# १

# निबंध वाङ्मय (१८७४-१९६०)

**घटक रचना :**

१.० उद्देश
१.१ प्रस्तावना
१.२ मराठी निबंधाची प्रेरणा आणि परंपरा
१.३ मराठी निबंध (१८१८ ते १९२०)
 १.३.१ १८१८ ते १८७४ या काळातील मराठी निबंध
 १.३.२ १८७४ ते १९२० या काळातील मराठी निबंध
 १.३.३ सत्यशोधक - ब्राह्मणेत्तर चळवळीतील मराठी निबंध
 १.३.४ दलित चळवळीतील निबंधकार
१.४ मराठी निबंध (१९२० ते १९६०)
 १.४.१ मराठी निबंधांचा प्रगत काळ
 १.४.२ मराठी ललित निबंध
 १.४.३ स्त्रीलिखित मराठी निबंध
१.५ समारोप
१.६ संदर्भ
१.७ नमुना प्रश्न

munotes.in

## १.० उद्देश

१) मराठी निबंध वाङ्मयाची प्रेरणा व परंपरा समजेल.
२) १८१८ ते १९२० या काळातील निबंधांचे स्वरूप आणि आशय लक्षात येईल.
३) १९२० ते १९६० या काळातील निबंधांचे स्वरूप आणि आशय लक्षात येईल.
४) १८१८ ते १९६० या काळातील निबंधांचे मराठी साहित्य आणि संस्कृतीसाठीचे योगदान लक्षात येईल.
५) सत्यशोधक, दलित चळवळीतील, स्त्रीलिखित आणि ललित निबंधाचे महत्त्व लक्षात येईल.

## १.१ प्रस्तावना :

मराठी वाङ्मयाच्या इतिहासात मराठी निबंधाला वेगळे महत्त्व प्राप्त झाल्याचे लक्षात येते. समाजप्रबोधन करण्यासाठी मराठी निबंधाचा साधन म्हणून उपयोग करण्यात आला. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा आणि अज्ञानवस्था यात अडकलेल्या जनतेला शहाणे करण्यासाठी

निबंधासारखे दुसरे साधन नव्हते. मराठी गद्यलेखनात निबंध वाङ्मयाला विशेष स्थान मिळाले आहे. मुळात निबंध हा वाङ्मयप्रकार मराठीमध्ये इंग्रजी साहित्याच्या परिचयातून आलेला आहे. ‘निबंध’ हा शब्द मराठी असला तरी त्याचा प्रकृतीधर्म हा पाश्चात्त्य आहे.

निबंधाला इंग्रजी भाषेत ‘एसे’ असे म्हणतात. ‘निबंधन’, ‘निबध्ननम्’ या संस्कृत शब्दावरुन मराठीत ‘निबंध’ हा शब्द अवस्थांतरित झाला. मात्र निबंध हा लेखनप्रकार संस्कृत नाही. संस्कृतमध्ये ‘बंधयुक्त’, ‘बद्ध असणे’, ‘बांधला जाणे’ या अर्थाने निबंध हा शब्द वापरला गेला आहे. महानुभाव वाङ्मयात ‘नीबंध काढविले’ असा उल्लेख आढळतो. ‘नीबंध’ याचा अर्थ कायदा अथवा नियम काढला असा होतो. त्यामुळे संस्कृत वा मराठी भाषेत पूर्वी निबंध लिहिला जात होता, याचे संदर्भ सापडत नाहीत. त्यामुळे निबंध हा वाङ्मयप्रकार पूर्णतः पाश्चात्त्य आहे असे म्हणता येते.

निबंध म्हणजे विशिष्ट विषयाचे तर्कशुद्ध नि पद्धतशीर आविष्करण की ज्यामध्ये सूत्रबद्ध विचाराचे प्रतिपादन असते. निबंधकाराचे व्यक्तिमत्त्व त्यात प्रतिबिंबित होत असते. त्यामुळे शास्त्र आणि साहित्य या दोन्ही अंगाने निबंध वाङ्मय आकारास येत असते. त्यामधून त्या त्या काळातील प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना मांडल्या जातात. मराठी निबंधाचा इतिहास समजून घेतला तर त्या त्या काळातील समाजजीवन, शासनविषयक बदल, भारतीयांची मनोवृत्ती, निबंधकारांची विचारदृष्टी याचा शोध घेता येतो. मराठी निबंधातून मांडलेले विचार हे पुढील प्रत्येक काळासाठी दिशादर्शक ठरु शकतात.

मराठी निबंधाचा इतिहास समजून घेताना निबंधाची प्रकृती आरंभ काळात जशी होती तशी पुढील काळात राहिलेली नाही, तिच्यात वेळोवेळी बदल झाले आहेत, हेही लक्षात येते. त्यामुळे मराठी वाङ्मयाचा इतिहास लक्षात घेताना मराठी निबंधाचा इतिहास अभ्यासणे म्हणजे भारतीय प्रबोधनाची परंपरा अभ्यासण्यासारखे आहे. पुढीलप्रमाणे निबंध वाङ्मय, मराठी निबंध यांचा कालखंडनिहाय, आशय-विषय निहाय अभ्यास करता येईल.

## १.२ मराठी निबंधाची प्रेरणा आणि परंपरा

मराठी वाङ्मयाच्या इतिहासात शिवकालीन ‘आज्ञापत्र’ आणि पुढील काळात लिहिलेल्या ‘बखरी’ यांचा अपवाद वगळता सर्वत्र पद्यलेखनच झालेले आढळते. महानुभाव वाङ्मयात ‘लीळाचरित्र’ हा गद्य ग्रंथ आढळतो. ही गद्यलेखनाची परंपरा पुढे विकसित झाली नाही. त्यासाठी इंग्रजी सत्तेचा उदय व्हावा लागला आणि एकोणिसावे शतक उजडावे लागले. गद्यलेखनाचा त्यातही निबंधलेखनाचा उदय होणे हे त्या त्या देशासाठी वैचारिकतेचा आरंभ मानावा लागतो. कारण निबंध हा प्रकार भावनेपेक्षा वैचारिकतेला अधिक जवळ करीत असतो. मराठी वाङ्मयात निबंध वाङ्मयाने प्रवेश केला तो इंग्रजी साहित्याच्या परिचयामुळे, त्यामुळे इंग्रजी साहित्यातील निबंधाचा परिचय करून घ्यावा लागतो.

इंग्लंडमध्ये सोळाव्या शतकात मायकेल एक्विम सियर डे माँतेन हा फ्रेंच साहित्यिक होऊन गेला. त्याने १५८० मध्ये २ व १५८८ मध्ये १ असे तीन खंड लिहिले, त्यातून ‘एसाय’ हा लेखनप्रकार लॅटिन भाषेतून लिहिला. माँतेन याने लिहिलेले एसाय (निबंध) हे आकाराने

लहान होते. 'ऑफ आयडेलनेस', 'ऑफ फ्रेंडशिप', 'ऑफ एक्सप्रिअन्स' अशा विषयांवर तो लिहीत असे. तो स्वतःच त्याच्या लेखनाचा विषय होता. बेकॉन, जॉन्सन, शेक्सपिअर असे वाचक त्याच्या लेखनाला मिळाले. असे असले तरी पहिला इंग्रजी निबंधकार म्हणून फ्रान्सीस बेकॉन याचा उल्लेख केला जातो.

फ्रान्सीस बेकॉन यांने 'एसाय' ह्या शब्दाऐवजी 'एसे' हा शब्द वापरुन लेखन केले. प्रथम लॅटिनमध्ये लिहून नंतर त्याचे इंग्रजीमध्ये रूपांतरण केले. १६१२ ते १६२५ या काळात बेकॉन याने एसे लिहिले. मॉंतेन आत्मनिष्ठतेने निबंध लिहीत होता तर बेकॉन हा वस्तुनिष्ठपणे लेखन करीत होता. त्याने वैयक्तिक अनुभवापेक्षा त्यातील विचारांना अधिक महत्त्व दिले.

बेकॉननंतर अब्राहम काउली याने गंभीर प्रकृतीची निबंधरचना केली. त्यानंतर डॅनिअल डिफो याने निबंध लिहिले. जॉन मिल्टन याने सामाजिक सुधारणाविषयी निबंध लिहिले. उदा. घटस्फोट हा कायद्याने घेता यावा, शिक्षण हे मानवी भावनेने दिले जावे, अशा विषयांवर मिल्टनने लेखन केले. पुढे जॉन ड्रायडन याने निबंधलेखन केले.

अठराव्या शतकात जोसेफ ॲडिसन आणि रिचर्ड स्टिल या जोडसंपादकांनी नियतकालिकातून निबंध लिहिले. १७११ मध्ये सुरु केलेल्या 'स्पेक्टेटर' या नियतकालिकातून त्यांनी निबंध लिहिले. नाटक, तमाशा, बायकांचा पेहराव, नवरा-बायकोची भांडणं अशा विविध विषयांवर ते लिहीत होते. या दोघांनी निबंध हा प्रकार वाढवला. पुढे डॉ. सॅम्यूअल जॉन्सन याने 'रँग्लर', 'ऐड़लर' या पत्रांतून 'विद्या', 'धर्म' या संबंधाने निबंध लिहिले. त्यानंतर गोल्डस्मिथ याने 'सिटीझन ऑफ द वर्ल्ड' मधून लेखन केले. लि. हंट याचे निबंध विक्षिप्त विषयांवर असायचे. एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमध्ये 'चार्ल्स लँब', हैजलिट, जेफरी, मेफॉले, कार्लाइल, मॅथ्यू अर्नाल्ड, जॉन मॉरले, आर.एच. हटन यांच्यासारखे निबंधकार लिहीत होते. याच काळात भारतात मराठी निबंधाचा उदय झाला.

इंग्रज भारतात आले आणि भारतात त्यातही महाराष्ट्रात नवे वारे वाहू लागले. असे असले तरी भारतीय माणूस पारंपरिक मानसिकतेत अडकलेला होता. अंधश्रद्धा, बालविवाह, सतीप्रथा, जरठकुमारी विवाह, अशा कित्येक अनिष्ट प्रथा, परंपरा होत्या. जातीयता कठोरपणे पाळली जात होती. चातुर्वर्ण्यव्यवस्थेतील खालच्या जातींना व स्त्रियांना शिक्षण घेता येत नव्हते. इंग्रजी सत्तेमुळे नवीन साहित्य, संस्कृती भारतीयांना समजून आली. ईस्ट इंडिया कंपनीने सतराव्या शतकात छापखाना सुरू केला होता. इंग्रजांचे शैक्षणिक धोरण उदारपणाचे होते. त्यांनी भारतात वृत्तपत्रेही सुरू केली. ख्रिस्ती मिशनरी आपल्या धर्माचा प्रसार करीत होती. या सर्वांचा परिणाम भारतीय पहिल्या शिक्षित पिढींवर झाला. त्यांनीही वृत्तपत्रे सुरू केली. ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' हे पाक्षिक सुरू केले आणि 'मराठी निबंधाचा जन्म झाला. ज्ञानप्रसाराच्या हेतूने मराठी वृत्तपत्रांनी संसार थाटला होता. ज्ञानदान करण्यासाठी, बोध देण्यासाठी, समाजाची सुधारणा करण्यासाठी, समाजाला जागृत करण्यासाठी वृत्तपत्रातून निबंध वाङ्मयाचा जन्म झाला आहे.' (२००९ : मोरे गिरीश, पृ. ३०)

एकूणच मराठी निबंध हा इंग्रजी साहित्य-संस्कृतीच्या प्रेरणेतून लिहिला गेला आहे. आरंभी भाषांतरित स्वरूपाचा मराठी निबंध पुढील काळात स्वतंत्रपणे लिहिण्यात आला. इंग्रजी संस्कृतीमुळे दीपून गेलेल्या पहिल्या पिढीने स्वबांधवांना शिक्षित, शहाणे करण्यासाठी निबंध या

वाङ्मयप्रकाराचा आधार घेतला. गद्यलेखन हे सरळ अर्थ प्रकट करते, त्या दृष्टीने निबंधातून थेट आशय, विचार प्रतिपादन करणे सोपे गेले.

## १.३ मराठी निबंध (१८१८ ते १९२०)

अभ्यासाच्या सोयीसाठी मराठी निबंधाची दोन कालखंडात विभागणी करता येईल. १८१८ ते १८७४ हा मराठी निबंधाचा 'अव्वल काळ' आणि १८७४ ते १९२० हा मराठी निबंधाचा 'विकास काळ' म्हणता येईल. प्रस्तुत ठिकाणी १८१८ ते १८७४ या काळातील मराठी निबंध कोणत्या आशयासह आविष्कृत होत होता याचे विवेचन करता येईल.

### १.३.१ १८१८ ते १८७४ या काळातील मराठी निबंध

१८१८ ते १८७४ या काळातील निबंध वाङ्मयातून तत्कालीन इंग्रजी राजवट, इंग्रजाची विचारसरणी, महाराष्ट्रीय जीवनावर नवजीवनाचे झालेले परिणाम, आक्रमण त्यामुळे त्यांच्या विचारात होणारे बदल याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते. आरंभीचे गद्यलेखन हे भाषांतरित स्वरूपाचे होते. सदाशिव काशिनाथ छत्रे हे इंग्रजी शिक्षण घेतलेले पहिल्या पिढीतील ग्रंथकार, त्यांनी १८२८ मध्ये 'बाळमित्र भाग १' हे पुस्तक लिहिले, 'चिल्ड्रन्स फ्रेंड' या इंग्रजी पुस्तकाचे ते भाषांतर आहे. यामधून त्यांनी सद्‌गुणांची प्रशंसा केली. सदाचरणामुळे समाधान मिळते, अन्यायाचे परिणाम हे वाईट होतात, अशा बोधपर विषयाची मांडणी या गद्यलेखनात आढळते. स.का. छत्रे यांनी 'नीतिकथा', 'वेताळ पंचविशी' हे ग्रंथही लिहिले. या लेखनास निबंध म्हणता येत नाही.

मोल्सवर्थ - कँडी यांनी 'इंग्रजी - मराठी कोशाचे' काम सुरू केले होते. त्यासाठी कँडी यांना परशुरामपंत गोडबोले यांनी मदत केली. १८५४ मध्ये त्यांनी 'नवनीत' हा काव्यग्रंथ लिहिला मात्र निबंधलेखन केले नाही. हरि केशव पठारे यांनी मात्र भाषांतरित ग्रंथ लिहिले. १८३३ मध्ये त्यांनी 'सिद्धपदार्थ विज्ञानशास्त्रविषयक संवाद' हा भाषांतरित ग्रंथ लिहिला. १८२७ मध्ये 'रसायनशास्त्रविषयक संवाद' हा ग्रंथ लिहिला. १८३८ मध्ये 'इंग्लंडचा वृत्तांत' हा ग्रंथ लिहून इंग्लंड देशाची तोंडओळख मराठी भाषिकांना करून दिली. त्यांचा १८४१ मध्ये प्रकाशित झालेला 'यात्रिक क्रमण' हा उत्तम भाषांतरित ग्रंथ. त्यांनी १८४६ मध्ये 'शालोपयोगी नीतिग्रंथ' हा ग्रंथ मराठी आणला. त्यांचा १८५१ चा 'देशव्यवहार व्यवस्था' हा ग्रंथ विविध विषयांमुळे गाजला. त्यांच्या वरील भाषांतरित ग्रंथांमधून मराठी निबंधाला जवळ जाईल असे लेखन त्यांनी केले आहे.

बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे पाक्षिक सुरू करुन मराठी निबंधाचा पाया घातला. 'दर्पण' मधील संपादकीय, स्फूट लेख व वाचकांची पत्रे म्हणजे मराठी निबंधलेखनाचा आरंभ होय. शं. गो. तुळपुळे स्पष्ट शब्दात लिहितात, "दर्पण नावाच्या पाक्षिकात लिहिलेले प्रारंभीचे प्रास्ताविक स्वरूपाचे लेख 'आद्य मराठी निबंध' या पदवीस तत्वत: पात्र ठरतील असे वाटते." (१९६६ : तुळपुळे शं.गो., पृ. ५)

बाळशास्त्री जांभेकर यांनी विविध विषयांवर लेखन केले असले तरी त्या लेखनास निबंध नाव मिळाले नव्हते. 'नियतकालिक लेखांपासून जे स्वार्थ होतात त्यांविषयी', 'इंग्लंड

देशांतील राज्यरीतीत बदल करण्यासंबंधी यत्न', 'शेतकरी लोकांस सरकारचे उत्तेजन', 'विद्या हे बळ आहे', 'रहदारी जकाती', 'हिंदुस्थानातील नाच तमाशे हा गुलामगिरीचा एक प्रकार आहे'. अशा महत्त्वपूर्ण विषयांवर त्यांनी लिहिले आहे. समाजप्रबोधन ही त्यांच्या लेखनामागची प्रेरणा होती. बालविवाह, जरठकुमारी विवाह यामागे अज्ञान-अंधश्रद्धा आहे असे त्यांना वाटत होते.

देशाची प्रगती होत असताना सामान्य जनतेला सुख मिळाले पाहिजे, केवळ मूठभर लोकांना सुख मिळून उपयोगाचे नाही, असा विचार जांभेकर मांडत होते. लोकांना माहिती देण्यासाठीसुद्धा ते लिहीत होते. 'प्राचीनधर्म व हिंदूधर्म' ह्या लेखनात कर्नल वानस केनडी यांच्या ग्रंथाविषयी माहिती देतात. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लेखन केले. जकातीचा प्रश्न मांडताना ते लिहितात, "जकाती भारी आणि सर्वास सारख्या नाहीत, विलायती माल जकाती-रहीत आहेत आणि ते कुशाल जावु देतात, परंतु गावठी माल ज्यांस सांभाळून, आश्रय दिला पाहिजे होता, त्यावरी भारी कर घातले आहे." (१९५० : जांभेकर बाळशास्त्री, पृ. ५३) यावरुन शेतकऱ्याचे दु:ख ते मांडत होते हे लक्षात घेता येते.

१८४० मध्ये जांभेकरांनी 'दिग्दर्शन' हे मासिक सुरू केले. त्यातील 'आशा' हा निबंध मानसशास्त्रीय विचार मांडणारा आहे. अनैतिक वर्तन हे देशासाठी हानिकारक आहे असा विचार त्यांनी मांडला. विद्या हे बळ आहे, गुलामगिरी ही सर्वांसाठी नाशकारक आहे, विद्येवाचून जो मनुष्य तो पशू आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली. त्यामुळे अव्वल इंग्रजी काळातील एक महत्त्वाचे आणि आद्य निबंधकार म्हणून बाळशास्त्री जांभेकर यांचा उल्लेख करावा लागतो.

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी १८४९ मध्ये 'परमहंस सभा' स्थापण्यात पुढाकार घेतला. १८४८ मध्ये स्थापलेल्या 'ज्ञानप्रसारक मंडळी'च्या मराठी विभागाचे ते अध्यक्ष होते. १८३६ मध्ये त्यांनी 'मराठी भाषेचे व्याकरण' लिहिले. त्याची 'प्रस्तावना म्हणजे मराठी व्याकरण व भाषाशास्त्रावरील सुबोध असा निबंध होय' (तत्रैव : मोरे गिरीश, पृ. ५४) १८४८ मध्ये त्यांनी 'विद्येच्या लाभाविषयी' या विषयावर भाषण केले, त्यातही निबंधाचे विशेष आढळतात. 'यमुणापर्यटन' (१८५७) या कादंबरीत त्यांनी एक संस्कृत लेख जोडला, त्याचे मराठी भाषांतर (पुनर्विवाहविषयक लेख) म्हणजे उत्तम निबंध आहे. मोरोपंतांच्या 'श्लोककेकावली' वर त्यांनी 'यशोदा पांडुरंगी' नावाने टीका लिहिला, ही टीका म्हणजे समीक्षात्मक लेख आहे.

गो. ना. माडगावकर यांनी आपल्या लेखनातून शास्त्रीय विचार मांडले. १८५१ मध्ये 'सृष्टीतील चमत्कार' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. मराठी ज्ञानप्रसारक मासिकातूनही त्यांनी निबंध लिहिले. 'सुचिभूर्तपणा', 'ऋणानिषेधक बोध', 'नीतिसंवाद', 'सत्यानिरुपण', 'पत्रावळी व द्रोण', 'मुंबईचे वर्णन' अशा पंधरांपेक्षा अधिक ग्रंथांमधून त्यांचे विचार समजून घेता येतात. वर्तनातूनच सुख मिळविता येते हा त्यांच्या निबंधातील केंद्रवर्ती विचार आहे. त्यांनी उद्योगाचा पुरस्कार केला. शास्त्रीय विषयाला त्यांनी महत्त्व दिले. 'उभ्दिदजन्य पदार्थ' मधून ते मानवाच्या सेवनात येणाऱ्या पदार्थ व फळभाज्यांविषयी माहिती देतात. 'मादक पदार्थ' या निबंधातून त्यांनी व्यसनाविरोधी विचार मांडले. त्यांच्या निबंधात समाजसुधारणेपर विचारही आढळतात. त्यामुळे मराठी निबंध वाङ्मयातील गो.ना. माडगावकर यांचे योगदान लक्षात घ्यावे लागते.

मिसेस फेरार या ख्रिस्ती लेखिकेने १८३५ मध्ये 'कुटुंबप्रवर्तननीति' हा निबंध लिहिला. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांविषयी कसे वागावे याविषयी त्यांनी विचार मांडले. हा निबंध इंग्रजी

ग्रंथावरुन मराठीत लिहिला आहे. उपदेशपरता हा त्यांच्या लेखनाचा विशेष आहे. याच काळात भाऊ महाजन हेही लिहीत होते. गोविंद विठ्ठल कुंटे म्हणजे भाऊ महाजन यांनी १८४१ मध्ये 'प्रभाकर' हे साप्ताहिक सुरू केले. हिंदु धर्मावर होणाऱ्या टिकेला त्यांनी उत्तर दिले. समाजातील अचरट चालींवर त्यांनी विचार मांडले. इंग्रजी राज्यपद्धतीवर त्यांनी टीका केली. मराठीवर असणारे प्रेम व्यक्त केले. शिक्षणाशिवाय समाज जागा होणार नाही असे त्यांना वाटत होते. इंग्रजी शिकणाऱ्यांकडून मराठीची होणारी अवहेलना त्यांनी सहन केली नाही. 'पुनर्विवाह प्रतिबंधामुळे अनर्थ' या निबंधात त्यांनी पुनर्विवाहाचे समर्थन केले. एकूणच मराठी भाषेचा पुरस्कार आणि इंग्रजी राज्यपद्धतीवर टीका करणारा निबंधकार म्हणून भाऊ महाजन यांची नोंद घ्यावी लागते.

या काळात निबंध वाङ्मयात उल्लेखनीय भर टाकणाऱ्यांमध्ये लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांची नोंद घ्यावी लागते. त्यांनी 'प्रभाकर' पत्रातून १८४८ ते १८५० या दरम्यान १०८ पत्रे लिहिली. त्यांना 'शतपत्रे' म्हटली जातात. त्यांचे प्रत्येक शतपत्र म्हणजे निबंध होय. त्यातून त्यांनी स्त्रीशिक्षण, बालविवाह, केशवपन, पुनर्विवाह अशा विषयांवर विचार मांडले. कालबाह्य, कर्मठ रूढींना त्यांनी दूर केले. 'विनंती विशेष' या शब्दातून ते निबंधलेखनाची सुरुवात करीत. ब्राह्मणांच्या वर्तनाचा त्यांनी कडक शब्दात समाचार घेतला आहे. 'हिंदु लोक हे आजकालपर्यंत गाढ निद्रेत आहेत, ती जाण्यास बहुत ग्रंथ व बहुत ज्ञान पसरले पाहिजे' (१९६७ : देशमुख गोपाळ हरी, पृ. १०) असा विचार त्यांनी मांडला. पारंपरिक रूढी प्रथांना त्यांनी नकार दिला. ग्रंथप्रामाण्याला विरोध केला. धर्माची व्यापक संकल्पना त्यांनी मांडली. जातिभेदास काय आधार? हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांनी इंग्रजी राजवटीचे स्वागत केले. 'इतिहासाची जाणीव, धर्म विषयक पुरोगामी भूमिका, विद्येवरची श्रद्धा, समाजसुधारणेचे प्रयत्न आणि आत्मपरिक्षण या बाबींमुळे लोकहितवादींना मराठी साहित्यामध्ये मानाचे स्थान मिळाले आहे.' (२००९ मोरे गिरीश पृ. ८३)

अव्वल इंग्रजी काळात कृष्णाशास्त्री चिपळूणकर यांचा निबंध लेखक म्हणून उल्लेख करावा लागले. ख्रिस्ती धर्माच्या वाढत्या प्रचाराला रोखण्यासाठी त्यांनी १८५२ मध्ये 'विचारलहरी' हे पत्र सुरू केले. त्यातून सामाजिक विषयावर लेखन केले. 'पाठशाळापत्रक' मधून त्यांनी २५ निबंध लिहिले; त्यास 'मराठी व्याकरणावरील निबंध' असे नाव दिले. भाषेचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करण्याची त्यांनी भूमिका घेतली. 'विद्यानंदाविषयी' या निबंधातून त्यांनी विद्येचे महत्त्व पटवून दिले. 'अनेकविद्या मूलतत्व संग्रह' या ग्रंथात त्यांनी विविध शास्त्रांमधील सिद्धांत स्पष्ट केले. मराठी भाषा, व्याकरण, ख्रिस्ती धर्मप्रसाराला विरोध, विद्यार्जन असे विषय घेऊन नवविचार मांडणारे निबंधकार म्हणजे कृष्णशास्त्री चिपळूणकर होत.

या काळात विष्णुबुवा ब्रह्मचारी म्हणजे विष्णु भिकाजी गोखले यांचे निबंध वेगळे विचार मांडत होते. त्यांनी हिंदू धर्माची बाजू घेतली. अतिशय कट्टरतेने त्याचा पुरस्कार केला. 'वेदोक्त धर्मप्रकाश' (१८५९), 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' (१८६७), 'सहजस्थितीचा निबंध' (१८६८), 'वेदोक्त धर्माचा विचार व ख्रिस्ती मत खंडन' (१८७४) अशा निवडक ग्रंथांमधून त्यांनी पुरोगामी विचारांना धार्मिक परिभाषेत बसविण्याचा प्रयत्न केला. वेदोक्त धर्माचे पुनरुज्जीवन व्हावे ही भूमिका त्यांनी घेतली तर लोकशाही राज्यकारभाराचीही बाजू घेतली. त्यांनी आदर्श राज्याची मांडलेली संकल्पना विशेष लक्षात घ्यावी लागते. कुणीही आयते खाणार नाही, राजा हा वंशपरंपरेने नव्हे तर सर्वांतून निवडावा ही भूमिका त्यांनी घेतली. यावरुन त्यांच्या विचारातील दोन टोक सहज लक्षात येतात.

या कालखंडातील अतिशय महत्त्वाचे निबंधलेखक म्हणून जोतीराव फुले यांचा उल्लेख करावा लागतो. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा आणि पोथीनिष्ठ समाजाविरुद्ध त्यांनी लेखन केले. त्यांच्या निबंधात विवेकनिष्ठ विचार आढळतो. 'गुलामगिरी' (१८७३), 'पुणे सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट' (१८७५), 'सत्यशोधक समाजाच्या तिसऱ्या वार्षिक समारंभाची हकिगत' (१८७६), 'पुणे सत्यशोधक समाजाचा निबंध व वक्तृत्व समारंभ' (१८७७), 'हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन' (१८८२), 'शेतकऱ्याचा असूड' (१८८३), 'सार्वजनिक सत्यधर्म' (१८९१) या ग्रंथांमधून जोतीराव फुले यांचे विचार समजून घेता येतात.

जोतीराव फुले यांच्या निबंधातून व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, कृषकउद्धार सामाजिक न्याय, समता, लोकशाही या विषयांवर मांडलेले विचार आढळतात. २४ मे १८८५ रोजी पुणे येथे भरलेल्या लेखकांच्या परिषदेचे निमंत्रण त्यांना मिळाले. न्या. रानडे यांच्या या निमंत्रणास त्यांनी दिलेले उत्तर मार्मिक स्वरूपाचे आहे. '... उंटावरुन शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारास व मोठमोठ्या सभास्थानी आगंतुक भाषण करणारांस कोठून (शूद्रातिशूद्रांचे दुःख) कळणार' (१९९१ : फुले जोतिराव, पृ. ३४४) असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. 'शेतकऱ्याचा असूड' मधून त्यांनी भारतीय शेतकरी आणि शेती या विषयी ससंदर्भ लिहिले आहे. अविद्येमुळे शूद्रातिशूद्र हे गुलामीत राहातात, शेतकऱ्यांना शिक्षण दिले पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली. लॉर्ड मेकॉले यांच्या 'शिक्षणविषयक झिरपण्याचा सिद्धांत' त्यांनी नाकारला.

त्यांनी आपल्या लेखनातून धार्मिक विचार मांडले. सत्य म्हणजे धर्म, त्यामुळे सत्यानुसार वर्तन करण्यावर त्यांनी भर दिला. वेदांना दूर करुन, दानधर्माचा धिक्कार करुन, निर्मिकाचा स्वीकार करणारे जोतीराव फुले हे बंडखोर निबंधकार होते. त्यांनी ब्रिटिश राजवटीचे स्वागत केले असले तरी त्यांच्यावर टिकाही केली. विद्येसाठी लोकल फंड गोळा करणे, जकाती बसवणे, जंगलावर अधिकार स्थापणे अशा इंग्रजी वर्तनामुळे शेतकऱ्याच्या दुःखात भर पडली असे विवेचन त्यांनी केले. विषय मांडताना ठिकठिकाणी त्यांनी विविध ग्रंथांचे संदर्भही दिले आहेत. त्यामुळे सामाजिक सुधारणेचा आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीचा विचार मांडणारे जोतीराव फुले यांचे निबंधलेखन पुढील पिढ्यांना दिशादर्शक ठरतात.

जोतीराव फुले यांच्या शाळेतील मुक्ता साळवे ही अस्पृश्य जातीतील विद्यार्थीनी, तिने वयाच्या अकराव्या वर्षी 'मांगमहाराच्या दुःखाविषयी निबंध' लिहिला. १ मार्च १८५५ च्या 'ज्ञानोदय' मध्ये तो प्रसिद्ध झाला. प्रत्यक्ष ईश्वराबरोबर संवाद करुन तिने काही प्रश्न उपस्थित केले. निसर्गतः सर्वजण समान असूनही हा भेदभाव का? वेदाप्रमाणे वर्तन करणे हा ब्राह्मणांचा धर्म आहे, असा धर्म इतरांना का नाही? माणसांना धर्म असला पाहिजे, हे सांगताना मुक्त लिहिते, "मुसलमान लोक कुराणाच्या आधारे करुन व इंग्रज लोक बैबलाच्या आधारे करुन, आणि ब्राह्मण लोक वेदाधारे करुन चालतात... हे भगवान तुजकडून आलेला कोणता धर्म तो आम्हास कळीव, म्हणजे आम्ही सर्व त्यांच्यासारख्या रीतीने अनुभव घेवू..." (१९९१ : साळवे मुक्ता, पृ. ७४७) ही मागणी करताना मुक्ता पेशवाईत महार-मांगांवर किती अत्याचार होत होता याचे वर्णन करते. पेशवाईपेक्षा इंग्रजशाही चांगली आहे असे मुक्ताला वाटते. या निबंधाच्या शेवटी यावर उपाय सुचविताना ज्ञानरूपी औषध घेण्यास ती सांगते. त्यामुळे निबंध वाङ्मयाच्या इतिहासात मुक्ता साळवे हिच्या निबंधाची नोंद करावीच लागते.

ताराबाई शिंदे यांनीही १८८२ मध्ये 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध लिहिला. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते बापूजी हरि शिंदे यांच्या कन्या म्हणजे ताराबाई शिंदे. स्त्रीवर होणारा अन्याय, स्त्रियांना आलेली दुःखद स्थिती यास कोण जबाबदार आहे, याविषयीचे आधार विवेचन म्हणजे सदरील निबंध आहे. अज्ञान, धर्म आणि पुरुष ह्या तीन घटकांमुळे स्त्री ही मानसिक गुलामगिरीमध्ये जगत आहे, असे ताराबाईंना वाटते. स्त्रियांना ज्ञानापासून वंचित ठेवले, पुरुषांनी त्यांच्या सोयीचे धर्मग्रंथ लिहिले त्यातून बालविवाह, केशवपन, बहूपत्नीकत्व, पुनर्विवाह प्रतिबंध, जरठ कुमारी विवाह अशा प्रथा निर्माण केल्या यावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. स्त्री पतिव्रता असावी, ही सक्ती पुरुषांनाही असली पाहिजे. आपले विचार स्पष्ट करण्यासाठी त्यांनी महाभारत, रामायण, संत साहित्य आणि मराठी साहित्यातील दाखले दिले आहेत. स्त्रीवादी चळवळ नसतानाही स्त्रीवादी विचाराचे प्रतिबिंब वरील निबंधात पडल्याने ह्या निबंधाचे महत्त्व वाढले आहे.

विष्णुशास्त्री पंडित यांनी आपल्या निबंधातून बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह अशा प्रश्नांवर विचार मांडले. 'ब्राह्मण कन्या विवाह विचार' (१८६४), 'पुरुष सूक्त व्याख्या' (१८६४), 'विधवा विवाह' (१८६५), 'स्मृतिशास्त्र व्याख्यान' (१८७३), 'शूद्रधर्म' (१८७३), 'स्त्रियांचे अधिकार - व्याख्यान' (१८७५) अशा अनेक लेखन व्याख्यानातून त्यांनी स्त्री सुधारणेसाठी व समाजसुधारणेसाठी विचार मांडले.

बाबा पद्मनजी यांच्या 'यमुणापर्यटन' ह्या कादंबरीचा उल्लेख केला जातो, मात्र त्यांचे निबंधलेखनही प्रसिद्ध आहेत हे लक्षात घ्यावे लागते. १८५१ मध्ये त्यांनी विविध विषयांवर स्वतंत्रपणे निबंध लिहिले, त्यातील एकत्रित निबंधाच्या पुस्तकास त्यांनी आरंभी 'सर्वसंग्रही' ऐवजी नंतर 'निबंधमाला' हे नाव दिले. बौद्ध, ख्रिश्चन, हिंदू, पारशी, मुस्लिम अशा धर्माविषयी त्यांनी विचार मांडले. १८५२ मध्ये त्यांनी 'स्त्री विद्याभ्यास' हा निबंध लिहिला. त्यात स्त्रीसुधारणेविषयी विचार मांडले. 'हिंदू लोकांच्या सणाविषयी निबंध' (१८५३) लिहून त्यांनी कर्ज काढून सण साजरा करण्याविषयी निषेध व्यक्त केला. 'व्यभिचारनिषेधक बोध' (१८५४) ह्या निबंधातून त्यांनी व्यभिचाराचा निषेध केला. 'कुटुंबाची सुधारणा' ह्या निबंधात पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, बालविवाह, सद्वर्तन अशा विषयांवर आपली मते मांडली आहेत. त्यामुळे निबंध लेखक बाबा पद्मनजी यांचे निबंध वाङ्मयाच्या इतिहासातील योगदान स्वीकारावे लागते.

या काळात भाऊ दाजी लाड, वि.ना. मंडलिक, वामन आबाजी मोडक, यांचेही काही निबंध प्रसिद्ध झाले होते. भाऊ दाजी लाड यांनी पुराणवस्तू संशोधन आणि वाङ्मयावर विचार मांडले. वि.ना. मंडलिक यांनी प्राचीन परंपरेचा अभिमान व्यक्त केला. वामन आबाजी मोडक यांनी सुधारणावादी विचार मांडले. यांमध्ये डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे निबंध मात्र वेगळा विचार मांडताना आढळतात. प्रार्थना समाजाचे स्वरूप समजावे यांसाठी त्यांनी लेखन केले, व्याख्यानेही दिली. प्राचीन भारतीय विद्येविषयी त्यांनी संशोधन केले, प्राच्यविद्यातज्ज्ञ भांडारकरांचे 'महाभारताचा काळ' (१८७३), 'श्रीकृष्णा संबंधीचे उल्लेख' (१८७४), 'हिंदुस्थानातील वेद पठण' (१८७४) याशिवाय 'वेदाज इन इंडिया' हे लेख लक्षणीय आहेत. 'भारताचा सामाजिक इतिहास' या ग्रंथातून त्यांनी जातिसंस्थेविषयी विचार मांडले. 'महाविद्यालयीन शिक्षणाची ध्येय व उद्दिष्ट्ये' हा निबंध त्यांची शिक्षणविषयक दृष्टी मांडतो. धार्मिक संदर्भात त्यांनी एकेश्वरवाद मांडला मात्र पारंपरिक ईश्वरभक्तीला विरोध केला.

नारायण महादेव परमानंद उर्फ मामा परमानंद यांनी 'इंदुप्रकाश' आणि 'नेटिव्ह ओपिनियन' मधून लेखन केले. 'मराठी ज्ञानप्रसारक सभेची सद्यःस्थिती' (१८५६), 'ईर्षा' (१८५७), 'प्रपंचासाठी काही विचार' (१८५७), 'सिंध व तेथील लोक' (१८६३) या महत्त्वपूर्ण चार निबंधात मामा परमानंद यांचे विचार लक्षात येतात. जोतीराव फुले यांच्याशी त्यांचे वैचारिक मतभेद असले तरी विशेष सख्य होते. 'आपले लोक मराठी ही जी आपली स्वभाषा तिजकडेस अगदीच लक्ष देत नाहीत. जेणेकरुन मराठी सुधारत नाही, इतकेच नाही, परंतु ती बिघडते व तीत पुष्कळ ग्रंथही होत नाहीत ही फार वाईट गोष्ट आहे.' (१९९३ : मामा परमानंद, पृ. ५९) यावरुन त्यांचे स्वदेशाभिमान आणि स्वभाषाभिमान लक्षात येतो.

न्या. महादेव गोविंद रानडे यांचे निबंध हे समन्वयवादी भूमिकेतून आविष्कृत झाले आहेत. जुने आणि नवे यांचा मेळ ते घालत होते. माणूस हा सर्व दृष्टीने उन्नत झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यांचे राजकीय विचार हे जहाल तर सामाजिक विचार हे मवाळ स्वरूपाचे होते. ते उदारमतवादी दृष्टीने सभोवतालकडे पाहात होते. मराठ्यांच्या इतिहासबद्दल ते प्रेम व्यक्त करतात. 'तरुण शिकलेल्या लोकांची कर्तव्ये' (१८५९), 'प्रजावृद्धीचे दुष्परिणाम' (१८६४) या निबंधात ते एकात्मिक दृष्टीने विचार मांडतात. संत एकनाथांच्या ओव्यांधारे त्यांनी भागवत धर्म स्पष्ट केला. जमा केलेल्या संपत्तीपेक्षा मनाची शुद्धी फार आवश्यक असते असा ते विचार करीत.

या काळात काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांनी 'नावल व नाटक ह्यासंबंधी निबंध' (१८७२) हा लेख लिहिला. त्यापूर्वी १८६९ मध्ये त्यांनी 'वेदांविषयी निबंध' लिहिला होता. इंग्रजी काळात मराठी कादंबरी ही कल्पनारम्यात अडकली आहे, वास्तव जीवन कुठेही आढळत नाही याविषयी आपले मत व्यक्त केले. आपल्या मतपुष्ठ्यार्थ त्यांनी या काळातील 'मंजुघोषा', 'विचित्रपुरी', 'मुक्तामाला', 'सुलोचना', 'रत्नप्रभा', 'मोचनगड' ह्या कादंबऱ्यांतील उतारे दिले आहेत. 'शांकुतल', 'मुद्राराक्षक', 'कुमार संभव' ह्या नाटकांधारे त्यांनी नाट्यवाङ्मयावर प्रकाश टाकला आहे. नावल व नाटक ह्यासंबंधी निबंध लिहून का.बा. मराठे यांनी मराठी समीक्षेची वेगळी दिशा सूचित केली आहे.

रा. भि. गुंजीकर यांनी आपल्या निबंधातून मराठी भाषेविषयीचा अभिमान व्यक्त केला. त्यांनी १८६७ मध्ये 'विविध ज्ञानविस्तार' हे मासिक सुरू केले. 'बंगाली व्याकरण', 'कानडी भाषा' ह्या लेखातून त्यांची भाषिक जाणकारी लक्षात येते. 'महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धी' (१८६९), 'भारत खंडाच्या निकृष्टावस्थेची कारणे व उत्कर्षाचे उपाय' (१८७५), 'विद्याबुद्धीच्या कामी आमची अनास्था' (१८८७) अशा अनेक निबंधात त्यांची भूमिका व्यक्त झाली आहे. 'भारत खंडामध्ये एक भाषा करण्याचा विचार आणि नवीन विद्वानांचा अविचारीपणा' या निबंधात त्यांनी व्यक्त केलेला मराठी भाषेचा अभिमान लक्षात घेता येतो. सरकारने देशी भाषांकडे दुर्लक्ष करू नये, इंग्रजी भाषेसह देशी भाषांना विद्यापीठात स्थान द्यावे असे मत त्यांनी मांडले. देशी भाषांमध्ये इंग्रजी शब्दांची धुडघूस होत आहे, हे निरीक्षण त्यांनी 'देशभाषांची दूर्दशा' ह्या निबंधात मांडले. याशिवाय त्यांनी स्त्रीशिक्षणासंबधानेही विचार मांडले आहेत.

१८१८ ते १८७४ या कालखंडात महादेव गोविंद कोल्हटकर, केरुनाना लक्ष्मण छत्रे, रघुनाथशास्त्री भास्कर गोडबोले, वामन दाजी ओक, सखाराम मनोहर दीक्षित, रामकृष्ण

विश्वनाथ, नीळकंठ जनार्दन कीर्तने, विनायक जनार्दन कीर्तने, भास्कर दामोधर पाळंदे यांनीही आपल्या परीने निबंध वाङ्मयात भर घातली.

एकंदरीत १८१८ ते १८७४ हा मराठी निबंध वाङ्मयाचा पहिला महत्त्वाचा टप्पा मानता येतो. अव्वल इंग्रजी काळ असूनही मराठी निबंधाचा उगम आणि त्याची जोपासना किती स्वतंत्रपणे झाली हे समजून येते. जांभेकर, तर्खडकर, माडगावकर, भाऊ महाजन, लोकहितवादी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, विष्णुशास्त्री पंडित यांनी समाजसुधारणापर मांडलेले विचार तर जोतीराव फुले, मुक्ता, ताराबाई शिंदे यांनी सत्यशोधकीय भूमिकेतून मांडलेले विचार समजून घेणे म्हणजे मराठी निबंध वाङ्मयातील विविध विचार प्रवाह समजून घेण्यासारखे आहे. या काळात भारतीय समाजव्यवस्थेतील विविध प्रश्नांवर निबंध लिहिले गेले. अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा, स्त्रीशिक्षण, ज्ञानार्जनाचे महत्त्व, स्वधर्म-स्वभाषाभिमान, धर्मसुधारणा, शेतकऱ्यांची प्रगती, मनःशुद्धी, देशाविकास, भाषा व मराठी साहित्य या संबंधाने निबंधकार लिहित होते. परंपरेचा अभिमान आणि इंग्रजी नवविचारांचे आकर्षण यांमध्ये सुशिक्षित पिढी अडकलेली होती याचे स्पष्ट चित्र या काळातील मराठी निबंधांतून समोर येते.

### १.३.२ १८७४ ते १९२० या काळातील मराठी निबंध

१८७४ ते १९२० या कालखंडात मराठी निबंध वाङ्मयाने मागील काळाच्या तुलनेने विविध क्षेत्रात मार्गक्रमण केले. १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाला' हे मासिक सुरू करुन राजकीय विचाराला प्राधान्य दिले. त्यामुळे टिळक-आगरकरांसारखे निबंधलेखक उदयास आले. शि.म. परांजपे, न.चिं. केळकर, अ.ब. कोल्हटकरांसारखे स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश यांविषयी प्रेम व्यक्त करणारे निबंधकार तयार झाले. वि. का. राजवाडे यांनी इतिहास संशोधनाचा मार्ग स्वीकारला. देशभक्तीचा उच्चार अधिकतेने होऊ लागला. या काळातील काही महत्त्वपूर्ण निबंधलेखकांच्या निबंधांचे आशय-रूप पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

विष्णुशास्त्री चिपळूणकर हे या काळातील महत्त्वाचे निबंधकार. १८७४ मध्ये त्यांनी 'निबंधमाला' हे मासिक सुरू केले. लोकांत राष्ट्रवाद रूजावा यासाठी सात वर्षे हे मासिक चालवले. १८८० मध्ये टिळक-आगरकरांच्या मदतीने 'न्यू इंग्लीश हायस्कूल' सुरू केले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रवाद, धर्माभिमान वाढावा यासाठी प्रयत्न केले. 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' हा त्यांचा पहिला निबंध तर 'आमच्या देशाची स्थिती' हा शेवटचा निबंध. देशाभिमान हा त्यांच्या निबंधातील केंद्रवर्ती विचार आहे. निबंधमालेमधून त्यांनी एकूण ७४ निबंध लिहिले. भाषा, वाङ्मय, इतिहास, समाज, मतखंडन आणि ग्रंथपरीक्षण या अंगांनी त्यांनी विचार मांडले. 'विद्वत्व आणि कवित्व', 'वाचन' यांतून वाङ्मयाविषयक विचार मांडले. ते म्हणतात, "वर्णावयाच्या गोष्टीचा साक्षात अनुभव कवीस अगदी अवश्य पाहिजे" (१९९३ : चिपळूणकर विष्णुशास्त्री, पृ. ४०) त्यांनी 'जॉन्सनचे चिरित्र' लिहिले. त्यांचे 'इंग्रजी भाषा', 'भाषांतर', 'लेखनशुद्धी', 'भाषापद्धती', 'भाषादुषण', 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' हे निबंध भाषेविषयी विचार मांडतात. 'आमच्या देशाची स्थिती', 'संपत्तीचा उपभोग' व 'लोकभ्रम' या निबंधात त्यांचे समाजविषयक विचार आढळतात. 'गर्व' हा निबंध मानसशास्त्रीय विचार मांडतो. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांच्या अभिमान व्यक्त करणारे निबंधलेखक म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची नोंद घेतली जाते.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी चिपळूणकरांच्या विचारांना व्यापक रूप दिले. स्वराज्य हे टिळकांच्या लेखणीचे मध्यमर्ती सूत्र होते. त्यांनी समाजसुधारणेला विरोध केला. स्त्रीशिक्षणापेक्षा स्वराज्य महत्त्वाचे मानले. संमतीवयाच्या कायद्याला विरोध केला. देशातील स्थिती, देशभाषेतील ग्रंथ आणि विलायतेमधील राजकारण यांची माहिती स्वदेशी बांधवांना कळावी यासाठी त्यांनी 'केसरी' सुरू केले. देशाच्या प्रगतीला कोणती ग्रहणे लागली आहेत, याविषयी विचार मांडले. प्रथम राष्ट्राचे हित आणि नंतर प्रजेचे हित हे त्यांचे धोरण होते. 'केसरी' बरोबर त्यांनी 'मराठा' हेही पत्र सुरू केले होते. ब्रिटिशांच्या नोकरशाहीवर त्यांनी जोरदार टीका केली. 'उजाडले पण सूर्य कुठे आहे?', 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?', 'तुम्ही आपल्या हाताने जेवणार का नाही?', 'हा म्हातारचाळ का पोर खेळ?' असे किती तरी बेधडक प्रश्न त्यांनी ब्रिटिशांना विचारले. बाजारु-कारकुनी तयार करणाऱ्या शिक्षणापेक्षा राष्ट्रीय शिक्षणावर त्यांनी भर दिला. 'स्वदेश, स्वभाषा ही निसर्गतः उत्पन्न झालेली आहेत' (१९७६ : टिळक खंड-४, पृ. १२६) असे त्यांना वाटते. वेदोक्त प्रकरणात त्यांनी राजर्षी शाहूंचे क्षत्रियत्व नाकारले. एकूण समाजसुधारणेपेक्षा देश सुधारणेला टिळकांनी दिलेले महत्त्व हे विशेष नोंद घेण्यासारखे आहे.

गोपाळ गणेश आगरकर यांनी मात्र आपल्या निबंधातून राजकीय विषयापेक्षा सामाजिक विषयांचा पुरस्कार केला. १८८८ मध्ये त्यांनी 'सुधारक' हे पत्र काढले. प्रारंभी 'केसरी'तून त्यांनी राजकीय विषयावर लिहिले होते. पुढे त्यांनी समाजातील प्रश्नांवर विवेकनिष्ठ भूमिकेतून विचार मांडले. स्वधर्मातील दोष दाखविण्यासाठी ते डगमगले नाहीत. समाजपरिवर्तनाच्या भूमिकेतून ते लिहित होते. 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार' असे त्यांच्या विचारांचे स्वरूप होते. पुरोगामी विचार आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते म्हणून त्यांना ओळखले जाते. लोकशिक्षण आणि समाजसुधारणा यावर त्यांनी निबंधातून विचार मांडले. लोकांच्या मनातील खोट्या, आचरट जाऊन कल्पना आधुनिकता यावी यासाठी त्यांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. रूढी आणि अंधेश्रद्धेविरुद्ध आगरकर पेटून उठतात. याशिवाय अंगरखा कसा असावा, स्त्रियांनी जोडा कोणता घालावा, अशा लहान-सहान प्रश्नांविषयीसुद्धा त्यांनी निबंध लिहिले. विवेकवाद हा त्यांच्या लेखनाचा पाया होता. धर्मातील कर्मकांडामुळे मनुष्यास दु:ख प्राप्त होते असे त्यांना वाटते. त्यांनी सुधारकांचे बोलके, वागते आणि सुधारणानिंदक असे तीन वर्ग केले. हिंदूधर्मातील शिमगा हा सण सर्वात लज्जास्पद आहे, हे त्यांनी पटवून दिले. स्त्रीवर्गाविषयी ते लिहितात, "जोपर्यंत स्त्री जातीविषयी व स्त्रियांच्या असाधारण गुणाबद्दल पूज्यबुद्धी उत्पन्न झाली नाही, जोपर्यंत स्त्री म्हणजे प्रजनन यंत्र होय, जोपर्यंत स्त्री तुमची दासी होय, तोपर्यंत हा उद्दामपणा व बेशरमपणा जाणे फार कठीण आहे." (१९८४ : आगरकर गो.ग., खंड १, पृ. २६९) त्यांनी संमतीवयाच्या कायद्याचा पुरस्कार केला. त्यामुळे आगरकरांची नोंद बुद्धिप्रामाण्यवादी निबंधकार म्हणून केली जाते.

या काळात शिवराम महादेव परांजपे यांनी आपल्या निबंधातून प्रखरपणे स्वदेशनिष्ठा व्यक्त केली. 'स्वराज्य', 'वंदे मातरम्' असे शब्द उच्चारण्यास बंदी होती, त्या काळात म्हणजे १८९८ मध्ये त्यांनी 'काळ' हे पत्र सुरू केले. त्यांनी सशस्त्र क्रांतीचे समर्थन केले. जनतेत स्वातंत्र्यांची आकांक्षा निर्माण केली. तरुण प्रेरित झाले. इंग्रज सरकारने 'काळ' वर बंदी घातली. शि.म. परांजपे यांनी प्रामुख्याने राजकीय विषयांवर लेखन केले. त्यांचे निबंध वरवर सामान्य माणसांना उद्देशून आहेत असे वाटत होते. मात्र त्यामधून ब्रिटिश नीतिच्या विरुद्ध विचार मांडण्याचे सामर्थ्य होते. त्यामुळे व्याजोक्तीच्या आधारे ते लिहीत होते हे लक्षात येते.

दुष्काळामागे इंग्रजी राजवट कारणीभूत आहे असे मत ते मांडतात. 'भाकरीमध्ये दुसरा एक वाटेकरी' अशा शब्दात ते इंग्रजांचा उल्लेख करीत. 'ध्रुवाची गोष्ट खोटीच असली पाहिजे' या निबंधात ते भारतीयांना इंग्रजांविरुद्ध बंड करण्यास प्रेरित करतात. त्यासाठी एकतेचे तत्त्व ते लेखनातून मांडतात. राजकीय सुधारणा नको तर स्वातंत्र्य हवे आहे, ह्या केंद्राभोवती शि.म.परांजपे यांचे निबंध आढळून येतात.

न.चि.केळकर यांना टिळकांनी पुण्याला बोलावून घेतले. १८९७ मध्ये 'केसरी' व 'मराठा' ची जबाबदारी त्यांच्याकडे आली. पुढे १९१० ते  ते १९३२ या काळात ते 'केसरी'चे संपादक होते. 'पिशवीचे तोंड कोणाच्या हातांत राहणार?', 'दिल्लीचा बादशाही दरबार', 'स्वराज्य, ब्राह्मण व ब्राह्मणेतर' अशा निबंधातून त्यांची विचारसरणी समजून घेता येते. गतवैभवाचा आणि देशाचा अभिमान ते व्यक्त करतात. 'ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांना शिक्षणरहित ठेवले या म्हणण्यास काहीच आधार नाही.' (१९३८ : केळकर न.चि. खंड ४, पृ. ५१९) अशी भूमिका ते मांडतात. 'कुळकर्णीलीलामृत'या पद्य ग्रंथाच्या परीक्षणात त्यांनी सत्यशोधक समाज व राजर्षी शाहू यांच्यावर टीकात्मक भूमिका घेतली. इंग्रजी राजवटीचे दुष्परिणाम मांडणारे आणि टिळक विचारांचा वारसा पुढे चालविणारे निबंध लेखक म्हणून न.चि.केळकर यांच्याकडे पाहता येते.

अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी १९१५ पासून 'संदेश' हे पत्र सुरू केले. 'देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ' हा विषय त्यांच्या निबंधलेखनात प्रामुख्याने आढळतो. 'त्या पैशावर थूः' (१९२२) या निबंधात ते म्हणतात, "'संदेश' हिंदुस्थानच्या स्वतंत्रतेकरिता जन्मलेला आहे." (१९३३: कोल्हटकर अ.ब., पृ. २१६) त्यांच्या दृष्टीने समाजसेवा म्हणजे स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी चळवळ करणे आणि त्यानुसार समाजजागृती करणे. त्यांच्या निबंधात शिवाजी महाराज, रामदास, लोकमान्य टिळक यांच्याविषयी आदरभाव दिसून येते. जनतेच्या कल्याणासाठी, त्यांचे राष्ट्रीय हित जपण्यासाठी देशभक्ती आणि सत्यनिष्ठा यात वाढ झाली पाहिजे असे त्यांना वाटते. त्यांच्या निबंध लेखनात वैविध्य होते, असे असले तरी स्वातंत्र्यप्राप्ती हे उद्दिष्ट त्यांनी सोडले नव्हते. आध्यात्म, पुराण, धर्म, स्वराज्य, यांसह घरगुती व खाजगी विषयांवरही ते लिहीत होते. 'हिंदू धर्माचा जगभर फैलाव करा' असे ते म्हणत. त्यातून त्यांच्या स्वधर्माचा अभिमान लक्षात येतो. त्यांच्या निबंधांची शीर्षके चटकदार आहेत. 'चहा, चिवडा, चिरुट', 'मुंडावळी बांधुन बसले', 'टिळक बाळंत झाले', 'राजाला माकड चावले', 'तुम्ही पुरुष की बायका', 'हजामती का करता?' ही शीर्षके त्याचे द्योतक आहेत. संदेशामधून त्यांनी विविध व्यक्तीवर मृत्यूलेखही लिहिले आहेत. 'मंदिर प्रवेशाचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रत्येक गावात शिवाजी महाराजांचे एक मंदिर बांधून त्यात सर्वांना सारखे हक्क द्यावे, अशी भूमिका घेऊन ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कळवली. एकूण स्वराज्याविषयक विचार मांडणारे निबंधकार म्हणून त्यांची नोंद घ्यावी लागते.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनीही आपल्या निबंधात जहाल राष्ट्रभक्ती व्यक्त केली. त्यांनी टिळकांच्या सूचनेनुसार १८९७ पासून 'केसरी' साठी लेखन केले. चिपळूणकर-टिळकांचा वारसा पुढे चालवणारे निबंधकार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. 'स्वराज्याची शिष्टाई'या निबंधात त्यांनी टिळकांचा गुणगौरव केला आहे. त्यांनी टिळकांवर इतर अनेक निबंध लिहिले. स्वातंत्र्याचा विचार त्यांच्या निबंधातून व्यक्त झाला आहे. टिळकांप्रमाणेच त्यांनी महात्मा

गांधी यांच्यावरही निबंध लिहिले. 'महात्मा गांधी यांचा संदेश' या निबंधात त्यांनी शांतता असहकार, कायदेभंग हे राष्ट्रासाठी उपयुक्त ठरेल असा विचार मांडला.

या काळात 'केसरी' व 'काळ' मधील निबंधाशी नाते प्रस्थापित करणारे निबंध भास्कर बळवंत भोपटकर यांनी लिहिले. त्यांनी १९०५ मध्ये 'भाला' हे पत्र सुरू केले. 'मायदेशाच्या हितासाठी भाला हा काम करणार' ही भूमिका घेऊन त्यांनी विचार मांडले. त्यांचे निबंध हे प्रामुख्याने राजकीय स्वरूपाचे होते. त्यात हिंदू धर्माचा अभिमान होता. 'नरकाचा दरबार' हा निबंध त्यांनी लिहिला. 'नाशिक कटाचा खटला' (१९१०) ह्या निबंधात त्यांनी जॅक्शनच्या हत्येविषयी लिहिले आहे. राजकीय विचार मांडताना त्यांनी 'संततीनियमन', 'पगडी विरुद्ध टोपी', 'जेवणावळीतील द्रोण आणि वाट्या' असे खुसखुशीत लेखही लिहिले.

ह. ना. आपटे हे कादंबरीकार असले तरी त्यांनी 'करमणूक' ह्या साप्ताहिकातून निबंधही लिहिले. 'मुलांस थोडा उपदेश' या भाषण संग्रहात निबंध लेखनाचे गुण आढळतात. मनोरंजनातून प्रबोधन हा त्यांच्या लेखनाचा विशेष मानता येतो. त्यांच्या निबंधात आगरकरांप्रमाणे समाजसुधारणेची तळमळ होती. 'मराठीचा अभ्यास', 'विदग्ध वाङ्मय', 'सहा अभंगात तुकाराम महाराज', 'हास्य' हे त्यांचे काही निवडक निबंध त्यांच्यातील निबंध लेखकाचे व्यक्तिमत्त्व दर्शवितात.

राजारामशास्त्री भागवत यांनी 'आमची देशीभाषा' हा निबंध १८९२ मध्ये लिहिला. त्यात त्यांनी राष्ट्रीय भाषेची जागा आंग्लभाषेने घेतल्याची खंत व्यक्त केली. 'प्राकृत भाषेची विचिकित्सा', 'संस्कृत भाषेची विचिकित्सा' हे दोन निबंध भाषाविषयक विचार मांडतात. 'मराठीचा एक कॅथेलिक भक्त' ह्या निबंधात त्यांनी फादर स्टीफन यांच्याविषयी लिहिले आहे. 'चातुर्वर्ण्य मया सृष्टम' (१९०२) ह्या निबंधात त्यांनी वेदकाळात चार वर्णात समाज विभागला होता परंतु जातीयता नव्हती, याविषयी विचार मांडले आहेत. आरंभी पारंपरिक विचारसरणीचे भागवत 'विवाह व लग्न', 'विधवाविवाह' असे निबंध लिहून सुधारकी विचार मांडतात. 'विधवा बाळ असो वा प्रौढ असो तिच्या लग्नास शास्त्राची अडकाठी बिलकूल नाही' (१९७९ : भागवत, खंड ४, पृ. २५५) असे सांगत स्त्रीशिक्षणाची आवश्यकता ते मांडतात.

श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीही निबंध लिहिले आहेत. 'केतकर लेखसंग्रह' यात ते प्रसिद्ध आहेत. 'राजवाडे यांची जीवनपद्धती', 'वाङ्मयोपासनेचा धंदा', 'सिनेमाचा धंदा', 'बाल संरक्षण', 'स्त्रियांचे संसारशास्त्र', 'मुंबई शहरातील शरीरविक्रय' अशा लेखांमधून केतकरांचे समाजशास्त्रीय विचार समजून घेता येतात. ल.रा. पांगारकर हे टिळक-चिपळूणकरांच्या विचारधारेत बसणारे निबंधकार. पारमार्थिक आणि धार्मिक वृत्तीने ते विषय मांडतात. त्यांनी 'मुमुक्षू' हे साप्ताहिक १९०७ मध्ये सुरू केले. त्यातून त्यांनी स्वधर्मप्रीती मांडली. एक पुरुषाने एकाच स्त्रीबरोबर तर एक स्त्रीने एकाच पुरुषाबरोबर लग्न करावे असा नैतिक दृष्टिकोण ते मांडत होते. त्यामुळे धार्मिक स्वरूपाचे निबंधलेखन करणारे पांगारकर अशी त्यांची नोंद घेता येते. वा.म. जोशी यांनी मात्र 'विचारसौंदर्य' या लेखसंग्रहातील काही लेखात वाङ्मयीन प्रश्नांवर चर्चा केली आहे. 'महाकाव्य', 'डॉ. केतकर', 'न.चि.केळकर' याविषयी त्यांनी लिहिले आहे. मुळात कादंबरीलेखन करणाऱ्या वा.म.जोशी यांनी निबंध लेखन करावे हे विशेष मानता येते.

वि.का. राजवाडे यांनी इतिहासविषयक संशोधन करुन निबंध लिहिले आहेत. १८९४ मध्ये त्यांनी 'भाषांतर' हे मासिक सुरू केले. प्लेटो, ॲरिस्टॉटल, गिबन यांच्या ग्रंथांचे त्यांनी भाषांतर केले. १८९८ मध्ये 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने-खंड पहिला' प्रसिद्ध करुन त्यास दीर्घ प्रस्तावना लिहिली. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' २२ खंडात प्रसिद्ध करुन त्यांना जोडलेल्या विस्तृत अभ्यासपूर्ण प्रस्तावना म्हणजे समाज, भाषा, व्याकरण, वाङ्मय यावरील निबंध आहेत. भाषाशास्त्रीय निबंधातून त्यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. 'विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती' ह्या निबंधात विक्षेपसाधनांचा, बाह्य पदार्थांचा सोदाहरण उल्लेख ते करतात. वाङ्मयाची व्याख्या करताना ते लिहितात, "मनुष्य जातीच्या मुखातून जे जे म्हणून सार्थ व संपूर्ण विधान शब्दरूपाने भूत, वर्तमान व भविष्यकाळी बाहेर पडले, पडते व पडेल ते ते सर्व वाङ्मय होय." (१९५९ : राजवाडे वि.का., पृ. १०५) साहित्यलेखनाकडे ते राष्ट्राच्या प्रगतीचे साधन म्हणून पाहतात. 'कादंबरी' या निबंधामध्ये त्यांनी कादंबरीचा इतिहास सांगितला आहे. मराठी विद्यापीठ झाले पाहिजे असे त्यांना वाटते. त्यांनी इतिहासाचीही मीमांसा केली आहे. 'हिंदुस्थानातील आर्य लोकांचा वर्ण', 'आमची पुराणे व असीरियांतील नवे शोध', 'मग ब्राह्मण कोण?', 'मगध', 'नट आणि निच्छिवि' अशा निबंधातून त्यांनी विविध वंशाचा इतिहास मांडला आहे. त्यांनी 'अंत्याजोद्धार' हा निबंध १९०९ मध्ये लिहिला. अस्पृश्यता निवारणापेक्षा ज्यात्युकर्षाचा विचार ते मांडतात. 'महाराष्ट्रातील बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद' या निबंधात त्यांनी महनीय व्यक्तींची नोंद घेतली आहे. त्या यादीत सयाजीराव गायकवाड यांचे नाव आहे मात्र राजर्षी शाहू, जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले यांचे नाव नाही. एकूणच राजवाडे यांचे इतिहास संशोधनातील योगदान उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. मराठी निबंधाच्या इतिहासात त्यांच्यामुळे इतिहासविषयक निबंधाची भर पडली हे नाकारता येत नाही.

वासुदेव शास्त्री खरे यांनीही इतिहास संशोधनपर लेखन केले आहे. त्यांचे निबंध माहितीपूर्ण आहेत. त्यांनी लिहिलेल्या पेशवेकालीन इतिहासावर मांडलेले विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. त्यांनी लिहिलेल्या इतिहास संशोधनपर लेखांचे बारा खंड उपलब्ध आहेत. 'इचलकरंजी संस्थानाचा इतिहास', 'मिरज प्रकरण', 'हैदर अल्लीवरील तिसरी स्वारी', 'हरिवंशाची बखर', 'नानांचा अधिकारयोग' अशा लेखनात त्यांची लेखनदृष्टी किती तटस्थ होती याचा प्रत्यय येतो. भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य यांनीही ऐतिहासिक लेखन केले. 'निबंध आणि भाषण' या ग्रंथात त्यांचे निबंध संग्रहित केले आहेत. प्राचीन मराठी भाषा, वाङ्मय आणि महाराष्ट्र या विषयांवरील विवेचन या संग्रहात त्यांनी केले.

१८७४ ते १९२० हा मराठी निबंध वाङ्मयाचा विकास काळ मानता येतो. स्वदेश, स्वभाव आणि स्वधर्माचा अभिमान या काळात व्यक्त झाला. इंग्रजी राजवटीचे दुष्परिणाम मांडण्यात आले. राजकीय विचाराला अधिकाधिक महत्त्व देण्यात आले. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय विचारांची खडाजंगी याच काळात अधिक झाली. आधुनिकतेच्या दृष्टीने हा कालखंड महत्त्वपूर्ण ठरला. साहित्य प्रकारामध्ये क्रांतिकारक बदल झाले. विविध विचारधारेचे निबंध या काळात लिहिले गेले. अव्वल इंग्रजी काळ मागे पडून मराठी निबंधाचा स्वतंत्र काळ अशी ओळख या काळाने करून दिली.

### १.३.३ सत्यशोधक - ब्राह्मणेतर चळवळीतील मराठी निबंध

१८७३ मध्ये जोतिराव फुले यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापला. त्यानुसार अनेक विचारवंत विचार-वर्तन करीत होते. पुढे सत्यशोधक चळवळीला 'ब्राह्मणेत्तर चळचळी'चे स्वरूप प्राप्त झाले. शूद्रातिशूद्रांवर होणारा अन्याय निबंधातून मांडला गेला. प्रत्येक क्षेत्रातील प्रस्थापित वर्गाची मक्तेदारी नाकारली जात होती. आपल्या मताचा प्रसार करण्यासाठी 'दीनबंधू', 'दिनमित्र', 'जागृती', 'नवयुग', 'सत्यवादी', 'चिकित्सक', 'ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर', 'शिवाजी' अशी वृत्तपत्रे काढण्यात आली. त्यातून कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, मुकुंदराव पाटील, दिनकरराव जवळकर, श्रीपतराव शिंदे, देवराव नाईक, भास्करराव जाधव, प्रबोधनकार के.सी. ठाकरे, वालचंद कोठारी, जागृतीकार भगवंत बळवंत पाळेकर, केशवराव जेधे, केशवराज बागडे, शंकरराव मोरे, गणपतराव जाधव, बाळासाहेब पाटील अशा किती तरी लेखकांनी निबंधलेखन केले. त्यातील काही निबंध लेखनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

कृष्णराव भालेकर हे जोतीराव फुले यांचे अनुयायी होते. सत्यशोधक विचाराचा प्रभाव त्यांच्यावर झाला होता. सत्यशोधक विचार कार्याचा प्रसार व्हावा यासाठी त्यांनी १८७७ मध्ये 'दीनबंधू' हे पत्र सुरु केले. 'बळीबा पाटील' ही त्यांची कादंबरी. त्यांचे समग्र वाङ्मय प्रकाशित झाले आहे. त्यातील निबंध-भाषणांमधून त्यांनी शेतकरी व कामगार वर्ग यांचे अज्ञान दूर होण्यासाठी विचार मांडले आहेत. शेतकऱ्यांची हालाखी मांडताना इंग्रजी राज्याचे ते स्वागत करतात. अज्ञानावस्थेत अडकलेल्या शेतकऱ्यांना ते म्हणतात, 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' अज्ञान, अंधश्रद्धा, धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीमुळे निद्रीतावस्थेतील शेतकरी जागा व्हावा असे त्यांना वाटत होते. त्यासाठी शिक्षण हे एकमेव माध्यम असल्याचे ते सांगतात. मुलांप्रमाणे मुलींनीही शिक्षण घेतले पाहिजे हे सांगताना ते ब्राह्मण वर्गाचे दोष दाखवतात. धार्मिक भय घालून, स्वतःचे श्रेष्ठत्व गाजविणाऱ्या ब्राह्मण वर्गाचा ते समाचार घेतात. त्यामुळे जोतीराव फुले यांच्यानंतर सत्यशोधकी विचारांचा प्रसार करणारे निबंधकार म्हणून त्यांची नोंद घेता येते.

नारायण मेघाजी लोखंडे हे सत्यशोधक चळवळीतील महत्त्वाचे कार्यकर्ते विचारवंत. भालेकरांनी सुरू केलेले 'दीनबंधू' बंद पडले, ते १८८० मध्ये मुंबई येथून त्यांनी सुरु केले. सत्यशोधक विचारांचा प्रसार करण्याचे ध्येय उराशी बाळगून ते लिहीत होते. १८८४ मध्ये त्यांनी 'मिलहँडस असोसिएशन' ही कामगार संघटना स्थापन केली. आपल्या लेखनात त्यांनी 'गिरणी कामगारांच्या सभा' याविषयी लिहिले 'इंग्रज सरकारचे राज्यांत मोगलाई' हा निबंध कामगारांवर होणारा अन्याय उघड करतो. फॅक्टरी ॲक्टची अंमलबजावणी होत नाही याकडे ते लक्ष वेधून घेतात. सत्यशोधक मंडळी ही ब्राह्मणेतर लोकांचे मानवी हक्क प्राप्त करण्यासाठी निर्माण झाली आहे असे त्यांना वाटते. धनुर्धारी यांनी जनकोजी शिंदे यांच्याविषयी वापरलेला शूद्र शब्द न आवडून त्याचा परामर्श लोखंडे यांनी एका लेखात घेतला आहे. 'पोलीस, रयत आणि सरकार', 'जातिभेद, अपमान व उदारता', 'प्रतिस्पर्ध्याची सभा'या लेखात त्यांनी मांडलेले विचार हे सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत.

मुकुंद पाटील हे सत्यशोधक चळवळीतील दुसऱ्या पिढीतील निबंध लेखक. त्यांचे जनक वडील कृष्णराव भालेकर तर दत्तक वडील गणपतराव पाटील हे जोतीराव फुल्यांचे अनुयायी होते. ह्या दोघांच्या निधनानंतर १९१० मध्ये त्यांनी बंद पडलेले 'दीनमित्र' सुरु केले. त्यातून भट-ब्राह्मण व कर्मठ लोकांवर हल्ले चढवले. ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध लिहिताना त्यांनी स्वपक्षातील पुढाऱ्यांविरुद्धही लिहिले. जोतीराव फुले, जनक-दत्तक वडील यांचा सत्यशोधकी

वारसा त्यांनी पुढे चालवला. त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा आबासाहेब पाटील यांनी 'दीनसेवा' पत्र काढून हा वारसा पुढे चालू ठेवला.

भगवंत बळवंत पाळेकर यांनी 'जागृती' हे पत्र सुरू करुन बुद्धिवादी विचारांचे निबंध लिहिले. लोकांच्या विचाराला चालना देऊन मानण्याची प्रतिष्ठापना करावी या हेतूने ते लिहीत होते. स्वबांधवांचा मागासलेपणा दूर झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. शिक्षण हे समाजोन्नयनाचे साधन आहे असा विचार ते मांडतात. शेती उद्योगाबरोबरच दुसरे धंदेही शेतकऱ्यांनी सुरु केले पाहिजे असे पाळेकर सांगत. स्वधर्मातील दोषांमुळे धर्म पराजित होत असतो, हिंदू धर्माच्या अपयशाचे खापर बौद्ध धर्मावर फोडणे हे सत्याला धरुन नाही, हा विचार त्यांनी 'बौद्ध धर्मावरील ब्राह्मणी आक्षेप' या निबंधात मांडला. 'अस्पृश्यांना सुद्धा स्वराज्य पाहिजे' या निबंधात डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या विचारांचे त्यांनी समर्थन केले आहे. यावरुन सत्यशोधकी विचारांना व्यापक करणारे निबंधलेखक म्हणून पाळेकरांकडे पाहता येते.

श्रीपतराव शिंदे यांचे निबंधही सत्यशोधक चळवळीशी नाते सांगतात. सामाजिक व धार्मिक प्रश्नांसह राजकारणावरही त्यांनी विचार मांडले. १९१९ मध्ये त्यांनी 'विजयी मराठा' हे पत्र सुरू केले. त्यातून लिहिलेल्या निबंधात त्यांची स्वतंत्र विचारसरणी आढळून येते.

'विजयी मराठा' मधून विविध सत्यशोधकी विचारवंत लिहीत होते. पुढे बाळासाहेब पाटील यांनी 'सत्यवादी' मधून लेखन केले. दिनकरराव जवळकर, के.सी. ठाकरे, वि.रा.शिंदे, केशवराव बागडे, शंकरराव मोरे अशी अनेक मंडळी 'विजयी मराठा' मधून लिहीत होती. या सर्वांनी बहूजन समाजाच्या हितासाठी लेखन केले.

एकूणच सत्यशोधक चळवळीने मराठी साहित्याला अनेक निबंध लेखक दिले. त्यांनी विशिष्ट वर्गाच्या मक्तेदारीविरुद्ध लेखन केले. धर्मविचारात सुसंगतपणा आणला. ब्राह्मणेतरांच्या शिक्षणाचा प्रश्न मांडला. शेतकरी आणि कामगार यांच्या हिताकडे सरकारने आणि स्वत: शेतकरी व कामगारांनी लक्ष दिले पाहिजे याकडे लक्ष वेधले. बहुजन समाजाच्या अधोगतीमागील कारणे शोधून ते सर्वांपुढे मांडली. जोतीराव फुले यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणारे हे निबंधकार होते. धर्मग्रंथांनी बहूजन समाजावर अन्याय केल्याची भावना ते व्यक्त करीत होते. शिक्षणामुळे अनेक प्रश्न सुटू शकतात यावर त्यांनी भर दिल्यामुळे सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीतील निबंध वाङ्मयाचा स्वतंत्र विचार झाला पाहिजे.

### १.३.४ दलित चळवळीतील निबंधकार

दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकराने प्रेरित झालेली असली तरी आंबेडकर पूर्व काळातही ती सुरू होती. गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडे यांनी आपल्या परीने दलित चळवळ सुरू ठेवली होती. 'मूकनायक' उदयास येण्यापूर्वी 'सामवंशीय मित्र', 'निराश्रित हिंद नागरिक' अशी अनेक मुखपत्रे दलित चळवळीसाठी स्थापली होती. 'आदि हिंदू', 'गरुड', 'समता', 'दलितबंधु', 'पतितपावन', 'दलितसेवक', 'दलित निनाद', 'अरुण', 'चोखामेळा' अशा पत्रांमधून दलित प्रश्नांवर लेख लिहिले जात होते. त्यातील काही निबंधकारांचे कर्तृत्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

गोपाळबाबा वलंगकर हे १८८६ मध्ये ब्रिटिश लष्करातून निवृत्त होऊन दलितोद्धाराच्या कार्यासाठी दाखल झाले. १८९० मध्ये त्यांनी 'अनार्य दोषपरिहार मंडळी' ही संस्था सुरु केली. १८८८ मध्ये 'विटाळ विध्वंसन' ही पत्रिका काढून विचार मांडले. 'आपल्या बांधवांना धर्म म्हणजे काय हे तरी विशद करावे म्हणून 'हिंदू धर्मदर्पण' नावाची पुस्तिका लिहिली'. (१९९०: आंबेडकर बाबासाहेब, पृ. ८) 'दीनबंधू', 'सुधारक' मधूनही ते लिहीत होते. 'विटाळ विध्वंसन' या पुस्तिकेत त्यांनी हिंदू धर्माचा अत्यंतिक अभिमान बाळगणाऱ्यांना सव्वीस प्रश्न विचारले आहेत. वेद, स्मृती, गीता, संतवाङ्मय, पुराणे यातील दाखले देऊन ते मत मांडत. स्वबांधवांमध्ये जागृती यावी यासाठी ते लिहित होते. हिंदू धर्मातील खुळचट गोष्टींचा ते निर्देश करतात. त्यावरुन आद्य दलित लेखक म्हणून त्यांचा उल्लेख करता येतो.

शिवराम जानबा कांबळे यांनी १९०४ मध्ये 'श्रीशंकर प्रासादिक सामेवंशीय हितचिंतक मित्र समाज' ही संस्था स्थापली. १९०८ मध्ये 'सोमवंशीय मित्र' हे मासिक सुरू केले. स्वसमाजातील दोष नाहीसा होऊन त्यांची आत्मोन्नती व्हावी यासाठी ते लिहीत होते. मुरळी प्रथा, वेश्या व्यवसाय, बळीप्रथा, मृतमंसाहार, अस्वच्छता अशा विषयांवर त्यांनी निबंध लिहिले. इंग्रजी राज्याचे त्यांनी स्वागत केले. 'फुकट आणि सक्तीचे शिक्षण', 'आमच्या सुधारणेसाठी सरकारने काय करावे?', 'आमच्या इंग्रजी राज्याला उदंड आयुष्य दे!', 'व्यभिचार', 'विवाहोत्पत्ती', 'बहुभार्यात्व', 'बहूभर्तृकत्व' हे त्यांचे निबंध महत्त्वाचे विषय मांडतात.

किसन फागू बनसोडे यांनी १९१० मध्ये 'निराश्रित हिंदु नागरिक' हे साप्ताहिक सुरू केले. पुढे १९१३ मध्ये 'विटाळ विध्वंसन' आणि १९१८ मध्ये 'मजदूर पत्रिका' ही वृत्तपत्रे सुरु केली. त्यामधून त्यांनी पारंपरिक रूढींचे विध्वंसन केले. कष्टकरी वर्गाचे दुःख त्यांनी मांडले. आपले बांधव हे हिंदू असूनही निराश्रित आहेत, निराधार आहेत असे त्यांना वाटत होते. त्यांच्यासोबत गणेश अकाजी गवई हेही लिहीत होते. गवई यांनी १९२० मध्ये 'बहिष्कृत भारत' हे मासिक अमरावती येथून सुरू केले. आंबेडकरपूर्व काळातील दलित निबंधकारांनी स्वसमाजातील बांधवांचे दुःख निबंधातून मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२० मध्ये 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक काढले. १९२८ मध्ये देवराज नाईक यांच्या संपादकत्वाखाली 'समता' हे नियतकालिक सुरू केले. त्यामधून त्यांनी लिहिलेले अग्रलेख, स्फूटलेख, मृत्यूलेख यांमधून त्यांची विचारदृष्टी समजून घेता येते. त्यांचे निबंधलेखन हे माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी लिहिण्यात आले आहेत. माणसावर लादलेली गुलामी त्यांनी उघड केली. त्यांच्यावर होणारे अन्याय मांडून, त्यातून बाहेर पडण्याच्या उपाययोजना ते मांडत असत. आपल्या निबंधात त्यांनी सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक प्रश्नांवर चर्चा केली आहे. त्यांचे निबंधलेखन नवसमाज निर्माण करण्याच्या प्रेरणेतून आविष्कृत झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पितृऋण, देवऋण, ऋषिऋण यापेक्षा लौकिक ऋण फेडले पाहिजे असे सांगितले. हे सांगताना लौकिक ऋण म्हणजे समाजऋण हे स्पष्ट करायला ते विसरत नाहीत. 'अस्पृश्यता व सत्याग्रहाची 'सिद्धी' या निबंधात त्यांनी सत्य म्हणजे काय, सत्याग्रह म्हणजे काय, तो कुणी कशासाठी करायचा? याविषयी चिंतन मांडले आहे. 'हिंदुचे धर्मशास्त्र, त्यांचे क्षेत्र आणि त्याचे अधिकारी' या निबंधात त्यांनी हिंदू समाज व अस्पृश्यता याविषयी विचार व्यक्त केले आहेत. जातिभेद मानून, स्त्रियांना कनिष्ठ लेखने यामुळे

हिंदू समाज चांगल्या गुणांसाठी मुकला आहे असे त्यांना वाटते. ते म्हणतात, "हिंदु समाज हा अनेक वर्षे जगला आहे तो केवळ गुलामांचे राष्ट्र म्हणून जगला आहे." (१९९०: आंबेडकर बाबासाहेब, पृ. २०८(६))

महार वतन हे अस्पृश्यांच्या प्रगतीमधील अडथळा आहे, त्यातून लाचारी येते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटते. 'काकगर्जना' या निबंधात त्यांनी राजर्षी शाहूंवर टीका करणाऱ्यांचा समाचार घेतला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांसह 'सामाजिक न्याय' या तत्त्वास त्यांनी महत्त्व दिले. चातुर्वर्ण्यव्यवस्था, जातियता, अस्पृश्यता संपली पाहिजे, व्यक्तीचा स्वाभिमान वाढला पाहिजे, शिक्षण घेऊन संघटित झाले पाहिजे, अन्यायाविरुद्ध संघर्ष केला पाहिजे, आपण माणूस आहोत याचे भान ठेवले पाहिजे या दृष्टीने ते लिहीत होते. त्यांचा प्रत्येक अग्रलेख हा उत्तम निबंधाचा नमुना आहे. त्यामुळे मराठी निबंध वाङ्मयाच्या इतिहासात निबंधलेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी नोंद घेणे अगत्याचे ठरते.

एकंदरित दलित चळवळीतील निबंध हे भारतीय समाजव्यवस्थेची चिकित्सा करतात. सामाजिक विषमता संपविण्याचा विचार मांडतात. माणसाच्या स्वाभिमानाची भाषा करतात. अस्पृश्यता निवारण हा प्रारंभीच्या निबंधकारांचा हेतू होता, पुढे सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय समतेची मागणी करणाने निबंध लिहिले गेले. त्यातली विवेकनिष्ठ चिकित्सा मराठी निबंधाला वेगळ्या वळणावर नेते.

## १.४ मराठी निबंध (१९२० ते १९६०)

१९२० ते १९६० हा मराठी निबंधाचा प्रगत काळ मानता येतो. ब्राह्मणेतर चळवळ, स्वातंत्र्याची चळवळ, आंबेडकरी चळवळ, मार्क्सवादी चळवळ, शेतकरी-कामगार चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, हिंदुत्ववादी चळवळ, गांधीवादी चळवळ अशा अनेक चळवळी या काळात निर्माण झाल्या होत्या. त्या त्या चळवळीला अनुसरून लेखक लिहीत होते. मराठी निबंध आशयदृष्ट्या संपन्न होत होता त्याप्रमाणे अभिव्यक्तीच्या अंगानेही तो विकसित होत होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, विनायक दामोदर सावरकर, श्री. म. माटे, द.के. केळकर, विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, साने गुरुजी, काकासाहेब कालेलकर, पु.ग. सहस्त्रबुद्धे, ग.त्र्यं. माडखोलकर यांच्यासारखी मंडळी निबंध लेखन करीत होती. त्यामुळे हा काळ मराठी निबंधासाठी प्रगत काळ होता. या काळातील पुढील निबंधकारांच्या निबंधाचा आशय समजून घेता येईल.

### १.४.१ मराठी निबंधांचा प्रगत काळ

विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' मांडला. 'वि.रा.शिंदे यांचे लेख, व्याख्याने व उपदेश' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांच्या 'रोजनिशी' मधून त्यांचे धर्मविषयक विचार समजून घेता येतात. एकेश्वरी धर्मपंथ त्यांना मान्य होता. 'मुरळी सोडण्याची चाल', 'शेतकरी वर्गाचे प्रश्न', 'मुलींचे शिक्षण', 'अस्पृश्यता निवारण' अशा विषयांवर त्यांनी आपले विचार मांडले. १९३३ मध्ये त्यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथ लिहिला. 'उत्तरयुगीन अथवा अर्वाचीन अस्पृश्यता' या प्रकरणात महर्षी शिंद्यांनी म्हटल्याप्रमाणे, अस्पृश्य लोक हे कधी काळी राज्यकर्ते असावेत आणि ते धर्माने बौद्ध असावेत. 'राजकारण' या प्रकरणात ते म्हणतात, "महार जात महाराष्ट्रात मुख्य बलुतेदार म्हणूनच नव्हे तर वतनदार म्हणून नांदत होती. ह्या संबंधी जे

पुरावे अद्यापि तुरळक आढळतात ते फार महत्त्वाचे आहेत..." (१९७६ : शिंदे वि.रा., पृ. १५२) अस्पृश्यता ही संस्था आहे, असे त्यांना वाटते. तिचा अभ्यास करण्यासाठी ते पाणिनी, उपनिषद, ब्राह्मण, श्रीकृष्ण तसेच वेदमंत्र काळातील दाखले देतात. 'समाज सुधारणा यशस्वी का होत नाही?' ह्या निबंधात त्यांनी समाजसुधारकांच्या धर्माविन्मुखतेवर प्रकाश टाकला. परकियांपेक्षा आपण स्वकीय शत्रूंपासून अधिक सावध असले पाहिजे, असा विचार मांडला. 'मराठी वाङ्मयः तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र' ह्या निबंधांत त्यांनी समकालीन तरुण साहित्यिकांना पूर्वग्रह सोडून, माहितीला अनुभवाची जोड देऊन लिहिण्याची विनंती केली. विविध प्रश्नांची उकल भारतीय पातळीवर करणारे निबंधकार म्हणून त्यांचा उल्लेख करता येतो.

विनायक दामोदर सावरकर यांनी 'मित्र मेळा' व 'अभिनव भारत' अशा स्वातंत्र्य चळवळींमध्ये सहभाग घेतला. 'हिंदुत्व', 'हिंदुराष्ट्र दर्शन', 'हिंदुपतपादशाही', 'मला काय त्याचे', 'जात्युच्छेदक निबंध', 'क्ष-किरणे', 'हिंदुत्वाचे पंचप्राण', 'गांधीगोंधळ' अशा प्रकारच्या लेखनातून त्यांचे विचार समजून घेता येतात. स्वातंत्र्याची आस, प्रखर देशाभिमान आणि समाजहिताची तळमळ त्यांच्या निबंधातून व्यक्त झाली आहे. इंग्रजी राज्य, परकीय आक्रमण यांचे भारतीय संस्कृतीवर झालेले आक्रमण याचा ते निषेध करतात. 'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव' या निबंधात त्यांची ईश्वरावरची निष्ठा व्यक्त झाली आहे. 'देवा, तुझी ललित कलाकुसरी पाहून धन्य, देवा, धन्य तुझी! वारे वा!... आम्ही माणसे देवा, तुझी लेकरे आहोत. तू आमची खरी माता आहेस.' (१९७३: सावरकर वि.दा. पृ. २३) असा विश्वास ते व्यक्त करतात. पोथीनिष्ठतेपेक्षा विज्ञाननिष्ठेला त्यांनी महत्त्व दिले. 'यंत्र' ह्या निबंधात त्यांनी यंत्रबळाचे महत्त्व विशद केले आहे. जातिभेद मोडण्यासाठी रूढींच्या बेड्या तोडण्यास ते सांगतात. वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी अशा बंधनास ते स्वदेशी बेड्या म्हणतात. 'गोपालन हवे गोपूजन नव्हे' असा विचार ते मांडतात. 'रणशिंग' या संग्रहात त्यांची इतिहासविषयक भूमिका समजून येते. हिंदुत्वाचा कट्टर पुरस्कार करणाऱ्या सावरकरांनी मराठी निबंधांतून विज्ञाननिष्ठ विचारही मांडले याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

munotes.in

श्री. म. माटे यांना शैलीदार आहे म्हणून ओळखले जाते. 'विचारमंथन', 'विचारशलाका', 'विचारगुंफा', 'साहित्यधारा' अशा निबंधसंग्रहातून त्यांची विचारधारा लक्षात येते. वैचारिक आणि ललित अशा दोन्ही अंगांनी त्यांचे निबंध आविष्कृत झाले आहेत. 'विचारगुंफा' या संग्रहातील निबंधात त्यांनी काही वादग्रस्त मुद्दे उपस्थित केले आहेत. 'क्रांतिकारकांचा बक्षिस-समारंभ' या निबंधातून त्यांनी दहा महनीय व्यक्तींविषयी लिहिले आहे. चित्रगुप्ताच्या तोंडून प्रत्येकाच्या विचारावर मत मांडले आहे. जोतीराव फुले यांच्याविषयी चित्रगुप्त म्हणतो, "यांनी लिहिलेले वाङ्मय सद्भिरुचीला सोडून आहे आणि त्यात धर्माची, अवतारी पुरुषांची आणि क्वचित प्रसंगी संतांची सुद्धा निंदा केलेली आहे." (१९५५: माटे श्री.म. पृ.१६३) याचा अर्थ श्री. म. माटे यांना जोतीरावांची भाषा विचार रूचलेले नव्हते. 'अस्पृश्यांचे भीमपुरुष डॉ. आंबेडकर' या निबंधात त्यांनी काही वादग्रस्त मुद्दे मांडले आहेत. स्वराज्य मिळाल्यानंतर लोकशाही, समता, समाजसुधारणा होईल यावर ते विश्वास ठेवतात. एकूणच श्री.म. माटे यांचे निबंध ललित आणि वैचारिकतेच्या अंगाने लिहिले जात होते.

द.के. केळकर यांनी प्रामुख्याने भौतिकवादी-विज्ञाननिष्ठ निबंध लिहिले. 'काव्यलोचन', 'संस्कृती संगम', 'संस्कृती आणि विज्ञान', 'वादळी वारे' ही त्यांची लेखनसंपदा. आपल्या निबंधातून त्यांनी शास्त्रीय विषयांवर विचार मांडले. शास्त्रीय शोध हे महत्त्वाचे असून

त्यांचा उपयोग समाजाला होत असतो, त्यामुळे सांस्कृतिक जीवनही बदलते असे त्यांना वाटते. शास्त्रीय विषय ललित्यमयतेने मांडल्यामुळे त्यात वाचनीयता आली आहे. वादग्रस्त विषय दूर सारुन वर्णनपर विवेचन ते करतात. मराठी निबंध वाङ्मयात विज्ञाननिष्ठ निबंध लिहिणाऱ्या द.के. केळकरांचा उल्लेख करावा लागतो.

आचार्य विनोबा भावे यांच्या निबंधातून जीवनाचे सखोल चिंतन आढळते. महात्मा गांधी यांची प्रेरणा आणि आलेले अनुभव यातून त्यांच्या लेखनात 'अहिंसा' हे मूल्य आविष्कृत झाले आहे. 'गीता प्रवचने', 'विचार पोथी', 'मधूकर', 'सिंहावलोकन', 'जीवनदृष्टी' या ग्रंथांमधील लेखांना निबंधाचे रूप मिळाले आहे. सेवा, आदर, ज्ञान, जीवन, कुटुंब याविषयीचे चिंतन ते अत्यंत कोमलतेने करतात. 'सेवा जवळून आदर दुरुन आणि ज्ञान आतून' हे सांगताना विनोबांमधील बोधप्रधानता सहज लक्षात येते.

दादा धर्माधिकारी यांचे निबंध प्रौढ स्वरूपात वाचकांपुढे येतात. युक्तिवाद व तर्कनिष्ठा हे त्यांच्या लेखनाचे विशेष. गांधीवादी विचारांचा प्रभाव त्यांच्या निबंधात जाणवतो. 'साम्ययोगाच्या मार्गावर', 'दांडाचे स्नेहदर्शन' हे त्यांचे ग्रंथ. 'सर्वोदयदर्शन' हा त्यांच्या व्याख्यानांचा संग्रह. गांधीवाद आणि जयप्रकाश यांचे क्रांतीविचार यांचा आढळ त्यांच्या चिंतनातून लक्षात येतो. विषय मांडणी करताना काही वेळा त्यांनी विनोदाचेही साह्य घेतले आहे.

साने गुरुजी यांना 'संवेदनशील निबंधकार' म्हणून ओळखावे लागते. मुला-मुलांवर प्रेम करणारा हा निबंधकार हळवे मन उघड करतो. किशोरवयीन मुलांवर संस्कार करण्याची ताकद त्यांच्या लेखनात आहे. जीवनातील मंगल आणि प्रसन्न क्षणांवर त्यांनी अतोनात प्रेम केले. 'भारतीय संस्कृती'मधून ते प्राचीन संस्कृतीवर प्रकाश टाकतात. त्यांच्या निबंधाविषयी डॉ. म.मा. आळतेकर म्हणतात, "विनोबा भावे, दादा धर्मादिकारी आणि काकासाहेब कालेलकर यांच्यानंतर साने गुरुजींच्या निबंधाचा विचार करावयाचा म्हणजे महाविद्यालयामधून प्राथमिक शाळेत आल्यासारखे वाटते." (१९४९: आळतेकर, पृ. १९८) या मतात न्यूनता वाटत असली तरी संस्कारशीलतेच्या दृष्टीने साने गुरुजी यांचे निबंध हे महत्त्वाचे आहेत.

काकासाहेब कालेलकर यांच्यावरही गांधीवादाचा प्रभाव होता. दत्तात्रय बाळकृष्ण म्हणजेच काकासाहेब कालेलकर यांनी 'जीवनातील आनंद' या ग्रंथात आपले विचार-निरीक्षण व्यक्त केले आहेत. 'हिंडलग्याचा प्रसाद' या पुस्तकात त्यांचे तुरुंगातील अनुभव समजून घेता येतात. 'लोकशिक्षण', 'नवभारत'मधून त्यांनी विविध विषयांवर लेखन केले. 'जिवंत व्रतोस्तव', 'जीवनविहार', 'जीवन आणि समाज', 'समाज आणि समाजसेवा' या लेखनातून त्यांनी सामाजिक विषयांवर प्रकाश टाकला आहे. केवळ रंजनपरता नको असे ते साहित्याबाबत म्हणत असत.

डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे हे बुद्धीवाद, राष्ट्रभक्ती आणि ज्ञाननिष्ठा या विचारांनी भारावलेले होते. 'वैयक्तिक व सामाजिक' हा त्यांचा निबंधसंग्रह, व्यक्ती आणि समाज यावर प्रकाश टाकणारा आहे. व्यक्तीच्या परस्पर व्यवहारातून समाज आकारास येत असतो असे त्यांना वाटते. बुद्धिला पटलेल्या तर्कानुसार की सामाजिक बांधिलकीनुसार वर्तन करावे? अशा प्रश्नांचा वेध ते घेतात. समाजकारण व राजकारण या दोहोंना ते परस्पर पोषक मानतात. 'वैयक्तिक पुण्य आणि

सामाजिक पुण्य' हा त्यांचा निबंध उल्लेखनीय स्वरूपाचा आहे. त्यामुळे तर्कशुद्ध मांडणी करणारे निबंधकार म्हणून डॉ. सहस्त्रबुद्धे यांची नोंद घ्यावी लागते.

ग.त्र्यं. माडखोलकर यांनी १९४४ पासून लेखनारंभ केला. संपादकीय लेख, टीका, वाङ्मयीन-समीक्षात्मक लेख यांमधून त्यांचे विविध विषयांवरील विचार समजून घेता येतात. 'वाङ्मय विलास', 'अवशेष', 'जीवन साहित्य', 'स्वैरविचार', 'निर्माल्य' हे त्यांचे काही लेखसंग्रह. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ते सहभागी झाले होते. 'पखरण' या लेख संग्रहात त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील घडामोडी, स्वराज्य चळवळी याविषयी विचार मांडले. आपल्या मांडणीत त्यांनी 'महाराष्ट्राचे एकीकरण आणि मराठवाड्याची स्वतत्रंता'चा मुद्यांवरही भर दिलेला आहे. महात्मा गांधीऐवजी सुभाषचंद्र बोस यांच्या सशस्त्र क्रांतिकारी चळवळीला ते जवळ करतात. त्यांचे निबंध वैचारिक आणि भावनिकतेने समोर येतात.

एकूणच १९२० ते १९६० हा कालखंड विशेष असा आहे. स्वातंत्र्याची चळवळ सुरु होती, १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले, भारतीय संविधानही मिळाले, शिक्षणाचा प्रसार होत होता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केल्यामुळे समाज ढवळून निघाला होता, लोकमान्य टिळकांनंतर महात्मा गांधीकडे स्वराज्य चळवळीची धुरा आली होती. या सर्व बाबींचा परिणाम हा विचारवंत, लेखक, कार्यकर्ते यांच्यावर होत होता. मराठी निबंधामध्ये या सर्वांचे प्रतिबिंब आढळून येते. हिंदुत्वनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, अस्पृश्यनिवारण, भौतिकवादी दृष्टिकोण या विषयांवरील मतप्रतिपादन हा या काळाचा विशेष मानावा लागतो. तर्कशुद्धते बरोबरच ललित्यमयता हे निबंधाचे विशेष या काळाची देण म्हणता येते. याच काळात मराठी निबंधाला 'लघुनिबंध', 'ललितनिबंध' हा स्वतंत्र निबंधाचा प्रकार मिळाला. ना.सी. फडके आणि वि.स. खांडेकर यांनी 'ललित निबंधा'साठी दिलेले योगदान स्वतंत्रपणे अभ्यासण्याची गरज आहे. अनेक स्त्रियांनी या काळात लेखन केले आहे.

### १.४.२ मराठी ललित निबंध

१९२० नंतर मराठी निबंधामध्ये ललित निबंधाचा उदय झाला. १९२६ मध्ये 'रत्नाकर' मासिकातून ना.सी. फडके यांनी 'गुजगोष्टी' लिहिल्या. त्यात मराठी ललित निबंधाची प्रारंभावस्था सापडते. वि.स. खांडेकर यांनी या प्रकाराचे कोडकौतुक केले. त्यासाठी 'वैनतेय' मधून त्यांनी लेखन केले.

ललित निबंध हा स्वैर कल्पनाविलास आणि आत्मनिष्ठ चित्रण यांच्या आधारे आकारास येतो. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा मनमोकळा आविष्कार म्हणजे ललित निबंध. मनमोहक, चित्तवेधक, वाचकांना आकर्षित करुन, गुंतवून ठेवणारा एक निबंधप्रकार म्हणजे ललित निबंध होय. तर्कशुद्ध प्रतिपादन टाकून भावनिकतेने विषय फुलवित जाणारा प्रकार रंजनाचा आधार घेत प्रबोधनही करू शकतो. आत्मकथन, आत्मचरित्र या प्रकारातील आत्मनिष्ठा ललित निबंधात आढळते. पुढीलप्रमाणे काही निवडक ललित निबंधकारांच्या लेखनाचा परामर्श घेता येईल.

ना.सी. फडके यांनी 'रत्नाकर' या मासिकातून 'गुजगोष्टी' लिहून 'लघुनिबंधा'स वाट मोकळी करुन दिली. 'सुहास्य' (१९२६) हा त्यांचा पहिला ललित निबंध. 'गुजगोष्टी' (१९३३), 'नव्या गुजगोष्टी' (१९३७), 'धूम्रवलये' (१९४०) या संग्रहातून त्यांचे लघुनिबंध वाचावयास मिळतात. 'ऐन पंचविशी', 'अज्ञानाची महती', 'एकादशी', 'दाही दाही शंभर',

'दोरीवर वाळणारे कपडे', 'सर्कसचा तंबू', 'पहिला पांढरा केस' अशा लघुनिबंधातून ना.सी. फडके जीवनाकडे अतिशय गमतीने पाहतात. म्हातारपणाची पहिली निशाणी म्हणून ते पांढऱ्या केसाकडे बघतात. शेवटी शरीरापेक्षा मन तरुण असते असा निष्कर्ष ते मांडतात. 'दोरीवर वाळणारे कपडे' या लघुनिबंधात कल्पकतेचा वापर केला आहे. वाळणारे कपडे परस्परांशी बोलत आहेत. त्यांची भाषा कळाली तर कोण कोणते सत्य समजून येईल असा कल्पनाविलास ते करतात. त्यामुळे एकाच वेळी सुखद, प्रसन्न आणि तात्त्विक अनुभूती मांडणारे लेखक म्हणून ना.सी. फडके यांच्या लेखनाकडे पाहता येते.

वि.स. खांडेकर यांनी १९२७ मध्ये 'वैनतेय' या साप्ताहिकातून 'रानफुले' ह्या शीर्षकाने लघुनिबंध लिहिले. 'वायुलहरी' (१९३६) हा त्यांचा पहिला संग्रह पुढे 'चांदण्यात' (१९४०), 'अविनाश' (१९४१), 'मंदाकिनी' (१९४२), 'मंजिऱ्या' (१९४६), 'कल्पकता' (१९४५), 'तिसरा प्रहर' (१९४७), 'मंझधार' (१९५९), 'झिमझिम' (१९६१) हे त्यांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. सहजसुलभतेने ते मानवी जीवनातील लहान लहान घटना प्रसंग मांडतात. 'महापूर' मध्ये त्यांना बालवाडीच्या आठवणी स्मरतात. कृष्णेला आलेल्या पुराचे वर्णन करताना कैलास शिखर, रावसाहेब मंडलिक, अ.ब. कोल्हटकर, तैमुरलिंग अशा व्यक्तींपर्यंत प्रवास करतात. लघुनिबंधात अतिशय मोकळेपणाने, अनौपचारिकतेने गप्पा मारता येतात, याचा अनुभव खांडेकरांचे ललित निबंध वाचून येतो.

अनंत काणेकर हे फडके-खांडेकरांचे समकालीन लेखक. त्यांचे 'पिकली पाने' (१९३४), 'शिंपले आणि मोती' (१९३६), 'तुटलेले तारे' (१९३८), 'उघड्या खिडक्या' (१९४४) आणि 'प्रकाशाची दारे' (१९८०) हे लघुनिबंध संग्रह प्रकाशित आहेत. अंतर्मुख दृष्टी, मिश्किल वृत्ती आणि विनोदी भाव हा त्यांच्या लेखनाचा विशेष. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रश्नांवरील त्यांचे ललितनिबंध उपहास-उपरोध यांच्यामुळे वाचकप्रिय झाले आहेत. 'व्यवस्थितपणाचे धडे', 'पळण्याची कला', 'दोन चाके', 'द्रोण मेणबत्या' यासारखे काही लघुनिबंध विचारप्रधान आहेत.

ललित निबंध लिहिणाऱ्या निबंधप्रकारात ना.म. संत, वि.पां. दांडेकर, गो. रा. दोडके, वि.ल. बर्वे, कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे यांचाही उल्लेख करावा लागतो. पुढे म.ना. अदवंत यांनीही ललित निबंध लिहिले. १९४५ नंतर दुर्गा भागवत, विंदा करंदीकर, ना.ग. गोरे, गं.भा. निरंतर, भगवंत देशमुख, अ.वा. वर्टी असे किती तरी लेखकांनी ललित निबंध लिहिले आहेत. अनिल अवचट यांच्या ललित गद्याचा स्वतंत्र अभ्यास करता येतो.

### १.४.३ स्त्रीलिखित मराठी निबंध

मराठी निबंधाचा इतिहास अभ्यासताना स्त्रियांनी लिहिलेल्या निबंधांचा स्वतंत्र विचार करता येतो. मुळातच स्त्रियांना शिक्षणाची बंदी होती. पुढे शिक्षण मिळाले तरी त्यांना व्यक्त होण्याचा अधिकार नव्हता. व्यक्त होतानाही त्या आरंभी घाबरत, लाजत. पुढे मात्र नव्या जाणिवेमुळे स्त्रिया व्यक्त होत गेल्या. निबंध वाङ्मयातही त्यांनी योगदान दिले. त्याविषयी धावता आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

मराठीतील स्त्रियांनी लिहिलेला पहिला निबंध हा भाषांतरित स्वरूपाचा आहे. १८३५ मध्ये इंग्लंडच्या विदुषी मिसेस फेरार यांनी 'Hints for the improvement of Early

Education and Discipline' या इंग्रजी ग्रंथाच्या आधारे 'कुटुंब प्रवर्तननीति' हा निबंध लिहिला. कुटुंबातील सदस्यांनी परस्परांशी कसे वर्तन करावे याचे विवेचन त्यांनी केले आहे. कुटुंबातील सदस्यांच्या वर्तनाचा परिणाम हा कुटुंब, समाज आणि देशावर होतो असे त्यांना वाटते. भारतीय कुटुंबसंस्थेमधील दोष त्या दाखवतात. त्यांच्या सदरील निबंधात ख्रिश्चन विचारदृष्टी आढळते. मिसेस फेरार ह्या भारतीय नसल्या तरी मराठी भाषेतून लिहिलेला हा पहिला निबंध मानावा लागतो.

भारतीय स्त्री निबंधकार म्हणून मुक्ता साळवे हिचे नाव घ्यावे लागते. जोतीराव फुले यांनी १८४८ मध्ये पुणे येथे सुरू केलेल्या शाळेत मुली शिकत होत्या. त्यातील मुक्ता साळवे ह्या मुलीने 'मांगमहारांच्या दु:खाविषयी निबंध' हा ज्ञानोदयच्या १८५५ च्या अंकात प्रकाशित झाला. स्त्रीने लिहिलेला हा मराठीतील पहिला निबंध होय. एका शूद्र जातीतील स्त्रीच्या वेदना या निबंधात आहेत. इतरांप्रमाणे मांग महारांना स्वतंत्र धर्म आणि धर्मग्रंथ नाही याविषयीची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. या निबंधात मुक्ताने पेशवाईचे केलेले वर्णन तत्कालीन सामाजिक स्थिती दर्शवितो. अस्पृश्य वर्गाने शिक्षण घेतले तर त्यांच्यावरील जनावरांप्रमाणे होणारे अन्याय दूर होतील असा विश्वास मुक्ता व्यक्त करते. भारतीय आद्य स्त्री निबंधकार म्हणून मुक्ता साळवे हिचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते.

जोतीराव फुले यांनी सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका केले. सावित्रीबाई फुले यांचे काव्यलेखन प्रसिद्ध आहे. त्यांनी लिहिलेल्या पत्रलेखनात निबंध वाङ्मयाचे विशेष आढळतात.

ताराबाई शिंदे यांनी १८८२ मध्ये 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध लिहिला. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते बापूजी हरि शिंदे यांची कन्या म्हणजे ताराबाई शिंदे. मतलबी, स्वार्थी पुरुष वर्गाने धूर्तपणे धर्मग्रंथ रचून स्त्रियांना गुलाम केले, याविषयी अभ्यासपूर्ण मांडणी ताराबाईंनी या निबंधात केली आहे. स्त्रियांच्या अंगी अनेक दुर्गुण असल्याचे दाखवले जाते परंतु पुरुषांच्या दुर्गुणांकडे दुर्लक्ष केले जाते, याकडे ताराबाई लक्ष वेधतात. अज्ञान, धर्म आणि पुरुष या तीन घटकांमुळे स्त्रिया मानसिक गुलामगिरीत जगत आहेत असे ताराबाईंना वाटते. या निबंधात त्यांनी रामायण, महाभारत, संत वाङ्मय यातील उदाहरणे देऊन आपले मत स्पष्ट केले आहे. स्त्रीवादी समीक्षेला पाया घालणाऱ्या ताराबाई शिंदे यांचा उल्लेख टाळता येत नाही.

मराठी निबंध हा नियतकालिकाचे अपत्य आहे. १८३२ मधील 'दर्पण' मधून त्याची आरंभीची अवस्था आढळून येते. मराठी नियतकालिकाच्या इतिहासात स्त्रियांचेही योगदान लक्षात येते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नीला सुरेश अभ्यंकर यांनी 'स्त्री संपादित नियतकालिके: एक चिकित्सक अभ्यास' (१८५० ते १९५०) या विषयावर २००५ मध्ये पीएच.डी. साठी शोधप्रबंध पूर्ण केला आहे. या अभ्यासात नियतकालिकांमधून लेखन करणाऱ्या स्त्रियांचे, संपादकाचे विस्तृत विवेचन केले आहे. नियतकालिकातून अनेक स्त्रिया व्यक्त होत्या. स्त्रीवर्गासाठी म्हणून सुरू झालेले पहिले नियतकालिक म्हणजे 'आर्यभगिनी' हे आनंदीबाई लाड यांनी १८८६ मध्ये सुरू केले. ते काही दिवसांनी बंद पडले. पुढे १८८९ मध्ये 'माणकबाई लाड' यांनी ते पुन्हा सुरु केले. या मासिकात पिरोजबाई कोठारी, सोन्याबाई गाडेकर, एम.व्ही. धुरंदर ह्या स्त्रिया लिहीत होत्या. १८९५ मध्ये कृष्णाबाई माळवदकर यांनी 'सीमंतिनी' हे मासिक पुण्याहून सुरु केले. काशिनाथ रघुनाथ मित्र यांच्या पत्नी मनोरमाबाई मित्र यांनी १९०१ मध्ये 'महाराष्ट्र महिला' हे मासिक मुंबईहून सुरू केले. त्यात आनंदीबाई काळेले, लहानुबाई कोठारे

ह्या स्त्रिया लिहीत होत्या. १९०२ मध्ये 'ताराबाई नवलकर' यांनी मुंबईहून 'स्वदेश भगिनी' हे मासिक सुरु केले. पुढे १९०९ मध्ये सरस्वती वैद्य यांनी गोव्याहून 'प्राचीप्रभा' हे मासिक सुरू केले. १९१६ मध्ये सीताबाई सावंत यांनी मुंबईहून 'गृहिणी-रत्न -माला' हे मासिक सुरू केले. माई वरेरकर यांनी १९३३ मध्ये 'महिला' हे मासिक मुंबईहून सुरु केले. त्यात त्यांनी 'ध्वनीलेख' हे सदर लिहून स्त्रियांवरील अत्याचारावर प्रकाश टाकला.

कुमुदिनी खेर यांनी १९३५ मध्ये मुंबईहून 'वाग्विलास' हे मासिक सुरू केले. 'बाई' हा शब्द आपल्या नावापुढे लिहिण्याची चाल बंद करावी असे त्यांनी सांगितले. १९४१ मध्ये 'भगिनी' हे नियतकालिक सुरु झाले. नलिनी साहेबराव शिंदे यांनी भगिनीचे संपादन केले. १९४१ मध्ये 'जैन महाराष्ट्र महिला' हे मासिक सोलापूरहून सुरु झाले. सुमतीबाई शहा यांनी 'मंदिर' नावाचे मासिक मुंबईहून सुरु केले. बहूजन समाजातील स्त्रियांचे जीवन त्यात आढळते. 'वनिता विश्व' हे मासिक १९४८ मध्ये निघाले. डॉ. चंद्रकला हाटे यांनी ते संपादित केले. स्त्रियांच्या इतर प्रश्नांबरोबर आरोग्यविषयक विचार त्यात मांडले. सदरील नियतकालिकांतून स्त्रियांनी स्त्रीशिक्षण, सामाजिक सुधारणा, विवाहविषयक समस्या, आरोग्य, अशा विविध प्रश्नांवर विचार मांडले. त्यातील निवडक निबंधलेखिकांचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

काशीबाई कानिटकर यांनी मराठीतून गद्यलेखन केले आहे. काशिबाई या पंढरपूरचे कृष्णराव बापट यांच्या कन्या. प्रार्थना समाजातील व्याख्याने ऐकून त्यांना शास्त्रीय विषयात आवड निर्माण झाली. पती गोविंदराव कानिटकर आणि त्यांनी मिळून 'निबंधचंद्रिका' हे नियतकालिक सुरू केले. त्यांनी कथा, कादंबऱ्या लिहिल्या. अनेक मासिकांतून स्फूट लेखनही केले. त्यांनी डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र लिहिले. त्यांचा 'कालच्या स्त्रिया व आजच्या स्त्रिया' हा निबंध प्रसिद्ध आहे. त्यावेळी तो 'सुबोध पत्रिकेत' छापून आला होता.

१८८६ मध्ये आनंदीबाई लाड यांनी 'आर्य भगिनी' हे मासिक सुरु केले. त्यामधून त्यांनी 'लग्नाच्या चाली', 'लवकर लग्न करण्याची चाल' अशा विषयांवर लेख लिहिले. 'आर्य भगिनी' बंद पडल्यानंतर माणकबाई लाड यांनी ते १८८९ मध्ये सुरु केले. त्यांनी 'शिवणकामाचा मार्ग' या लेखात उच्चवर्गीय गरीब स्त्रियांच्या अर्थाजर्नाविषयी विचार मांडले आहेत. २१ मार्च २०१५ रोजीच्या 'लोकसत्ता' मध्ये 'स्त्रिया लिहू लागल्या' या लेखात डॉ. स्वाती कर्वे यांनी स्त्रियांच्या गद्यलेखनाविषयी एक टिपण लिहिले आहे. त्यात त्यांनी 'कांताबाई तर्खडकर, 'पिरोजबाई कोठारी', सोन्याबाई गाडेकर, लीनाबाई शामराव, सीताबाई लांडगे इत्यादी लेखिकांची पहिली पिढी नियतकालिकांतून पुढे येत होती' (https;//www.loksatta.com) असे म्हटले आहे

कांताबाई तर्खडकर यांनी 'स्त्रियांची स्थिती' हा लेख लिहून जरठकुमारी विवाहावर टीका केली. दहा वर्षाच्या कुमारिकेबरोबर साठ वर्षाच्या वृद्धाचे लग्न झाल्यामुळे पती कधी मरेल सांगता येत नाही. त्यामुळे तिचे होणारे नुकसान भरुन काढता येत नाही. कांताबाई तर्खडकर यांनी हा विषय मांडून जरठकुमारी विवाहाचे दोष दाखवले आहेत. सुंदराबाई देसाई यांनी बालविवाह आणि जरठकुमारी विवाह यांस 'राक्षसी विवाह' असे म्हटले आहे. 'बालविवाह' या लेखात सीताबाई लांडगे यांनी मुलींच्या आई-वडिलांना दोषी ठरवले आहे.

munotes.in

एकूणच स्त्रीलिखित मराठी निबंधाचा इतिहास मोठा नसला तरी तो दुर्लक्षित करण्याइतपत नाही. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांना मिळालेले दुय्यम स्थान, पुरुषसत्ताक व्यवस्था यामुळे ती व्यक्त होऊ शकत नाही. तिला शिक्षणापासून वंचित ठेवले होते. ज्यावेळी तिला शिक्षण मिळाले, समाजसुधारणेसाठी पुरुषांनी पुढाकार घेतला, त्यावेळी ती लिहू लागली. संपादन क्षेत्रातही ती उतरली. त्यातून स्त्रियांनी विविध प्रश्नांवर लेखन केले. मुक्ता साळवे, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, काशिबाई कानिटकर, आनंदीबाई व माणकबाई लाड, कांताबाई तर्खडकर, पिरोजबाई कोठारी, सोन्यबाई गाडेकर, सीताबाई लांडगे, सुशीला जाधव, डॉ. चंद्रकला हाटे, माई वरेरकर, ताराबाई नवलकर, मनोरमाबाई मित्र, नलिनी शिंदे, अशा कितीतरी स्त्रियांनी आपल्या लेखनातून स्त्रीवर्गाचे प्रश्न मांडले. पुढील काळात इरावती कर्वे, दुर्गाबाई भागवत यांच्यासारख्या परिपक्व विचार मांडणाऱ्या निबंधकार होऊन गेल्या. आजही अनेक स्त्रिया लिहीत आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्रीवादी साहित्य चळवळीतील निबंधाचा आढावा घ्या.

## १.५ समारोप

'मराठी निबंध वाङ्मयाचा इतिहास' हा महाराष्ट्राच्या सर्वांगीण जडणघडणीचा साक्षीदार आहे. पद्यलेखनांची फार मोठी परंपरा असलेल्या साहित्यात गद्यलेखन त्यातही निबंध लेखन हे फार उशिरा सुरू झाले. 'लीळाचरित्र' आणि 'बखर वाङ्मय' यांची समृद्ध गद्यलेखन परंपरा पुढे विकसित झाली नाही. त्यासाठी इंग्रजी सत्तेचा उदय व्हावा लागला. इंग्रजी साहित्याच्या परिचयाने आरंभी भाषांतरित, रूपांतरित स्वरुपात लिहिला गेलेला मराठी निबंध 'दर्पण' मधून स्वतंत्रपणे वाचकांपुढे आला.

निबंध हा वाङ्मयप्रकार सरळ अर्थ स्पष्ट करणारा असल्यामुळे निबंध लेखकांनी आपापल्या काळातील प्रश्न निबंधातून मांडले. इंग्रजी संस्कृतीच्या तुलनेने आपण फार मागे आहोत, आपला समाज, देश मागे आहे याची जाणीव पहिल्या पिढीतील शिक्षितांना झाली. त्यांनी समाजसुधारणेला महत्त्व दिले. त्यासाठी नवनवीन माहिती देशबांधवांना देण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हा प्रत्येक कालखंडातील प्रश्न मराठी निबंधाच्या केंद्रस्थानी राहिलेला आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी - प्रथा - परंपरा, चातुर्वर्ण्यव्यवस्था, अस्पृश्यता, दलित-स्त्रीवर्गाचे शिक्षण, यांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रीय समाजाला बाहेर काढण्यासाठी निबंध लेखकांनी आपले विचार मांडले. परकियांच्या सत्तेखाली आपला विकास होणार नाही अशी भूमिका घेऊन लेखन झाले. त्यातून स्वदेश, स्वभाषा आणि स्वधर्म यांचा अभिमान व्यक्त करणारे लेखक पुढे आले. पारमार्थिक विचाराबरोबरच भौतिक व विज्ञानातील जाणिवा व्यक्त करणारे निबंध लेखकही या काळात आढळतात. शेतकरी-कामगार वर्गाच्या उन्नतीसाठीचा विचार मराठी निबंधातून मांडला जात होता. एकूणच 'मराठी निबंधाचा अभ्यास

करणे म्हणजे महाराष्ट्राच्या जडणघडीचा शोध घेणे असे म्हणता येते. इतर वाङ्मयप्रकारांच्या तुलनेने मराठी निबंधाचा उद्गम आणि विकास हा देशाच्या स्थितीगतीचा परिप्रेक्ष्य आहे याची नोंद घेणे आवश्यक ठरते.'

## १.६ संदर्भ


१. डॉ. मोरे, गिरीश : 'मराठी निबंध : उद्गम आणि विकास', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००९

२. डॉ. तुळपुळे, शं.गो. : 'मराठी निबंधाची वाटचाल' : विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, नागपूर, १९६६

३. जांभेकर, ग.गं. संपा. : 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह खंड २': लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९५०

४. प्रियोळकर, अ.का. संपा. : 'लोकहितवादीकृत निबंध संग्रह' : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६७

५. फडके, य.दि. (संपा) : 'महात्मा फुले गौरव ग्रंथ': हरि नरकेः म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, १९९१

६. कुलकर्णी, पु.बा. : 'मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड' : पु. बा. कुलकर्णी, मुंबई, १९९३

७. चिपळूणकर, विष्णूशास्त्री : 'निबंधमाला खंड' - १: विष्णुशास्त्री चिपळूणकर, वरदा बुक्स, पुणे १९९३

८. आगरकर, गोपाळ गणेश : 'आगरकर वाङ्मय खंड - १': म.रा.सा.स. मंडळ, मुंबई १९८४

९. केळकर, न.चिं. : 'समग्र केळकर वाङ्मय खंड ४': मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पुणे, १९३८

१०. गद्रे, अनंत हरि (संपा.) : 'अच्युतराव कोल्हटकर स्मारक, ग्रंथ भाग १': मुंबई १९३३

११. राजवाडे, वि. का. : 'राजवाडे लेख संग्रह' : साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९४९

१२. मून, वसंत (संपा) : 'डॉ. आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक' : महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९०

१३. शिंदे, वि.रा. : 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न': महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७६

१४. सावरकर, वि.दा. : 'सावरकरांचे निवडक वाङ्मय': मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई १९७३

१५. श्री. माटे. म. : 'विजार गुंफा' : जय प्रकाशन, मुंबई, १९५५

१६. डॉ. अळतेकर, म. मा. : 'मराठी निबंध' : सुविचार प्रकाशन, नागपूर-पुणे, १९४९

१७. 'स्त्री संपादित नियतकालिके' : एक चिकित्सक अभ्यास : (अप्रकाशित पी.एचडी. शोध - नीला सुरेश अभ्यंकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, २००५)

१८. https://www.Loksatta.com/chaturang.news/women-began-to-write-1083682, ६ डिसेंबर २०२० रोजी भेट


munotes.in

## १.७ नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) १८७४ ते १९२० या काळातील मराठी निबंधाचे स्वरूप स्पष्ट करा.
२) दलित चळवळीतील निबंधकारांचा परिचय तुमच्या शब्दात करुन द्या.
३) सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीतील मराठी निबंधांचा आढावा घ्या.
४) १९२० ते १९६० या काळातील मराठी निबंधकारांची ओळख करुन घ्या.

**ब) टिपा लिहा.**

१) मराठी निबंधाचा प्रगत काळ
२) मराठी ललित निबंध
३) स्त्रीलिखित मराठी निबंध
४) अ.ब. कोल्हटकर यांचे निबंधविशेष

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या निबंधात विशेषत्वाने कोणत्या गोष्टीची जाणीव होते ?
२) राजारामशास्त्री भागवत यांनी १८९२ मध्ये कोणता निबंध लिहिला ?
३) ताराबाई शिंदे यांच्या निबंधाचे नाव काय ?
४) आद्य दलित निबंधकार म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो ?

❖❖❖❖

munotes.in

# घटक २

# कविता : (१८७४-१९२०)

**घटक रचना :**

२.०. उद्दिष्ट्ये
२.१. प्रस्तावना
२.२. घटक विवेचन
२.३. समारोप
२.४. संदर्भग्रंथ

## २.०. उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत भागात आपण मराठी काव्याचा १८८० ते १९२० पर्यंतचा कालखंड अभ्यासणार आहोत. अभ्यासामागील उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) मराठी काव्याच्या बदलाचे स्वरूप समजून घेणे.
२) प्राचीन मराठी काव्य लेखनाचे स्वरूप समजून घेणे.
३) प्रस्तुत कालखंडातील केशवसुतांच्या काव्यलेखनाचे स्वरूप व वेगळेपण समजून घेणे.
४) प्रस्तुत कालखंडात लेखन करणाऱ्या कवींच्या काव्यलेखनाचे व योगदानाचे स्वरूप समजून घेणे.
५) प्रस्तुत कालखंडातील काव्याची वैशिष्ट्ये कोणती याचा शोध घेणे व मराठी काव्याच्या विकासाचे स्वरूप समजून घेणे.

ही उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेवून प्रस्तुत काव्यलेखन कालखंडाचा अभ्यास करावयाचा आहे. मराठी काव्याच्या इतिहासातील या कालखंडाच्या योगदानाचे स्वरूप समजून घेणे हा एकूणच अभ्यासाचा उद्देश आहे.

## २.१. प्रस्तावना :

मराठी काव्याचे सामान्यतः प्राचीन व अर्वाचीन असे दोन कालखंड पडतात. प्रत्येक कालखंडात विशिष्ट टप्प्यावर काव्यलेखनाच्या स्वरूपात फरक पडत गेला आहे. त्या त्या काळबदलाचे स्वरूप समजून घेतले की हा फरक लक्षात येतो. मराठी काव्याचा इतिहास समजून घेण्यासाठी काव्यलेखनातील हे बदल लक्षात घेणे गरजेचे आहे. मराठी काव्याचा इतिहास म्हणजे एकूणच काळाला सामोऱ्या जाणाऱ्या कवी व त्यांचे काव्यलेखनाच्या वृत्ती यांच्या आकलनाचा अभ्यास आहे. प्रस्तुत कालखंडाचा अभ्यास देखील आपणास याच दृष्टिकोनातून करावयाचा आहे. अशा प्रकारे इतिहासाचा शोध घेताना काळाच्या पटावर घडणाऱ्या कृतींचा वर्तमानकालीन

munotes.in

संदर्भात शोध घेणे व चिकित्सा करणे देखील अपेक्षित असते. हे सुद्धा प्रस्तुत घटकाभ्यास करताना ध्यानात ठेवावयाचे आहे.

## २.३. घटकविवेचन :

मराठी काव्याला अनेक शतकांची परंपरा आहे. ही परंपरा अविच्छिन्न स्वरूपात गेल्या शतकाच्या आरंभी आपल्या हाती पडलेली होती. प्राचीन काळात मराठी काव्याने आपला ठसा उमटवलेला होता. इतर प्रकारांच्या तुलनेत मराठी काव्य निश्चितच वाखाणण्याजोगे होते. सामाजिक गतीविधींमधील आपले स्थान मराठी काव्याने दाखवून दिले होते. प्राचीन मराठी काव्याचे हे स्वरूप समजून घेणे यासाठी आवश्यक आहे की जेणे करून आपणास १८८० च्या टप्प्यावर असे काय घडले की ज्यामुळे या टप्प्यावरच्या कवितेकडे विशेषकरून पहावे लागते. म्हणूनच प्रथमतः प्राचीन मराठी कवितेचे स्वरूप थोडक्यात समजून घेऊ.

### २.३.१. प्राचीन मराठी काव्याचे स्वरुप :-

Lady of the lake Princess Heroic epic प्राचीन मराठी काव्याची परंपरा, संत, पंत व तंत या तीन भागात प्रामुख्याने विभागलेली आहे. संत परंपरा ही भक्तीपरंपरा म्हणून देखील ओळखली जाते. या कालखंडातील संतांचे योगदान हे अविस्मरणीय आहे. भक्तीपरंपरेतील प्रत्येक संताची कामगिरी उल्लेखनीय असल्यानेच त्या त्या संतांच्या काव्यलेखनाने व त्यांच्या प्रभावळीने आपला एक कालखंड निर्माण केला. जसे की, श्री. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ व संत तुकाराम या संतांच्या अभंगरचना या विशिष्ट काळाच्या द्योतक आहेत. त्यांच्या प्रभावातून अनेक संतांनी लेखन केले व मराठी काव्यास आपले योगदान दिले. भक्तीपरंपरेतील काव्यलेखनाचे स्वरूप हे आध्यात्मिक होते. रामायण, महाभारत, भागवत यातील देवदेवतांच्या कथा व घटना या म. भक्ती व मोक्ष हे हेतू त्यामागे होते. त्यानंतरच्या पंडिती काव्याचे स्वरूप तत्त्वविवेचन व पांडित्यदर्शन हे होते. त्यांनीदेखील काव्यनिर्मितीसाठी पुराण साहित्य, वेद व शास्त्रे यांचा आधार घेतला. या पंडितांना संस्कृत साहित्य जवळचे वाटले. या कालखंडात देखील मोरोपंतांसारख्या पंडितांनी आपल्या काव्यलेखनाने विशिष्ट काळ व्यापला. शाहिरी काव्यातील लावणी व पोवाडा यांनी अधिकाधिक माणसाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. बोध, प्रवचन, मार्गदर्शन याबरोबरच मनोरंजन हे देखील या काळाच्या काव्यलेखनासमोरचे उद्दिष्ट होते. अर्थातच त्यास मर्यादा होत्या. तरीही या काळातील काव्यलेखनाने निश्चितच मानवी मनातील शृंगार व वीररसाचा परिपोष केला. आपण ज्या कालखंडाचा अभ्यास करणार आहोत. त्याची पार्श्वभूमी म्हणून आपण प्राचीन मराठी काव्याचे स्वरूप पाहिले. तरीही सुरुवातीलाच हे लक्षात घेणे गरजेचे आहे की आपण जरी असे भाग करत असलो तरी ते केवळ अभ्यासाच्या सोयीसाठी असतात.

१८७५ मध्ये देखील भक्ती परंपरा स्तोत्रे, पदे, अभंग यांच्या स्वरूपात अस्तित्वात होती. पंडिती परंपरा लौकिक विषयावर वृत्तबद्ध रचना व काही संस्कृत काव्याचे भाषांतर या स्वरूपात अस्तित्वात होती. अर्धलौकिक व अर्धपौराणिक अशा स्वरूपात मोरोपंती परंपरा कायम होती. बापूसाहेब कुरुंदवाडकर, राजा टी. माधवराव, पु. बा. जोशी हे मोरोपंती संप्रदायातील कवींचे काव्यलेखन सुरू होते. मात्र शाहिरी परंपरा अस्तित्वात असली तरी शिष्टमान्य नव्हती. परंतु या समग्र काव्यलेखन प्रवाहात बदल हा १८७४ पासून सुरू असलेल्या काही बदलांनी

घडवून आणला. हा बदल ठळकपणे १८८५ मध्ये दृश्य झाला. एकूणच मराठी साहित्यात भाषांतर युग म्हणून ओळखला जाणाऱ्या काळाचा परिणाम म्हणून मराठी काव्यातही काही भाषांतरित साहित्य निर्माण झाले. संस्कृतवरून किंवा तत्सदृश्य ग्रंथांवरून काही भाषांतरे झाली. परशुरामपंत तात्या गोडबोले यांचे काव्य त्यांनी केलेल्या संस्कृत नाटकांच्या भाषांतरामधील श्लोकाच्या अनुवादाच्या स्वरूपाचे होते. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी मेघदूत, करूणविलास, अन्योक्ती यांची भाषांतरे केली. गणेशशास्त्री यांनी रघुवंशाचे भाषांतर केले. पारखीशास्त्री यांनी ऋतुसंहाराच्या धर्तीवर 'ऋतुवर्णन' हा भाषांतरित ग्रंथ लिहिला. परंतु हे सर्व भाषांतरित साहित्य संस्कृतमधून आलेले होते. परंतु इंग्रजी काव्याचे भाषांतरे हे या काळातील बदलास अधिक कारण ठरले. स्कॉटच्या या ग्रंथाचे 'दैवसेनी' या नावाने प्रधान यांनी भाषांतर केले. टेनिसन यांच्या काव्याचे कीर्तिकर यांनी भाषांतर केले. महादेवशास्त्री कोल्हटकरांनी इंग्रजी स्फुट कवितांची भाषांतरे केली. अशा स्वरूपाच्या भाषांतरित साहित्याच्या निमित्ताने मराठी कविता व कवी यांना इंग्रजी कवितेचा परिचय झाला. भाषांतराच्या निमित्ताने इंग्रजी काव्याचे वाचन व अध्ययन होऊ लागले. या धर्तीवर काही काव्यप्रयोग मराठीत आले. कुंटे यांनी 'राजा शिवाजी' च्या निमित्ताने हा काव्यप्रकार मराठीत आणला. या काव्यलेखनात प्रथमच निरलंकृत भाषेचा वापर केला गेला. पंडिती व शाहिरी काव्यलेखनाच्या धर्तीवर हा भाषावापर उल्लेखनीय होता. एकूणच विषयात थोडेसे नावीन्य आणि स्त्रीविषयक दृष्टिकोनात फरक असणारे वि. मो. महाजनी यांचे 'कुसुमांजली' हे काव्य देखील विशेष उल्लेखनीय होते. हा ग्रंथ म्हणजे भावगीत रचनेची पूर्वचिन्हे म्हणावयास हवीत. याच इंग्रजी साहित्याच्या भाषांतराने काव्यलेखनामध्ये बदल घडून आला किंवा त्यासाठीची भूमी तयार केली असे म्हणावे लागते.

### २.३.२. १८८५ ते १९२० कालखंड :

१८८५ ते १९२० हा अर्वाचीन मराठी कवितेतील क्रांतिकाल म्हणून ओळखला जातो. ही क्रांती व काळ प्रामुख्याने केशवसुत या कवीच्या नावे ओळखली जाते. या काळात केशवसुत समकालीन काही कवी काव्यलेखन करीत असले तरी हा काळ केशवसुतांच्या नावेच ओळखला जातो. यामागे देखील कारणे आहेत. या काळात केशवसुत समकालीन ना. वा. टिळक व विनायक हे काव्यलेखन करत होते. परंतु त्यांची कविता कथनपर होती. कथनपरता व कथात्मकता हे तिचे विशेष होते. त्यांच्यापेक्षा दहा वर्षांनी काव्यरचनेस सुरूवात केलेल्या दत्त कवींच्यावर इंग्रजी काव्याचा पुष्कळ परिणाम होता. तरीही ही क्रांती केशवसुतांच्या नावे ओळखली जाते. आता आपण हा काळ क्रांती काळ म्हणून का ओळखला जातो? या क्रांतीचे स्वरूप कशा प्रकारचे होते? आणि या क्रांतीने मराठी काव्यात कोणता बदल घडवून आणला? याचा अभ्यास करू.

क्रांतीचे बीज इंग्रजी काव्यवाङ्मयाच्या वाचन-अध्ययनात होते. या काळात अनेक कवींनी इंग्रजी काव्याची भाषांतरे देखील केली. तरीही १८८५ ते १८९० या काळात केशवसुतांसारखा दुसरा कोणताही काव्यलेखक आत्मलक्षी कवितेच्या परिणामक्षेत्रात असलेला दिसत नाही. म्हणून ही क्रांती त्यांच्या नावे ओळखणे वावगे ठरत नाही. कारण क्रांतीचे केंद्रस्थानच कवितेच्या माध्यमातून आत्माविष्कार करणे हे होते. हा आत्माविष्कार केशवसुतांच्या कवितेत प्रभावीपणे येतो. याचे स्वरूप आपण पुढे पाहणार आहोतच परंतु काव्य आत्मलक्षी बनल्याने कथनपर व वर्णनपर असलेले मराठी काव्य कथात्मकतेपासून वेगळे झाले. तिला तिचा स्वतःचा चेहरा सापडण्यास मदत झाली व मराठी कवितेने आपला स्वतःचा चेहरा भावकवितेच्या माध्यमातून शोधला. केशवसुतांच्या कवितेतून त्यांचा काव्यविषयक दृष्टिकोन देखील कसा वेगळा होता हे लक्षात येते. यासाठी त्यांच्या कवी आणि काव्यासंबंधीच्या अनेक कविता

अभ्यासता येतील. त्यांच्या काव्यलेखनाची ऊर्जाच नवीन काही करण्याची होती. नेणिवेत पूर्वपरंपरेचे पाश तोडण्याची तयारी चालू होती. इंग्रजी काव्यवाचनाच्या व अभ्यासाच्या परिणामाने त्यास ऊर्जा प्राप्त झाली व मराठी कवितेच्या बदलास देखील गती मिळाली. त्या ऊर्जेची अभिव्यक्ती म्हणजेच ही क्रांती म्हणावी लागेल. मराठी कवितेचे क्रांतीपूर्वस्वरूप व उत्तर स्वरूप लक्षात घेतले तरी केशवसुतांच्या कवितेने मराठी कवितेत कोणता बदल घडवून आणला व त्यास क्रांती का म्हणावयाचे याची काहीएक कारणे लक्षात येतात.

## २.३.३. मराठी कवितेचे क्रांतीपूर्वस्वरूप :-

* काव्यलेखनाचे धार्मिक, पौराणिक काही प्रमाणात ऐतिहासिक विषय होते.
* काव्याकडे साधन म्हणून पाहिले जाई. अध्यात्मविवेचन, बोध आणि उपदेश, दीर्घ अथवा लघु कथानिवेदन, नाट्यप्रसंग चित्रण, निसर्गवर्णन इ. कार्य काव्याला करावी लागत.
* दीर्घ आणि कथनात्मक कविता
* अक्षरगणवृत्ते, ओवी, अभंग या रचना प्रकारात कविता लिहिली जात.
* अलौकिक विषयांद्वारा लौकिक भावनाभिव्यक्ती करण्यात अडचणी येत.

**मराठी कवितेचे क्रांती नंतरचे स्वरूप :-**

* कवीची स्वतःची, त्याच्या भोवतालच्या परिस्थितीस किंवा घटनास होणारी प्रतिक्रिया आत्मलेखन म्हणून ओळखली जाते.
* या कवितेचे स्वरूप स्फूट आणि भावगीतात्मक होते.
* काव्यलेखनासाठी मात्रावृत्ते व जातीप्रकार यांचा वापर केला गेला.
* लौकिक, सामाजिक, समकालीन विषयाधारित काव्यलेखन झाले.
* या कवितेने आत्मविष्कारासाठी लेखन हे आपले साध्य मानले.

हा भेद लक्षात घेतला की क्रांती मराठी कवितेच्या बाह्यांग आणि अंतरंग या दोहोंमध्ये घडून आली. म्हणूनच ही क्रांती परिपूर्ण होती असे म्हटले जाते.

१८८५ ते १९२० हा अर्वाचीन मराठी कवितेतील क्रांतिकाल पस्तीस वर्षांचा होता. या काळात काव्यलेखकांच्या दोन पिढ्या झाल्या.

**पहिली पिढी :-** केशवसुत व समकालीन ना. वा. टिळक, माधवानुज, दत्त, विनायक, लक्ष्मीबाई टिळक या कवींची.

* या पिढीने समाजविषयक दृष्टिकोनात बदल घडवून आणला.
* या पिढीने सामाजिक रूढींविरूद्ध बंड करण्याच्या वृत्तीस प्रारंभ केला.

**दुसरी पिढी :-** गोविंदाग्रज, रेंदाळकर, बी, बालकवी या कवींची. ही पिढी १९१० नंतर बहरास आली. या पिढीतील प्रमुख कवी १९२०च्या सुमारास दिवंगत झाले. त्यामुळे या पिढीचा काळ १९२० पर्यंत मानला जातो.

* या पिढीने स्त्रीविषयक भूमिका बदलल्या.
* शृंगार रसाला वळण लावले. आंतरिक भावनेस म्हणजेच प्रेमास महत्त्व दिले. जवळच्या व्यक्तीविषयी प्रेम व्यक्त करताना अर्थातच शृंगाराला फाटा मिळवून जबाबदारीने प्रेमाभिव्यक्ती होऊ लागली.
* संकोचाची व अपराधाची भावना जाऊन रसिक मनातील भावना टिपताना मोकळेपणा आला.

या स्वरूपावरून लक्षात येते, की पहिल्या पिढीने नवीन रचनेला प्रारंभ करून दिला आणि दुसऱ्या पिढीने ती दृढमूल केली.

## २.३.४. केशवसुतकालीन कविता :-

मराठी कवितेला केशवसुतांचा काव्यविषयक दृष्टिकोन नवा होता. तो इंग्रजी कवितेच्या परिचयातून आलेला होता. तत्कालीन कवितेतील बदल तत्कालीन सामाजिक परिस्थितीशी गरज म्हणून झाला का? या प्रश्नाचे उत्तर देतानाच केशवसुतांनी मराठी कवितेत क्रांती घडवून आणली की नाही? या प्रश्नाचे उत्तर दडलेले आहे. तसेही कोणताही काळ बदलास अनुकूल नसतो तर तो अनुकूल करून घ्यावा लागतो. हा काळ क्रांतीकाळ व या काळातील कविता क्रांतीकालीन कविता म्हणून ओळखली जाते. पूर्वकवितेहून या काळातील कवितेचे वेगळेपण लक्षात घेतले की या कवितेने घडवून आणलेल्या बदलास क्रांती का म्हणावयाचे हे लक्षात येते. या काळात कवितेच्या अंतरंग व बाह्यरंग म्हणजेच आशय-विषय व शैली या दोहोत देखील बदल घडून आले. साहजिकच प्रत्येक काळाप्रमाणे बदल स्वीकारणे तत्कालीन समाजमनास व रसिकमनास कठीण गेले परंतु त्यातूनच कवितेचा विकास देखील होत आलेला आहे हे लक्षात ठेवावयास हवे.

## २.३.४.१. अंतरंगातील बदल :-

### २.३.४. अ) समाजविषयक दृष्टिकोन :-

तत्कालीन समाज हा अज्ञान, अंधश्रद्धा, विषमता, अनीती यांनी बरबटलेला होता. भारतीय समाजमन चुकीच्या धार्मिक कल्पनांच्या आहारी गेले होते. यामुळेच समाज आपल्या समाजविकासाच्या ध्येयापासून ढळलेला होता. इंग्रजी राजवटीने नव्या मूल्यव्यवस्थेची ओळख करून दिलेली असली तरी प्रत्यक्ष जीवनात त्याचे आचरण होत नव्हते. अशा परिस्थितीत केशवसुतांनी काव्यलेखनासाठी फ्रेंच राज्यक्रांतीने दिलेली समता, स्वातंत्र्य व बंधुता ही तत्त्वत्रयी स्वीकारली. व्यापक समताबुद्धी हा केशवसुतांमुळेच या काळातील काव्यलेखनाचा विशेष बनला. स्त्रीविषयक लेखनात जी मुभा घेतली त्यामागे स्त्री पुरुष समता हा हेतू होता. त्याप्रमाणेच त्यांच्या स्वातंत्र्यकल्पनेमध्ये रूढीपासून स्वातंत्र्य ही सामाजिक स्वातंत्र्याची कल्पना प्रभावी होती. येथे 'स्फूर्ति', 'नवा शिपाई' या कविता उदाहरणादाखल पाहता येतील. तसेच पुढे देखील दसरा (गोविंदाग्रज), धर्मवीर (बालकवी), रणशिंग (टिळक), डंका (बी) या कविता याच धर्तीवर लिहिल्या गेल्या. दीनदलित, दुष्काळग्रस्त, विधवा असे आजूबाजूचे ज्वलंत विषय या काळातील काव्यलेखनाचे विषय बनले. यातूनच कविता वास्तवाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते.

**ब) स्वराज्य प्रेम :-**

पारंपरिक कविता ही ईश्वरविषयक भक्तीभावनेवर आधारित होती. मात्र अर्वाचिन कवितेत धर्मप्रेमापेक्षा भाषाप्रेम आणि त्यापेक्षाही देशप्रेम यास महत्त्व प्राप्त झाले. नवीन समाजाची रचना करणारे स्वराज्य हे धर्मविषयक भावनेमध्ये प्रभावी ठरले. स्वदेशविषयक प्रेम यांनी या कवितेला जोश दिला. यामुळे मराठ्यांच्या उज्ज्वल भूतकालीन इतिहासाला उजाळा मिळाला. या स्वरूपाच्या विनायक कवींनी 'कोठला शिवाजी राजा' आणि 'हतभागिनी' या कविता लिहिल्या. भाषाविषयक प्रेमाने या कवितेतील स्वराज्यप्रेमाला बरीच ऊर्जा पुरविली. माधव, गोविंद, तिवारी, सावरकर यांनी या प्रकारचे काव्य समृद्ध केले. स्वातंत्र्याच्या प्रबळ इच्छेतून या काळातील अशा स्वरूपाची कविता लिहिली गेल्याचे लक्षात येते.

**क) सृष्टीप्रेम :-**

या काळात सृष्टी विषयक प्रेमाला काव्यलेखनात स्वतंत्रपणे स्थान मिळाले हे या काळाचे विशेष होय. या काळात सृष्टीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. त्यामुळेच या काळात सृष्टीतील प्रत्येक घटकावर स्वतंत्रपणाने कविता लिहिण्याची पद्धत रूढ झाली. केशवसुतांनी या विषयाच्या अनुषंगाने 'फुलपाखरू', 'भ्रमर', 'पुष्पाप्रत' इ. कविता लिहिल्या. केशवसुतांनी व त्यांच्या कविकल्पनांनी सृष्टी ही शक्ती आहे असे समजून तिच्या अनेक गुढांची उकल करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सृष्टी विषयकही दृष्टी वर्डस्वर्थ आदि पाश्चात्त्य कवींकडून घेतली आणि आत्मसात केली. त्यांच्या समकालीन टिळकांनी मात्र सृष्टीतील फूल हे बोधाचे प्रतीक मानले. मात्र या काळातील इतर कवींच्या तुलनेत बालकवींचे सृष्टीप्रेम निर्हेतुक आणि उत्कट होते. त्यांनी सृष्टी ही शुद्धतेचे व मांगल्याचे प्रतीक मानले. केशवसुतांपेक्षाही त्यांचे सृष्टीप्रेम उत्स्फूर्त, अकृत्रिम आणि जिव्हाळ्याचे होते.

**ड) गूढगुंजनात्मक कविता :-**

केशवसुतांनी मराठी कवितेला दिलेली ही खूप मोठी देण आहे. त्यांनी 'हरपलेले श्रेय', 'झपूर्झा' या कवितांमधून गुढात्म अनुभव सांगितले आहेत. यातून या काळात टिळकांनी 'कोलाहल-मौन-गान' गायिले. कवी बी यांनी 'पिंगा' आणि 'चाफा' या कविता लिहिल्या. गोविंदाग्रजांनी 'फुटकी तपेली' लिहिली. या कवितांमधून अध्यात्म व्यतिरिक्त जीवनविषयक स्वतंत्र तात्त्विक विचार येतो. केशवसुतपूर्वकालीन कवींनी असे प्रयत्न केलेले नव्हते. किंबहुना असे काही असू शकते याची कल्पनाही त्यांना नसावी. म्हणूनच गूढगुंजनात्मक कवितेच्या या प्रवाहाने मराठी कवितेला दिशा देण्याचे काम केले.

केशवसुतकालीन कवितेतील बाह्यांग बदल हे लक्षणीय व स्पष्टपणे दृष्टीस येणार होते.

## २.३.४.२. बाह्यांग बदल :-

**अ) स्फूट रचना :-**

पूर्वकाळातील कविता ही कथानिवेदनात्मक व प्रसंगवर्णनात्मक असल्याने विस्ताराने मोठी होती. परंतु केशवसुतकालीन कविता आत्मनिवेदनात्मक म्हणजेच भावनांच्या उद्गाराची असल्याने विस्ताराने लहान होती. पूर्वीच्या कवितेतील वर्णने व पाल्हाळ कमी झाला. यासच स्फूट कविता म्हणतात. पूर्वीच्या दीर्घ कवितेचे हे लहान स्वरूप रसिकांना आवडले नसल्याने टिकाही झाली.

munotes.in

**ब) मात्रावृत्तांचा वापर :-**

या कवितेतील आणखी एक बाह्यरूपातील बदल म्हणजे ही कविता अक्षरगणवृत्ताकडून मात्रावृत्तात्मक झाली. नवीन कविता कृत्रिम नसल्याने तिला हा बदल मानवला. केशवसुतांनी ही मात्रारचना इंग्रजी पद्धतीवर नेण्याचे सहेतुक प्रयत्न केले. त्यात पादाकुलक (८+ ८ मात्रा) आणि बालानंद (८+ ६ मात्रा) या चरणांचा उपयोग पुष्कळच प्रमाणात केला. अष्टमात्रिक आणि षण्मात्रिक गणांचा उपयोग करून निरनिराळ्या लांबीचे चरणही रचले. एकेका कडव्यात वेगवेगळ्या लांबीच्या चरणांचा उपयोग केला. एकेका कडव्यात येणाऱ्या चरणांची संख्या कमी अधिक करून त्या कडव्यांमध्येही वैचित्र्य साधले. अशा प्रकारे कवितेच्या बंधामध्ये इंग्रजी धर्तीची विविधताही केशवसुतांनी आणली. नवीन छंदोरचनेमध्ये पटवर्धनांनी या प्रयोगांना मान्यता देणारी नावे केशवसुतांच्या कवितांवरून देऊन त्यांचा गौरव केला आहे. 'उन्मनी', 'झपूर्झा', 'श्यामाराणी', 'महती', 'सृष्टिलता' अशी ती नावे आहेत. केशवसुतांनंतर अनेक कवींनी निर्यमक रचना करण्याचा प्रयत्न केला. परंतु केशवसुतांनी निर्यमक रचना केली नाही. यामध्ये रेंदाळकर व घंटय्या नायडू यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो.

**क) सुनीत :-**

सुनीत हा काव्यप्रकार मराठीत आणण्याचे श्रेय केशवसुतांना दिले जाते. या काव्यप्रकाराने विचारांकित भावनेला कवितेत स्थान मिळवून दिले. त्यांची 'मयुरासन आणि ताजमहाल' ही कविता मराठीतील पहिले सुनीत होय. यानंतर त्यांनी सात-आठ सुनिते लिहिली. त्यांचे अनुकरण करून गोविंदाग्रज, बालकवी, तांबे यांनी सुनितरचना केली. रविकिरण मंडळाने याचा जोरदार पुरस्कार केला व अर्वाचीन काळात या काव्यप्रकारास बहर आला.

**ड) विलापिका :-**

हा इंग्रजीतून मराठीत आलेला आणखी एक काव्यप्रकार होय. इंग्रजी इलीजी या काव्यप्रकाराच्या तुलनेत मराठीतील या काव्यप्रकाराचा विचार करावा लागतो. मराठीमध्ये प्रस्तुत कालखंडातील लेंभे यांचा 'शोकावर्त', आगाशे यांचा 'बाष्पांजली' टिळकांची 'बापाचे अश्रू', ही कविता इ. चा उल्लेख या संदर्भात करता येतो. या काव्यप्रकाराच्या स्वभावाप्रमाणे गंभीर विचाराला विलापिकेमध्ये स्थान देणारे 'बाष्पांजली' इतके दुसरे सरस काव्य मराठीत नाही मात्र क्लिष्टतेमुळे ते देखील सरस वाटत नाही. त्यादृष्टीने 'शोकावर्त' सरस आहे. विलापिका म्हणजे दु:खप्रकटन या अर्थाने मोगरे यांनी बरीच अशा प्रकारची कविता लिहिली. परंतु ती सार्वजनिक ठिकाणी बाष्पांजली वाहण्याच्या स्वरूपाची असल्याने म्हणावी तशी कारूण्यमयी नाही. तरीही त्यांची कविता दखल घेण्याजोगी आहे.

**इ) उपहास काव्य :-**

हे काव्य विनोदी कवितेच्या जवळ जाते. हे काव्य म्हणजे एकप्रकारची सामाजिक टिकाच असते. या काव्यप्रकाराचे प्रवर्तक व परंपरा चालविणारे कवी मोगरे हे होत. त्यांनी 'पदवीचा पाडवा', 'अभिनव धर्मस्थापना' आणि 'मेथाजीची मजलस' ही तीन दीर्घ उपहासात्मक काव्ये लिहून सरकारी पदवीकरता हपापलेले मनुष्य, सनातनी वृत्तीचे लोक आणि जहाल राजकारणाचे अनुयायी यांच्यावर उपहासाचे शस्त्र चालविते. यास्वरूपाची 'सुधारक' व 'नकुलांकर' ही काव्ये पटवर्धनांनी लिहिली.

## ई) शिशुगीत :-

मुलांच्याकरिता काही वाङ्मयनिर्मिती करण्याच्या हेतूने अमेरिकन मिशन 'बालबोधमेवा' हे नियतकालिक १८७३ पासून काढीत. टिळकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानंतर त्यांनी स्वतः या नियतकालिकासाठी काव्यलेखन केले. कवी दत्त आणि बालकवी यांच्याकडूनही बालकविता लिहून घेतली व मराठीतील या काव्यलेखन प्रकारास प्रारंभ झाला. टिळकांनी कविता बालमन समजून घेण्याऐवजी ती त्यांना बोध करणारी, कौतुक करणारी होती. परंतु दत्त व बालकवींच्या शिशुगीतांनी प्रौढांच्या मनातही स्थान मिळविले.

क्रांतीच्या प्रभावातून मराठी कवितेत काही महत्त्वपूर्ण बदल झाले. त्यातून सुनीत, विलापिका, शिशुगीत यासारखे काव्यप्रकार निर्माण झाले व पुढील काळात अधिक बहरले. या सर्वच बदलांची ओळख करून घेतली. केशवसुतांची दृष्टी जीवनाच्या गंभीर बाजूकडे अधिक वळणारी, आणि त्यांची प्रतिभा रूढ विचार सोडून अधिक स्वतंत्रपणे विहार करणारी आणि विषयदृष्ट्या अधिक प्रान्त आक्रमणारी अशी होती. म्हणून तिचे परिणाम त्यांच्यानंतरच्या कवितेवर अधिक झाले. या कवितेने व्यक्तीच्या भावनांना महत्त्व देऊन विचारांपेक्षा संवेदनशीलतेशी कवितेचा संबंध जोडून दिला. लौकिक जीवनाच्या नव्या जाणिवांनी जगण्याकडे व भवतालाकडे पाहिले जाऊ लागले. समाज व व्यक्तीमन स्वातंत्र्य, बंधुता, समता या नव्या आधुनिक मूल्यांनी प्रेरित झाले. त्याअनुषंगाने भावभावनांची अभिव्यक्ती होऊ लागली. तितकीच सौंदर्यलालसा, प्रेमपूजन, सामाजिक रूढींविरूद्धची बंडखोरी, दूरच्या भूतकाळाचे आकर्षण, गहिरी व अनाकलनीय उदासीनता, गूढगुंजन ही या कवितेचे विशेष होते.

१८८५ ते १९२० या क्रांतीकालातील कविता नवीन कविता म्हणून ओळखली जाते. या नवीन कवितेचे प्रतिनिधी म्हणून श्री. माडखोलकर यांनी केशवसुत, टिळक, विनायक, गोविंदाग्रज आणि बालकवी यांचा 'आधुनिक कविपंचक' असा उल्लेख केला. आधुनिक या शब्दांचा वापर त्यांनी केवळ कालवाचक दृष्ट्या केला नसावा. काव्यातील नवीनत्वाचा विचार त्यांना अपेक्षित असावा. असे असले तरी केवळ या पाच कवीचा 'आधुनिक कवी' म्हणून विचार करता येत नाही असे रा. श्री. जोग यांचे मत आहे. कवी विनायकांचे सामाजिक विचार पूर्वपरंपरेतील होते मात्र ते केशवसुतांच्या सामाजिक विचारांनी प्रभावित होते. त्यांची आत्मलेखनात्मक कविता देखील फार नाही. यापेक्षा कवी बी आणि रेंदाळकर यांचा या कविपंचकात समावेश होणे गरजेचे होते असे वाटते. कारण कवी बी यांनी नवीन कवितेचा स्पष्टपणे कैवार घेतला होता. एक 'कमला' हे थोडेसे दीर्घ काव्य सोडल्यास त्यांची स्फूट कविता भावगीतात्मक होती. संस्कृतानुसारी रेंदाळकरांनी देखील लवकरच नवीन संप्रदायामध्ये प्रवेश केला व भावगीतात्मक कविता लिहिली. कवी माधवानुज यांनाही नवीन कवितेचे पाईक समजावयास हवे. अकाली दिवंगत कवी दत्त यांच्याकडून आणखी रचना झाल्या असत्या तर ते देखील या काळात समाविष्ट झाले असते. कवी नागेश स्वतःस स्पष्टपणे नवीन संप्रदायाचे अनुयायी समजत. प्रेमविषयक भावना स्वतःच्या म्हणून व्यक्त करण्याची रूढी नवीन कवितेने सुरू केली. त्याचा पुरेपूर उपयोग करणारे गोविंदाग्रज मराठी कवितेतील 'प्रेमाचे शाहीर' बनले. ते स्वतःस 'केवशसुतांचा सच्चा चेला' समजत. निसर्गप्रेमाचे अधिक मधुर, जिव्हाळ्याचे व सौंदर्यपूर्ण वर्णन करणाऱ्या बालकवींच्या कविता हे या काळाचे मोठे यश आहे. अशाप्रकारे १९२० पर्यंत नवीन कविता चांगलीच रूजली होती. तरीही परंपरेप्रमाणे काव्यरचना करणारे लेंभे, सुमन्त, साधुदास, अनंततनय हे कवी होते. यांच्या काव्यलेखनावर इंग्रजी कवितेचा कोणताही परिणाम झाला नाही. या कवींची स्फूट कविता भावगीतात्मक नव्हती. पारंपरिक पद्धतीच्या

कवींची भाषा अनेक वेळा संस्कृतप्रचुर, पुष्कळदा क्लिष्ट, पांडित्यपूर्ण असे. अक्षरगणवृत्तांवर भर असे. यमकानुप्रासचमत्कार यांचे प्रदर्शन त्यात असे. भरपूर अर्थबोध देणाऱ्या टीपांनी कवितेतील प्रसादगुणांचा अभाव दर्शविला. मात्र भाषा आणि वृत्तरचना शुद्ध ठेवण्याचा या कवींचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. या कवींची भूमिका उपदेशाची होती. 'महाराष्ट्रभाषाचित्रमयूर' ही पदवी धारण करणाऱ्या आठले यांची 'माहेरचे मूळ' आणि 'सासरची पाठवणी' या मुलींना उपदेश करणाऱ्या कविता घराघरात पोहोचल्या. गो. वि. कानेटकर यांची 'संमोहनलहरी' ही चिंतनपर व विचारप्रकटन करणारी कविता वेगळी व उल्लेखनीय ठरली. भिडे यांनी विविध, दीर्घ आणि स्फुट कविता लिहिली, परंतु ती साधी सोपी नसल्याने यश मिळवू शकली नाही. सारांश, ही जुनी परंपरा केशवसुतांच्याच नव्हे, तर त्यांच्या पुढील पिढीच्या कालात आणि नंतरही काही काल चालू होती. त्यानंतर ती फारच क्षीण झाली व हळूहळू नष्टही झाली.

## २.३.५. भा. रा. तांबे व इतर महत्त्वाचे कवी :-

अर्वाचीन कवितेचा तिसरा कालखंड हा १९२० ते १९४५ हा आहे. परंतु दुसऱ्या आणि तिसऱ्या कालखंडाला जोडणारे श्री. 'चंद्रशेखर' शिवराम गोऱ्हे (१८७३-१९३७) आणि श्री. भास्कर रामचंद्र तांबे (१८७४-१९४१) हे दोन महत्त्वाचे कवी होत. गोऱ्हे हे गुजरात मधील बडोदे येथे आणि तांबे हे मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर, इंदूर, देवास, धार इत्यादी मराठी संस्थानी प्रदेशामध्ये राहून काव्यलेखन करत होते. हे दोघेही 'राजकवी' म्हणून बडोदे आणि ग्वाल्हेर येथे मान्यता पावले. या दोघांनाही केशवसुतांचे गुरूत्व न स्वीकारता आपली रचना चालविली. चंद्रशेखर हे अर्वाचीन पंडिती परंपरेचे नवीन कालातील श्रेष्ठ प्रतिनिधी होते. त्यांनी प्रासंगिक कविता बऱ्याच लिहिल्या. त्यांच्या बऱ्याचशा कविता रूपांतरणात्मक होत्या. त्यांच्या कवितेत भावात्मक भाग अत्यल्प असे. आदर्शवादी संप्रदायातील अक्षरगणवृत्तांचा प्रभाव होता. शब्दांची समर्पक निवड, व्याकरणाची शुद्धता, वृत्तांची निर्दोष योजना, यमकांचा शुद्ध आणि सहज असा विन्यास, अनुप्रासांची माधुर्यपूर्ण, पण संयमयुक्त साधना इ. गुणविशेषांमुळे त्यांची कविता नटलेली आहे. नवीन परंपरेचा स्वीकार न करताही त्यांनी नवीनास आदर वाटावी अशी कामगिरी केली.

तांबे हे वृत्तीने रोमँटिक होते. त्यामुळे कविता स्फुट, भावगीतात्मक व आत्मलेखनात्मक आहे. त्यांच्या कवितेचे टेनिसनची गीते आणि ब्राऊनिंगची नाट्यगीते यांच्याशी नाते जुळते. त्यांनी कोणाच्याही आहारी न जाता आपल्या स्वतंत्र काव्यलेखनाने मराठी कवितेमध्ये गीतसंप्रदाय निर्माण केला. नाट्यसंगीतातील गीतप्रेमातून प्रेरणा घेऊन मराठीत नाट्यगीतपरंपरा रूजविली. तांबे केशवसुतांपासून वेगळे ठरतात ते त्यांच्या गीतरचनेमुळे. कलावादी, सौंदर्यवादी ही त्यांची ओळख आहे. केशवसुतांप्रमाणे रूढिभंजन वा सुधारणानुकूल कविता लिहिणे हा त्यांचा हेतू नव्हता. त्यामुळे त्यांची कविता व्यक्तिवादी झाली. परचित्तप्रवेश हा त्यांच्या भावकवितेचा विशेष होय. त्यातून त्यांनी व्यक्तीच्या सुखदु:खाची अनेक चित्रे रेखाटली. केशवसुतकालीन प्रेमगीतातील नैराश्याची भावना तांब्यांच्या कवितेत येत नाहीत. त्यांच्या कवितेत प्रेमाची अनेक भावपूर्ण चित्रे रंगवलेली आहेत.

## २.३.६. रविकिरणमंडळ :-

पुण्यामध्ये वाङ्मयप्रेमी लोकांची 'श्रीशारदामंदिर' नावाची एक संस्था वाङ्मयविषयक विचारकार्य करत होती. त्यातील कवींचा 'रविकिरणमंडळ' नावाचा गट होता. त्यांच्यामार्फत काव्यप्रकाशनाचे कार्य सुरू केले. या मंडळाने पन्नासपेक्षा अधिक काव्यसंग्रह प्रकाशित केले. १९२० मध्ये काव्यलेखन करत असणाऱ्या गिरीश, यशवंत, माधव ज्युलियन, काव्यविहारी यांनी जनमानसाची पकड घेतली नसल्याने काव्यसृष्टीत ठळक असे कवी दिसत नव्हते. अशा काळात या मंडळाने १९२० च्या अंतास केशवसुतकालीन प्रातिनिधिक कवी दिवंगत झाल्यानंतर मराठी काव्यसृष्टीत निर्माण झालेला अधार दूर करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. काव्यसंग्रह प्रकाशनाबरोबरच या मंडळातील कवींच्या काव्यविषयक चर्चा व उपक्रम देखील मराठी काव्याचा प्रवाह समृद्ध करण्यास मदत झाली. या कवीमंडळामध्ये स्थापनेच्यावेळी माधव ज्युलियन (मा. त्र्यं. पटवर्धन), गिरीश (शं. के. कानेटकर), यशवंत (य. दि. पेंढारकर), श्री. बा. रानडे व सौ. मनोरमाबाई रानडे, ग. त्र्यं. माडखोलकर, द. ल. गोखले आणि नाट्यछटाकार दिवाकर ही मंडळी होती. माधव ज्युलियन, गिरीश आणि यशवंत यांनी या काळात अतुलनीय असे काव्यलेखन केले. त्यांचा संघटितपणे काव्यलेखनाचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरला. या मंडळातील इतरांनी स्वतंत्रपणे गद्यलेखन सुरू ठेवले. स्फूट भावगीतलेखक म्हणून हे तीनही कवी नवीन कवितेच्या संप्रदायातील आहेत. त्यांची समाजविषयक व सुधारणाविषयक मते केशवसुत-गडकरी यांच्याशी संवादी होती. या कवींनी आधीच्या कवितेस अधिक व्यवस्थित रूप दिले. तीमध्ये विविधता आणली. ती आकर्षक करून अधिक व्यापक अशा जनमानसापर्यंत नेऊन पोहोचविली. केशवसुतांचा प्रभाव पारंपरिक कवितेसाठी इतका नवखा आणि आव्हानात्मक होता की त्यांच्या प्रभावातून कविता स्वैरपणे लिहिली गेली. या कवितेचे व्यवस्थापन व विस्तार करण्याचे काम रविकिरणमंडळातील कवितेने केले.

माधव ज्युलियन यांनी स्फुट भावगीतात्मक आणि दीर्घ खंडकाव्यात्मक अशा दोन प्रकारची कविता लिहिली. ज्युलियनांइतकी सुनिते कोणी लिहिली नसावीत. या सुनितांची मांडणी एखाद्या कथा स्वरूपात करून त्यांनी 'तुटलेले दिवे' हा संग्रह प्रकाशित केला. ज्युलियनांच्या मुळे या काळात सुनितांच्या रचनेला बहर आला. त्यांची गझल स्वरूपाची स्फुट कविता 'गज्जलांजली' या संग्रहात आहे. फारशी कवितेचा परिचय यासाठी महत्त्वाचा ठरला. मराठी कवितेतील गझल रचनेला त्यांच्यामुळेच बहर आला. या व्यतिरिक्तची काव्यरचना 'स्वप्नरंजन' आणि 'मधुलहरी' या संग्रहातून आली. माधव ज्युलियन हे उत्तान आणि उत्कट प्रेमभावनेमुळेच अधिक ओळखले जातात. त्यांना 'प्रणयपंढरीचा वारकरी' म्हणूनही संबोधले जाते. त्यांनी प्रेमविषयक अनुभवावर 'विरहतरंग', सामाजिक उपहासपर 'सुधारक', वाङ्मयीन झब्बूगिरी दर्शविणारे 'नकुलालंकार' अशी खंडकाव्ये लिहिली. त्यांच्या दोन-तीन रूबायांच्या भाषांतरांनी मराठीतील रूबायांच्या लेखनाला चालना दिली.

कवी गिरीश यांनी देखील सुनिते, गझल लिहिली. सघोटीव शब्दरचना व व्यवस्थित मांडणीची भावगीतरचना केली. भावगीतातील संयत भावनेमुळे प्रेमाचा उत्कट अनुभव कमीच मिळतो. थोर व्यक्ती, आदरनीय स्थले व वास्तू, निसर्गातील सुंदर स्थले व दृश्ये इ. त्यांच्या आदराचा व भक्तीचा विषय झाली. त्यांच्या 'अभागी कमल', 'आम्बराई', 'कला' या खंडकाव्यांनी सामाजिक खंडकाव्यास चालना दिली  हे त्यांचे श्रेय होय. त्यांनी खंडकाव्यात अनेक गीतांचा वापर केला. हा आदर्श त्यांनी टेनिसनकडून घेतला असावा. त्यांच्या 'एनॉक

आर्डन' या दीर्घ कवितेचा त्यांनी अनुवाद केला आहे. विपुल, गेय, सुव्यवस्थित रचना हे त्यांच्या कवितेचे मुख्य विशेष होते. रविकिरणमंडळातील कवी यशवंत हे भावगीतकवीच होत. त्यांनी विपुल स्फुट रचना केली. त्यांच्या भावगीतांमध्ये उत्कटता आहे. 'जयमंगला' हे त्यांचे कथाकाव्य उत्कृष्ट भावगीतसंग्रहच आहे. 'बन्दिशाळा' व 'काव्यकिरीट' ही दीर्घ काव्ये त्यांनी मंडळाच्या कवींच्या प्रेरणेतून लिहिली. भावगीतानुकूल 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्यही रचले. रविकिरणमंडळाच्या या तीन कवींनी 'नवीन कवींची प्रतिभा दीर्घ व महाकाव्यलेखनास समर्थ नसते' हा त्यांच्यावरचा आक्षेप यशस्वीरित्या खोडून काढला आहे. या कवींच्या खंडकाव्यांनी इतर कवींना दीर्घरचनेस प्रवृत्त केले.

रविकिरण मंडळाचे कार्य हे मराठी कवितेच्या व्यवस्थापनेच्या दृष्टीने महत्त्वाचे राहिले.

* या कवींनी कविजनांच्या बाहेरील शिक्षित वर्गात देखील मराठी कविता नेऊन पोहोचवली.
* काव्यगायनाचे यशस्वी प्रयोग केले. त्यासाठी गेय कवितेचा स्वीकार केला.
* या कालखंडात विविध काव्यप्रकारात काव्यलेखन झाले. जसे की, गजल, सुनीत, खंडकाव्ये, जनपदगीते, प्रेमगीते. या निमित्ताने विविध भावनांची अभिव्यक्ती कवितेच्या माध्यमातून होऊ शकते याची ओळख झाली.
* नव्याचा स्वीकार करताना वृत्तशुद्ध व व्याकरणशुद्ध रचना देखील केली गेली.
* काव्यरचनेत कलादृष्टीचे महत्त्व काहीएक प्रमाणात ओळखले गेले.
* काव्यविषयक चर्चा होऊ लागल्या.

केशवसुतांच्या कवितेने मराठी कवितेत क्रांती घडवून आणली. त्या प्रभावातून अनेकांनी काव्यलेखन केले. असे असले तरी केशवसुतकालीन विखुरलेल्या व अस्पष्ट राहिलेल्या काव्यविशेषांना ठळक करण्याच्या दृष्टीने रविकिरणमंडळाच्या कवितेने महत्त्वाचे कार्य केले. ज्यामुळे क्रांतीकालीन कविता अधिक विस्तारत गेली.

## २.६.१. रविकिरण मंडळातील इतर अनेक कवी :-

रविकिरण मंडळातील या प्रमुख कवींबरोबरच इतर अनेक कवींनी महाराष्ट्राच्या विविध भागातून काव्यलेखन केले. त्यांच्यावर केशवसुतांपासून तांब्यांपर्यंत अनेकांचा प्रभाव राहिला. रविकिरण मंडळाच्या सोबतच या कवींच्या काव्यलेखनाचे महत्त्व मराठी काव्येतिहासाच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. त्यामध्ये केशवसुतांपासून स्फूर्ती घेतलेले दक्षिण महाराष्ट्रातले कवी 'काव्यविहारी' हे एक होत. त्यांनी १९२०च्या सुमारास प्रसिद्धी मिळविली. केशवसुती रचनाप्रकारातच त्यांनी बहुतांश रचना केली. मनातील भावनेची सरळ अभिव्यक्ती, त्यासाठी साधी पण जोरदार भाषा, अलंकृतता व लालित्य कमी, त्यामुळे मनोवेधकता कमी व बोधपर अशी त्यांची रचना होती. 'काव्यविहार' हा त्यांचा समाजसुधारणेची कळकळ व्यक्त करणारा संग्रह होय.

हरी सखाराम गोखले यांनी देखील पुण्यात राहून केशवसुत पद्धतीची कविता लिहिली. त्यांची कविता साध्या विषयांनी आकृष्ट होणारी होती. तिला गरिबांची कळकळ होती. त्यामुळे ती उपदेश व बोधपर झाली. त्यासाठी साधी, निरलंकृत भाषा वापरली. भावनेबरोबर वाहून जाणारी त्यांची कविता नव्हती. परंतु ही कविता आकर्षक झाली नाही व तिने लोकप्रियताही मिळविली नाही.

munotes.in

या काळात तांब्यांचे संस्कार असणारे श्री. वा. गो. मायदेव व कवी अज्ञातवासी हे दोन कवी होत. त्यांनी तांब्यांचे संग्रह प्रकाशित केले. मायदेव यांनी केशवसुत व टिळक यांच्या संस्काराची कविता लिहिली. त्यांनी टिळकांच्या शिशुगीतांच्या आकर्षणातून अभिनयगीताची प्रथा लोकप्रिय केली. त्यांच्या प्रौढ गीतात विविधता अधिक होती. करुण, वत्सल भाव असणारी तसेच विनोद देखील असणारी ती कविता होती. दीर्घ सामाजिक खंडकाव्येही लिहिली. कवी अज्ञातवासी यांना तांब्यांच्या गीतपद्धतीचे आकर्षण होते. त्यामुळे त्यांची कविता गीतबहुल झाली. रविकिरणमंडळाचे समकालीन असूनही विनायकांप्रमाणे पारतंत्र्य आणि देशाची अवनत स्थिती ही त्यांच्या कवितेचे विषय झाले. भाषेच्या बाबतीत त्यांनी गडकऱ्यांचे अनुकरण केले. त्यांची समग्र कविता स्फुट भावगीतांच्या स्वरूपाची आहे.

या काळातील एक लोकप्रिय कवी म्हणजे प्र. के. अत्रे हे होय. यांच्यावरील गडकऱ्यांचा प्रभाव स्पष्ट लक्षात येतो. त्यांना विनोदी व विडंबनात्मक काव्यलेखनासाठी लोकप्रियता मिळाली व मराठीतील अशा स्वरूपाच्या काव्यलेखनाचे प्रमुख स्त्रोत बनले. त्यांनी रविकिरण मंडळावरती व इतर अनेक व्यक्तींवरती विडंबनात्मक काव्यलेखन केले. त्यांच्या विडंबनात्मक काव्यलेखनाचा 'झेंडूची फुले' हा संग्रह प्रसिद्ध आहे. विदर्भातील आनंदराव टेकाडे हे गोविंदाग्रजांच्या पिढीतील असले तरी त्यांनी रविकिरणमंडळाच्या काळात आपले काव्यलेखन केले. काव्यगायन लोकप्रिय करणारे कवी म्हणून त्यांची काव्येतिहासातील नोंद महत्त्वाची आहे. 'आनंदगीते' म्हणून ही गीते ओळखली जातात. दुसरे विदर्भ कवी म्हणजे कविभूषण ब. ग. खापर्डे हे होय. त्यांनी 'काव्यकान्ताकार' या नावाने खंडकाव्य प्रसिद्ध केले. त्यांनी काव्याकरिता गद्याचा उपयोग केला. अर्वाचिन मराठीतील गद्यकाव्यास त्यांनी चालना दिली असेही म्हणता येते. ही प्रेरणा त्यांनी रविंद्रनाथांच्या 'गीतांजलीची' गद्यात झालेल्या भाषांतरावरून घेतली. विदर्भातील समकालीन कवी ना. के. बेहरे हे देखील एक होत. त्यांनी संख्येने विपुल व स्फूट काव्य लिहिले. त्यांनी केशवसुतांना विषय व शैलीच्या बाबत स्फूर्तिस्थान मानले. विदर्भातील या कवींपैकी ज्येष्ठ कवी ज. के. उपाध्ये हे होत. विनोद काव्यलेखनाने त्यांनी लोकप्रियता मिळविली. त्यांचा 'पोपटपंची' हा संग्रह प्रकाशित आहे. त्यांचे 'चालचलाऊ भगवद्गीता' हे विडंबन काही वेगळ्याच धर्तीचे विडंबन आहे. त्यामध्ये त्यांनी दुसऱ्या अध्यायातील भगवंताच्या उपदेशासाठी रांगड्या भाषेचा वापर करून खुमासदार विनोदनिर्मिती केली आहे.

## २.६.२. राष्ट्रीय कविता :-

रविकिरण मंडळाच्या आधीच्या पिढीतील सावरकर यांची काव्यरचना या काळात प्रकाशात आली. सावरकरांच्या काव्यरचनेवर मोरोपंत व मिल्टन यांचा प्रभाव आहे. त्यांचा दीर्घ काव्यलेखनाकडे कल होता. त्यांनी स्फूट कविताही महाकाव्याच्या शैलीतच लिहिली. यावरून लक्षात येते, की भव्योदात्ततेचे त्यांना आकर्षण होते. त्यांची काव्यवृत्ती तत्त्वज्ञाची, प्रेषिताची, सुधारकाची होती. लालित्यापेक्षा ओज व गौरव यांनी त्यांची कविता प्रेरित आहे. त्यामुळेच त्यांच्या प्रतिभेचा मोकळेपणा हरवला गेला आहे असे म्हणता येते. 'गोमंतक' या महाकाव्यलेखनाच्या उत्तरार्धात त्यांनी इंग्रजी 'ब्लॅक व्हर्सेस' चा आधार 'वैनायक वृत्त' या नावाने घेतला. सावरकरांनी स्वातंत्र्यप्रीती, पूर्वइतिहासातील घटना व यांच्याविषयीचा अभिमान, नवीन पराक्रमाला उत्तेजन आणि त्याबद्दलचा आशावाद अशा आशयाची राष्ट्रीय कविता लिहिली. कवी विनायक यांची ही परंपरा सावरकरांसोबत कवी माधव, कवी दु. आ. तिवारी, अज्ञातवासी, कवी गोविंद यांनी पुष्ट केली. कवी गोविंद यांनी मेळ्यातील पदांच्या स्वरूपाची रचना केली. त्यांनी

राष्ट्रीय कविता अधिक्याने लिहिली. त्यामध्ये मराठ्यांची संग्रामगीते, झाशीची संग्रामदेवता, शिवप्रताप, राणा प्रतापसिंह इ. काव्ये लिहिली. या कवितेत अर्थापेक्षा आवाज अधिक असल्याने सामान्यजनापर्यंत राष्ट्रीय कविता पोहोचविण्याचे श्रेये कवी गोविंद यांच्याकडे जाते. कवी माधव यांनी यापेक्षा सरस राष्ट्रीय कविता लिहिली. मराठ्यांच्या इतिहासातील काव्यानुकूल प्रसंगांवरती त्यांनी लिहिलेली कविता शाहिरी स्वरूपाची आहे. ती साक्षेपी आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत राष्ट्रीय कवितेतील भावनेचा आवेश काहीवेळा कमी दिसतो. प्रमाण भाषा, मर्यादित अलंकार, आटोपशीर मांडणी या कलागुणांकडे त्यांचे लक्ष असे. ऐतिहासिक काव्यलेखनासाठी मराठी काव्यलेखनात त्यांची ओळख आहे. त्यांचा 'हिरवे तळकोकण' हा संग्रह प्रसिद्ध आहे.

## २.६.३. ग्रामीण गीते :-

रविकिरण मंडळ हे पुण्यात उदयास आले. या मंडळाच्या प्रेरणेतून पुण्यातील काही तरूणांनी काव्यानिर्मिती केली. गिरीश व यशवंत यांनी ग्रामीण गीते लिहिली. त्यामध्ये ग्रामीण वातावरणासोबत ग्रामीण भाषेचाही वापर केला गेला होता. गिरीशांचे शिष्य ग. ह. पाटील यांनी देखील अशा प्रकारची गीते लिहिली. 'रानजाई' या नावाने ती प्रकाशित आहेत. त्यामध्ये अनुभवाचा आणि आपुलकीचा जिव्हाळा आहे. मात्र ग्रामीण भाषेचा उपयोग केलेला नाही. ग. ल ठोकळ यांनी ग्रामीण भाषेचा वापर असलेली लक्षवेधक कविता लिहिली. ठोकळ यांनी इतर कवींच्या अशा कवितांचा संग्रह 'सुगी' या नावाने प्रकाशित करून या काव्यप्रकारास उत्तेजन दिले.

## २.६.४. कणिका :-

गोपिनाथ तळवळकर यांनी 'कणिका' हा काव्यप्रकार रूढ केला. या प्रकाराचे मूळ रविंद्रनाथांनी जपानी 'टांका' या काव्यप्रकाराची 'कणिका' या नावाने बंगालीमध्ये आणलेल्या कवितेत आहे. गिरीशांच्या अनुसरणाने लिहिलेली कविता त्यांनी 'दुर्वांकुर' या नावाने संग्रहित आहे. सुनिते, अभंग, विषय, जातिप्रकार व शब्दप्रयोग कवी गिरीशांची आठवण करून देतात. या कवितांपेक्षा त्यांचे वेगळेपण या कणिकांमधून जाणवते. पाच किंवा सहा भूपति-जातीमधील किंवा तिला जवळ येणाऱ्या पंक्तीमध्ये एखादा भावनांकित विचार थोड्याशा कलाटणीसह प्रकट करणे हे या कणिकांचे स्थूल स्वरूप असते. तीमध्ये कोटीतील अर्थचमत्कृती नसते किंवा सुभाषितांमधील प्रत्यक्ष बोधपरताही नसते. पटवर्धनांच्या रूबायामध्ये ही कविता त्रुटित स्वरूपाची होती. पुढे काही कालानंतर कवी कुसुमाग्रज यांनीही अष्टचरणी 'जीवनलहरी' लिहून त्रुटित कवितेचा आणखी एक नमुना रूढ केला. तथापि या सर्व त्रुटित रचनाप्रकारांत भावनेचा पुरा आविष्कार होणे कठीण असल्याने व तीत कारागिरीचीही थोडी आवश्यकता असल्याने मुक्तच्छंदाच्या पुढील जमान्यात तिचा फारसा अवलंब झाला नाही. रूबाया, गझल आणि सुनिते यांचेही कारागिरीचे प्रमाण अधिक असल्याने असेच झाले. तांबे पद्धतीची गीतकविता मात्र यापेक्षा अधिक कालपर्यंत टिकली. कारण तीमध्ये रचना सुलभतेबरोबरच गेयताही हेती आणि रेडिओमुळे तिला बराच वाव मिळाला. बोरकर, संजीवनी मराठे आणि मंगेश पाडगावकर यांच्यामुळे काव्यप्रतिष्ठाही मिळाली. इतके मात्र खरे की या काळात अनेक काव्यप्रकार विस्तारत गेले तर काही नव्याने हाताळले गेले.

हा समग्र काव्यप्रवाह सौंदर्यवादी कवितेचा होता. जुन्या परंपरेला खंडित करून नव्या काव्य प्रवृत्ती स्वीकारताना या कवितेवर अनेक आरोप झाले व तिच्याविषयी शंका उपस्थित केल्या गेल्या. तिच्या प्रेमाभिव्यक्तीबद्दल आक्षेप घेतले गेले. जसे की गोविंदाग्रज आपल्या प्रेयसीकडे चुंबन मागतात, माधव ज्युलियन 'प्रणयपंढरीचे वारकरी' आहेत. केशवसुतांच्या कवितेत मात्रादोष आहेत म्हणून बाह्य रचनेतील बदल दोषास्पद ठरविले गेले. कवीचे प्रेम आदर्शवादी की वासनात्मक असावे, रविकिरण मंडळाची कविता श्लील की अश्लील, सांकेतिक की स्पष्ट, आशावादी की निराशावादी अशा अनेक मुद्दयांवरून समीक्षकात वादविवाद झाले. मात्र रविकिरण मंडळाच्या कवितेत दहा पंधरा वर्षांनंतर नावीन्य राहिले नाही. १९४० नंतर काही काल मराठी कवितेत ओहोटीची अवस्था निर्माण झाली. अशा काळात मराठी कवितेला नवसंजिवनी देण्याचे काम कवी अनिल, कुसुमाग्रज व कवी बोरकर यांनी केले. ही पिढी स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे. या पिढीने स्वातंत्र्यपूर्व पंधरा वर्षे व स्वातंत्र्योत्तर पंधरा वर्षे असे काव्यलेखन केले. स्वातंत्र्योत्तर कवितेच्या कालखंडाची सुरूवात साधारणतः या कवींच्या काव्यलेखनातून होते.

## २.७. स्वातंत्र्योत्तर कवितेचा कालखंड :-

**कवी कुसुमाग्रजां**च्या "पहिल्या 'जीवनलहरी' संग्रहातील केशवसुतांप्रमाणे सामाजिक आशय आणि ओजोगुणयुक्त शैली दिसत असली तरी नाशिकच्या सावरकर आणि गोविंद यांच्या कवितेचे संस्कार असावे असे वाटते. तरीही कुसुमाग्रजांच्या कवितेने स्वतंत्रपणे आपली छाप मिळविली. सामाजिकतेचे भान आणि तात्कालिक घटना व प्रसंगांच्या माध्यमातून चिरंतनाचा वेध घेणे हे त्यांच्या काव्याचे विशेष आहेत. 'विशाखा' मधील त्यांच्या कवितेने ध्येयासक्ती, स्वातंत्र्यप्रेम यांनी मनाला स्फुरण व दिलासा देऊन तो काळ भारावून टाकला. समिधा, किनारा, मेघदूत, मराठी माती, स्वगत, हिमरेषा, वादळवेल" हे त्यांचे काव्यसंग्रह आहेत. ध्येयासक्ती, दुर्दम्य आशावाद, भव्यदिव्यतेची ओढ, सामाजिक विषमतेचे नाट्यमय दर्शन, समतापूर्ण समाजाचे दर्शन ही त्यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

**बोरकरां**नी "तांब्यांचा गीतसंप्रदाय अधिक समृद्ध केला. आनंदभैरवी, चित्रवीणा, गीतार आणि चैत्रपुनव" हे त्यांचे चार संग्रह आहेत. प्रेम आणि निसर्ग हे त्यांच्या कवितेचे जिव्हाळ्याचे विषय होते. लालित्यपूर्ण चौफेर दृष्टीने त्यांच्या कवितेने भवताल टिपला. एका विशिष्ट तंद्रीतील त्यांची काव्यवृत्ती गूढता निर्माण करणारी आहे. अध्यात्मप्रवण अशी आहे. त्यांनी मराठीतील सौंदर्यवादी कवितेतील भावनांचा आविष्कार आणि संवेदनावैभव वाढविले. बोरकरांच्या गोमंतकीय कवितेने प्रथमच कवितेत प्रादेशिक कवितेचा प्रांत निर्माण केला. गोमंतकीय शब्दकळेतील नादमधुरता आणि सागरी निसर्गसौंदर्याने ओथंबलेले अनुभव आणले. गोमंतातील आधुनिकता आणि भावनिकता यांचे साहचर्य त्यांच्या कवितेत आहे. तिच्यात निसर्गसौंदर्य व अध्यात्मप्रवण गूढ तितकाच मोकळा शृंगारभाव आहे. रस, रूप, गंधांच्या अनेक प्रतिमांनी मराठी कवितेची प्रतिमासृष्टी व शब्दकळा संपन्न केली. या प्रतिमा संगीताला अधिक जवळच्या आहेत. ते जीवनाचे 'भोक्ते व भक्त' म्हणून ओळखले जातात. बोरकर आणि कुसुमाग्रज यांनी नवकवितेच्या काळातही सौंदर्यवादी कवितेची धारा वाहती ठेवण्याचे काम केले.

munotes.in

**कवी अनिल** या विदर्भातील कवीच्या कवितेने बाह्यरूपाच्या दृष्टीने मराठी कवितेवर मूलगामी परिणाम केला. त्यांनी १९२० मध्ये काव्यलेखनास सुरूवात केली. रविकिरणमंडळाच्या भरभराटीच्या काळात प्रसिद्ध झालेला त्यांचा पहिला कवितासंग्रह स्वतंत्र काव्यवृत्तीची जाणीव करून देणारा आहे. त्यांची खरी ओळख त्यांनी काव्यलेखनासाठी केलेल्या मुक्तछंदाच्या वापरासाठी आहे. त्यामुळेच ते पूर्वपरंपरेपेक्षा अधिक प्रभावीपणे आत्माविष्कार करू शकले. त्यांच्या 'प्रेम आणि जीवन', 'भग्नमूर्ति', 'निर्वासित चिनी मुलास' या दीर्घ कवितांनी मुक्तछंदास निश्चित व स्थिर स्वरूप दिले. नवकवितेच्या रूपसिद्धीमध्ये मुक्तछंदाचे प्रवर्तक कवी अनिलांचा मोठा वाटा आहे. अनिलांना विदर्भातील कवी वा. ना. देशपांडे यांचेही साहाय्य याकामी झाले. 'सांगाती' आणि 'दशपदी' हे त्यांचे स्वातंत्र्योत्तर काव्यसंग्रह होत. दीर्घ चिंतनात्मक खंडकाव्ये सुरू केली. प्रक्षोभरसाचा पुरस्कार केला. मानवतावाद आणि क्रांती यांचा ध्यास धरला. भावनाविष्काराला सवंगपणा येत असणाऱ्या काळातील अस्सल, उत्कट, सूक्ष्म भावनांची अभिव्यक्ती करणारा 'फुलवात' हा संग्रह महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्योत्तर कवितेत समाजाभिमुख वृत्तीच्या आहेत. आत्ममग्न सौंदर्य हे त्यांच्या चिंतनाचे व व्यापक समाजाभिमुखतेचे वैशिष्ट्य आहे. हे सौंदर्य जगण्याला दिलासा देते.

मराठी कवितेला समृद्ध करण्याचे काम रविकिरणमंडळानंतरच्या कुसुमाग्रज, बोरकर व अनिल यांच्यासोबते अनेकांनी केले. त्यातील कुसुमाग्रज व बोरकर यांच्या सौंदर्यवादी कवितेची धारा समृद्ध होत गेली. बोरकरांच्या प्रेरणेतून पाडगांवकरांनी केलेल्या काव्यरचनेने मराठी कवितेला बरेचसे समृद्ध केले. ना. घ. देशपांडे व राजा बढे तसेच माळव्यातील काळेले आणि मराठवाड्यातील कान्त यांनी देखील याच स्वरूपाचे काव्यलेखन केले. वा. रा. कान्त यांचे रूद्रवीणा, वाजली विजेची टाळी, वेलांटी, मरणगंध, दोनुली हे संग्रह या काळात निघाले. सौंदर्यवादी वृत्तीचा हा कवी नवकाव्याचे संस्कार असणारा होता. त्यांची कविता विकासोन्मुख आहे. त्यांनी मुक्तछंदातील व्यापक मानवतावादी कविता निर्माण केली. 'नागासाकीचे अंध' किंवा 'चकमक झडली आहे मातीच्या मनात' या कविता विकासदर्शन आहेत. त्यांनीही निकुंबांप्रमाणे पौराणिक कथांवरील कथात्मक किंवा चिंतनगर्भ दीर्घकाव्येही लिहिली. 'मरणगंध'मध्ये त्यांनी वेगळी उंची गाठलेली आहे. याच संप्रदायातील कवी निकुंब यांनी भावगीतरचनेचे विविध प्रकार आत्मसात केले. त्यांच्या कवितेत ओवी, गीत, मुक्तछंद, कणिका, सुनिते हे सर्वच येतात. निकुंब यांची कविता नागर आहे. ती साक्षेपी, डोळस, नाजूक व हळुवार आहे. निसर्गरूपांची सुबक चित्रे व प्रेमाचा आविष्कार यांनी ही कविता मोहक बनलेली आहे. निकुंबांनी मृगावर्त या संग्रहात प्राचीन पुराणकथांचा अन्वयार्थ लावलेला आहे. ही या काळातील मराठी साहित्याची प्रवृत्ती होती. वि. म. कुलकर्णी यांनी देखील रविकिरणमंडळाकडून स्फूर्ती घेऊन काव्यलेखन केले. त्यांनी अनेक आणि नवनवीन प्रथांमधून काही काही उचलून आपली कविता लक्षणीय बनविली. त्यांची कविता साधी व मोकळी आहे. सोज्ज्वळ वृत्तीची व श्रद्धशील आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळातील सौंदर्यवादी धारेतील कवींत लोककवी मनमोहन यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. रविकिरण मंडळकालातील त्यांची बेबंद शैलीची व संकेतमुक्त कविता उल्लेखनीय आहे. संकेत मोडणारी बंडखोरी तिच्यात आहे तरीही तिची ओळख सौंदर्यवादीच आहे हे विशेष. 'आदित्य' हा त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह त्यांना काव्येतिहासात स्थान मिळवून देतो. त्यांचे 'युगायुगांचे सहप्रवासी' हे खंडकाव्य नवकाव्याच्या प्रवर्तनाचे श्रेय घेणारे आहे. त्यांची बेछूट, रंगेल, उद्दम शब्दकळा ही इतकी वेधक, प्रभावी आणि नाविण्यपूर्ण आहे की नवकवितेतील संतप्त कवींनाही ही कविता प्रेरक वाटते. 'आधुनिक वाल्मिकी' असा ज्यांचा उल्लेख केला जातो ते ग. दि. माडगूळकर देखील या काळातील महत्त्वाचे कवी होत. नवकवींनी गीतकार असा त्यांचा उल्लेख करून त्यांना हिणवले.

परंतु त्यांचे 'गीत रामायण' १९५६ हे त्याकाळातील सर्वात लोकप्रिय काव्य होते. यातील सुभग गीते सामान्यातील सामान्यापर्यंत पोहोचली. अस्सल लोकसाहित्यावर पोसलेली त्यांची शब्दकळा परंपरागत मराठी समाजाला भुरळ पाडणारी होती. संस्कारशील व परंपरेत रमलेल्या कवीमनाने नेहमीच लोकमानसात जिव्हाळ्याचे स्थान मिळविले आहे. त्यांची कविता आधुनिकतेबद्दल विन्मुख असणे हे तिच्यातील वैगुण्य मानले जात असले तरी तेच तिच्या लोकप्रियतेचे कारण आहे. आधुनिक नवकाव्याशी दुरावा ठेवून वाहणारी ही लोककाव्याची धारा आहे. ही कविता आशयाने काहीशी स्थूल व स्पष्ट पण प्रसन्न, लडिवाळ, प्रासादिक, गेय व मधुर वळणाची आहे. आकाशवाणी व दूरदर्शन द्वारा ती अधिक लोकाभिमुख बनली. राजा बढे, कवी संजीव, सोपानदेव चौधरी, पी. सावळाराम, जगदीश खेबूडकर, गंगाधर महांबरे, शांताराम नांदगावकर इ. कवी किंवा गीतकार याच धारेत समाविष्ट होतात. कालदृष्ट्या इंदिरा संत, पद्मा गोळे व संजीवनी मराठे यांचाही समावेश स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काव्यलेखन करणाऱ्या पिढीत करावा लागतो. रविकिरणमंडळाच्या प्रेरणेतून शांता शेळके यांनी काव्यलेखन केले. त्यांनी गीत रचनेतून अमाप लोकप्रियता मिळविली. मराठमोळी शब्दकळा, चित्रमय शैली आणि रेखीव रचना हे वैशिष्ट्य आहे. वर्षा, तोच चंद्रमा, रूपसी, गोंदण हे त्यांचे संग्रह होत. इंदिरा संत "यांनी काव्यलेखनासाठी ओवी अभंगादी छंद आणि सोपी मात्रारचना यांचा स्वीकार केला. त्यांची नाजूक भावाभिव्यक्ती स्वतंत्र ठसा उमटवणारी आहे. 'सहवास' हा १९४१ सालचा काव्यसंग्रह पती पत्नी असा दोघांनी मिळून लिहिलेल्या कवितांचा आहे. त्यांच्या काव्यलेखन शैलीवर मराठी स्त्रीगीताचे संस्कार आहेत. शेला १९५१, मेंदी १९५५, मृगजळ १९५७, रंगबावरी १९६४ व बाहुल्या १९७२ हे त्यांचे स्वातंत्र्योत्तर काळातील संग्रह होत. त्यांची कविता रेखीव व आत्मनिष्ठ आहे. संजीवनी मराठे यांनी १९३२ पासून काव्यलेखनास प्रारंभ केला. रविकिरण मंडळाच्या संस्कारातील गेय व मधुर अशी त्यांची भावगीते आहेत. या कालखंडातील स्त्री कवयित्रींनी पुरूषांच्या बरोबरीने काव्यलेखन करून आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. स्वातंत्र्योत्तर काळात प्रभा गणोरकर यांचा व्यतीत, अनुराधा पोतदार यांचा कॅक्टस फ्लॉवर आणि मल्लिका अमरशेख यांचा वाळूचा प्रियकर, देहऋतू, महानगर, माणूसपणाचे भिंग बदलल्यावर" हे संग्रह आपल्या स्वतंत्र काव्यलेखनशैलीने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या काळात पद्मा लोकूर, शिरीष पै, अनुराधा पोतदार, सुशीला पगारिया, अंजली ठकार, प्रभा गणोरकर, मल्लिका अमरशेख यांनी काव्यलेखन केले. शिरीष पै यांचे 'हायकू' आणि 'एका पावसाळ्यात एकतारी' हे काव्यसंग्रह आहेत. त्यांची कविता अकृत्रिम व भावोत्कट आहे. 'हायकू' हा नवा काव्यप्रकार त्यांनी मराठीत आणला हे त्यांचे श्रेय उल्लेखनीय आहे. सरोजिनी बाबर यांनी लोकगीतांचे स्त्रीधन संग्रहित करण्याचे खूप मोलाचे कार्य केले. मराठी कवितेत मल्लिका अमरशेखने स्त्रीच्या दृष्टिकोनातून रेखाटलेले महानगर वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांची धाडसी प्रतिमा व मुक्त जीवनसंवेदन मराठी कवितेत स्वतःचे स्थान निर्माण करणारे आहे. तिचे काव्यजग हे सर्वस्वी नव्या मूल्यांवर आधारलेले आहे. स्त्रीवादाच्या उदयानंतर स्त्रीच्या दृष्टीने उभारलेले पुरूषी जग हे सर्वस्वी नवे व काहीवेळा अस्वीकारणीय होत. त्यामुळेच स्त्रीवादी म्हणून काहीवेळा कवयित्रींना अव्हेरले गेले तरी या कवयित्रींनी मराठी कवितेत स्त्रीवादी कवितेची एक धारा निर्माण केली व मराठी कवितेला समृद्ध केले.

या काळात कवी यांचे समकालीन वा. ना. देशपांडे यांचाही उल्लेख या काळात महत्त्वाचा ठरतो. रचनेतील प्रयोगशीलता आणि आशयामधील चिंतनपरता या विशेषांनी त्यांची कविता वेगळी ठरते. त्यांचे 'कपटवेध' हे नाट्यकाव्य मराठी कवितेत उल्लेखनीय व नवीन आहे. मर्ढेकरांसोबत अनेकांनी हाताळलेल्या संगीतिकेला देखील नाट्यकाव्याचे सौंदर्य व लोकप्रियता लाभली नाही. १९२० हे १०४५ या कालखंडात गझल, सुनीत, गीते, नाट्यगीते, ग्रामीण

गीते,शिशुगीते, विनोद-विडंबन-उपहास काव्ये, रूबाया, कणिका इ. त्रुटितकाव्यप्रकार आणि गद्यकाव्य असे अनेक काव्यप्रकार उद्गम पावून समृद्ध झाले. ओवी-अभंगादी जुन्या छंदाचाही नवीन भावनाविष्कारासाठी उपयोग झाला. मुक्तछंदातील काव्यलेखनास सुरूवात झाली. स्फूट व दीर्घ कविताही लिहिली गेली. अनेक सर्गात्मक सामाजिक खंडकाव्याबरोबरच नुसत्या भावगीतांनी बनलेले काव्य ‘जयमंगले’ निर्माण झाले. लहान पण नियमित खंडकाव्यांनी बनलेली ‘शशिमोहन’ सारखी दीर्घ कथाकाव्ये लिहिली गेली. कमी जास्त लांबीच्या स्फुट काव्यखंडांचे ‘विरहतरंग’ पाहावयास मिळते. अनेक सुनितांनी बद्ध असे कथाकाव्यही रचले गेले. ऐतिहासिक दीर्घकथा रचल्या गेल्या. समरगीते लिहिली गेली. उर्दू, बंगाली, हिंदी या भारतीय भाषांबरोबरच इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश, रशियन, जपानी इ. विदेशी भाषांमधूनही काव्य मराठीत अनुवादित झाले. अशा पद्धतीने हा काळ काव्यरचनेतील वैचित्र्याने समृद्ध झाला. या काळात अलंकारांचे आकर्षण काहीप्रमाणात राहिल्याने चांगली रचना करूनही काही कवी लोकप्रियतेपासून दूर राहिले. काहींच्या जुन्या संस्कारांनी आत्माविष्कारात कृत्रिमता राहिली. स्वातंत्र्यपाशी या घटनेने जीवनातील सर्वच भागांवर महत्त्वाचा परिणाम केला. साहित्यात ही घटना निर्मितीप्रक्रियेला गती देणारी ठरली. १९४५ नंतरचा काळ अनेक सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घडामोडींनी प्रेरित झाला. त्यामध्ये १९५० मध्ये देशात लोकशाहीचे झालेले प्रस्थापन महत्त्वाचे आहे. त्यानंतर १९४८ महात्मा गांधीजींची हत्या, १९४८ हैद्राबादचा मुक्तिसंग्राम, १९६० संयुक्त महाराष्ट्राची स्थापना, १९६२ चीनचे आक्रमण, १९७१ बांगला देशसोबतचं युद्ध, १९७५ ची आणीबाणी आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेलं धर्मांतर, गोव्याचं स्वातंत्र्य, साहित्य अकादमीची स्थापना, तिच्या भाषिक आदान-प्रदानाच्या योजना, साहित्य, संस्कृती मंडळाची स्थापना, अनुदाने, राज्य वाङ्मय पुरस्कार इ. गोष्टीही स्वातंत्र्योत्तर घडामोडीच आहेत. या सर्वच घटनांचा काव्यनिर्मितीमध्ये मोलाचा सहभाग आहे. याचाच परिणाम म्हणून या काळात सातशेवर कवींचे दीड हजारावर कवितासंग्रह प्रसिद्ध झाल्याची नोंद वाङ्मयेतिहासात आहे. अलंकारप्रचुर, गीतात्मक, निवेदनात्मक, वक्तृत्वपूर्ण, सुबोध काव्यरचना असणारे हे संग्रह आहेत. लोकप्रिय परंतु पारंपरिक वळणाची बाळबोध अशी कविता होती. या कवितेला वळण देणारी स्वतंत्र वृत्तीची कविता नवकवितेच्या रूपाने उदयाला आली. कविता नवकवितेच्या दिशेने गेली तरी लोकमानस सौंदर्यवादी युगात रमणारे राहिले. नवकवितेच्या काळातही अशा प्रकारची रचना होत होती. परंतु त्यासोबतच स्वतंत्र वृत्तीच्या कवींनी या काळाला आकार देण्याचे काम केले. ते १९४५ च्या अगोदर व नंतरही लेखन करत होते. अनिलांपासून साधारणतः तिचा विचार केला जातो. रेगे, कुसुमाग्रज, बोरकर, मनमोहन यांनी तिला पुढे नेले.

## २.८. नवकविता :-

मराठी कवितेच्या प्रांगणात याच दरम्यान महत्त्वाची घटना घडली ती म्हणजे बा. सी मर्ढेकरांची कविता. ही कविता नवकाव्याची प्रवर्तक आहे. त्यांच्या कवितेने मराठी कवितेला रोमँटिकतेकडून वास्तवाकडे वळविले. हे वास्तव यंत्रयुगातील होते. आपल्या नवकवितेचे प्रवर्तन स्वातंत्र्यप्राप्तीच्या राजकीय घटनेने झालेले नाही. ते द्वितीय महायुद्धातील ‘माणुसकीच्या विडंबना’तून झालेले आहे. युद्धोत्तर वैश्विक जाणिवा मराठी कवितेने आत्मनिष्ठ वृत्ती प्रवृत्तीतून स्वीकारले. मर्ढेकरांपूर्वी मराठी कवितेने असे त्या त्या काळातील आघात सोसत स्वतःत व काव्यसृष्टीत बदल घडवून आणला व काव्याला प्रवाहित ठेवले. अत्रे ‘झेंडूची फुले’ १९३२,

काणेकर 'चांदरात' १९३३, रेगे 'साधना' व इतर कविता १९३१, अनिल 'निर्वासित चिनी मुलास' १९४०, मनमोहन 'युगायुगांचे सहप्रवासी' १९४६ या कवी व त्यांच्या या काव्यकृतींनी मराठीतील नवकवितेचे प्रवर्तन केले व युगप्रवर्तन घडविले. यामध्ये मर्ढेकरांची कविता ही देखील युगप्रवर्तक आहे. ती दुसरी वाङ्मयीन काव्यक्रांती होती. १९४५ नंतरच्या मराठी कवितेच्या परंपरेतील भावगीतात्मकता, ढोबळ भावना, स्थूल अलंकारिक मांडणी, कल्पनारम्यता, आविष्कारातील साचेबंदपणा, यमक, अनुप्रासप्रधान रचना, भावनांचे नाटकी उदात्तीकरण इ. टाळून कविता वास्तवाकडे वळली. नवकवितेने आविष्काराचे अनेक प्रयोग केले. आशय आणि आविष्कार यात भिन्नता आणली. आजपावेतो मराठी कवितेला अस्पर्श असे सूक्ष्म जीवनानुभव कवितेतून पकडले. भावूक आशावादापेक्षा वास्तवदर्शी निराशावाद कणखर मनोवृत्तीने स्वीकारला. या कवितेने मानवाचे एकाकीपण, अगतिकता व अर्थशून्य जगण्याला चित्रित करून कवितेला सच्चा सूर दिला. यंत्रयुगीन प्रतिमा मराठीत आणल्या. जीवनाचे वेगळे आकलन करून दिले. माणसाच्या सुप्त, अर्धसुप्त मनाचे भान आणून दिले. ही अनोखी संवेदनशीलता मराठीला नवी होती. त्यामुळे पारंपरिक अभिरूचीला मर्ढेकरी संवेदनशीलता न रूचणे आणि त्यांची कविता न कळणे स्वाभाविक होते. आदर्शवादी आणि स्वप्नरम्य सांकेतिक अभिरूचीच्या मंडळीनी 'नवकविते'ला कडाडून विरोध केला. तसा विरोध केशवसुतांच्या कवितेला झाला नाही. कारण त्या काळातील वाचक, लेखक व समीक्षक हे सीमित व एकाच इंग्रजी साहित्याच्या परंपरेवर पोसलेले होते. शिवाय केशवसुतांपूर्वी किमान चाळीस वर्षे अगोदर सौंदर्यवादी कवितेचा संथ पायरव सुरू झाला होता. उलट रविकिरण मंडळाकडून नवकवितेकडे झालेले स्थित्यंतर तुलनेने आकस्मिकच असे होते. परंतु या कवितेतील नव्या प्रतिमा व नव्या जीवनानुभवाच्या सृष्टीने रसिकांशी सहजसंवाद राहिला नाही. कारण ती परंपरेत मुरलेली नव्हती. १९४७ ते १९६० हा नवकवितेच्या प्रभावाचा काळ होता. या काळात ती चांगलीच मराठी कवितेत रूळत गेली. त्यामुळेच मर्ढेकरांना मात्र १९६० नंतरच मान्यता मिळाली. त्यापूर्वी त्यांची कविता विवाद्यच राहिली. वैश्विक जाणिवेतून होणारी प्रस्फुरणे आणि स्वातंत्र्याने गतिमान बनलेल्या आर्थिक सामाजिक परिवर्तनातून निर्माण झालेल्या प्रवृत्ती असे दोन प्रवाह या नवकवितेत प्रवाहित राहिले.

"मराठी कवितेला नवता देऊ पाहणारी स्वतंत्र वृत्तीच्या कवींची कवी अनिलांपासूनची एक धारा होती. त्याच धारेतील **पुरुषोत्तम शिवराम रेगे** अर्थातच पु. शि. रेगे आणि **शरच्चंद्र मुक्तिबोध** हे दोन कवी म्हणजे नवकवितेच्या काळातील दोन स्वतंत्र वृत्तीचे कवी होत. अगदी वेगवेगळ्या प्रवृत्तीचे हे कवी असले तरी नवकवितेच्या प्रवर्तनात त्यांचा मोलाचा वाटा आहे. पु. शि. रेगे यांचे पहिले तीन कवितासंग्रह स्वातंत्र्यपूर्व काळात प्रसिद्ध झाले. तर दोला १९५०, गंधरेखा १९५६, पुष्कळा १९६०, दुसरा पक्षी १९६६, स्वानंदबोध १९७०, प्रियाळ १९७२ इ." काव्यसंग्रह स्वातंत्र्योत्तर काळातील आहेत. रेग्यांची कविता सनातन व नित्यनूतन आहे. त्यामुळेच तिची स्वातंत्र्याच्या संबंधात विभागणी करता येत नाही. ही अभिजात वळणाची कविता आहे. अल्पाक्षरी, आत्ममग्न, खानदानी वळण, संस्कृतप्रचुर शब्दकळा हे तिचे विशेष आहेत. त्यांनी शब्दक्रीडा करत विविध संवेदनांचे प्रतिमावैभव उभारले. मराठी काव्यात बोरकर व रेगे यांची स्वतःची अशी काव्यभाषा आहे. समीक्षकांनी रेग्यांच्या या गुणाचा पुष्कळ गौरव केला आहे. ते शब्दानुभवी कवी म्हणून ओळखले जातात. शब्दांना पुरविलेल्या संवेदनांमुळे त्यांची कविता म्हणजे 'पार्थिव इंद्रिय संवेदनांची गाथा' म्हणून ओळखली जाते. समीक्षक म्हणतात, 'शब्दांच्या व शब्दसंहतांच्या नादरूपात्मक संवेद्य शक्तींचा जणू काही अर्कच काढून ते एक नागर असा शब्दबंध तयार करतात व त्याद्वारे अनेक सादपडसादयुक्त अशा अमूर्त व मनोरम मनोवस्था साकार करीत असतात. त्यांनी शिल्पित केलेली अनुभूती मराठी काव्यक्षेत्रात अपूर्व होय.'

रेग्यांच्या निवडक कवितांचा संग्रह 'सुह्रदगाथा' (१९७५) हा गंगाधर पाटील यांनी संपादित केला आहे. गंगाधर पाटील म्हणतात, की रेग्यांच्या प्रतिभेने स्त्रीच्या शरीरमनाचे नानाविध गुण वेचून एक कलापूर्ण स्त्री-प्रतिमा, म्हणजेच स्त्रीचे जणू एक नवे मिथ निर्माण केले आहे. ही स्त्री विविधरूपी स्त्री-सौंदर्य, सर्जन, मार्दवे, प्रेम, काम, करूणा, देयता, आनंद, स्वच्छंदता आदी स्त्रीगुणांनी नटलेली आहे.

**शरच्चंद्र मुक्तिबोध** यांचे 'नवी मळवाट' (१९४९) व 'यात्रिक' (१९६४) हे महत्त्वाचे संग्रह आहेत. हे साम्यवादी विचारधारेतील कवी आहेत. ते मराठीतील निष्ठावंत मार्क्सवादी कवी आहेत. त्यांनी आपल्या काव्यलेखनाने कुसुमाग्रज, काणेकर यांच्या ओसरत्या साम्यवादी कवितेला जोम दिला. नवकवितेची सामर्थ्ये समजून घेऊन पण त्या धारेशी एकरूप न होता स्वतंत्र वळणाने, साम्यवादी जाणिवेने काव्य करणारे मुक्तिबोध हे स्वातंत्र्योत्तर महत्त्वाचे कवी होत. 'मर्ढेकरांच्या काव्यातील नैतिक निराशा व्यक्तिवादी मानवतावादातून जन्माला आलेली आहे व त्यांचे काव्य ऱ्हासशील काव्यपरंपरेत बसणारे आहे' अशी त्यांनी मार्क्सवादी मीमांसा केली. त्यांचे कवितेचे मानवतावादी विश्लेषण समाज व व्यक्तीमनाला उभारी देणारे आहे. त्यांनी साम्यवादी दृष्टीतून समष्टीची संकल्पना मांडली.

अतिशय सूक्ष्म भावसंवेदनांची, आत्मनिष्ठ अशी भाववेधक नवकविता **सदानंद रेगे** यांनी लिहिली. विक्षिप्त परंतु वैशिष्ट्यपूर्ण अशी ही कविता आहे. 'अक्षरवेल', 'गंधर्व', 'देवापुढचा दिवा', 'वेड्या कविता' हे त्यांचे काव्यसंग्रह होत. त्यांची कविता पौरात्य ते पाश्चात्त्य संदर्भांनी समृद्ध आहे. त्यामुळे ती अधिक सूक्ष्म व अर्थगर्भ आहे. तिच्यामध्ये पूरेपूर आशयातील नावीन्य आहे. त्यांच्या काव्यलेखनाची शैली विक्षिप्त व तिरकस आहे. तिच्यामध्ये अभिव्यक्तीच्या अनेक शक्यता आहेत. जुन्या कवितेशी कोणताच संबंध दाखवता येणार नाही इतक्या वेगळ्या वाटांनी प्रयोग करीत त्यांनी मराठी कविता पुढे नेली. त्यांच्या काव्यलेखन शैलीने आशय व अभिव्यक्तीचे समृद्ध दालन उघडे केले.

नवकवितेला विरोध करून जुन्या पारंपरिक वळणाची एक धारा होती. तिच्यासोबतच नवकवितेची निवडक वैशिष्ट्ये आत्मसात करून पण आपले मूलतः भिन्न असलेले वेगळेपण कायम टिकवून ठेवणारी आणखी एक धारा होती. या धारेतील नवकवितेच्या प्रांगणातील 'त्रिवेणीधारा' म्हणून ओळखली जाणारी विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर यांची कविता महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात रविकिरण मंडळाच्या कवींनी काव्यगायनाद्वारा कविता लोकप्रिय केली व सामान्य वाचकापर्यंत नेली; तर वरील तीन कवींनी काव्यवाचनाद्वारा कवितेला लोकप्रिय बनविले. काव्यगायनाची जागा काव्यवाचनाने घ्यावी ही घटना देखील बदलती काव्यवृत्ती लक्षात आणून देणारी आहे. यांच्या कवितेने मराठी समीक्षेत जुनी कविता आणि नवी कविता अशी चर्चा चालू झाली ही या कवितेसंदर्भात आणखी एक नोंद घेण्याजोगी बाब होय. हे तीनही कवी वेगवेगळ्या प्रवृत्तीचे आहे. चिंतनशीलता आणि प्रायोगिकता हे तिचे वैशिष्ट्य होय.

काणेकर, कुसुमाग्रज, मुक्तिबोध यांच्या साम्यवादी कवितेच्या धारेला विंदा करंदीकर यांच्या कवितेने जोम दिला. 'स्वेदगंगा' (१९४९), 'मृद्गंध' (१९५४) हे दोन काव्यसंग्रह त्याचे द्योतक होय. सामाजिक व राजकीय विषयापासून त्यांच्या कवितेला सुरूवात झाली. परंतु 'वाटाड्या' (१९५९) या कवितेपासून ते साम्यवादापासून दुरावले. त्यानंतर त्यांनी मुक्तसुनीते,

तालचित्रे, विरूपिका इ. आकृतीविषयक अनेक प्रयोग केले. जोमदार, बेदरकार शब्दकळा, भावनेची उत्कटता आणि प्रयोगशील नावीन्य या अंगांनी विंदांनी मराठी कवितेला पुढे नेली.

**वसंत बापट** या समाजाभिमुख वृत्तीच्या कवीने देखील आरंभी समाजवादी विचारसरणी स्वीकारली. जुना शाहिरी ढंग आणि नवी समाजवादी जाणीव यांचा मेळ त्यांच्या कवितेत आहे. त्यांच्या कवितेत नाट्यमय मांडणी येते. 'बिजली', 'सेतू', 'सकिना', 'मानसी' हे त्यांचे संग्रह होत. समूहभाव ओसरल्यानंतर त्यांनी 'मानसीच्या' रूपाने संयत, उत्कट मालिकाकविता लिहिली. मोहक, अस्सल, मराठमोळी शब्दकळा आणि नाट्यपूर्ण रचनाबंध या दृष्टीने त्यांची कविता लक्षणीय आहे.

**मंगेश पाडगावकर** हे संवेदनासमृद्ध कवी होत. तरल व कोमल भावना, निसर्गसंवेदन आणि कोवळ्या व नाजूक प्रेमभावना यांच्या अनेक छटांनी त्यांची कविता मोहक बनलेली आहे. कोमल भाववृत्तींची अभिव्यक्ती हा त्यांचा पिंड आहे. 'धारानृत्य', 'जिप्सी', 'छोरी', 'वात्रटिका', 'सलाम', 'गझल' हे त्यांचे काही सुरूवातीचे संग्रह होत. 'विदूषक', 'सलाम', 'गझल' या संग्रहात त्यांनी स्वातंत्र्योत्तर जीवनातील राजकीय, सामाजिक विषयांवर उपरोधपूर्ण आणि विदारक भाष्य केले. हलकाफुलका विनोदी वळणाचा 'वात्रटिका' हा संग्रहही वेगळा आहे. उदासबोधात विडंबनात्मक काव्य केले. त्यांची सामाजिक जाणीव शहरी वळणाची, वरवरच्या विरोध विसंगतीपुरती मर्यादित आहे. त्यामुळे उपरोध, उपहास, विडंबन हेच तिचे स्वरूप राहते.

आधुनिक कविता आणि नवकविता यात फारसा फरक नाही. आधुनिक कवितेने सामाजिक विषयांना उपहास, विडंबन आणि अन्वेषणाच्या अनुषंगाने स्वीकारले. तीच परंपरेने सुरू ठेवत नवकवितेने व्यक्ती आणि समाज यांचा अधिकाधिक लोकशाही मूल्यांच्या आधारे अन्वेषण करण्याचा प्रयत्न केला. आधुनिक कवितेप्रमाणेच नवकवितेने नव्याचा स्वीकार केला. या कवितेत विचाराला प्राधान्य मिळाल्याने तिच्यातील गेयता कमी झाली. नवकविता नवी ठरते तिच्यातील प्रतिमांच्या नवेपणा आणि लक्षवेधकपणामध्ये त्या सौंदर्यापेक्षा समर्पकतेला अधिक महत्त्व देणाऱ्या आहेत. भलेही या तिच्या गुणामुळे व तिच्यातील नवेपणामुळे रसिक वाचक तिच्यापासून अंतर ठेवून राहिला तरी नवकविता स्वातंत्र्योत्तर काळातील समग्र सामाजिक, राजकीय, आर्थिक व भौतिक आशयाला कवेत घेणारा आहे. नवकवितेचे आस्थास्थान हे समग्र परिस्थितीतील मानव हा आहे. त्यामुळे नवकवितेत परिस्थितीमध्ये आढळणारी विफलता, जुगुप्सादायक बीभत्सता, क्वचित अश्लिलता, घोर विषमता यांचा अभिव्यक्ती होते. नवकविता वास्तववादी आहे त्यामुळे हे घडते. नवेपणा हा प्रतिमांमधून की आशयातून व्यक्त व्हावा याबाबत याकाळात अनेक मते व्यक्त झाली. मर्ढेकरांनी प्रतिमांना महत्त्व दिले तर य.दि. भाव्यांनी अर्थ हाच आत्मा, प्रतिमा हे शरीर आहे असे म्हटले. नवकवितेविषयीच्या या उपपत्ती आहेत. काव्यप्रयोजनामध्ये काव्यवृत्ती सामावलेल्या असतात. म्हणजेच कवी कोणत्या कारणासाठी काव्यलेखन करतो. प्राचीन काळापासून नवकाव्यापर्यंत पाहिले तर ही प्रयोजने वेगवेगळी आहेत व त्यानुसार काव्यवृत्ती देखील बदलत गेल्या आहेत. पूर्णतः आध्यात्मिक आणि नैतिक अधिष्ठानाची कविता आधुनिक काळात नव्या वळणावर आली. तिने आत्मोद्धार म्हणजेच काव्य अशी भूमिका घेतली. ही भूमिका काव्यलेखन हे स्वार्थ की परार्थ असा प्रश्न निर्माण करते. केशवसुतांनी काव्याचे प्रयोजन म्हणून अनेक गोष्टी सांगितलेल्या आहेत. आधुनिक कवितेच्या वृत्ती या स्वार्थ आणि परार्थाच्या सीमारेषेवरील आहेत. या कवींचा स्वार्थ हा देखील परार्थच आहे असे अभ्यासाअंती लक्षात येते. परंतु नवकाव्यात मात्र करंदीकरांनी काव्य लिहिणे एवढीच

कवीची जबाबदारी असते असे मानतात. रा. श्री. जोग यांनी नवकाव्याच्या वृत्ती दोन भागात विभागल्या आहेत. त्यातील पहिली म्हणजे आपली कविता म्हणजे मनातील अर्थ इतरांस सहजपणे संपूर्ण आणि स्पष्टपणे समजलाच पाहिजे असे नाही ही वृत्ती होय. दुसरी म्हणजे आपले काव्य हे स्वार्थ असल्याने आपल्या आत्मोद्गारात खासगी आणि सार्वजनिक असे द्वैत मानण्याचे कारण नाही; सारेच खासगी आहे ही वृत्ती. या वृत्तींनी नवकवितेत दुर्बोधता आणि अश्लिलता वाटाव्या अशा अर्थालाही वाव मिळाला. प्रेमाच्या अभिव्यक्तीतील संकोच केशवसुतकालापासूनच बाजूला पडत आला. प्रेमाची शारीरिक बाजू तिच्या भावनिक बाजूइतकीच महत्त्वाची असते. ती न दुर्लक्षिता तिचा उल्लेख नवकवितेमध्ये होऊ लागला. त्यामुळेच तिच्यावर अश्लिलतेचा आरोपा केला जातो. शृंगारातील उत्तानता वा जगण्यातील बिभत्सता ती सारखंच मानते. सर्वच सत्य सुंदर असे नवकविता मानते. या काव्यवृत्ती काव्याचा आशय आणि अभिव्यक्तीमधून दिसून येतात. नवकवितेतील प्रतिमांच्या नवीनतेने आणि तिच्यातील दुर्बोधतेने तिचा समाजाशी असणारा जवळीकीचा सांधा तुटला. त्याचे एक कारण काव्यवृत्तीमध्ये झालेल्या बदलातही आहे. नवकवितेत पूर्वीच्या अनेक गोष्टी दिसत नाही. नवकविता आशयाच्या अभिव्यक्तीसाठी मुक्तछंद हा एकच प्रकार मानते की काय अशी परिस्थिती आहे. रविकिरण मंडळात अनेक काव्यप्रकारांमधून लेखन झाले. काव्यप्रकारांच्या दृष्टीने रविकिरण मंडळाचा काळ समृद्ध होता. तसे या काळात अनेक रचनाप्रकार काव्यलेखनासाठी वापरले गेले नाहीत. रचनामूलक अलंकारांना निरोप मिळाला. विरोधाच्या आभासापेक्षा वा त्यासाठी अलंकारांची योजना करण्यापेक्षा प्रत्यक्ष विरोध करण्यावरच नवकविता भर देते. नवकवितेत अभिव्यक्तीच्या दृष्टीने प्रतिमा नावीन्यालाच अधिक महत्त्व मिळाल्याचे दिसते. या काळात अभिव्यक्तीचे प्रयोग हे फारच अल्प आहेत. नवकवितेत काव्य अधिकच छोटे होत गेले. काव्यप्रसार व काव्याच्या लोकप्रियतेचे कार्य करण्यास नवकविता प्रयत्नशील राहिली नाही. हे सर्व मुद्दे नवकवितेतील त्रुटी म्हणून पाहता येत नाहीत तर ते तिचे पूर्वपरंपरेहून वेगळेपण आहे, हे लक्षात घ्यावयास हवे.

मुक्तिबोधांनी नवकवितेमध्ये दोन धारा असल्याचे म्हटले. त्यांच्या मते नवकाव्यात एक विफलतावादी कवींची व दुसरी आशावादी कवींची अशा दोन धारा आहेत. विफलतावादी धारेची विचारसरणी ही व्यक्तीवादी व अहंवादी आहे, अबुद्धिवादी आहे असे त्यांना वाटते. तिचा मानव्यावर विश्वास नाही. त्यात आशावाद नसून ती अन्याय व विषमतेविषयी केवळ चीड निर्माण करते. ती त्रयस्थाची उपहासात्मक भूमिका घेते. ती तुच्छतावादी आहे. मर्ढेकर व त्यांचे अनुयायी या धारेचे प्रतिनिधित्व करतात असे त्यांना वाटत असावे. तर दुसरी काव्यधारा दृढ आशेवर फोफावणारी, समाजवादी वा मानवतावादी, समदुःखी सहप्रवाशाची भूमिका घेणारी, मानवाच्या भवितव्याबद्दल सुजाण विश्वास असणारी अशी आहे. ही कविता सहानुभूतीने मानवी भावनांची निरनिराळी सत्य समोर आणते. मुक्तिबोधांच्या मते या धारेचे प्रतिनिधी कवी अनिल व ते स्वतः असावेत. परंतु या दोनही धारा सामाजिकतेची दखल घेतात हे महत्त्वाचे. नवकवितेचा विचार करताना मुक्तिबोधांचे हे विवेचन समोर ठेवणे गरजेचे आहे. कारण इतिहासाचा एकांगी वा पक्षपाती अभ्यास करता येत नाही. नवकवितेविषयी मतमतांतरे व वादविवाद तिचे विश्लेषण व अन्वेषण करताना महत्त्वाचे असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्राचीन मराठी काव्याचे स्वरूप स्पष्ट करा.

## २.३. समारोप :

प्राचीन काळापासून नवकवितेपर्यंतचा काव्याच्या इतिहासाचा हा घाट मांडण्याचा प्रयत्न आहे. इथे काही ठळक कवी व त्यांच्या कार्याच्या आधारे काव्येतिहास पाहिला असला तरी त्यांच्यासोबतच अनेक छोटे मोठे कवी विविध भागातून काव्यलेखन करत होते हे लक्षात घ्यावयास हवे. आजच्या कवितेचे रूप हे या प्रत्येक काळातील आव्हानांना दिलेल्या प्रतिसादातून निर्माण झालेले आहे. कवितेच्या निर्मितीत कवी ज्या काळात व ज्या परिस्थितीत लेखन करतो त्याचा प्रभाव खूप मोठा असतो. एकाच विचारधारेच्या आधारे इतिहास तपासता येत नाही. प्रत्येक काळात अनेक विचारधारा कार्यरत असतात व त्यांची अभ्यासामध्ये दखल घेणे गरजेचे असते. या सर्व मुद्द्यांच्या आधारे १९२० पासूनच्या काव्याचा नवकवितेपर्यंतचा विचार केलेला आहे.

## २.४. संदर्भग्रंथ :


१) गाडगीळ, स. रा., 'मराठी काव्याचे मानदंड' खंड दुसरा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे - प्रथमावृत्ती २००५.

२) जोग, रा. श्री. व इतर, 'प्रदक्षिणा खंड १ काव्य' - रा. श्री. जोग, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती १९७२.

३) घवी, रवींद्र व इतर, 'प्रदक्षिणा खंड २ स्वातंत्र्योत्तर कविता' - रवींद्र घवी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण - २००४.

४) सद्रे, केशव, 'कवितेतील आधुनिकवाद' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २०००.


**नमुना प्रश्न :-**

**अ) दीर्घोत्तरी -**

१) केशवसुतकालीन कवितेचे अंतरंगातील बदल स्पष्ट करा.

२) रविकिरण मंडळातील कवी व त्यांच्या कवितेचे स्वरूप स्पष्ट करा.

३) स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेच्या कालखंडातील महत्त्वाचे कवी व त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये सांगा.

४) १८८५ ते १९२० या कालखंडातील कवी व कवितेचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१) रविकिरण मंडळ

२) राष्ट्रीय गीत

३) कवी अनिल

४) नवकविताकार - शरच्चंद्र मुक्तिबोध

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कणिका हा काव्यप्रकार कोणी रूढ केला ?

२) रविकिरण मंडळ कोठे उदयास आले ?

३) बा. भ. बोरकर यांनी कोणाचा गीतसंप्रदाय अधिक समृद्ध केला ?

४) शरच्चंद्र मुक्तिबोध हे कोणत्या विचारधारेतील कवी होत ?

❖❖❖❖

munotes.in

# घटक ३

# कादंबरी : (१८७४-१९२०) (१९२०-१९६०)

**घटक रचना :**

३.० उद्देश
३.१ प्रास्ताविक
३.२ १८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरी
३.३ ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणारी कादंबरी
३.४ समारोप
३.५ संदर्भग्रंथ
३.६ सरावासाठी प्रश्न

## ३.० उद्देश

१) १८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरीचे स्वरूप अभ्यासणे.
२) या कालखंडात लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांचा आशय, विषय व शैलीचे स्वरूप ध्यानात घेणे.
३) या कालखंडातील कादंबरीकारांची व त्यांच्या कादंबऱ्यांची ओळख करून घेणे.
४) तसेच उत्तरोत्तर कालखंडात कादंबऱ्यांमध्ये झालेल्या बदलाचे स्वरूप ध्यानात घेणे.

## ३.१ प्रास्ताविक

प्रस्तुत घटकात १८७४ ते १९६० या कालखंडातील मराठी कादंबरीचा आढावा घ्यावयाचा आहे. सदर आढावा घेताना या विस्तृत कालखंडाचे दोन भाग केले असून पहिल्या भागात १८७४ ते १९२० आणि दुसऱ्या भागात १९२० ते १९६० या कालखंडातील कादंबरीचे स्वरूप अभ्यासावयाचे आहे.

❖ पहिल्या भागात प्राधान्याने ह. ना. आपटे, बा. स. गडकरी, नाथमाधव, वा. म. जोशी, रा. वि. टिकेकर, ना. ह. आपटे. सहकारी कृष्ण, वा. म. जोशी, कृष्णराव भालेकर, काशीबाई कानिटकर इत्यादी अनेक महत्त्वाच्या कादंबरीकारांचा समावेश होतो. तर दुसऱ्या भागात श्रीधर व्यंकटेश केतकर, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, भा. वि. वरेरकर, ग. त्र्यं. माडखोलकर. पु. य. देशपांडे, र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, श्री. ना. पेंडसे, विभावरी शिरूरकर, विश्राम बेडेकर, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके इत्यादी अनेक कादंबरीकारांचा समावेश होतो.

## ३.२ १८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरी

१८७४ नंतरच्या काळातील महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून ह. ना. आपटे यांचा उल्लेख करावा लागेल. तत्पूर्वी सदर कालखंडातील कादंबरीकारांकडे वळण्यापूर्वी ह. ना. आपटेपूर्व मराठी कादंबरीचा थोडक्यात परामर्श घ्यावा लागेल.

कादंबरी हा एक आधुनिक ललित साहित्यप्रकार आहे. इंग्रजी साहित्यातून प्रेरणा घेऊन कादंबरी हा साहित्यप्रकार भारतीय साहित्यात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाला. संस्कृत कथासाहित्यातून किंवा लोकसाहित्यातून कादंबरीचा जन्म झाला असे मत काही टीकाकार मांडतात. मात्र कादंबरी या स्वतंत्र ललित साहित्यप्रकाराचे इंग्रजी कादंबरीशी अधिक साम्य आहे. थोडक्यात इंग्रजी साहित्याच्या परिचयातून मराठीत अनेक साहित्यप्रकार आले. त्यामध्ये कादंबरी या साहित्यप्रकाराचाही समावेश होतो.

मराठी भाषेतील पहिली कादंबरी भाषांतरित आहे. हरी केशवजी यांनी १८४१ मध्ये जॉन बन्यनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या कादंबरीचा 'यात्रिकक्रमण' हा अनुवाद केला. त्यानंतर बाबा पदमनजी यांनी १८५७ मध्ये लिहिलेली 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी होय. त्यापाठोपाठ 'मुक्तामाला' १८६१ (लक्ष्मणशास्त्री हळबे), 'मंजुघोषा' १८६८ (ना. स. रिसबूड), 'मोचनगड' १८७१ (रा. भि. गुंजीकर) 'विचित्रपुरी' १८७० (के. ल. जोरवेकर) 'चंद्रप्रभाविरहवर्णन' १८७३ (साळूबाई तांबवेकर) इत्यादी अनेक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. वरीलपैकी अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. तथापि 'यमुनापर्यटन' सारख्या वास्तववादी कादंबऱ्यांनी ह. ना. आपटे यांच्या सामाजिक कादंबरीसाठी योग्य भूमी निर्माण केली असे म्हणता येईल.

१८७४ पासून मराठी साहित्यक्षेत्रात नवे मन्वंतर अवतरले. निबंधाला विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी, कवितेस केशवसुतांनी, नाटकास अण्णासाहेब किर्लोस्करांनी आणि कादंबरीस ह. ना. आपटे यांनी नवे रूप आणि नवा अर्थ दिला. परिणामी त्या त्या साहित्यप्रकारांमध्ये आमूलाग्र परिवर्तन झाले. समाजजीवनात निर्माण झालेल्या नव्या जागृतीचे हे सांस्कृतिक फलित होते.

### ❖ ह. ना. आपटे

हरिभाऊ आपटे यांनी 'मधली स्थिती', 'गणपतराव' (अपूर्ण), 'मी', 'यशवंतराव खरे', 'जग हे असे आहे', 'पण लक्षात कोण घेतो!', 'मायेचा बाजार', 'आजच' (अपूर्ण) इत्यादी अनेक कादंबऱ्या लिहून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे चित्रण केले आहे. 'मधली स्थिती' ही हरिभाऊ यांची पहिली कादंबरी. ती रेनॉल्डसच्या 'मिस्टरीज ऑफ ओल्ड लंडन' चे रूपांतर आहे. ही कादंबरी १८८५ मध्ये 'पुणेवैभव' मधून क्रमशः प्रसिद्ध झाली.

हरिभाऊंच्या सर्व कादंबऱ्यांमध्ये 'पण लक्षात कोण घेतो!' ही कादंबरी अधिक चर्चिली गेली आहे. यमुना नावाच्या एका विधवेने लिहिलेले हे आत्मचरित्र आहे असा आभास निर्माण करून लिहिल्या गेलेल्या या कादंबरीला आत्मचरित्राचे इतके सहज परिमाण लाभले आहे की ह.

ना. आपटे यांनी त्यावर आपले नाव का लिहिले असा प्रश्न काही भाबड्या वाचकांनी केला होता असे उल्लेख मिळतात. ह. ना. आपटे यमूच्या भावभावनांशी किती समरस झाले होते हेच यावरून स्पष्ट होते. 'यशवंतराव खरे' या कादंबरीतही 'मधली स्थिती' प्रमाणे पुणे शहरातील समाजस्थितीचे वस्तुनिष्ठ चित्रण हरिभाऊंनी केले आहे.

थोडक्यात, हरिभाऊंनी आपल्या कादंबऱ्यांतून केलेले समाजचित्रण सदाशिवपेठी समाजापुरते मर्यादित असले तरी त्या जीवनचित्रणाला असलेली खोली लक्षणीय आहे. काळाच्या ओघात होऊ लागलेल्या एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास आणि सुधारणावादामुळे व्यक्तिवादी जाणिवांचा होऊ लागलेला उदय या सामाजिक संक्रमणाचे प्रतिबिंब हरिभाऊंच्या कादंबरीत उमटले आहे. "इतका समाजाभिमुख लेखक या काळात निर्माण व्हावा हे त्या काळाला जसे भूषणावह आहे तसे ते लेखकालाही आहे" असे नमूद करून दु. का. संत यांनी हरिभाऊंच्या मर्यादा यथायोग्य शब्दात दाखवून दिल्या आहेत. 'गणपतराव' नंतर प्रसिद्ध झालेल्या 'कर्मयोग' या कादंबरीचा नायक चंद्रशेखर समाजसुधारणावादी विचारांपेक्षा राष्ट्रसुधारणावादी विचारांकडे अधिक झुकलेला आहे हे नोंदवल्यानंतर दु. का. संत लिहितात, "आगरकरांच्या विचारातील व्यक्तीवादापेक्षा चिपळूणकरांच्या व त्यांच्या अनुयायांतील रामदासी वृत्तीचा पुरस्कार त्यांना अधिक जवळचा वाटला असे दिसून येते."

अव्वल इंग्रजी काळात मिल, स्पेन्सर आदी विचारवंतांमुळे मानवतावाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता आदी आधुनिक मूल्ये रूजली. त्यांचा परिणाम हरिभाऊंच्या कादंबऱ्यांवर झालेला दिसून येतो. हरिभाऊ हे बोधवादी असले तरी उथळ बोधवादी नाहीत किंवा त्यांना कृतिशील सुधारकही म्हणता येत नाही, परंतु तत्कालीन सुधारणावादी वातावरणाचा एखाद्या लेखकाच्या मनावर कोणता परिणाम होऊ शकतो याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ह. ना. आपटे यांचे व्यक्तिमत्त्व होय.

निबंधमालेच्या उदयानंतर महाराष्ट्रात राष्ट्रवादी विचारांचे वारे वाहू लागले. आतापर्यंत इंग्रजांचे ते चांगले असे म्हणणारा, न्यूनगंडाने पछाडलेला सुशिक्षित वर्ग आपल्या देशाचा ऐतिहासिक–सांस्कृतिक वारसा शोधू लागला. टिळकांच्या जहाल राजकाणाचाही यात मोठा वाटा होता. तशातच स्वामी विवेकानंद यांच्यासारखे हिंदू धर्माचे प्रतिनिधी अमेरिकेपर्यंत जाऊन हिंदू धर्माची द्वाही फिरवून आले होते. ही सांस्कृतिक पार्श्वभूमी ऐतिहासिक कादंबरीच्या उदयास कारणीभूत ठरली. त्याचप्रमाणे समकालीन लेखकांचे स्कॉट, रेनॉल्ड्स यांच्या कादंबरीचे वाचन ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या उदयास पूरक ठरते. स्कॉट, रेनॉल्ड्स यांची ऐतिहासिक कादंबरी ही सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या प्रेरणेतून आणि रंजनाच्या नव्या गरजेतून निर्माण झालेली होती. ह. ना. आपटे यांची ऐतिहासिक कादंबरी ही उदयास येताना हेच घडले आहे. मेडोज टेलरच्या 'टिपू सुलतान' या कादंबरीचा संक्षिप्त अनुवाद करून ह. ना. आपटे यांनी आपल्या ऐतिहासिक कादंबरीलेखनाला प्रारंभ केला. इतिहास आणि दंतकथा हे त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीचे आधारस्तंभ आहेत. 'उषःकाल', 'सूर्योदय', 'सूर्यग्रहण', 'केवळ स्वराज्यासाठी', 'गड आला पण सिंह गेला' या सर्व कादंबऱ्यांच्या निर्मितीप्रेरणा हीच आहे. या कादंबऱ्यांतून त्यांनी प्राधान्याने शिवकालीन इतिहास वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. 'म्हैसूरचा वाघ', 'रूपनगरची राजकन्या', 'वज्राघात' या कादंबऱ्यांना महाराष्ट्राबाहेरील इतिहासाची पार्श्वभूमी आहे. याही कादंबऱ्यांचे स्वरूप आणि हेतू वरीलप्रमाणेच आहे.

हरिभाऊंनी मराठी कादंबरीला प्रतिष्ठा आणि लोकप्रियता मिळवून दिल्याने या काळात अनेक कादंबरीमाला उदयास आल्या. या कादंबरीमालांची नावे पाहिली तरी त्या मालांमधून प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्यांचे स्वरूप आणि उद्दिष्टे लक्षात येतात. या मालांमधून शेकडो कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. पोतदार यांची मनोरंजक व नीतीपर पुस्तकमाला, कादंबरी कल्पतरू पुष्पमाला, मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळाची पुस्तकमाला, मकरंद पुस्तकमाला, भारतगौरव पुस्तकमाला, ज्ञानमित्र पुस्तकमाला, गुणागोविंद पुस्तकमाला, कुटुंबशिक्षणमाला, सुरस ग्रंथमाला, सरस वाङ्मय रत्नमाला इत्यादी मालांमधून या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. बोध आणि रंजन हे दोन्ही उद्देश समोर ठेवून या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. का. र. मित्र, वि. सी. गुर्जर, बाळकृष्ण रामचंद्र कुलकर्णी, भाऊ श्रीधर कुलकर्णी, दामोदर उदास, ग. वि. कुलकर्णी, श्री. ना. ताडपत्रीकर, द. भि. रणदिवे, कृ. के. गोखले, भिकाजी गोपाळ भिडे, तात्या नेमिनाथ पांगळ, रा. वा. कोठारी, बाळकृष्ण संतुराम गडकरी, विठ्ठल जिवाजी नाडकर्णी, प्र. श्री. भसे, जानकीबाई देसाई, यशोदाबाई भट, गिरिजाबाई केळकर इत्यादी अनेक लेखक-लेखिका या मालांमधून लेखन करताना दिसतात. हरिभाऊंच्या काळात उदयास आलेल्या या कादंबरीमाला पुढे अनेक वर्षे सुरू होत्या. या मालांमधील कादंबऱ्या वाचल्या जात असतानाच वामन मल्हार जोशी, श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे कादंबरी लेखन सुरू झाले. त्यांच्याकडे वळण्यापूर्वी या काळातील आणखी काही लेखकांचा परामर्श घेणे आवश्यक आहे.

### ❖ बा. स. गडकरी

बाळकृष्ण संतुराम गडकरी यांनी 'सुधारणेचा मध्यकाल', 'दुर्दैवी प्रेमयोग', 'पुष्पमाला', 'विद्वान सोबती की कुशल गृहिणी', 'मूर्खाचा शहाणा' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. एखादा विषय मनाशी निश्चित करून कादंबरीलेखन करावे आणि त्यातून काहीतरी बोधपर संदेश द्यावे असे गडकरी यांच्या कादंबरीचे स्वरूप आहे. उदाहरणार्थ, 'सुधारणेचा मध्यकाल' या कादंबरीमध्ये विधवा पुनर्विवाह हा विषय त्यांनी मांडला आहे. मनोरमा, लीला आणि बकुळाताई या तीन विधवा निरनिराळ्या स्वभावाच्या असून त्यातील मनोरमेचे वर्तन अनुकरणीय आहे. लीलाचे वर्तन क्षम्य आहे तर बकुळाताईचे वर्तन त्याज्य आहे अशी मांडणी गडकरी यांनी केली आहे. गडकरी हे त्याकाळी 'विदर्भाचे हरिभाऊ' म्हणून ओळखले जात.

### ❖ सहकारी कृष्ण

सहकारी कृष्ण हे बा. सं. गडकरी यांचे समकालीन असलेले आणखी एक कादंबरीलेखक आहेत. त्यांनी 'ही प्रेमाची मूस की पुरुषार्थाची कूस ?', 'माझी कहाणी', 'हा संसार की नरकवास ?', 'आत्मोद्धार', 'संकट की सौभाग्य ?', 'मानापमान', 'संक्रांत', 'शिकली पण चीज केले', 'आधुनिक स्वयंवर', 'चैत्राचा महिना', 'अपमानाचा मान' इत्यादी अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप सामान्यतः कुटुंबकथा असे आहे. माफक सुधारणावादाचा पुरस्कार करणाऱ्या सहकारी कृष्णांनी आपल्या सामाजिक कादंबऱ्यांमधून बोधवादी दृष्टिकोन कुठेही ढळू दिलेला नाही.

### ❖ नाथमाधव

नाथमाधव यांनी 'प्रेमवेडा', 'परवाची गोष्ट अथवा जग हे असेच', 'बंगाल्यातील पहिले गुप्त मंडळ अथवा हेमचंद्र रोहिणी', 'मद्यपाननिषेधक श्रीनिवासराव', 'रायक्लब'अथवा 'सोनेरी टोळी', 'विहंगवृंद', 'ग्रहदशेचा फेरा', 'दैवाचा खेळ', 'देशमुखवाडी', 'विमलेची ग्रहदशा', 'डॉक्टर' इत्यादी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. नाथमाधव यांच्या कादंबऱ्याही बोधवादी

उद्दिष्टे समोर ठेवून लिहिलेल्या कुटुंबकथा आहेत. समकालीन समाजजीवनातील स्त्रीशिक्षणाचा प्रश्न त्यांच्या 'डॉक्टर' या कादंबरीत आलेला दिसतो. सुशिक्षित स्त्रीने अशिक्षित पुरुषाशी लग्न करावे की करू नये या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी ही कादंबरी लिहिली गेली. 'मद्यपाननिषेधक श्रीनिवासराव' ही कादंबरी तत्कालीन सुशिक्षित वर्गात मद्यपानाचे जे व्यसन बोकाळू लागले होते त्याचे चित्रण करण्यासाठी लिहिली गेली आहे. इंग्रजांचे अंधानुकरण न करता सुशिक्षितांनी आपल्या जुन्या परंतु चांगल्या परंपरा जोपासल्या पाहिजेत असा विचार नाथमाधवांना मांडायचा आहे. नाथमाधवांनी ह. ना. आपटे यांच्या परंपरेत भर घालणारी विपुल ऐतिहासिक कादंबरी लिहिली असून त्यांचीही नोंद घेणे आवश्यक आहे. 'तरुण राजपुत्र सरदार', 'शिवाजी महाराजांचे आरमार अथवा सावळ्या तांडेल' या खेरीज 'स्वराज्यमाला' ही शिवशाहीचा इतिहास रेखाटणारी कादंबरीमाला त्यांनी लिहिली आहे. रेनॉल्ड्सच्या 'केनेथ' या कादंबरीवर आधारलेली 'वीरधवल' ही कादंबरी त्यांनी लिहिली आहे. इतिहासाला कल्पनारम्य बनवून वाचकांसमोर ठेवणे हेच त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप आहे.

### ❖ प्रभाकर श्री. भसे

प्र. श्री. भसे यांनी भारतगौरव ग्रंथमालेतून काही कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'रजनी' या बंकिमचंद्र यांच्या कादंबरीचे त्यांनी मराठी रूपांतर केले आहे. नावीन्याचे आकर्षण हा भसे यांच्या कादंबरीचा विशेष म्हणता येईल. 'रजनी' या कादंबरीत अंधांच्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. तर 'प्रेममंदिर' या कादंबरीत अध्यात्म हा विषय त्यांनी हाताळला आहे. त्याशिवाय 'समाजकंटक अथवा वेणू', 'कर्मफल', 'प्रणयपंक' अशा काही सामाजिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत.

### ❖ का. र. मित्र

का. र. मित्र या काळातील विपुल लेखन करणारे लेखक आणि 'मनोरंजन' या मासिकाचे संपादक आहेत. त्यांनी अनेक बंगाली कादंबऱ्यांची भाषांतरे आणि रूपांतरे केली आहेत. जोगेन्द्रनाथ चट्टोपाध्याय, चण्डीशरण सेन, तारकनाथ गंगोपाध्याय अशा काही बंगाली लेखकांच्या कादंबऱ्यांची रूपांतरे त्यांनी केली आहेत.

### ❖ वा. गो. आपटे

आपटे यांनी बोधवादी उद्दिष्ट समोर ठेवून काही कादंबऱ्यांची रूपांतरे केली आहेत. उदाहरणार्थ, मिसेस हेन्री वुडच्या 'मिसेस हॅलीबर्टन्स ट्रबल' या कादंबरीचे त्यांनी रूपांतर केले असून त्या कादंबरीचे शीर्षक 'दु:खाअंती सुख' असे आहे. तसेच मिसेस हेन्री वुडच्या 'ईस्ट लीन' या कादंबरीचे त्यांनी 'माणिकबाग' हे रूपांतर केले आहे.

### ❖ वि. सी. गुर्जर

बंगाली कादंबऱ्यांचे यशस्वी अनुवादक आणि रूपांतरकार म्हणून वि. सी. गुर्जरांचा उल्लेख करता येईल. त्यांनी रमेशचंद्र दत्त यांच्या एका लोकप्रिय कादंबरीवरून 'जीवनसंध्या', नन्नीहाल बंडोपाध्याय यांच्या एका कादंबरीवरून 'प्रेमसंयोग', राखालदास बॅनर्जी यांच्या एका ऐतिहासिक कादंबरीवरून 'शशांक' अशी काही रूपांतरे केली आहेत. तसेच बाबू जलधर सेन यांच्या 'अभागी' या कादंबरीचे रूपांतर त्यांनी 'हतभागिनी' या शीर्षकाने केले आहे. शिवाय प्रभातकुमार मुखर्जी यांच्या 'रत्नदीप' या कादंबरीचेही त्यांनी रूपांतर केले असून त्या रूपांतराचे शीर्षक 'पौर्णिमेचा चंद्र' असे आहे.

### ❖ चिं. वि. वैद्य

१९१४ मध्ये चिं. वि. वैद्य यांची 'दुर्दैवी रंगू' ही एक ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाली असून या कादंबरीविषयी अनेक समीक्षकांनी अनुकूल अभिप्राय व्यक्त केले आहेत. रंगू ही एक विधवा असून जन्मापासूनच दुर्दैव तिच्या पाठीशी लागलेले आहे. ती जिथे जाईल तिथे दुर्दैवी घटना घडतात आणि त्यातून रंगूची कथा घडत जाते. चिं. वि. वैद्य यांनी पानिपतच्या इतिहासाशी रंगूच्या कथेची सांगड घातली असून प्रत्येक घटनेला तिच्या दुर्दैवी जीवनाची पार्श्वभूमी देण्याचा प्रयत्न केला आहे.

### ❖ ना. ह. आपटे

हरिभाऊंच्या नंतरच्या पिढीतील महत्त्वाचा लेखक म्हणून ना. ह. आपटे यांचा उल्लेख करता येईल. सुधारणावाद म्हणजे पाश्चात्त्यांचे अंधानुकरण, स्वैराचार, व्यसनीपणा, अशिष्ट वर्तन अशी काहीतरी चुकीची धारणा या लेखकाने करून घेतली आहे. 'न पटणारी गोष्ट' यासारखी कादंबरी लिहून जरठ-कुमारी विवाहाचा प्रश्न हाताळणारे आणि नीरेसारखी बंडखोर नायिका उभी करणारे आपटे पाश्चात्त्य विचारांचा आणि सुधारणांचा प्रवाह थोपवला पाहिजे, एवढेच नव्हे तर आपल्या समाजाच्या हितासाठी ते आवश्यकच आहे. असे प्रतिपादन करताना दिसतात. 'उमज पडेल तर' या कादंबरीत त्यांनी पाश्चात्त्यांचे आंधळे अनुकरण करू नये असे मत मांडले आहे. 'कल्पनाचित्र अथवा अर्वाचीन रामराज्य' या कादंबरीतील नर्मदा ही सुधारणावादी पित्याची मुलगी असल्यामुळेच स्वैराचारी बनली आहे असेच लेखकाला सुचवायचे आहे की काय असे वाटू लागते. परंतु शेवटी ती सद्वर्तनी बनते. कुसुमावती देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे नर्मदेच्या चित्रणात नारायण हरींनी सुधारकी चाळ्यांना नामोहरम करून बाळबोध संस्कारांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याची आपली हौस पूर्णपणे भागवून घेतली आहे. जणू काय केले म्हणजे अर्वाचीन रामराज्य निर्माण होईल हेच त्यांना येथे सांगायचे आहे. खेरीज 'कपटजाल', 'भुरळ', 'हृदयाची श्रीमंती' अशा अनेक सामाजिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या.

मीरेचा जरठ पती आपल्या अल्पवयीन पत्नीचा विवाह तिला अनुरूप असलेल्या तरुणाशी करून देण्याचा मनोदय व्यक्त करतो ही गोष्ट कोणालाही पटणार नाही, याची ना. ह. आपटे यांना खात्रीच होती. म्हणूनच तर त्यांनी या कादंबरीला 'न पटणारी गोष्ट' हे नाव दिले आहे. त्याखेरीज त्यांनी 'पंजाबचा लढवय्या शीख', 'रजपुतांचा भीष्म', 'लांछीत चंद्रमा', 'अजिंक्यतारा', 'संधिकाल' अशा काही ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या असून वाचकांमध्ये राष्ट्रीय जाणिवेचा परिपोष करण्याचा प्रयत्न केला आहे.

### ❖ वा. म. जोशी

हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या हे संक्रमणकालीन समाजवास्तवाचे एक रूप आहे. तर वामन मल्हार यांच्या कादंबऱ्या हे त्याचे दुसरे रूप आहे. हरिभाऊंच्या काळात उदयास आलेल्या नवमध्यमवर्गात सुधारणावाद, शिक्षणप्रसार आणि तज्जन्य विचारप्रक्रिया वेगात सुरू झालेली दिसते. वामन मल्हार यांच्या कादंबरीत तिचा पुढचा टप्पा विकसित झालेला दिसून येतो.

ईश्वराचे अस्तित्व, तो सगुण आहे की निर्गुण, उपयुक्ततावाद, देशप्रेम, धर्मप्रेम, स्त्री-स्वातंत्र्य, विधवाविवाह, स्त्रीच्या लग्नाची वयोमर्यादा, शारीर आणि अशारीरप्रेम इत्यादी प्रश्नांची चर्चा वामन मल्हार यांनी आपल्या कादंबरीमध्ये घडवून आणली आहे. उदाहरणार्थ, स्त्रीने पुनर्विवाह करण्यात काहीच निंद्य नाही. किंबहुना तिने द्विपतिकत्त्व स्वीकारण्यात काहीच गैर नाही

हे पटवून देण्यासाठी आणि त्याला शास्त्राचा पूर्ण आधार असल्याचे सिद्ध करण्यासाठी त्यांनी 'आश्रमहरिणी' ही कादंबरी लिहिली. 'सुशीलेचा देव' या कादंबरीत दगडाला देव मानणाऱ्या सुशीलेचा ध्येय हाच देव मानण्यापर्यंतचा वैचारिक क्रमविकास रेखाटला गेला. तसेच जीवनात कलेला महत्त्वाचे स्थान असले तरी नीतीपेक्षा ते वरचे नाही हा विचार मांडण्यासाठी 'इंदू काळे सरला भोळे' ही कादंबरी लिहिली गेली.

वामन मल्हार यांची कादंबरी म्हणजे सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या तत्त्वत्रयीचा विलोभनीय आविष्कार होय. त्यातही वामन मल्हार समाजचित्रणापेक्षा तत्त्वचिंतनात आणि त्यातून उद्भवणाऱ्या चर्चांमध्ये अधिक रमले. तरीही त्यांनी घेतलेला मानवी मनाचा ठाव त्यांच्या कादंबऱ्यांची जमेची बाजू आहे. (उदाहरणार्थ 'इंदू काळे सरला भोळे') त्या दृष्टीने पाहता वामन मल्हार यांची कादंबरी हा हरिभाऊंच्या कादंबरीचा विकास आहे. परंतु ही कादंबरी सशक्त समाजचित्रणात उणी पडते हे नोंदविणे येथे आवश्यक ठरते.

थोडक्यात निष्कर्ष असा की, वामन मल्हार यांना कादंबरी घडवायची नसून कादंबरीच्या माध्यमातून तत्त्वचर्चा घडवायची आहे. त्यांचा हा हेतूच मुळात कादंबरीच्या प्रकृतीशी विसंवादी आहे. त्यामुळे व्यक्तिरेखा, तत्त्वचर्चा आणि जीवनवास्तवाचे चित्रण यात विसंवादाचे ताण निर्माण होतात.

नरहर कुरुंदकर यांनी वामन मल्हार यांच्या कादंबरीविषयी मौलिक विवेचन केले आहे. वामन मल्हार यांनी जीवनाच्या अवलोकन आकलनात हरिभाऊंच्या पुढे दोन पावले प्रवास केला आणि हरिभाऊंच्या वास्तववादाचा विकास त्यांच्या कादंबरीत होतो. ही जमेची बाजू नमूद करूनही नरहर कुरुंदकर यांना फार मोठा विस्तीर्ण प्रदेश त्यांच्या आकलन अवलोकनाच्या बाहेरच राहिला आहे हे मान्य करावे लागले आहे.

## ३.३ ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणारी कादंबरी

अव्वल इंग्रजी काळ हा प्रामुख्याने भाषांतरयुग म्हणून ओळखला जातो. या काळात अनेक इंग्रजी ग्रंथांची आणि कादंबरी आदी साहित्य प्रकारांची भाषांतरे झाली. या काळात कादंबरी या सदराखाली अनेक कल्पित कथा लिहिल्या गेल्या. त्यांचा निर्देश आपण यापूर्वी केलेला आहेच. याच काळात महात्मा फुले यांनी मराठी वाचकांचे लक्ष ग्रामजीवनाकडे वळवणारे लेखन केले. त्यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यादृष्टीने १८८८ मध्ये लिहिली गेलेली. 'बळीबा पाटील' ही कादंबरी लक्षणीय ठरते. मुळात 'दीनमित्र' मध्ये एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ मध्ये प्रकाशित झालेली ही कादंबरी अलीकडेच उजेडात आली असून सीताराम रायकर यांनी संपादित केलेल्या 'कृष्णराव भालेकरः समग्र वाङ्मय' या ग्रंथात समाविष्ट झालेली आहे. मुळात ही कादंबरी १८७७ मध्येच लिहिली गेलेली आहे असे रायकर यांनी म्हटले आहे. या कादंबरीचे लेखक कृष्णराव भालेकर हे महात्मा फुले यांच्या विचारांनी प्रभावित झालेले विचारवंत लेखक आहेत. मुळात या कादंबरीचे शीर्षक 'बळीबा पाटील आणि १८७४ चा दुष्काळ' असे असून तिची निर्मिती खेड्यापाड्यातल्या लोकांसाठी झालेली आहे अशी ग्वाही स्वतः लेखक भालेकर यांनी दिली आहे. या कादंबरीची दखल मराठी समीक्षकांनी फारशी घेतलेली नाही. त्यामुळेच त्यानंतर अनेक वर्षांनी लिहिली गेलेली रा. वि. टिकेकर ऊर्फ धनुर्धारी

यांची ‘पिराजी पाटील’ (१९०३) ही कादंबरी पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून उल्लेखिली जाते असे दिसून येते.

‘बळीबा पाटील’ ही कादंबरी एकूण चार भागात विभागलेली असून पहिल्या भागात खेड्यातील जीवनाचे वर्णन आणि बळीबा पाटलाच्या पाटीलकीचा इतिहास आलेला आहे. दुसऱ्या भागात लेखकाने बळीबाचा व त्याच्या कुटुंबाचा परिचय करून दिलेला आहे. तिसऱ्या भागात बळीबाच्या भाईबंदांच्या सभेचे वर्णन आलेले आहे. बळीबा आपल्या शेतकरी बांधवांना उपदेशपर विवेचन करतो. हे विवेचन महात्मा फुलेप्रणित सार्वजनिक सत्यधर्मानुसार आहे. ही कादंबरी छोटेखानी असली तरी त्या काळातील एकूणच बहुजनांची दुरावस्था प्रकट करते. स्वतः रायकर यांनी म्हटल्याप्रमाणे ‘बळीबा पाटील’ ही एक रूपककथा आहे.

धनुर्धारी ऊर्फ रा. वि. टिकेकर यांनी लिहिलेली ‘पिराजी पाटील’ ही महत्त्वाची ग्रामीण कादंबरी म्हणता येईल. ही कादंबरी १९०३ मध्ये प्रकाशित झाली. दुष्काळामुळे भणंग झालेली पिराजी पाटील आपल्या कुटुंबाची आणि इतर शेतकऱ्यांची कशी वाताहत झाली आहे याची कहाणी सांगतो. तीच कहाणी लेखक आपल्या शब्दात या कादंबरीत कथन करतो. तत्कालीन ग्रामव्यवस्था, गावकामगारांचे एकमेकांशी असलेले संबंध, शहरी पांढरपेशा लोकांची शेतकरीवर्गाकडे पाहण्याची संकुचित वृत्ती तसेच सरकारी अधिकाऱ्यांची लाचखोरी इत्यादी अनेक बाबी या कादंबरीत लेखकाने मांडल्या आहेत. एकूण तेरा प्रकरणात विभागलेली ही कादंबरी ग्रामजीवनाशी निगडित अनेक प्रश्नांना हात घालताना दिसते.

### ❖ स्त्रियांचे कादंबरीलेखन

स्त्रियांचे कादंबरीलेखन हा या कालखंडातील अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. मुळात या काळात स्त्रीशिक्षणाबाबत समाजात बरीच उदासीनता होती. तथापि महात्मा फुले आणि अन्य काही समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षणासाठी चळवळी केल्यामुळे काही प्रमाणात स्त्रीशिक्षणाला चालना मिळाली. त्यामुळेच काही लेखिका उदयाला आलेल्या दिसतात. साळूबाई तांबवेकर यांचा निर्देश यापूर्वी आलेला आहेच. त्यांनी लिहिलेल्या ‘चंद्रप्रभाविरहवर्णन’ या कादंबरीचा निर्देश आपण यापूर्वी केलेला आहेच. त्यांनी ‘हिंदुस्थानातील तारा’ ही आणखी एक कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीच्या नायिकेची जहाजातून प्रवास करत असताना पतीशी ताटातूट होते. त्यानंतर शिक्षणच तिला जगण्याचा मार्ग दाखवते. पुढे तिची अजून एका स्त्रीशी भेट होते. दोघी मिळून लोकशिक्षणाचे व्रत घेतात. अशाप्रकारे साळूबाई यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारी कादंबरी लिहिली आहे.

### ❖ गोदावरीबाई पंडित

‘प्रीतीचा मोबदला अथवा पुष्पगुच्छ आणि वनमाला’ ही गोदावरीबाई पंडित यांची कादंबरी १८९० मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीत त्यांनी एका सरदारपुत्राची प्रेमकथा आणि शौर्यकथा वर्णन केलेली आहे. बंडखोर म्हणून घोषित करण्यात आलेल्या मया  सरदारपुत्राला वनमाला नावाची एक तरुणी फाशीच्या शिक्षेपासून वाचवते आणि त्याच्यावर प्रेम करू लागते. त्याच्यासाठी ती राजपुत्रालाही नकार देते आणि त्याला सांगते की प्रेमाचा मोबदला प्रेम हाच आहे. प्रेमावाचून प्रेम मिळत नाही. तेव्हा स्वतः राजपुत्र वनमाला आणि पुष्पगुच्छ यांचा विवाह घडवून आणतो. याविषयी स्वतः लेखिका म्हणते की, हा सर्व परिणाम स्त्रीशिक्षणाचा आहे. म्हणून

आर्यदेशबांधव हो, तुम्हास जर संसारात सुखाची इच्छा धरायची असेल तर स्त्रियांस सुशिक्षण देऊन त्यास ज्ञान प्राप्ती करून देण्याविषयी आळस करू नका.

### ❖ इंदिराबाई हरीपूरकर

१९११ मध्ये इंदिराबाई हरीपूरकर यांनी 'दैवलीला' ही कादंबरी लिहिली असून ती बरीचशी आत्मचरित्रात्मक स्वरूपाची आहे. कारण या कादंबरीतील घटनांना लेखिकेच्या जीवनात घडलेल्या काही गोष्टींचा आधार आहे. उदाहरणार्थ, लेखिका पुत्र किंवा कन्या या दोघांकडे सारख्याच दृष्टीने पाहते. मुलींच्याही जन्माचा आनंद मानते. श्राद्धकर्मावर खर्च करण्याऐवजी ती रक्कम शाळेला दान करते. एवढे प्रागतिक विचार मांडूनही शेवटी भवितव्याचे तडाखे, काल-लहरींचे गोते आणि मृत्यूची अटळता आम्ही निमूटपणे सोसली पाहिजे असा संदेश देऊन 'दैवलीला' ही कादंबरी संपते.

### ❖ जानकीबाई देसाई

जानकीबाई देसाई या देखील या काळातील लोकप्रिय लेखिका आहेत. 'गृहलक्ष्मी', 'ताजमहाल', 'प्रेमळ सवत', 'सौभाग्यतिलक', 'पातिव्रत्याची कसोटी', 'चारूगात्री अथवा आंग्लसत्तेचा उदयकाल' अशा काही कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. आपले कादंबरीलेखन करताना त्यांनी बंगाली कादंबऱ्यांचा आदर्श समोर ठेवलेला आहे. बोधवादी दृष्टिकोन त्यांच्या कादंबरीत सर्वत्र दिसून येतो. उदाहरणार्थ 'प्रेमळ सवत' या कादंबरीत लेखिकेने दोन सवती आनंदाने एकत्र राहतात असे दाखवले आहे. त्यासाठी त्यांनी अशी काही बिनतोड परिस्थिती निर्माण केली की या दोन्ही स्त्रिया एकत्र येणे किती अपरिहार्य आहे हे वाचकाला सहज पटावे. या कादंबरीचा नायक मनोहर वडिलांच्या इच्छेमुळे विमलाशी विवाह करतो. नंतर कालांतराने शिक्षणासाठी तो शहरात येतो. तेथे शिकत असताना लीला या तरुणीच्या प्रेमात पडतो. आपले लग्न झाले आहे याचा सुगावाही तो तिला लागू देत नाही. योगायोग असा की लीलाच्या आईचा अंतकाळ जवळ येतो तेव्हा मरणशय्येवर असताना ती लीलाला मनोहरच्या स्वाधीन करते. शेवटी मनोहर नाइलाजाने तिच्याशी लग्न करतो. त्यानंतर लीला आणि विमला या दोन्ही सवती आनंदाने मनोहरचा संसार करतात. येथे विवाहित पुरुषाचा पहिली पत्नी हयात असताना दुसऱ्या स्त्रीशी विवाह करण्याचा अधिकार बिनतक्रार स्वीकारला जातो. स्त्रीला मात्र त्याविरुद्ध काहीही तक्रार न करता सवतीचा स्वीकार करावा लागतो. यावरून या काळातील काही स्त्रियांची मनोवृत्ती पारंपरिक विचारांवरच पोसली गेलेली होती हे दिसून येते.

जानकीबाई देसाई यांच्याच 'सौभाग्यतिलक' या कादंबरीतील यमूचा नवरा अचानक नाहीसा होतो. तो भेटावा म्हणून यमू सौभाग्यतिलक हे व्रत करते. पुढे नवऱ्याची भेट झाल्यावर ती या व्रताची सांगता करते आणि कादंबरी संपते. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचे संस्कार स्त्रियांची मनावर कसे पक्के टिकून होते हेच यावरून दिसून येते.

'गृहलक्ष्मी' या कादंबरीत त्यांनी हुंडा पद्धतीची अनिष्टता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'मूकनायिका' या कादंबरीत त्यांनी एका मुक्या आणि बहिऱ्या मुलीची कथा सांगितली आहे. मुकी-बहिरी आणि रूपाने सामान्य अशा भागीरथीचे लग्न ठरत नाही. तिच्याहून लहान असलेली बहीण मात्र सुंदर असते. तिचे लग्न ठरते तेव्हा गावातले लोक मोठ्या मुलीच्या आधी धाकटीचे लग्न ठरले म्हणून त्या कुटुंबाला वाळीत टाकतात. तेव्हा भागीरथीचे वडील लग्नाच्या वेळी भागीरथीला बुरखा घालून बोहल्यावर उभे करतात आणि अशा रीतीने भागीरथी आणि विद्याधर

munotes.in

यांचे लग्न होते. यातून मुलीचा संसार पुढे कसाही होवो किंवा तिला परित्यक्ता म्हणून जगण्याची वेळ येवो, तिला निदान कुंकवाचा धनी मिळाला पाहिजे यासाठी धडपडणारा बाप दिसून येतो. हेसुद्धा तत्कालीन समाजस्थितीचे वास्तव चित्र आहे असे म्हणायला हवे.

स्त्रियांच्या कादंबरीलेखनाचे स्वरूप पाहिले तर स्पष्टपणे दिसून येते की त्यांना पुरुषांचे प्रोत्साहन लाभले आहे. या काळातील स्त्रीसुद्धा पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचा एक घटक असल्याने तिच्यावर पुरुषप्रधान मनोवृत्तीचा पगडा असणार हे उघडच आहे. म्हणूनच शिकल्या तरी देवधर्म, रूढीपरंपरा न सोडणाऱ्या स्त्रिया या कादंबऱ्यांमधून भेटतात. शिक्षणामुळे स्त्रिया स्वतंत्र होतील पुरुषांचे ऐकेनाशा होतील या प्रवादाला उत्तर देण्यासाठीच स्त्रियांच्या कादंबरीत या स्वरूपाच्या स्त्री व्यक्तिरेखा रगंविल्या गेल्या आहेत.

### ❖ काशीबाई कानिटकर

काशीबाई कानिटकर ह्या या कालखंडातील महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांच्या कादंबऱ्या इतर लेखिकांच्या तुलनेत निराळ्या ठरतात. 'रंगराव' या कादंबरीत त्या म्हणतात, शिकलेली याचा अर्थ नुसते लिहायला, वाचायला येणे एवढेच नाही तर विचारातही त्याबरोबर सुधारणा झाली पाहिजे व त्याप्रमाणे वर्तनात बदल झाला पाहिजे तरच त्याचा उपयोग. म्हणजेच शिक्षणाबरोबर विचारात सुधारणा झाली पाहिजे हा विचार मांडून काशीबाई कानिटकर यांनी त्या दृष्टीने आपले कादंबरीलेखन केले आहे. काशीबाई हरिभाऊ आपटे आणि काशीबाईंचे पती गोविंदराव कानिटकर यांच्या प्रोत्साहनामुळेच शिकल्या व 'रंगराव' ही कादंबरी हरिभाऊंच्या प्रोत्साहनामुळे लिहिली गेली हे खरे, परंतु काशीबाईंची स्वतंत्र विचार करण्याची झेप लक्षणीय आहे. शिक्षणातून स्वतंत्रपणे विचार करण्याचा आत्मविश्वास काशीबाईंसारख्या फारच थोड्या लेखिकांनी या काळात मिळवलेला दिसतो. स्वतः काशीबाईंना शिक्षण घेताना व शिक्षण घेतल्यानंतरही खूपच मानसिक त्रास सहन करावा लागला आहे. त्यामुळे सासुरवाशिणी, परित्यक्ता, फसलेल्या विधवा या स्त्रियांच्या सोबतच शिक्षण घेतल्यामुळे समाजात व कुटुंबात टीकाविषय झालेल्या स्त्रियांचे दुःख काशीबाईंनी या कादंबरीत मांडले आहे. समाजातील रूढी परंपरांचा विचार करणारी त्यांची 'रंगराव' ही पहिली कादंबरी १९०३ मध्ये प्रसिद्ध झाली. या काळातील तरुण स्वतःच्या लग्नाविषयी स्वतंत्रपणे विचार करू लागले होते. बदललेल्या या सामाजिक परिस्थितीचे भान काशीबाईंनी व्यक्त केले आहे. कादंबरीचा नायक रंगराव नोकरीसाठी परदेशात जातो. लग्नाच्या वेळी तो आणि त्याचा भाऊ आपल्या वधूंची निवड स्वतःच्या मताप्रमाणे करतात. या काळाच्या संदर्भात काशीबाईंनी केलेले हे चित्रण निश्चितच त्यांच्या स्वतंत्र विचारांची जाणीव करून देणारे ठरते.

'पालखीचा गोंडा' ही त्यांची दुसरी कादंबरी १९२८ मध्ये प्रसिद्ध झाली असली तरी तिचाही विचार येथेच करणे सोयीचे ठरेल. ही कादंबरी म्हणजे कोणा एका ताईंनी लिहून ठेवलेले चरित्र असून ते आपल्याला योगायोगाने मिळाले आहे असा आभास काशीबाईंनी निर्माण केला आहे. वास्तवाभास निर्माण करण्याची ही तत्कालीन लेखकांची नेहमीची पद्धत आहे. हरिभाऊंनी ज्याप्रमाणे 'पण लक्ष्यात कोण घेतो?' ही कादंबरी लिहिताना हे कोणा यमुना नावाच्या बालविधवेचे आत्मचरित्र आहे असा आभास निर्माण केला आहे. तसाच आभास काशीबाईंनी निर्माण केला आहे. कादंबरीची निवेदिका प्रवास करीत असताना तिला पालखीचा गोंडा या संस्थानचे नाव ऐकायला मिळते. हे नाव ऐकून तिला उत्सुकता वाटते व त्यापोटी ती त्या गावाला

जाऊन पोहोचते. तेथे गेल्यावर तिला त्या संस्थानाच्या राणीची माहिती मिळते. तिथल्याच एका शाळेत तिला राणीचे चरित्र मिळते हे चरित्र म्हणजेच 'पालखीचा गोंडा' ही कादंबरी होय.

लेखिकेने या कादंबरीत स्वप्नांचा आधार घेतलेला आहे. या कादंबरीतील नानाला त्याचे आजोबा स्वप्नात येऊन त्याच्या बहिणीच्या जबाबदारीची जाणीव करुन देताना म्हणतात की, आता तिला शिक्षण देऊन योग्य करण्याच काम तुझं आहे. जबाबदारी कळण्यासाठी ज्ञानाशिवाय मार्ग नाही. तेव्हा तूच ते काम केलं पाहिजे. तू अभ्यास करून आपली विश्वविद्यालयाची शेवटची परीक्षा पास झालास म्हणजे तेच काम कर. पालखीचा गोंडा या संस्थानात ताई स्त्री-पुरुष समता प्रस्थापित करते. यात तिला सासुबाईंचे मार्गदर्शन व पूर्ण सहकार्य मिळते. स्त्रियांना स्वातंत्र्य, शिक्षण, मालमत्तेत समान हक्क व नोकऱ्या दिल्या जातात. त्यामुळे पुरुषांच्या अरेरावी वर्तनाला आळा बसतो. सर्वत्र सुखसमृद्धी नांदू लागते. कारखानदारी वाढून पालखीचा गोंडा हे संस्थान आर्थिकदृष्ट्या संपन्न बनते.

संस्थानाची भौतिक प्रगती केल्यानंतर ताईंच्या मनाला मनःशांतीची ओढ लागते. पुन्हा एकदा आजोबा नानाच्या स्वप्नात येऊन तुझी कामगिरी झाली म्हणून सांगतात. त्याच वेळी ताई व मनू (कादंबरीची निवेदिका) यांनाही तशीच स्वप्ने पडलेली असतात. त्यानंतर आपली कामगिरी पार पाडल्याच्या आनंदात संस्थानाचा सर्व कारभार सल्लागार मंडळावर सोपवून चौघेजण आत्मानंदासाठी पृथ्वीप्रदक्षिणेला निघून जातात. निघण्यापूर्वी ताई सोन्याची पालखी सिंहासनावर ठेवते. अशीही पालखीचा गोंडा या संस्थानची कथा आहे. इतर समकालीन कादंबरीलेखिकांच्या तुलनेत काशीबाई कानिटकर यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्वतंत्र विचारांची चमक दिसून येते. परंतु पारंपरिक विचारसरणीचा पगडा त्याही टाळू शकल्या नाहीत. कारण पालखीचा गोंडा या संस्थानात एकीकडे स्त्री-पुरुष समता नांदत असताना त्याच वेळी वेदाभ्यासाचे वर्गही सुरू असतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) ग्रामीण जीवनाचे वास्तवचित्रण करणारी बळीबा पाटील या कादंबरीचा आढावा घ्या.

---

## ३.४ समारोप

या संपूर्ण काळाचा विचार करता बदलत्या समाजवास्तवाचे एक फार मोठे आव्हान मराठी माणसासमोर उभे आहे असे दिसून येते. या काळातील समाज संक्रमणावस्थेतून मार्गक्रमण करत होता. मराठी कादंबरीच्या दृष्टीनेही हा काळ संक्रमणावस्थेचा किंवा स्थित्यंतराचा आहे. रचनादृष्ट्या कथेकडून कादंबरीकडे आणि आशयदृष्ट्या अद्भुताकडून वास्तवतेकडे वाटचाल करू पाहणाऱ्या या काळातील कादंबरीवाङ्मयाच्या प्रवाहात बरेच चढ-उतार नजरेस पडतात ते यामुळेच. या कालखंडातील बहुतेक लेखक कमी-अधिक प्रमाणात हरीभाऊंचे अनुकरण

करताना दिसतात; परंतु गुणवत्तेच्या दृष्टीने त्यांच्या आसपास जाणारी कादंबरी एकाही लेखकाला घडवता आली नाही. हरिभाऊंची कादंबरीही गुणवत्तेच्या दृष्टीने फार श्रेष्ठ दर्जाची आहे असे मुळीच नाही. नरहर कुरुंदकरांनी म्हटल्याप्रमाणे इतरांच्या तुलनेत हरिभाऊंचे असलेले मध्यमपण हीच त्यांची उंची ठरली. तथापि आधीच्या व समकालीन इतर लेखकांच्या तुलनेत कादंबरीच्या सामाजिक प्रकृतीचे भान बाळगणारा व आपल्या कादंबरीत ते दाखवून देणारा एकूणच चांगला कादंबरीकार म्हणून हरिभाऊंचा उल्लेख करावा लागेल हेही निर्विवाद. कादंबरी म्हणजे कल्पित गोष्ट, रंजनाचे केवळ एक साधन हा दृष्टिकोन रद्दबातल ठरवून हरिभाऊंनी आपल्या सामाजिक कादंबरीचे लेखन केले. कादंबरी म्हणजे समाजचित्र ही जाणीव त्यांच्याच कादंबरीत प्रथम दिसून आली. कादंबरी ही समकालीन सामाजिक जीवनाचा दस्तऐवज असतो ही जाणीव वि. कों. ओक, काशीबाई कानिटकर आणि हरिभाऊ यांच्या कादंबरीत दिसून येते. ना. ह. आपटे, नाथमाधव असे काही कादंबरीलेखक आशय आणि विषयदृष्ट्या हरिभाऊंच्या जवळ आहेत. परंतु त्यांच्या कादंबरीची रचना पाहता त्यांनी 'मुक्तामाला' परंपरेचा वारसा चालवला असून फडके-खांडेकर यांच्या कादंबरीसाठी अनुकूल पार्श्वभूमी निर्माण करून ठेवली आहे असे म्हणावे लागते. या काळात १८७९ मध्ये प्रकाशित झालेली म. वि. रहाळकर यांची 'नारायणराव आणि गोदावरी' ही कादंबरी सामाजिक कादंबरी म्हणून उल्लेखिली जाते. तथापि तिला सामाजिक कादंबरी म्हणते येईल का असा प्रश्न पडतो. कारण ती कादंबरी शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' या नाटकाचे केवळ कादंबरीरूपांतर आहे असे दिसून येते.

वि. का. राजवाडे यांनी आपल्या 'मराठी कादंबरी' या निबंधात या काळातील कादंबरीविषयी अत्यंत महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. राजवाडे लिहितात, "अलीकडील बऱ्याच अद्भुत कादंबऱ्या व वास्तविक कथानके पूर्वीच्या अद्भुत व वास्तविक गोष्टींप्रमाणेच परभाषेतील ग्रंथांची रूपांतरे, भाषांतरे किंवा सूचनांतरे आहेत. ही सर्व ग्रंथोत्पत्ती आमच्या अस्सल प्रतिभेची अस्सल पूजा नव्हे." राजवाडे यांचा अभिप्राय अत्यंत परखड आहे यात शंकाच नाही. तथापि, हरिभाऊंचा मात्र त्यांनी गौरवाने उल्लेख केला आहे. समाजात उत्कृष्ट विचारांचा प्रसार करण्यास कादंबरी सारखे दुसरे सोपे साधन नाही असे त्यांचे स्पष्ट मत आहे. ते कार्य हरिभाऊ यांच्या कादंबरीने साध्य केले आहे असा त्यांचा अभिप्राय आहे.

थोडक्यात, सदर कालखंडातील ह. ना. आपटे, बा. सं. गडकरी, सहकारी कृष्ण, वा. गो. आपटे, नाथतमाधव, प्र. श्री. भसे, मित्र, कृष्णराव भालेकर, वा. म. जोशी, ना. ह. आपटे, काशीबाई कानिटकर, गोदावरीबाई पंडित, रा. वि. टिकेकर इत्यादी अनेक लेखक आणि लेखिकांच्या कादंबऱ्याचा आढावा आपण घेतला. सामाजिक कादंबरीच्या नावाखाली शेक्सपिअरच्या नाटकांची कादंबरीरूप रूपांतरे सुरू असताना आणि एकूणच मराठी कादंबरीत इंग्रजी कादंबरीची सामान्य अनुकरणे सुरू असताना इंग्रजी ललित आणि वैचारिक साहित्यातून आलेल्या आधुनिक जाणिवा पचवून परंतु त्याच वेळी इंग्रजी कादंबरीच्या प्रभावातून बाहेर पडून हरिभाऊंनी आपली सामाजिक कादंबरी घडविली. त्यांच्या कादंबऱ्यांची आशयसूत्रे लक्षात घेतली तरी त्यांना आपल्या समाजस्थितीचे किती उत्तम भान होते हे दिसून येते. सुधारणावादाचा चुकीचा अर्थ घेऊन इंग्रजांच्या अंधानुकरणाकडे निघालेल्या नवशिक्षित पिढीची प्रवाहपतित मानसिकता, सुधारणावादाचा काळ असूनही स्त्रियांची होत असलेली कुचंबणा असे एतद्देशीय संदर्भ हाताळून त्यांनी मराठी कादंबरीला मराठी मातीत उभे केले. त्यांच्या अनुभवविश्वाला मध्यमवर्गीय मर्यादा आहेत हे खरे, परंतु त्याहून व्यक्त झालेली जीवनजाणीव अत्यंत सखोल आणि कलात्म आहे. त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीकडेही समकालीन काळात उदयास आलेल्या

सांस्कृतिक राष्ट्रवादाचा वाङ्मयीन आविष्कार म्हणून पाहता येईल. ही परंपरा पुढे अनेक लेखकांनी समृद्ध केली, परंतु मूळ हेतू सफल होण्याऐवजी त्यातून रंजनवादच प्रबळ होत गेला. आणि त्याचा अनिष्ट परिणाम होऊन पुढील काळात वास्तवनिष्ठ सामाजिक कादंबरीचा प्रवाह क्षीण होत गेला.

### ❖ १८७४ ते १९२० या कालखंडातील निवडक मराठी कादंबऱ्यांची सूची

| प्रकाशित साल | कादंबरीचे नाव | कादंबरीकार / लेखक |
|---|---|---|
| १८७४ | शृंगारमंजिरी | ग. वि. कानिटकर |
| १८७४ | प्रेमबंधन | नारायण दामोदर योगी |
| १८७६ | वसंतकोकिला | नारो सदाशिव रिसबूड |
| १८७८ | रत्नप्रभा | लक्ष्मणशास्त्री हळबे |
| १८७९ | नारायणराव आणि गोदावरी | म. वि. रहाळकर |
| १८७९ | मित्रचंद्र | पां. गो. पारखी |
| १८८१ | शृंगारशेखर | बा. ना. राव |
| १८८१ | शिरस्तेदार | विनायक कोंडदेव ओक |
| १८८३ | शिक्षक | द्वा. ना. रणदिवे |
| १८८४ | शिलादित्य | शंकर मोरा रानडे |
| १८८५ | मधली स्थिती | ह. ना. आपटे |
| १८८५ | मंजुळा | ग. ना. गांगण |
| १८८५ | राजपुत्र राजहंस | अ. के. दप्तरदार |
| १८८८ | बळीबा पाटील | कृष्णराव भालेकर |
| १८९३ | पण लक्ष्यात कोण घेतो ! | ह. ना. आपटे |
| १८९५ | यशवंतराव खरे | ह. ना. आपटे |
| १८९५ | मी | ह. ना. आपटे |
| १८९५ | लालन बैरागीण | दि. गो. वझे |
| १८९७ | पानिपतची मोहीम | ना. वि. बापट |
| १८९८ | वाईकर भटजी | धनुर्धारी (रा. वि. टिकेकर) |
| १८९९ | जग हे असे आहे | ह. ना. आपटे |
| १८९९ | केवळ स्वराज्यासाठी | ह. ना. आपटे |
| १८९९ | चितुरगडचा वेढा | ना. वि. बापट |
| १९०२ | रूपनगरची राजकन्या | ह. ना. आपटे |
| १९०३ | गड आला पण सिंह गेला | ह. ना. आपटे |
| १९०३ | रंगराव | काशीबाई कानिटकर |
| १९०३ | पिराजी पाटील | धनुर्धारी (रा. वि. टिकेकर) |
| १९०६ | सुधारणेचा मध्यकाल | बा. सं. गडकरी |
| १९०६ | दुर्दैवी प्रेमयोग | बा. सं. गडकरी |
| १९०६ | आजच | ह. ना. आपटे |
| १९०८ | सूर्योदय | ह. ना. आपटे |

munotes.in

| | | |
|---|---|---|
| १९०८ | परवाची गोष्ट अथवा जग हे असेच | नाथमाधव |
| १९०८ | प्रेमवेडा | नाथमाधव |
| १९०९ | कालिकामूर्ती (ब्राँझ स्टॅच्यू) | गो. ना. दातार |
| १९०९ | जीवनसंध्या (रमेशचंद्र दत्त) | वि. सी. गुर्जर |
| १९०९ | अजिंक्यतारा | ना. ह. आपटे |
| १९१० | समाजकंटक अथवा वेणू | प्र. श्री. भसे |
| १९१० | मद्यपाननिषेधक श्रीनिवासराव | नाथमाधव |
| १९१० | प्रेमसंयोग (नन्रिहाल बंडोपाध्याय) | वि. सी. गुर्जर |
| १९११ | संसार की संन्यास | भा. वि. वरेरकर |
| १९११ | दैवलीला | इंदिरा हरिपूरकर |
| १९१२ | विलासमंदिर (कॅननबरी हाऊस) | गो. ना. दातार |
| १९१२ | वसईचा वेढा | अनसूयाबाई देशपांडे |
| १९१३ | वीरधवल (केनेथ : रेनोल्ड्स) | नाथमाधव |
| १९१३ | ही प्रेमाची मूस की पुरुषार्थाची कूस | सहकारी कृष्ण |
| १९१३ | माझी कहाणी | सहकारी कृष्ण |
| १९१३ | हा संसार की नरकवास ? | सहकारी कृष्ण |
| १९१३ | जग हे त्रिविध आहे | सी. के. दामले |
| १९१३ | अर्वाचीन रामराज्य | ना. ह. आपटे |
| १९१३ | इंद्रभुवन गुहा | गो. ना. दातार |
| १९१३ | कपटजाल | ना. ह. आपटे |
| १९१३ | लांछीत चंद्रमा | ना. ह. आपटे |
| १९१४ | शिकली पण चीज केले | सहकारी कृष्ण |
| १९१४ | विद्वान सोबती की कुशल गृहिणी | बा. सं. गडकरी |
| १९१४ | सावळ्या तांडेल | नाथमाधव |
| १९१४ | भीषण कृत्य हुंडा | रा. वा. दाते |
| १९१४ | दुर्दैवी रंगू | चिं. वि. वैद्य |
| १९१४ | भुरळ | ना. ह. आपटे |
| १९१४ | कल्पनाचित्र अथवा अर्वाचीन रामराज्य | ना. ह. आपटे |
| १९१४ | संसार असार (प्रभातकुमार मुखर्जी) | वि. सी. गुर्जर |
| १९१४ | मानापमान | सहकारी कृष्ण |
| १९१४ | अपमानाचा मान | सहकारी कृष्ण |
| १९१५ | राजकुंवर | सहकारी कृष्ण |
| १९१५ | वज्राघात | ह. ना. आपटे |
| १९१५ | स्वर्गीयप्रेम (ट्रेझर ऑफ हेवन : मेरी कॉरेली) | कृ. के. गोखले |
| १९१५ | रागिणी | वा. म. जोशी |
| १९१५ | गृहलक्ष्मी | जानकीबाई देसाई |
| १९१५ | रजनी (बंकिमचंद्र चॅटर्जी) | प्र. श्री. भसे |
| १९१५ | प्रेममंदिर | प्र. श्री. भसे |

| | | |
|---|---|---|
| १९१५ | अपराध कोणाचा ? | मा. दा. आळतेकर |
| १९१५ | रॉयक्लब अथवा सोनेरी टोळी | नाथमाधव |
| १९१५ | दैवाचा खेळ | नाथमाधव |
| १९१५ | संकट की सौभाग्य ? | सहकारी कृष्ण |
| १९१५ | विहंगवृंद | नाथमाधव |
| १९१५ | ग्रहदशेचा फेरा | नाथमाधव |
| १९१६ | आश्रमहरिणी | वा. म. जोशी |
| १९१६ | शापित महाराष्ट्र | सहकारी कृष्ण |
| १९१६ | ताजमहाल | जानकीबाई देसाई |
| १९१६ | रहस्यभेद (रॉय हाऊस प्लॉट) | गो. ना. दातार |
| १९१६ | पुरी हौस फिटली | गिरिजाबाई केळकर |
| १९१६ | शशांक (राखालदास बॅनर्जी) | वि. सी. गुर्जर |
| १९१६ | पंजाबचा लढवय्या शीख | ना. ह. आपटे |
| १९१६ | समर्थशिष्य | ना. ह. आपटे |
| १९१७ | अल्ला हो अकबर | ना. सी. फडके |
| १९१७ | झाकली मूठ | वि. वा. हडप |
| १९१७ | सैतानी चक्कर | भि. गो. भिडे |
| १९१७ | गोदावरी | इंदिराबाई सहस्त्रबुद्धे |
| १९१७ | विमलेची ग्रहदशा | नाथमाधव |
| १९१७ | प्रियंवदा | का. र. मित्र |
| १९१७ | प्रेमळ सवत | जानकीबाई देसाई |
| १९१७ | सुहासिनी | नाथमाधव |
| १९१७ | कर्मफल | प्र. श्री. भसे |
| १९१८ | दुःखाअंती सुख | वा. गो. आपटे |
| १९१८ | हतभागिनी (अभागीः बाबू जलधर सेन) | वि. सी. गुर्जर |
| १९१८ | मूर्खाचा शहाणा | बा. सं. गडकरी |
| १९१८ | डॉक्टर (भाग १) | नाथमाधव |
| १९१८ | सौभाग्यतिलक | जानकीबाई देसाई |
| १९१९ | डॉक्टर (भाग २) | नाथमाधव |
| १९१९ | राजपुत्रांचा भीष्म | ना. ह. आपटे |
| १९१९ | पातिव्रत्याची कसोटी | जानकीबाई देसाई |
| १९२० | डॉक्टर (भाग ३) | नाथमाधव |
| १९२० | नलिनी | वा. म. जोशी |
| १९२० | पौर्णिमेचा चंद्र (रत्नदीपः प्रभातकुमार मुखर्जी) | वि. सी. गुर्जर |
| १९२० | लाख्या बारगीर | चिं. वा. मुजुमदार |
| १९२० | चारुगात्री अथवा आंग्लसत्तेचा उदयकाल | जानकीबाई देसाई |
| १९२० | दिव्यलावण्य | वि. वा. हडप |

munotes.in

| | | |
|---|---|---|
| १९२० | मूर्तिमंत गुलामगिरी (अंकल टॉम्स केबिन) | कृ. के. गोखले |
| १९२० | प्रणयपंक | प्र. श्री. भसे |

## ३.५ संदर्भग्रंथ


१) कुरुंदकर, नरहर, 'धार आणि काठ', देशमुख आणि कंपनी पुणे, आवृत्ती चौथी १९९८.

२) संत, दु. का., 'मराठी स्त्री', पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी २००३.


## ३.६ नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न -**

१) ह. ना. आपटे यांच्या कादंबरीचे स्वरूप विशद करा.

२) नाथमाधव यांच्या कादंबरीची वैशिष्ट्ये सांगा.

३) सदर कालखंडातील स्त्रियांच्या कादंबऱ्यांचा आढावा घ्या.

४) सदर कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे स्वरूप सांगा.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) १८४१ मधील कोणाच्या कादंबरीचा अनुवाद 'यात्रिकक्रमण' असा केला गेला?

२) कोणत्या कादंबरीकाराला 'विदर्भाचे हरिभाऊ' असे नामाभिदान मिळाले?

३) 'सुशिक्षित स्त्रीने अशिक्षित पुरुषाशी लग्न करावे की करु नये?' या प्रश्नाला उत्तर देणारी कोणती कादंबरी नाथमाधवांनी लिहिली?

४) प्र. श्री. भसे यांनी कोणत्या ग्रंथमालेतून कादंबऱ्या लिहिल्या?

**क) टिपा लिहा.**

१) कादंबरीकार नाथमाधव

२) कादंबरीकार ना. ह. आपटे

३) दोन स्त्री कादंबरीकार

४) ग्रामीण चित्रण करणारी कादंबरी

❖❖❖❖

munotes.in

# ३.१

# १९२० ते १९६० या कालखंडातील मराठी कादंबरीचे स्वरूप

**घटक रचना :**

३.१.१ प्रस्तावना
३.१.२ श्री. व्यं. केतकर
३.१.३ ना. सी. फडके
३.१.४ वि. स. खांडेकर
३.१.५ भा. वि. वरेरकर
३.१.६ वि. वा. हडप
३.१.७ ग. त्र्यं. माडखोलकर
३.१.८ पु. य. देशपांडे
३.१.९ रघुवीर सामंत
३.१.१० द. र. कवठेकर
३.१.११ साने गुरुजी
३.१.१२ मुकुंदराव पाटील
३.१.१३ ना. वि. कुलकर्णी
३.१.१४ र. वा. दिघे
३.१.१५ ग. ल. ठोकळ
३.१.१६ बी. रघुनाथ
३.१.१७ श्री. ना. पेंडसे
३.१.१८ विभावरी शिरूरकर
३.१.१९ अन्य लेखिका
३.१.२० गो. नी. दांडेकर
३.१.२१ व्यंकटेश माडगूळकर
३.१.२२ उद्धव शेळके
३.१.२३ मार्क्सवाद आणि मराठी कादंबरी
३.१.२४ काही अन्य कादंबरीकार
३.१.२५ समारोप
३.१.२६ १९२० ते १९६० या कालखंडातील निवडक कादंबऱ्याची सूची

munotes.in

३.१.२७ संदर्भ

३.१.२८ पूरक वाचन

३.१.२९ सरावासाठी प्रश्न

## ३.१.१ प्रस्तावना

ज्या काळात कादंबरीचे वाचन अशिष्ट आणि चोरटेपणाचे निदर्शक मानले जात होते, त्या काळात हरिभाऊंनी कादंबरीलेखन आणि कादंबरीवाचन या गोष्टींना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांचे अनुकरण करत अनेक सुधारणावादी लेखकांनी मराठी कादंबरीचा वाचकवर्ग वाढवला. परंतु त्यांच्यापैकी एकालाही हरिभाऊंच्या पुढची मजल गाठता आली नाही. हरिभाऊंमुळे समाजाभिमुख झालेली मराठी कादंबरी उत्तरोत्तर पुन्हा एकदा समाजविन्मुख होऊन रंजनाचे साधन बनली. त्यामुळे ह. ना. आपटे यांच्या नंतरची 'सामाजिक' या शीर्षकाखाली येणारी मराठी कादंबरी हा सामाजिक कादंबरीचा विकास नसून तो तिच्या इतिहासाचा इतिहास आहे, असे वा. ल. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. कुटुंबचित्रण आणि समाजचित्रणाचा अभाव, वास्तवाकडे पाठ फिरवून प्रणयचित्रणास दिलेले प्राधान्य, काय सांगितले यापेक्षा कसे सांगितले यालाच दिलेले अतिरिक्त माहिती इत्यादी दोषांनी डागाळलेल्या या कादंबरीवाङ्मयात बा. सं. गडकरी, ना. ह. आपटे यांनी केलेली हरिभाऊची अनुकरणे सोडली तर फडके-खांडेकर आदी लेखकांची तथाकथित सामाजिक कादंबरी म्हणजे ना. ह. आपटे यांनी घडवलेल्या मराठी सामाजिक कादंबरीच्या अधोगतीचा इतिहास आहे, असे निरीक्षण वा. ल. कुलकर्णी यांनी नोंदविले आहे.

१९२० नंतरच्या काळात सुरू झालेले पांढरपेशा मध्यमवर्गीय समाजजीवनाचे स्थित्यंतर हरिभाऊंनंतरच्या तथाकथित सामाजिक कादंबरीत आपणास कितपत जाणवले, असे प्रश्न उपस्थित करून पहिल्या महायुद्धानंतर एकत्र कुटुंबपद्धतीला हळूहळू सुरूंग लागला हे खरे असले तरी, त्यानंतरचे समाजजीवन व्यक्ती आणि कुटुंब यांच्या सहजीवनातून आकार घेत आले असताना त्याचे चित्रण मात्र या सामाजिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कादंबरीत आलेले नाही. ही वस्तुस्थिती नोंदवून वा. ल. कुलकर्णी पुढे लिहितात, "ह्या नंतरच्या काळातील अनेक कादंबरीकारांना आपण सामाजिक कादंबऱ्या लिहितो, आपण हरिभाऊंनाच गुरुस्थानी मानतो असे प्रामाणिकपणे वाटलेले असले तरी प्रत्यक्षात त्यांच्या कादंबऱ्याची बैठक बदलली. तिच्यात भोवतालच्या समाजजीवनासंबंधीच्या - मग ते व्यक्ती, कुटुंब किंवा समाज ह्या कोणाचेही जीवन असो - कुतुहलाला, गंभीरपणे केलेल्या चिंतन -निरीक्षणाला, कमी कमी महत्त्व प्राप्त होत गेले व त्याची जागा 'जीवनवाद', 'कलावाद', 'वास्तववाद' व 'ध्येयवाद' असल्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या दृष्टिकोणांशी संबद्ध असे विशिष्ट परिणाम साधू पाहणाऱ्या कृत्रिम चित्रणांनी घेतली जाऊ लागली म्हणून तर हरिभाऊंनंतरच्या मराठी कादंबरीला 'सामाजिक' ह्या नावाने संबोधतांना हरिभाईंनी त्या उपाधीला आपल्या कादंबरीलेखनाने प्राप्त करून दिलेला अर्थ आपण बदलीत नव्हे विटाळीत - आहोत असे सारखे वाटल्यावाचून राहत नाही." १९२० नंतर उदयास आलेल्या गांधीप्रणीत ग्रामवादामुळे ग्रामीण जीवनाकडे लक्ष वेधले गेले आणि त्याचा परिणाम कादंबरीवाङ्मयातील समाजचित्रणावर दिसून येऊ लागला. अनेक कारणांनी स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरीचा चेहरामोहरा बराच बदललेला असला तरी मराठी कादंबरीची नवी

पहाट उजाडायला १९६० पर्यंत वाट पाहावी लागली. एरवी मराठी कादंबरी अजूनही फडके-खांडेकरी रंजनवादाच्या साखरझोपेतच आहे.

## ३.१.२ श्री. व्यं. केतकर

केतकरांची कादंबरी हा सर्वसाधारणपणे हरिभाऊ आणि वामन मल्हार यांच्या कादंबरीचा पुढचा टप्पा आहे असे मानले जाते. हरिभाऊ सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करण्यासाठी लिहीत होते असे म्हटले तर केतकर हे त्या सामाजिक सुधारणांचा महाराष्ट्रीय जीवनावर झालेला इष्टानिष्ट परिणाम तपासण्यासाठी लिहीत होते असे म्हणावे लागेल. सुधारणावादाचे महाराष्ट्रीय समाजजीवनावर झालेले परिणाम केतकरांनी आपल्या कादंबऱ्यातून रंगवले. तसेच अनौरस संतती, भारतीय असूनही विदेशात वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या समस्या असे काही प्रश्न त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून हाताळले. 'गोंडवनातील प्रियंवदा' ही त्यांची पहिली कादंबरी. या कादंबरीच्या माध्यमातून अस्पर्शित राहिलेला नागपूर प्रांताचा परिसर मराठी कादंबरीत प्रथमच आला. 'परागंदा आणि भारतीय समाजाची सरहद्द' ही त्यांची कादंबरी अमेरिकेत गेलेला व तेथे कायम झालेला किंवा कायम होऊ पाहणारा जो सुशिक्षित भारतीयांचा वर्ग आहे, त्याच्या विचारौघाची निदर्शक आहे. 'ब्राह्मण कन्या' या कादंबरीतून प्रचलित समाजव्यवस्थेत अनौरस संततीचे सामाजिक भवितव्य काय हा प्रश्न केतकरांनी हाताळला आहे. समाजात मातृसत्ताक व्यवस्थेला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे, अनौरस संतती विवाहोत्पन्न संततीत सामावली जाणे कठीण आहे, असा विचार त्यांनी 'विचक्षणा' या कादंबरीतही मांडला आहे. 'आशावादी अथवा एका प्रवाहपतिताचे चरित्र' या कादंबरीचा नायक अमेरिकेत जातो. पुढे संन्यासदीक्षा घेऊन आपल्या देशाला सुखसंपन्न बनविण्याचे आशावादी स्वप्न पहात भारतात परततो. परंतु भारतात आल्यावर त्याचा भ्रमनिरास होतो. 'गावसासू' या कादंबरीत इंग्लंडमधील भारतीयांच्या जीवनवास्तवाचे चित्रण केतकर रेखाटतात.

कादंबरीकार म्हणून केतकरांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी मराठी कादंबरीला सदाशिवपेठेबाहेर काढले. अनेक देशांचे, अनेक वर्णांचे, धर्मांचे आणि संस्कृतीचे लोक त्यांच्या कादंबरीत चित्रित झाले आहेत. इतर लेखक तात्त्विक प्रश्नांची चर्चा घडवीत होते किंवा रंजनवादी भूमिका घेऊन प्रेमकथा रंगवीत होते त्या काळात केतकर पांढरपेशा जीवनाची सीमा ओलांडून अनौरस संततीचे, स्थलांतरितांचे, समाजातील जातीय वास्तवाचे आणि वरवरच्या सुधारणांच्या विफलतेचे चित्रण करीत होते.

## ३.१.३ ना. सी. फडके

फडके यांची कादंबरी म्हणजे पाश्चात्त्य साहित्यातून झिरपत आलेल्या व्यक्तिवादी जाणिवांचा टोकाचा आविष्कार म्हणावा लागेल. फडक्यांच्या व्यक्तिवादाने सामाजिक वास्तवापासून  पूर्णपणे छाटलेले कादंबरीचे भुंडे जग निर्माण केले. प्रणयचित्रण, चटकदार निवेदनशैली, आकर्षक कथारचना इ. वैशिष्ट्ये या कादंबरीची होती. या कादंबरीने आपला असा काही दरारा निर्माण केला की, फडक्यांच्या पाठोपाठ लेखन करू लागलेल्या अनेक लेखकांना याच वाटेवरून चालावे लागले. सामाजिक कादंबरीकार म्हणून 'युगप्रवर्तक' ठरलेल्या फडक्यांनी

'अल्ला हो अकबर' ह्या रूपांतरित स्वरूपाच्या व्याजैतिहासिक कादंबरीपासून आपल्या कादंबरीलेखनाचा प्रारंभ केला.

'कुलाब्याची दांडी' ही त्यांची सुरूवातीची कादंबरी. त्यानंतर आलेल्या 'जादूगार' या कादंबरीत त्यांच्या कादंबरीलेखनाचे सर्व विशेष एकवटले आहेत. लेखक आणि वाचक यांचे उभयपक्षी मनोरंजन हेच फडक्यांच्या कादंबरीचे उद्दिष्ट आहे आणि ते उद्दिष्ट नजरेसमोर ठेवूनच त्यांनी या कादंबरीची रचना केली आहे. पार्थिव वैभवापेक्षा मनाची श्रीमंती हीच खरी दौलत आहे हा विचार पटवून देण्यासाठी त्यांनी 'दौलत' ही कादंबरी लिहिली. 'अटकेपार' या कादंबरीत फडक्यांनी सुधीर हा हिंदू तरुण आणि मीनाक्षी ही मुस्लिम तरुणी यांची प्रेमकथा रंगवली. दोगे भिन्नधर्मीय असल्याने त्यांचे मिलन होत नाही. आपल्या प्रेमकथा रंगवितांना पुरूषप्रधान समाजातील रूढ नीतिकल्पनांना जराही धक्का लागणार नाही याची पूर्ण काळजी फडके घेतात. 'निरंजन' या कादंबरीतील नायक पत्नी पासून संसारसुख मिळत नाही म्हणून दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात पडतो. विवाहित पुरुषांच्या प्रेमकथा फडके रंगवितात, परंतु विवाहित स्त्रियांच्या प्रेमकथा ते फारशा रंगवत नाहीत. 'प्रवासी' सारख्या कादंबरीत अशी एखाददुसरी नायिका येते. परंतु तेथेही तिचा पती दुष्ट असतो म्हणून ती परपुरुषाकडे आकर्षिली जाते. ज्या समाजात स्त्री ही सुद्धा एक मानवी अस्तित्व असलेली व्यक्तीआहे, तिलाही राग, लोभ, प्रेम इ. भावना असतात हे मान्य नव्हते, त्या समाजात स्त्रीही प्रेम करू शकते, प्रसंगी आपले प्रेम व्यक्त करू शकते आणि तशीच वेळ आली तर त्याच्या परिपूर्तीसाठी बंडही करू शकते हे फडक्यांनी 'अखेरचे बंड' या कादंबरीतून दाखविले. त्यांच्या 'उद्धार' या कादंबरीत स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय त्या समर्थ होणार नाहीत हा परिचित मुद्दा येतो.

फडक्यांच्या सामाजिक म्हणवणाऱ्या कादंबरीत समाजवास्तव नसते असे राजकीय म्हणवणाऱ्या कादंबरीत राजकारण नसते. 'प्रवासी' ही त्यांची बहुचर्चित राजकीय कादंबरी. स्वातंत्र्यचळवळीत उडी मारणाऱ्या राजाभाऊ सरंजामे या देशभक्ताची ही कथा आहे. परंतु त्याच्या जीवनात समरप्रसंगाऐवजी प्रणयप्रसंगच अधिक येतात. समरभूमी या कादंबरीतही स्वातंत्र्यचळवळीची छाया पडली आहे. परंतु ती प्रेमकथेला उठाव देण्यापुरतीच. 'उन्माद' या कादंबरीचा नायक कामगारांचे पुढारपण करीत आपल्या समाजाचा प्रवास समाजसत्तावादाकडे झाला पाहिजे, असा ध्यास घेतो. परंतु ते सगळे प्रेमकथेपुढे दुय्यम ठरते. राजकीय कादंबरी लिहूनच दाखवतो या जिद्दीने फडक्यांनी 'शाकुंतल' ही कादंबरी लिहिली. देशात सुरू असलेल्या राजकीय चळवळीचा गौरव करणे आणि लोकांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत करणे हा या कादंबरीचा हेतू होता. परंतु प्रत्यक्षात निर्माण झाली आहे एक निस्तेज प्रेमकथा. मुळात समाजात परिवर्तनवादी जाणिवा रूजवू पाहणाऱ्या आणि त्यासाठी प्रत्यक्ष काही कार्य करणाऱ्या व्यक्तींविषयी त्यांच्या मनात तिरस्कारच होता. 'ही का कल्पदुरमाची फळं?', 'एक होता युवराज' ह्या कादंबऱ्यातून त्यांनी छत्रपती शाहू यांची प्रतिमा जाणीवपूर्वक विपर्यस्त अशीच चित्रित केली आहे. 'प्रतिज्ञा' ही कादंबरी लिहून त्यांनी रा. स्व. संघाविषयीचे आपले प्रेम व्यक्त केले आहे.

जीवनशोध हा फडक्यांचा हेतू नाहीच. त्यांना करायचे आहे ते फक्त वाचकांचे रंजन. त्यासाठी त्यांनी रुपसुंदर नायक-नायिका, प्रेम आणि पराक्रम, देशभक्ती, सत्याग्रह, तुरूंगवास, समकालीन विचारप्रवाह या सर्व गोष्टी साधनांसारख्या वापरल्या. त्यांच्या वापराचेही तथाकथित उत्कंठावर्धक तंत्र बनविले आणि मराठी कादंबरीचे तथाकथित युग घडविले.

munotes.in

## ३.१.४ वि. स. खांडेकर

फडके-खांडेकर काळाचा विचार करता असे जाणवते की, त्या काळात फडक्यांना कलावादी आणि खांडेकरांना जीवनवादी मानले गेले. परंतु हा वाद बाजूला ठेवून पाहिले तर दोघेही रंजनवादी ठरतात ही वस्तुस्थिती आहे. फडके उघड रंजनवादी आहेत तर खांडेकर बोधाला रंजक स्वरूप दिले पाहिजे, असे म्हणत रंजनच करतात. देशासाठी त्याग, समाजकार्य, ध्येयनिष्ठा ही तत्कालीन समाजाची स्वप्ने होती. ती खांडेकरांनी समाजाला पुरवली.

खांडेकरांची 'हृदयाची हाक' ही कादंबरी तरुणांनी संपत्तीकडे धावण्याऐवजी आपल्या हृदयाची हाक ऐकावी हा विचार मांडण्याचा प्रयत्न करते. 'कांचनमृग' या कादंबरीवर गांधीवादी विचारांचा प्रभाव आहे. 'उल्का' ही कादंबरी म्हणजे उल्केच्या उद्ध्वस्त प्रेमाची कहाणी आहे. 'दोन मने' या कादंबरीत प्रेमाचा त्रिकोण साकारत असतांना समाजचित्रण गौण ठरले आहे. 'दोन ध्रुव' या कादंबरीत श्रीमंती आणि गरिबी हे दोन ध्रुव आहेत, हा विचार खांडेकरांना व्यक्त करायचा आहे. 'हिरवा चाफा' मधील मुकुंद कांबळे हा नायक लेखक म्हणतो म्हणून कुणबी आहे असे समजायचे. कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कुठलेही कुणबीपण दिसत नाही. 'क्रौंचवध' ही त्यांची बरीच लोकप्रिय ठरलेली कादंबरी. 'कठोर बुद्धिवाद आणि भावनानिष्ठ बुद्धिवाद यातील संघर्ष चित्रित करणे' हा आपला हेतू आहे असे खांडेकर म्हणतात. केवळ शरीराऐवजी माणूस जेव्हा व्यापक मानवतेवर प्रेम करू लागेल तेव्हाच प्रेम ही एक अमृतवेल ठरेल, असा विचार त्यांनी 'अमृतवेल' या कादंबरीत मांडला आहे. 'ययाती' ही कुठल्याही अर्थाने पौराणिक कादंबरी नाही. पुराणकालीन जीवनवास्तवाचे आकलन वा आविष्करण हा या कादंबरीचा हेतू नाही. भोग विरूद्ध संयम या विचाराच्या मांडणीसाठी ययातीची कथा साधन म्हणून वापरली गेली आहे. भारतीय संस्कृतिप्रणीत आदर्श मूल्ये, श्रद्धा विसरून सुखवादाच्या पाठीमागे धावणाऱ्या आधुनिक काळातील मानवाला संयमाचा संदेश देण्यासाठी या कादंबरीचे लेखन झाले आहे. ते स्वतःच म्हणतात की, "ही ययातीची कामकथा, शर्मिष्ठेची प्रेमकथा, देवयानीची संसारकथा आणि कचाची भक्तिगाथा आहे." 'पांढरे ढग' या कादंबरीतून निःसत्त्व होत गेलेल्या मध्यमवर्गीय समाजाचे चित्रण त्यांनी केले असून, त्याबाबत त्यांचा भ्रमनिरास झालेला दिसतो. तरीही हा मध्यमवर्गीय अभिमान 'अश्रू' मध्ये पुन्हा व्यक्त झालेला आहे.

१९४२ ते १९५३ या काळात खांडेकरांनी एकही कादंबरी लिहिलेली नाही. या काळात दुसरे महायुद्ध, १९४२ चा स्वातंत्र्यलढा. भारतीय स्वातंत्र्यप्राप्ती अशा कितीतरी महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. परंतु त्यांचे प्रतिबिंब खांडेकरांच्या कादंबरीत पडलेले नाही. भेदक वास्तवाला सामोरा जाऊ न शकलेला हा लेखक 'ययाती' च्या रूपाने पूर्वादर्शांच्या चित्रणात अधिक रमला. असे असूनही आजही खांडेकरांच्या कादंबऱ्यांना वाचकवर्ग मोठा आहे. इतर अनेक भारतीय भाषांमध्ये त्यांच्या कादंबऱ्या भाषांतरित झाल्या आहेत.

## ३.१.५ भा. वि. वरेरकर

हरिभाऊनंतरचे वास्तववादी कादंबरीकार म्हणून वरेरकरांचा निर्देश करावा लागेल. नाटककार म्हणून नावारूपाला येत असतांनाच वरेरकरांनी 'संसार की संन्यास', 'चिमणी' या कादंबऱ्या लिहिल्या. परंतु कादंबरीच्या क्षेत्रात त्यांचे नाव प्रतिष्ठा पावले ते १९२८ साली प्रसिद्ध

झालेल्या ‘विधवाकुमारी’ या कादंबरीमुळे. विधवांच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने पाहत असतांना अकराव्या वर्षी त्रेचाळीस वर्षाच्या विधुराशी लग्न होऊन विधवा झालेल्या मथूची ही जीवनकहाणी आहे. त्यांनी ही कादंबरी गतभर्तृका या टोपणनावाने प्रसिद्ध केली. धर्म आणि रूढी यामुळे निर्माण झालेली विषमता आणि त्यामुळे व्यक्तिमनाची झालेली कोंडी हा वरेरकरांच्या चिंतनाचा विषय आहे. यामुळेच ‘विधवाकुमारी’ मधील मथू आणि ‘गोदू गोखले’ मधील गोदू पुरुषप्रधान समाजव्यवस्थेला आव्हान देऊन आपले व्यक्तिमत्व घडवतांना दिसतात.

एकीकडे स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे वरेरकर दुसरीकडे ‘परतभेट’ या कादंबरीत पारंपरिक वळणाची स्त्रीपात्रे रेखाटतांना दिसतात. ‘मी रामजोशी’ या कादंबरीतील गांधीवादी नायक खेड्यात जाऊन वेदांचा अभ्यास करत ग्रामसुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. ‘धावता धोटा’ या कादंबरीत मार्क्सवादी विचार आहेत, परंतु वरेरकरांची दृष्टी सर्वंकषपणे मार्क्सवादी आहे असे जाणवत नाही. गिरणी मालकाचा मुलगा कामगारांचे जीवन समजावून घेण्यासाठी कामगारवस्तीत राहतो ही कल्पनाच असंभाव्य आणि वास्तवाला सोडून आहे. ‘फाटकी वाकळ’, ‘मी रामजोशी’, ‘सात लाखातील एक’ या कादंबऱ्यातून वरेरकरांनी ग्रामजीवनाचे चित्रण केले आहे. आपल्या लेखकीय कारकिर्दीत वरेरकरांनी अनेक नाटकांबरोबरच अनेक कादंबऱ्याचे अनुवादही केले. वरेरकरांच्या कादंबरीवाङ्मयात एक सलग जीवनदृष्टी प्रत्ययास येत नसली तरी वरेरकरांची कादंबरी मर्यादित प्रमाणात का असेना समाजवास्तवाभिमुख आहे असे म्हणता येईल.

## ३.१.६ वि. वा. हडप

नाथमाधव, नारायण हरी आणि वि. वा. हडप यांच्या कादंबरीवाङ्मयात गुणात्मकदृष्ट्या फारसा फरक नाही. “हडपांचे लेखन बरेच उत्क्रांतिशील आहे. त्यांच्या प्रथमावस्थेतील कृती व त्यांच्या आजच्या सामाजिक किंवा राजकीय कादंबऱ्या यांच्या दरम्यान त्यांनी बरेच अंतर कापले आहे. वेगवेगळ्या विचारसरणी समजून घेऊन त्यांची दखल घेण्याची शक्ती त्यांनी प्राप्त करून घेतली आहे. प्रथमावस्थेतील त्यांच्या कादंबऱ्यात वैषयिक वर्णनांचा हव्यास दिसून येतो. नीतिनियमांचा पुरस्कार व स्वैराचाराचा निषेध हे त्यांच्या लेखनाचे उघड हेतू वाटले तरी अभावितपणे व उत्कटपणे वाचकांचे लक्ष अनाचाराच्या रम्यतेवर खिळवले जाते.” कुसुमवती देशपांडे यांनी केलेल्या या विवेचनात हडपांच्या कादंबरीलेखनाचे स्वरूप सारांशरूपाने ग्रंथित झाले असून, ते नजरेसमोर ठेवूनच त्यांच्या कादंबरीचा आढावा घ्यावा लागतो.

‘झाकली मूठ’, ‘वाकडे पाऊल’, ‘बहकलेली तरूणी’, ‘निवळलेली तरूणी’, ‘इश्काचा प्याला’, ‘राणी मी रखेली’, ‘सौंदर्याची बाग’, ‘लग्नलांच्छन’, ‘बाईलवेडा’, ‘दिव्यलावण्य’, ‘मास्तरीण काकू’ ह्या त्यांच्या कादंबऱ्यांची नावे वाचली तरी त्यांच्या कादंबरीचे स्वरूप कसे आहे ते लक्षात येते.

## ३.१.७ ग. त्र्यं. माडखोलकर

पराक्रम आणि प्रणय हे वाचकानुरंजनाचे प्रमुख घटक आहेत. हे हेरून माडखोलकरांनी आपल्या कादंबऱ्यातून क्रांतीचे आकर्षण असणारे तरुण नायक आणि त्यांच्या प्रणयलीलांची

चित्रणे केली आहेत. माडखोलकरांची विचारप्रणाली हिंदुत्ववादी असल्यामुळे ते गांधी आणि गांधीवादाला विरोध करणाऱ्या सशस्त्र क्रांतिवादी नायकांचे पुन:पुन्हा चित्रण करतांना दिसतात. सशस्त्र क्रांतिवादी चळवळीविषयीचे त्यांच्या मनात असलेले हे आकर्षण 'मुक्तात्मा' या त्यांच्या पहिल्या कादंबरीपासूनच दिसून येते. या कादंबरीतील कॉलेजकुमार चंद्रशेखर हा क्रांतिकारी विचारांनी भारावलेला तरुण आहे. टिळकांविषयी त्याला नितांत आदर असून, गांधी हे त्याला विक्षिप्त गृहस्थ वाटतात. 'मुक्तात्मा' ही मराठीतील पहिली राजकीय कादंबरी मानली जाते. यानंतर 'कांता', 'नवे संसार' या कादंबऱ्यातून सशस्त्र क्रांतिवादी तरूणाचे चित्रण येते. 'कांता' मध्ये समाजवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे तर 'शाप', 'दुहेरी जीवन' या कादंबऱ्यातून त्यांचे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे आकर्षण व्यक्त झालेले दिसते. 'चंदनवाडी' या कादंबरीत त्यांनी दलित जीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला. 'भंगलेले देऊळ' या कादंबरीत त्यांनी विवाहसंस्था ही पवित्र असली तरी आज तिला भंगलेल्या देवळाची कळा प्राप्त झाली आहे, असा विचार व्यक्त केला आहे. 'डाकबंगला' सारख्या कादंबरीतून स्खलनशील स्त्रियांची आणि स्वैराचाराची जी वर्णने येतात ती पाहता त्यांचा उद्देश पुरुषवाचकांचे रंजन हाच आहे असे वाटते.

सशस्त्र क्रांती हे माडखोलकरांचे स्वप्न होते. तेच त्यांनी यथाशक्यपणे कादंबरीत रंगवले. एका कादंबरीत समाजवाद, दुसऱ्या कादंबरीत सशस्त्र क्रांतिवाद, तिसऱ्या कादंबरीत मार्क्सवाद, त्या सर्वांच्या जोडीला गांधीवादाचा तिरस्कार आणि जहाल मतवादाचा पुरस्कार असे मोठे विचित्र आणि बहुरंगी दृश्य माडखोलकरांच्या कादंबरीवाङ्मयात दिसून येते.

## ३.१.८ पु. य. देशपांडे

फडके-खांडेकर-माडखोलकर या लोकप्रिय कादंबरीलेखकांच्या काळात आपली स्वतंत्र वाट चोखाळणारा कादंबरीकार म्हणून पु. य. देशपांडे यांचा निर्देश करावा लागेल. त्यांनी 'बंधनांच्या पलीकडे', 'सुकलेले फूल', 'विशाल जीवन', 'काळी राणी', 'सदाफुली', 'नवे जग', 'आहुति', 'भेरीघोष की धर्मघोष' इ. कादंबऱ्या लिहिल्या. समाजात निर्माण झालेल्या नव्या बुद्धिजीवी वर्गाचे, त्याच्या बुद्धिवादी आदर्शोन्मुख कल्पनांचे आणि आत्मनिष्ठ जाणिवांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या कादंबऱ्या आहेत. 'बंधनांच्या पलीकडे' ही कादंबरी लिहितांना सामाजिक जाणीव व्यक्त करणारे पु. य. देशपांडे 'सुकलेले फूल' आणि 'सदाफुली' या कादंबऱ्यातून आत्मनिष्ठ जाणिवांचा आविष्कार घडवतात. तेच पु. य. देशपांडे पुढे 'विशाल जीवन' आणि 'काळी राणी' या कादंबऱ्यातून पुन्हा व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांचा मागोवा घेतांना दिसतात. 'नवे जग' या कादंबरीत त्यांनी फॅसिझम आणि समाजवाद या राजकीय विचारप्रणालीतील संघर्ष चितारण्याचा प्रयत्न केला. 'आहुति' ही कादंबरी त्यांनी एक दिव्य प्रेमकथा वर्णन करण्यासाठी लिहिली असून, तिला भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी दिली आहे. 'भेरीघोष की धर्मघोष' ही कादंबरी कलिंग विजयानंतर सम्राट अशोकाने केलेल्या धर्मघोषाचे वर्णन करण्यासाठी लिहिली गेली आहे.

मराठी कादंबरी वास्तवाकडे पाठ फिरवून कल्पनाविश्वात रममाण झालेली होती त्या काळात पु. य. देशपांडे यांनी व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला हे महत्त्वाचे आहे.

munotes.in

## ३.१.९ रघुवीर सामंत

रघुवीर सामंत यांची 'उपकारी माणसे' ही चार खंडात लिहिली गेलेली कादंबरी या कालखंडातील एक लक्षणीय कादंबरी म्हणावी लागेल. 'प्रवासातील सोबती', 'अभ्रपटल', 'आकाशगंगा', 'घरोघरच्या देवी' या चार खंडात ती प्रकाशित झाली. ज्या काळात व्यक्तिवादी आणि रंजनवादी कादंबऱ्याचा सुळसुळाट झालेला होता त्या काळात रघुवीर सामंतांनी ही कुटुंबकथा लिहिली आहे. रूढ तंत्र नाकारून लिहिलेल्या या कादंबरीला तेवढेच सामाजिक परिमाणही लाभले आहे. अरूण ठाकूर या चित्रकाराच्या जीवनकहाणीच्या निमित्ताने एका मध्यमवर्गीय अविभक्त कुटुंबातील व्यक्तींच्या परस्पर भावसंबंधातून घडत जाणारे प्रदीर्घ जीवननाट्य या कादंबरीत रेखाटण्याचा प्रयत्न सामंतांनी केला आहे.

## ३.१.१० द. र. कवठेकर

कवठेकरांनी 'विखुरलेले प्रेम', 'उमाडलेल्या भावना', 'रेशमाच्या गाठी', 'मंदा', 'शालन', 'आभाळाची सावली' इ. अनेक कादंबऱ्या लिहिल्या. सर्वसाधारणपणे प्रणय आणि स्त्री-पुरुष संबंध हेच त्यांच्या कादंबऱ्याचे विषय आहेत. प्रेमप्रकरणे आणि त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत हा या कादंबऱ्याचा महत्त्वाचा चित्रणविषय असतो. कवठेकरांच्या 'आभाळाची सावली' मध्ये हेच घडले आहे. रेखा सुशील या तरुणीचे रमेशवर निरतिशय प्रेम जडले आहे. परंतु रमेश मात्र श्यामावर प्रेम करतो आहे. परंतु ज्या श्यामावर तो प्रेम करतो तिचा विवाह दुसऱ्याशीच होतो. एकंदरीत रेखा सुशील काय आणि रमेश काय प्रेमप्रकरणात अयशस्वी ठरतात आणि दुःख भोगतात. या काळात कादंबरीलेखक कसा संभ्रमावस्थेत सापडला होता याचेच हे निदर्शक आहे.

## ३.१.११ साने गुरुजी

फडके, खांडेकर, माडखोलकर यांनी मराठी कादंबरीचे क्षेत्र पुरते काबीज केलेले असतांना 'श्यामची आई', 'धडपडणारी मुले', 'क्रांती', 'सती', 'पुनर्जन्म', 'गोड शेवट', 'रामाचा शेला' इ. अनेक कादंबऱ्या लिहून साने गुरुजींनी आपला स्वतःचा स्वतंत्र वाचकवर्ग निर्माण केला. मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र म्हणून 'श्यामची आई' या कादंबरीची योग्यता निर्विवाद आहे. ही कादंबरी कितीही वाचकप्रिय ठरली असली तरी मराठी कादंबरीसमीक्षेत मात्र तिची उपेक्षाच झाली. 'धडपडणारी मुले' या कादंबरीत स्वावलंबन, सेवा, त्याग, चित्तशुद्धी, प्रार्थना याद्वारे विद्यार्थ्यांचे जीवन घडवू पाहणाऱ्या स्वामाजी या शिक्षकाची कथा येते. या कादंबरीत गांधीवादी विचारांनी भारावलेल्या तत्कालीन शिक्षक आणि विद्यार्थी वर्गाच्या भावनांचे चित्रण आले आहे.

## ३.१.१२ मुकुंदराव पाटील

अव्वल इंग्रजी काळातल्या पुण्याचे आणि तेथील सामाजिक वास्तवाचे उपरोधात्मक पद्धतीने वस्तुस्थितीनिदर्शक चित्रण करणारी कादंबरी म्हणून सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांची 'ढढ्ढाशास्त्री परान्ने ही कादंबरी महत्त्वाची ठरते. परंतु तिचा उल्लेख कुठेही आढळत नाही.

पेशवाईच्या काळात यमदूतांच्या गफलतीमुळे चुकून यमलोकी गेलेल्या ढढ्ढाशास्त्री यमदूतांनीच दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शंभर वर्षांनी पुन्हा पुण्यात येतो आणि शंभर वर्षानंतरचे पुणे पाहून कसा भांबावून जातो याचे हे कल्पकतापूर्ण चित्र आहे. कादंबरीचा बाज विनोदी आणि उपरोधिक आहे हे येथे वेगळे सांगायची गरज नाही. पुण्यात निर्माण झालेली सुधारणावादाची हवा, पुनर्विवाहाच्या घटना, सोवळ्याओवळ्याचा सुटलेला धरबंध हे सारे पाहून ढढ्ढाशास्त्री जागोजाग बेशुद्ध पडतात. त्यातून अनेक विनोदी प्रसंगही उद्भवतात. मुकुंदरावांच्या सत्यशोधकी बाण्यामुळे ते तेवढेच विखारी आणि उपरोधपूर्णही झाले आहेत.

## ३.१.१३ ना. वि. कुलकर्णी

ना. वि. कुलकर्णी यांना 'खेडूत सृष्टीचे कादंबरीकार' असे म्हटले गेले. परंतु त्यांच्या कादंबऱ्याचा समाधानकारक परामर्श घेतला गेला नाही. फडक्यांची लोकप्रियता फैलावू लागण्याच्या काळात तत्कालीन इतर अनेक लेखकांप्रमाणे त्या लाटेवर आरूढ न होता ना. वि. कुलकर्णी यांनी जीवनानुभवाच्या वेगवेगळ्या वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रतिभेचा तो धर्मच आहे. उदा. कामगार जीवनाचा वेध घेण्यासाठी त्यांनी 'मजूर' ही कादंबरी लिहिली. तर ग्रामजीवनाचा वेध घेण्यासाठी 'कसे दिवस जातील', 'शिपाई', 'माणिक' या कादंबऱ्या लिहिल्या. खेरीज त्यांनी 'न्याय', 'संसारात' (कष्टी वडील) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

## ३.१.१४ र. वा दिघे

१९३९ च्या डिसेंबरमध्ये र. वा. दिघ्यांची 'पाणकळा' प्रसिद्ध झाली आणि मराठी कादंबरीत पहिल्यांदाच ग्रामीण जीवनाचा सुगंध दरवळला. 'पाणकळा' च्या कथानकास सजलपूरभोवतीच्या रम्य निसर्गाची आणि ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी लाभली आहे. शेतकऱ्यांचे निसर्गावलंबी जीवन, त्यांचे दारिद्र्य, त्यांच्या आयुष्यावर पडलेला सावकारी पाश, भूमिहीन अवस्थेत होणारी तारांबळ, दुष्काळाच्या तडाख्यामुळे होणारी वाताहत, घराण्यांची पूर्वापार वैमनस्ये, त्यातून उद्भवणारे संघर्ष इ. अनेक बाबींच्या चित्रणातून 'पाणकळा' या कादंबरीतील ग्रामीण जीवन साक्षात होते. 'सराई' ही दिघ्यांची सर्वात लोकप्रिय ठरलेली कादंबरी. मनोहर-लाडी यांच्या प्रेमकथेला 'सराई'त मध्यवर्ती स्थान असले तरी इतर अनेक पात्र-प्रसंगांच्या व निसर्गवर्णनांच्या माध्यमातून दिघ्यांनी रानसरीचे ग्रामजीवन साकार केले आहे. रानसरी हे कोकण भागात सह्याद्रीच्या कुशीत वसलेले निसर्गरम्य खेडे आहे. नंतर त्यांनी 'निसर्गकन्या रानजाई' आणि 'गानलुब्धा मृगनयना' या व्याजैतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. 'आई आहे शेतात'च्या रूपाने ते पुन्हा ग्रामजीवनाकडे वळले. ही समकालीन वास्तवाचे चित्रण करणारी उत्कृष्ट ग्रामीण कादंबरी आहे. जीवनशोध आणि जीवनदर्शन हीच या कादंबरीची निर्मितीप्रेरणा आहे. 'पड रे पाण्या' १९५८ मध्ये प्रसिद्ध झाली. संतू मगर या मराठमोळ्या शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून ही कादंबरी लिहिली गेली. संतवाङ्मयावर ज्याचा मन:पिंड पोसला गेला आहे असा सामान्यातला असामान्य संतू या कादंबरीत दिघ्यांनी उभा केला आहे. मानवी शक्तीपेक्षा प्रतिकूल निसर्गाशी त्याने दिलेला संघर्ष येथे महत्त्वाचा आहे. 'कार्तिकी' या कादंबरीत त्यांनी ग्रामीण भागातील अस्पृश्यतेचा प्रश्न हाताळला आहे.

'सराई' आणि 'आई आहे शेतात' या कादंबऱ्यातून दिघ्यांनी कातकरी, ठाकूर या आदिवासी जमातींच्या जीवनाचे चित्रण केले होते. त्यांची 'सोनकी' ही कादंबरी सह्याद्रीतील ठाकूर जमातीचे आणि मध्य भारतातील गोंड आदिवासींचे जीवन चित्रित करते. दिघ्यांनी मध्यमवर्गीय जीवनचित्रणात अडकलेल्या मराठी कादंबरीला आशयाच्या अंगाने नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. परिणामी, त्यांच्या कादंबरीत वास्तववादी आणि रोमँटिक अशा दोन्ही प्रवृत्तीची सरमिसळ झालेली दिसून येते.

## ३.१.१५ ग. ल. ठोकळ

र. वा. दिघे यांच्या 'पाणकळा' आणि 'सराई' मुळेच ठोकळांना लेखनाची प्रेरणा मिळाली असावी. नुकतेच १९४२ चे आंदोलन होऊन गेले होते. या काळात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासारख्या नेत्यांनी सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना करून इंग्रजी सेनेला आव्हान दिले होते. भूमिगतांच्या चळवळींनी सारा महाराष्ट्र घुसळून निघाला होता. राजकीय अंदाधुंदीचा फायदा घेऊन काहींनी दरोडेखोरी सुरू केली होती. भूमिगतांच्या आणि दरोडेखोरांच्या कथा ऐकण्यात लोकांना रस वाटणे स्वाभाविक होते. अशा काळात 'गावगुंड' ने गुणाजी आणि जयवंत या दोन भावांची रोमांचक कथा सादर केली. १९६० मध्ये त्यांची 'ठिणगी' ही दुसरी कादंबरी प्रसिद्ध झाली.

## ३.१.१६ बी. रघुनाथ

बी. रघुनाथांनी 'बाबू दडके', 'म्हणे लढाई संपली', 'आडगावचे चौधरी', 'जगाला कळलं पाहिजे' इ. कादंबऱ्या लिहिल्या. देशकार्यासाठी स्वतःला वाहून घेणाऱ्या तरुणाची कथा 'बाबू दडके' या कादंबरीत त्यांनी वर्णिला आहे. 'आडगावचे चौधरी' ही कादंबरी मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील चौधऱ्यांच्या अनेक पिढ्यांची कहाणी थोडक्यात सांगून जाते. युद्धकाळात टंचाईच्या परिस्थितीत सामान्य माणूस कसा शोषणाचे भक्ष्य बनत होता याचे चित्रण 'म्हणे लढाई संपली' या कादंबरीत आले आहे.

## ३.१.१७ श्री. ना. पेंडसे

स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून पेंडशांचा उल्लेख केला जातो. परंतु 'एल्गार', 'रथचक्र' या कादंबऱ्याचा अपवाद वगळला तर खुद्द पेंडसे यांची कादंबरी रंजनवादी परंपरेत जाऊन बसली आहे हे 'गारंबीचा बापू' या कादंबरीने सिद्ध केले आहे. आणि पन्नास वर्षानंतर 'गारंबीची राधा' लिहिणारा हा लेखक अजूनही आपल्या त्या नंदनवनातून बाहेर पडलेला नाही हेही जाणवते. कोकणचा निसर्गसमृद्ध प्रदेश तेथील मानवी जीवनासह प्रभावीपणे चित्रित केल्यामुळे प्रादेशिक कादंबरीकार म्हणून पेंडशांची प्रतिमा तयार झाली आहे. 'एल्गार' ही कोकणातल्या साखरपेंडी या खेड्यात घडणारी रघू आणि कादर या दोन भिन्नधर्मीय सुशील जिवांची कथा आहे. 'हद्दपार' मध्ये आपल्या आणि आपल्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या मनावर स्वाभिमानाचे संस्कार करणाऱ्या राजेमास्तरांची जीवनकहाणी पेंडशांना सांगायची आहे. पेंडशांच्या इतर कुठल्याही कादंबरीपेक्षा 'गारंबीचा बापू' या कादंबरीला अधिक लोकप्रियता

munotes.in

मिळाली. बापू सामलाच्या कर्तृत्वाची ही कथा गारंबीच्या जीवनात एवढी मोठी ठरते की त्याला लोक अफाट बापू म्हणू लागतात. 'हत्या' या कादंबरीत पेंडशांनी ब्राह्मणी संस्कारांच्या दबावाखाली जगणाऱ्या, परंतु त्यातून बाहेर पाहणाऱ्या हत्या या बालकाचा पौगंडावस्थेपर्यंतचा जीवनप्रवास चितारला आहे. जीवनसंघर्षात धडपडणाऱ्या हत्याचा पुढील प्रवास 'कलंदर' या कादंबरीत लेखकाने चित्रित केला आहे. 'रथचक्र' ही पेंडशांची अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबरी. कोकणातल्या जुन्या वळणाच्या मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील स्त्रीची ही शोकान्त कहाणी आहे. 'रथचक्र' नंतर त्यांनी युद्धोत्तर काळातील महानगरीय चाळ संस्कृतीचे चित्रण करण्यासाठी 'लव्हाळी' आणि कामभावनेचा शोध घेण्यासाठी 'ऑक्टोपस' या कादंबऱ्या लिहिल्या. अलीकडच्या काळात त्यांनी 'तुंबाडचे खोत' ही द्विखंडात्मक दीर्घ कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीत त्यांनी तुंबाडच्या खोतांचा चार पिढ्यांच्या इतिहास कथन केला आहे.

## ३.१.१८ विभावरी शिरूरकर

स्त्रियांच्या भावभावनांना आणि बदलत्या काळात उपस्थित झालेल्या प्रश्नांना विभावरी शिरूरकरांच्या कथा-कादंबरीत प्रथमच उत्कट अभिव्यक्ती लाभली. शिक्षणामुळे जागृत आणि म्हणूनच बंडखोर झालेल्या स्त्रीमनाचा तो उद्गार होता. विभावरी शिरूरकरांनी विवाहाशिवाय मातृत्व प्राप्त करु पाहणाऱ्या अचलेची व्यक्तिरेखा 'हिंदोळ्यावर' या कादंबरीतून साकार केली आहे. परित्यक्त्यांच्या मनाच्या चिंधड्या समाजासमोर मांडाव्या या हेतूने 'हिंदोळ्यावर' या कादंबरीची निर्मिती झाली आहे. यानंतरच्या 'विरलेले स्वप्न' या कादंबरीची नायिका रोहिणी हिच्या दु:खाची प्रत थोडी निराळी आहे. वैशाखची सहचरी व्हावे हे तिचे स्वप्न आहे. परंतु तो आत्मविश्वास मात्र तिच्या ठायी नाही. 'जाई' मधील जाई ही देखील अनेक विवंचनांनी आणि दु:खमय घटनांनी ग्रासलेली आहे. शिक्षण नाही, कुटुंबसुख नाही अशा प्रतिकूल परिस्थितीत हालअपेष्टा सोसत मुलांसह आयुष्य कंठणं तिला भाग पडतं. 'हिंदोळ्यावर', 'विरलेले स्वप्ने' या कादंबऱ्या लिहून स्त्रियांच्या व्यथावेदनेला शब्दरूप करणाऱ्या विभावरींनी 'बळी' या कादंबरीत गुन्हेगार म्हणून घोषित झालेल्या मांगगारूडी समाजाच्या जीवनाची शोकात्मिका वर्णन केली आहे.

कुमारीमाता, अविवाहित प्रौढा, परित्यक्ता, सकेशा विधवा या विषयांवर कादंबरी लेखनाबरोबरच गंभीर वैचारिक लेखन करणाऱ्या बाळताई खरे यांनी कन्याशाळेतील आपल्या नोकरीचा विचार करुनच कदाचित विभावरी शिरूरकर हे टोपणनाव घेतले असावे. अपेक्षेप्रमाणे त्यांच्यावर बरीच टीका झाली. अगदी स्वत:ची प्रेतयात्राही त्यांना पहावी लागली.

## ३.१.१९ अन्य लेखिका

१९२० नंतरचा कालखंड स्त्रीसमस्यांच्या दृष्टीने अधिक जटील बनला होता. स्त्रीशिक्षणामुळे निर्माण झालेले अनेक प्रश्न आता नव्याने समोर येत होते. या काळातील स्त्रीलिखित कादंबऱ्यामधून आलेल्या विषयांची नोंद घेतली तरी या काळातील सुशिक्षित स्त्री कोणत्या प्रश्नांना तोंड देत जगत होती हे लक्षात येते.

विभावरी शिरूरकरांच्या परंपरेतील लेखिका म्हणून गीता साने यांचा उल्लेख करावा लागेल. प्रचलित समाजव्यवस्थेने स्त्रीला दिलेले दुय्यम स्थान आणि स्त्री म्हणून तिची होणारी

कुचंबणा हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. 'निखळलेली हिरकणी', 'हिरवळीखाली', 'वठलेला वृक्ष', 'लतिका', 'फेरीवाला', 'आविष्कार', 'माळरानात', 'वादळापूर्वी', 'धुके आणि दहिवर' इ. अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. जानकीबाई देसाई यांनी हुंडा पद्धतीचा निषेध करण्यासाठी 'गृहलक्ष्मी' ही कादंबरी लिहिली. 'प्रेमळ सवत', 'सौभाग्य तिलक', 'पातिव्रत्याची कसोटी' या कादंबऱ्यातून जानकीबाई देसाई सनातन स्त्रीधर्माचा पुरस्कार करताना दिसतात. कुमुदिनी प्रभावळकरांच्या 'कुस्करलेलं ह्रदय' या कादंबरीतही हाच विषय आला आहे. 'बेसूर संगीत' या कादंबरीत कुमुदिनी प्रभावळकर आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करतात, परंतु आंतरधर्मीय विवाहाचा मात्र निषेध करतात. 'निर्माल्यातली कळी' या कादंबरीत वेश्यांनी वेगळा मार्ग स्वीकारून आपले जीवन घडवावे, असा संदेश त्या देतात. यशोदाबाई भट यांनी 'मुलांचे बंड' मधून विधवांची दुरवस्था कथन केली आहे. शांताबाई नाशिककर यांनी 'हाच का धर्म?' या कादंबरीत जातीयतेसारख्या गतानुगतिक हिंदू चालीरीतींचा निषेध केला आहे. त्याचप्रमाणे लग्नसंबंध जमविण्यात त्या काळात मुलींचे शिक्षण हेही कसे अडचणीचे ठरत होते, हे त्यांच्या 'लग्नाचा बाजार' मध्ये दिसून येते. 'पुसलेल्या रांगोळ्या' या कादंबरीत त्यांनी परित्यक्ता स्त्रीच्या जीवनाला किती भयावह वळण लागू शकते हे दाखवून दिले. 'चिखलातले कमळ' मध्ये अनौरस संततीचा प्रश्न येतो. शांताबाईच्या 'कीर्ती' या कादंबरीत चांभार समाजातील तरुणीची कथा येते. कमलाबाई बंबेवाले यांनी 'बंधमुक्ता' मध्ये घटस्फोटाची आणि पोटगीची आवश्यकता प्रतिपादन केली. इंदिराबाई सहस्त्रबुद्धे यांनी 'गोदावरी' मध्ये बालविवाहाचा निषेध आणि विधवा विवाहाचा पुरस्कार केला तर स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करण्यासाठी 'बाळूताई धडा घे' ही कादंबरी लिहिली. त्यांनी 'केवळ ध्येयासाठी' या कादंबरीत विवाह संस्थेची अनावश्यकता प्रतिपादन केली आहे. कमलाबाई सोहोनी यांनी 'कुठे?' या कादंबरीत शिक्षणासाठी धडपडणाऱ्या सरलची कथा वर्णन केली आहे.

मालतीबाई दांडेकरांनी 'ईष्णरजनी', 'काटेरी मार्ग' या कादंबऱ्यातून परित्यक्ता स्त्रियांच्या कर्मकथा सांगितल्या आहेत. तर 'हिरा आणि गारगोटी' या कादंबरीतून त्यांनी मुलांचे संगोपन करणे हे आईचे कर्तव्य आहे, हा विषय रेखाटला आहे. मनोरमा निमकर यांची 'अखेरची लाट' आणि लीला देशमुख यांच्या 'दोन घडीचा डाव' या कादंबऱ्यातून विषमविवाहाची समस्या मांडली गेली आहे. स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहणाऱ्या लब्ध प्रतिष्ठितांचे बुरखे फाडण्यासाठी शालिनी तुळपुळे यांनी 'लपलेले गुन्हेगार' ही कादंबरी लिहिली.

प्रेमा कंटक या गांधीवादी विचारांनी भारावलेल्या लेखिका आहेत. 'काम आणि कामिनी' या कादंबरीत त्यांनी विवाहोत्तर नैष्ठिक ब्रह्मचर्यव्रताचा अवलंब करणाऱ्या मुकुंद या गांधीवादी तरुणाची कथा सांगितली आहे. तत्कालीन सुशिक्षित तरुण गांधीवादी विचारांनी कसा भारावला होता हे त्यांच्या 'अग्नियान' या कादंबरीत दिसून येते. पुरुष भ्रमरवृत्तीने वागला तर समाजाला चालतो, परंतु स्त्री तशी वागली तर ती मात्र स्वैरिणी ठरते. या धोरणाविरुद्ध लढा देणारा नायक आनंदीबाई जयवंत यांच्या 'जगाशी बंडखोरी' या कादंबरीत येतो. स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यातील बहुसंख्य युवक वर्ग पोटाची खळगी भरण्यासाठी व गावातील भांडणांना कंटाळून शहराकडे कसा धाव घेत होता, याचे चित्र शांता शेळके यांनी 'ओढ' या कादंबरीतून उभे केले आहे.

एकंदरीत विभावरी शिरूरकर यांचा अपवाद वगळता याही काळातील बहुसंख्य स्त्रीलिखित कादंबरी पुरुषप्रेरितच असून तिला पुरुषप्रधान समाजव्यवस्थेच्या मर्यादा पडल्या

आहेत. तिला नव्या विचारांचे आकर्षण वाटले परंतु पारंपरिक विचारांची चौकट छेदून ती बाहेर येऊ शकली नाही.

## ३.१.२० गो. नी. दांडेकर

प्राचीन भारतीय संस्कृतीने दिलेल्या मूल्यांची पडझड होत चालली आहे हे पाहून दांडेकर व्यथित होतात. प्राचीन भारतीय ग्रामव्यवस्था विकल झालेली पाहून त्यांना 'पडघवली' सुचते, तर जुनी ग्रामव्यवस्था टिकविण्याची धडपड करणारा धोंडी त्यांच्या 'पवनाकाठचा धोंडी' या कादंबरीचा नायक होतो. दांडेकर खऱ्या अर्थाने 'शितू' या कादंबरीमुळे साहित्यसृष्टीत ओळखले जाऊ लागले. त्याआधी त्यांनी 'बिंदूची कथा', 'तुडवलेलं घरकुल' आणि 'सिंधुकन्या' या कादंबऱ्या लिहिल्या होत्या. या कादंबऱ्यातून महाराष्ट्रापासून सुदूर अशा प्रदेशातील लोकजीवन चित्रित करणारे दांडेकर 'शितू' च्या रूपाने महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाकडे वळाले. सात्त्विक, सोशीक, बालविधवा शितू आणि बेदरकार परंतु अंतर्यामी प्रेमळ विसू यांच्या विफल प्रीतीची ही कारुण्यपूर्ण शोककथा आहे. 'पूर्णामायची लेकरं' मधून दांडेकरांनी वऱ्हाडी लोकजीवनाची प्रतिती घडविली आहे. दांडेकरांच्या निसर्ग वेड्या मनाने 'माचीवरला बुधा' ही कादंबरी घडविली. कादंबरीचा नायक बुधाचे मातीशी, सृष्टीशी, भोवतालच्या प्राणिजीवनाशी जे अतूट नाते जडले आहे त्याचे प्रत्ययकारी चित्रण दांडेकरांनी केले आहे. वेगवेगळ्या अनुभवाचा शोध घेण्याची जिद्द असलेल्या दांडेकरांनी 'जैत रे जैत' मध्ये ठाकर या आदिवासी जमातीच्या वनजीवनाच्या पार्श्वभूमीवर नाग्या आणि चिंधी यांची प्रेमकथा चित्रित केली आहे.

दांडेकरांच्या शिवकालीन समाजाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या हा स्वतंत्र विवेचनाचा विषय आहे. 'बया दार उघड', 'हर हर महादेव', 'दर्याभवानी' आणि 'झुंझारमाची' या कादंबऱ्यांच्या माध्यमातून त्यांनी शिवकाल उभा केला आहे. भाईबंदकीची आपसातली भांडणे आणि सुलतानी जुलूम यात मावळ मुलखातील समाजजीवन कसे होरपळून निघत होते याचे चित्र या कादंबऱ्यातून त्यांनी रेखाटले आहे.

## ३.१.२१ व्यंकटेश माडगूळकर

माडगूळकरांनी आपल्या कथा-कादंबरीतून वेगवेगळ्या स्वरूपाचे जीवनचित्रण केले असले तरी त्यांच्या साहित्याचं मुख्य अनुभवविश्व माणदेशी जीवनवास्तव हेच आहे. दलित जीवन हा त्यांच्या अनेक कथांचा विषय आहे. त्यांची 'पुढचं पाऊल' ही कादंबरी दलित कलावंताची कथा वर्णन करते. 'बनगरवाडी' ने प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. बनगरवाडी हे एक समूहजीवन जगणारे खेडे आहे. तो एक गाववाडा आहे. तेथील माणसांचा व्यवसायच त्यांना समूहजीवन जगायला भाग पाडतो आहे. हे जीवन राजाराम सौंदणीकर या शिक्षकाच्या मुखातून निवेदित केले जाते. 'वावटळ', 'कोवळे दिवस' आणि 'करुणाष्टक' या त्यांच्या कादंबऱ्या आत्मचरित्रात्मक आहेत. 'सत्तांतर' ही आत्मकेंद्रिततेपासून मुक्त आहे. 'वावटळ' मध्ये गांधी हत्येमुळे ग्रामीण भागात ब्राह्मण समाजावर जे गंडांतर कोसळले त्याचे चित्रण माडगूळकरांनी केले आहे.

munotes.in

माणदेशी जीवनवास्तव हा माडगूळकरांच्या साहित्याचा मुख्य विषय असला तरी त्यांचे साहित्य केवळ माणदेशकेंद्री नाही. वेगवेगळ्या स्वरूपाचे अनुभव त्यांनी तेवढ्याच समर्थपणे अभिव्यक्त केले आहेत.

## ३.१.२२ उद्धव शेळके

कौतिक या शिंपी कुटुंबातल्या स्त्रीने जगण्यासाठी केलेल्या धडपडीची कथा उद्धव शेळके यांनी 'धग' या कादंबरीत मांडली आहे. जगण्याच्या प्राथमिक प्रश्नांनी तिचे आणि तिच्या कुटुंबाचे जीवन एवढे ग्रासून टाकले आहे की, शेवटपर्यंत त्यातून ती बाहेर पडू शकली नाही. परिस्थितीविरुद्ध ती एकाकीपणे झुंजत राहिली आणि शेवटी पराभूत झाली. भाषा व वऱ्हाडी ग्रामीण जीवनाचे चित्रण या दृष्टीने प्रादेशिकतेचे रंग वागविणारी ग्रामीण कादंबरी म्हणून 'धग' चे मोल निर्विवाद आहे. शेळक्यांची 'डाळिंबाचे दाणे' ही कादंबरी लीला धानोरीकर या तमाशा कलावंत स्त्रीची कहाणी आहे. तमाशा कलावंतांच्या आशा-आकांक्षा, आपसातील हेवे-दावे व स्पर्धा, त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन, निगरगट्ट फडमालक आणि त्यांची लुबाडणूक करणारे थिएटर मॅनेजर, त्यांच्यावर होणारे अत्याचार इ. अनेक बाबींचे तपशीलवार चित्रण शेळक्यांनी या कादंबरीत केले आहे. 'धग' सारखी श्रेष्ठ कलाकृती लिहिणारा हा लेखक पुढे उदरनिर्वाहासाठी 'लेडीज होस्टेल' सारख्या रंजक कादंबऱ्या लिहू लागला, हे लेखकाच्या नव्हे तर आपल्या वाङ्मयीन संस्कृतीच्या अधःपाताचे लक्षण आहे.

## ३.१.२३ मार्क्सवाद आणि मराठी कादंबरी

सामान्यतः १९४५ च्या सुमारास काही लेखक मार्क्सवादाच्या प्रेरणेतून ग्रामीण आणि आदिवासी जीवनाच्या चित्रणाकडे वळाले. आदिवासींचे प्रश्न समजावून घेण्यासाठी, त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी शं.रा. भिसे, श्रीराम अईन्नरदे, प.त्रि. सहस्त्रबुद्धे, वा. ब. कर्णिक यांनी कादंबरी लेखन केले. भिसे यांनी 'जंगलातील छाया' ही कादंबरी लिहून जमीनदार व व्यापारी भिल्ल-पावऱ्यांची कशी फसवणूक करतात आणि त्यामुळे त्यांना कसे हलाखीचे जीवन जगावे लागते हे दाखवून दिले. 'सावलीच्या उन्हात' ही श्रीराम अत्तरदे यांनी लिहिलेली भाऊंच्या भ्रमनिरासाची कथा आहे. काँग्रेसमध्ये राहून भिल्ल-पावऱ्यांचा उद्धार करणे अशक्य असल्याची प्रचिती भाऊंना आली आहे. शेवटी आदिवासींनी लाल बावट्याखाली एकच आले पाहिजे, असा संदेश अत्तरदे यांनी दिला आहे. प.त्रिं. सहस्त्रबुद्धे यांनीही आपल्या 'पहिली सलामी' मध्ये हाच संदेश दिला आहे. या कादंबरीत माईच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढा होऊन आदिवासी स्वतंत्र झालेले दिसतात. 'प्रहार' या कादंबरीत कोळसाभट्टीत काम करणाऱ्या कातकऱ्यांच्या परिस्थितीचे आणि त्यांनी डॉ. मंगल व वीणा यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या विजयी लढाईचे चित्रण आले आहे. वि.वा. हडप यांची 'अन्नदाता उपाशी' ही कादंबरी मार्क्सवाद्याच्या प्रेरणेतून लिहिली गेली. जुलूम असाह्य झाल्यावर गरीब शेतकरीही जुलमी जमीनदाराचा कसा खून करू शकतात हे दाखवून देण्यासाठी हडपांनी ही कादंबरी लिहिली. मार्क्सवादी प्रेरणा टाळून लिहिली गेलेली वा.ब. कर्णिकांची 'वाडगीण' ही कादंबरी मुळात पर्ल बकच्या 'द मदर' या कादंबरीचे रुपांतर आहे. तथापि, स्वतंत्रपणाचा आभास निर्माण करण्यात कर्णिक यशस्वी झाले आहेत.

## ३.१.२४ काही अन्य कादंबरीकार

श्री. कृ. कोल्हटकर यांची 'श्यामसुंदर' ही दलित जीवनाचे चित्रण करणारी मराठी साहित्यातील पहिली कादंबरी म्हणता येईल. 'दुटप्पी की दुहेरी' ही त्यांची आणखी एक कादंबरी समकालीन समाजवास्तवाचे उपरोधिक चित्रण करते. वि. वि. बोकील यांच्या 'फोल आशा', 'आबा', 'द्वंद्व', 'कुबेर की रंक', 'तू तिथं मी', 'बेबीची बहिण' या कादंबऱ्यामधून साधारणपणे वास्तववादी पद्धतीनेच जीवनचित्रण आले आहे. गांधीवादाने प्रेरित झालेल्या ग.रा. वाळिंबे (रामतनय) यांनी ग्रामीण जनतेचा उद्धार व्हावा या तळमळीतून 'मोहित्यांची मंजुळा', 'खरा उद्धार', 'साखरगोटी', 'प्रमिलाबेन', 'गजाभाऊ' या कादंबऱ्या लिहिल्या. दा.न. शिखरे यांची 'आईची कृपा' गांधीवाद्याच्या प्रेरणेतून लिहिली गेली. वि.वा. शिरवाडकरांनी 'वैष्णव' या कादंबरीत गांधीवादी विचाराच्या प्रभावातून एका शिक्षकाच्या जीवनात कसे आमूलाग्र परिवर्तन होते याचे चित्रण केले आहे. तर 'जान्हवी' या कादंबरीत त्यांनी माणूस हा नैसर्गिक भावभावनांचे दमन करु शकत नाही हे दाखवून देण्यासाठी महंतांची व्यक्तिरेखा उभी केली आहे.

मा.दा. आळतेकर यांनी 'अपराध कोणाचा', 'ललिता', 'शांताराम', 'मुक्तबंध' इ. कादंबऱ्या लिहून सामाजिक बदलाचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. रा.शा. पाटील यांनी 'सीता' ही कादंबरी लिहून ग्रामोद्धार कसा करता येईल याविषयी विचार मांडले. बा.सी. मर्ढेकरांच्या 'तांबडी माती' या कादंबरीत युद्धकालीन ग्रामीण वातावरण प्रतिबिंबित झाले आहे. दुसरे महायुद्ध आणि धरण बांधण्याची योजना यामुळे खेड्यातल्या शेतकऱ्यांच्या जीवनावर जे अनिष्ट परिणाम झाले त्याचे चित्रण करण्यासाठी बा.सी. मर्ढेकरांनी 'पाणी' ही कादंबरी लिहिली. वि. ल. बर्वे यांनी 'मुचकुंद दरी' ही कादंबरी लिहून तळकोकणच्या जीवनाचे दर्शन घडविले आहे. न.चिं. केळकरांनी 'कोकणचा पोर' या कादंबरीला कोकणी कोळीवस्तीच्या सागरी जीवनाची पार्श्वभूमी दिली आहे. भा.द. खेर यांनी 'क्रांतीच्या वाटेवर' ही बेचाळीसच्या आंदोलनाची पार्श्वभूमी असलेली कादंबरी लिहिली. बा.भ. बोरकरांच्या 'भावीण', 'मावळता चंद्र', 'अंधारातील वाट' या कादंबऱ्या गोमंतकीय जीवनाची पार्श्वभूमी घेऊन जातात. म.भा. भोसले हे या कालखंडातील आणखी एक उल्लेखनीय लेखक आहेत. त्यांनी प्राध्यान्याने ग्रामजीवनाचे चित्रण केलेले आहे. म.भा. भोसले यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून निष्ठापूर्वक ग्रामीण कथा-कादंबरीलेखन केले आहे. त्यांची समरांगण ही पहिली कादंबरी १९४१ मध्ये प्रसिद्ध झाली तर 'घसरगुंडी' ही चौथी कादंबरी १९६३ मध्ये प्रसिद्ध झाली. दरम्यान त्यांनी 'उघड्या जगात' ही उल्लेखनीय कादंबरी लिहिली. याशिवाय १९३९ मध्ये प्रकाशित झालेली 'रणांगण' ही विश्राम बेडेकर यांची महत्त्वाची कादंबरी या कालखंडात प्रकाशित झालेली आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर एका जहाजावर घडणारी प्रेमकथा कादंबरीत बेडेकरांनी चित्रित केली आहे. महाराष्ट्रीय तरुण चक्रधर आणि ज्यू तरुणी हॅर्टा यांची ही प्रेमकहाणी आहे. हिटलरशाहीमुळे निर्वासित झालेली हॅर्टा चक्रधरवर जीव ओवाळून टाकू पाहते परंतु त्यांचे मीलन होऊ शकत नाही. या कालखंडातील एक महत्त्वाची कादंबरी म्हणून 'रणांगण' चा उल्लेख करावा लागेल.

थोर लेखक अण्णाभाऊ साठे यांचे कादंबरीलेखन या काळात सुरु झाले. त्यांनी १९६० नंतरच्या काळात विपुल कादंबरीलेखन केले आहे. गावागावांच्या आणि घराण्यांच्या आपसातील वैरांच्या कहाण्या हा अण्णाभाऊ साठेंच्या अनेक कादंबऱ्याचा विषय आहे. त्यांनी 'चित्रा', 'फकिरा', 'वैजयंता', 'माकडीचा माळ', 'आवडी', 'वैर', 'रानगंगा', 'पाझर',

'मास्तर', 'वारणेचा वाघ', 'चंदन', 'अलगूज', 'केवड्याचं कणीस', 'चिखलातील कमळ' इ. अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

चंद्रकांत काकोडकर यांनी 'गोमंतका जागा हो' या कादंबरीतून गोव्याच्या स्वातंत्र्याचा प्रश्न व देवदासींचे प्रश्न या विषयाची सांगड घातली आहे. भाऊ पाध्ये यांनी 'डोबांऱ्याचा खेळ' या कादंबरीतून स्वातंत्र्योत्तर काळात कामगार चळवळीचे प्रस्थापित राजकारणात झालेले रूपांतर अधोरेखित केले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यंकटेश मांडगूळकरांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीचा आढावा घ्या.

## ३.१.२५ समारोप

सदर आढाव्यात पृष्ठसंखेची मर्यादा पाहता सर्वच लेखकांच्या कादंबऱ्याचा परामर्श घेता आलेला नाही. १९२० ते १९६० या कालखंडातील मराठी कादंबरीकार दृष्टिक्षेप टाकल्यानंतर सर्वसाधारणपणे असे दिसून येत की, हा काळ प्रतिभिन्नतेने गजबजलेला आणि कादंबरीनिर्मितीच्या दृष्टीने विपुलतेचा असला तरी या काळातील कादंबरी ही मध्यमवर्गीय जाणिवांची निर्मिती आहे. केतकर, वरेरकर, रघूवीर सामंत, विभावरी शिरूरकर, र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ, श्री.ना. पेंडसे, माडगूळकर यांच्यासारखे काहीशा निराळ्या जाणिवा व्यक्त करु पाहणारे लेखक या काळात दिसत असले तरी एकंदरीत या कालखंडावर फडके-खांडेकर-माडखोलकर यांचाच प्रभाव दिसून येतो. त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे सुखवादाच्या आहारी गेलेल्या समाजविन्मुख व्यक्तिवादी जाणिवांची परिणती आहे. सामाजिक वास्तवापासून आणि संदर्भापासून पूर्णपणे विलग असलेले प्रणयचित्रण हा व्यक्तिवादी जाणिवांचा उथळ आविष्कार आहे.

१९२० नंतरचा कालखंड राजकीयदृष्ट्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळींनी धगधगत असूनही १९२० नंतरच्या काळात राजकीय या शीर्षकाखाली लिहिली गेलेली कादंबरी खऱ्या अर्थाने राजकीय नाहीच, असा निष्कर्ष अ.ना. देशपांडे यांनी काढला आहे. १९२० नंतरची मराठी कादंबरी कथानक प्रधानतेऐवजी व्यक्तिदर्शनप्रधान अधिक झाली. त्याचे कारण इंग्रजी साहित्य आणि विचारांचा प्रभाव हे आहे. औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात निर्माण झालेल्या व्यक्तिवादी जाणिवा तेथील साहित्यापासून प्रकर्षाने प्रकट झाल्या आणि त्याच जाणिवा इंग्रजी राजवटीत मराठी साहित्यातही झिरपत आल्या. मराठी कादंबरीची समीक्षाही उत्तरोत्तर व्यक्तिरेखनाला अधिक महत्त्व देऊ लागल्याने लेखकही व्यक्तिवादी जाणिवांना महत्त्व देत गेले. सदर कालखंडात व्यक्तिवादी जाणीव इतकी प्रबळ ठरली की, व्यक्तीभोवतालचे सामाजिक वास्तवच उपेक्षिले गेले. त्यामुळे या काळात उत्कृष्ट सामाजिक किंवा राजकीय कादंबरी फारशी निर्माण झाली नाही. स्त्रियांची दु:खे मांडण्याचा बहाणा करीत विवाहोत्तर प्रेम, द्विपत्निकत्व,

munotes.in

व्यभिचार, स्वैराचार या गोष्टींची वर्णने करण्यात आली. समाजातील शोषितांच्या जीवनाकडे लेखकांचे लक्ष वळले, परंतु त्याचे श्रेय लेखकांना नसून त्या काळात परिचित झालेल्या साम्यवादाला आणि नव्याने उदयास आलेल्या गांधीवादाला आहे. या काळातील व्यक्तिवादी जाणिवांच्या प्रभावामुळे साम्यवादी जाणीवही म्हणावी तेवढी प्रगल्भ झाली नाही.

केतकर, रघुवीर सामंत, दिघे, शिरूरकर यांच्यामुळे मराठी कादंबरी मध्यमवर्गीय जीवनकक्षेच्या बाहेर पडली. तिचा आस वास्तवचित्रणाकडे झुकला. तरीही या काळातील मराठी कादंबरी प्राधान्याने मध्यमवर्गीय आणि करमणूकप्रधान अशीच राहिली, हे सत्य नाकारत येत नाही.

## ३.१.२६ १९२० ते १९६० या कालखंडातील निवडक कादंबऱ्याची सूची

| प्रकाशन वर्ष | कादंबरीचे नाव | लेखकाचे |
|---|---|---|
| १९२० | प्रणयभंग | शारदासुत |
| १९२० | नगरतारका | द.भि. रणदिवे |
| १९२० | दिव्यलावण्य | वि.वा. हडप |
| १९२० | निरभ्रचंद्र | वि.वा. हडप |
| १९२० | त्रिवेणी विरुद्ध तिरंगी सामना | भि.गो. भिडे |
| १९२१ | अस्तप्राय भानू | द.वि. परांजपे |
| १९२१ | स्वराज्याचा श्रीगणेशा | नाथमाधव |
| १९२१ | मुलांचे बंड अथवा प्रतिज्ञाभंग | यशोदाबाई भट |
| १९२२ | वीरविवाह | लक्ष्मण नारायण जोशी |
| १९२२ | वीरविजय | लक्ष्मण नारायण जोशी |
| १९२२ | इंग्रजांचा पराभव | अ.ब. कोल्हटकर |
| १९२२ | सापत्नभाव | नाथमाधव |
| १९२३ | जादुगारीण | वि.वा. हडप |
| १९२३ | स्वराज्याचा कारभार | नाथमाधव |
| १९२३ | शिवशाहीचा शुभशकुन | वि.वा. हडप |
| १९२३ | माझा सम्राट | वि.वा. हडप |
| १९२४ | वाकडे पाऊल | वि.वा. हडप |
| १९२४ | अघोर पातक | जानकीबाई देसाई |
| १९२४ | बहकलेली तरुणी | वि.वा. हडप |
| १९२५ | स्वयंसेवक | नाथमाधव |

| | | |
|---|---|---|
| १९२५ | बाईलवेडा | वि.वा. हडप |
| १९२५ | मजूर | ना.वि. कुलकर्णी |
| १९२५ | निवळलेली तरुणी | वि.वा. हडप |
| १९२५ | कुलाब्याची दांडी | ना.सी. फडके |
| १९२५ | दुटप्पी की दुहेरी ? | श्री. ई. कोल्हटकर |
| १९२५ | श्यामसुंदर | श्री. ई. कोल्हटकर |
| १९२५ | इष्काचा प्याला | वि.वा. हडप |
| १९२५ | मूकनायिका | जानकीबाई देसाई |
| १९२६ | गोंडवनातील प्रियंवदा | श्री. व्यं. केतकर |
| १९२६ | परागंदा | श्री. व्यं. केतकर |
| १९२६ | आशावादी | श्री. व्यं. केतकर |
| १९२६ | चिमणी | भा.वि. वरेरकर |
| १९२६ | पेशवाईचे पुण्याहवाचन | वि.वा. हडप |
| १९२६ | कौमुदी | शांताबाई नाशिककर |
| १९२७ | स्वाधीन संसार | कृ. प. खाडिलकर |
| १९२७ | बंधनांच्या पलीकडे | पु.य. देशपांडे |
| १९२७ | माझे रामायण | नारो अप्पाजी तुळजापुरकर |
| १९२७ | उद्धार | ना.सी. फडके |
| १९२७ | राजमाता जिजाबाई | यशोदाबाई भट |
| १९२७ | स्वराज्याची स्थापना | नाथमाधव |
| १९२८ | जादूगार | ना.सी. फडके |
| १९२८ | विधवाकुमारी | भा.वि. वरेरकर |
| १९२८ | पालखीचा गोंडा | काशीबाई नाशिककर |
| १९२९ | लग्नाचा बाजार | शांताबाई नाशिककर |
| १९२९ | दौलत | ना.सी. फडके |
| १९२९ | काळे पाणी | वि.दा. सावरकर |
| १९३० | ब्राह्मण कन्या | श्री. व्यं. केतकर |
| १९३० | स्वराज्यातील संकट | नाथमाधव |
| १९३० | फोल आशा | वि.वि. बोकील |
| १९३० | किशोरीचे हृदय | दिवाकर कृष्ण |

munotes.in

| | | |
|---|---|---|
| १९३० | हाच का धर्म ? | शांताबाई नाशिककर |
| १९३० | धावता धोटा | भा.वि. वरेरकर |
| १९३० | ह्रदयाची हाक | वि.स. खांडेकर |
| १९३१ | मोहित्यांची मंजुळा | रामतनय (ग.रा. वाळिंबे) |
| १९३१ | आस्तिक | सानेगुरुजी |
| १९३१ | अटकेपार | ना.सी. फडके |
| १९३२ | गोदू गोखले | भा.वि. वरेरकर |
| १९३२ | ध्येयाकडे | ना.के. बेहरे |
| १९३३ | मुक्तात्मा | ग.त्र्यं. माडखोलकर |
| १९३४ | सीमोल्लंघन | मो.ग. रांगणेकर |
| १९३४ | परतभेट | भा.वि. वरेरकर |
| १९३४ | दोन ध्रुव | वि.स. खांडेकर |
| १९३४ | उल्का | वि.स. खांडेकर |
| १९३४ | हिंदोळ्यावर | विभावरी शिरूरकर |
| १९३५ | फेरीवाला | गीता साने |
| १९३५ | विरलेले स्वप्न | विभावरी शिरूरकर |
| १९३५ | नवलपूरचा संस्थानिक | न.चिं. केळकर |
| १९३५ | उघडझाप | भा.वि. वरेरकर |
| १९३५ | श्यामची आई | साने गुरुजी |
| १९३५ | कुलदैवत | भा.वि. वरेरकर |
| १९३६ | शाप | ग.त्र्यं. माडखोलकर |
| १९३६ | विकारी वात्सल्य | भा.वि. वरेरकर |
| १९३६ | काश्मिरी गुलाब | ना.सी. फडके |
| १९३६ | विचक्षणा | श्री. व्यं. केतकर |
| १९३७ | मृगजळ | मो.ग. रांगणेकर |
| १९३७ | काळे पाणी | वि.दा. सावरकर |
| १९३७ | धडपडणारी मुले | साने गुरुजी |
| १९३७ | प्रवासी | ना.सी. फडके |
| १९३८ | मावळता चंद्र | बा.भ. बोरकर |
| १९३८ | समरभूमी | ना.सी. फडके |

munotes.in

| | | |
|---|---|---|
| १९३८ | दोन मने | वि.स. खांडेकर |
| १९३८ | हिरवा चाफा | वि.स. खांडेकर |
| १९३८ | पाणकळा | र.वा. दिघे |
| १९३९ | पुनर्जन्म | साने गुरुजी |
| १९३९ | रणांगण | विश्राम बेडेकर |
| १९३९ | सुखाचा शोध | वि.स. खांडेकर |
| १९३९ | रिकामा देव्हारा | वि.स. खांडेकर |
| १९४० | पहिले प्रेम | वि.स. खांडेकर |
| १९४० | आस्तिक | साने गुरुजी |
| १९४० | झंझावात | वि.वि. बोकील |
| १९४० | मुखवटे | ग.त्र्यं. माडखोलकर |
| १९४० | सात लाखातील एक | भा.वि. वरेरकर |
| १९४० | राक्षसविवाह | श्री. के. क्षीरसागर |
| १९४१ | मातृमंदिर | मालतीबाई दांडेकर |
| १९४१ | जळलेला मोहर | वि.स. खांडेकर |
| १९४२ | रात्रीचा दिवस | बा.स. मर्ढेकर |
| १९४२ | कोकणचा पोर | न.चिं. केळकर |
| १९४२ | वारणेच्या खोऱ्यात | अण्णाभाऊ साठे |
| १९४२ | क्रौंचवध | वि.स. खांडेकर |
| १९४२ | काम आणि कामिनी | प्रेमा कंटक |
| १९४३ | तांबडी माती | बा.सी. मर्ढेकर |
| १९४३ | चंदनवाडी | ग.त्र्यं. माडखोलकर |
| १९४३ | तेजस्विनी | मालतीबाई दांडेकर |
| १९४३ | सराई | र.वा. दिघे |
| १९४४ | ससेमिरा | त्र्यं.वि. सरदेशमुख |
| १९४५ | गावगुंड | ग.ल. ठोकळ |
| १९४६ | कमळाचं जाळं | सरोजिनी बाबर |
| १९४६ | वैष्णव | वि.वा. शिरवाडकर |
| १९४६ | झुलता मनोरा | भा.वि. वरेरकर |
| १९४६ | वज्रलेख | मालतीबाई दांडेकर |

munotes.in

| | | |
|---|---|---|
| १९४६ | विझती ज्योत | शांता शेळके |
| १९४७ | ठिगळ | वि.वि. बोकील |
| १९४७ | कोजागिरी | शांता शेळके |
| १९४८ | काटेरी मार्ग | मालतीबाई दांडेकर |
| १९४८ | पाणी | बा.सी. मर्ढेकर |
| १९४९ | सिंधुकन्या | गो.नी. दांडेकर |
| १९५० | हद्दपार | श्री.ना. पेंडसे |
| १९५० | भावीण | बा.भ. बोरकर |
| १९५० | बळी | विभावरी शिरूरकर |
| १९५० | तू भेटायला नको होतास | सरोजिनी बाबर |
| १९५० | ओढ | शांता शेळके |
| १९५० | डोंबाऱ्याचा खेळ | भाऊ पाध्ये |
| १९५० | पुढचं पाऊल | व्यंकटेश माडगूळकर |
| १९५० | जेहलम् | ना.सी. फडके |
| १९५१ | चित्रा | अण्णाभाऊ साठे |
| १९५२ | जान्हवी | वि.वा. शिरवाडकर |
| १९५२ | गारंबीचा बापू | श्री.ना. पेंडसे |
| १९५३ | महानदीचा तीरावर | दुर्गा भागवत |
| १९५३ | शितू | गो.नी. दांडेकर |
| १९५३ | जाई | विभावरी शिरूरकर |
| १९५४ | क्षिप्रा | शरचंद्र मुक्तिबोध |
| १९५४ | अश्रू | वि.स. खांडेकर |
| १९५५ | बनगरवाडी | व्यंकटेश माडगूळकर |
| १९५५ | जैत रे जैत | गो.नी. दांडेकर |
| १९५५ | पडघवली | गो.नी. दांडेकर |
| १९५५ | पवनाकाठचा धोंडी | गो.नी. दांडेकर |
| १९५५ | लिलीचे फूल | गंगाधर गाडगीळ |
| १९५६ | आई आहे शेतात | र.वा. दिघे |
| १९५६ | कल्पनेच्या तीरावर | वि.वा. शिरवाडकर |
| १९५७ | माणुसकीची हाक | शंकरराव खरात |

munotes.in

| | | |
|---|---|---|
| १९५७ | कुणा एकाची भ्रमणगाथा | गो.नी. दांडेकर |
| १९५८ | पड रे पाण्या | र.वा. दिघे |
| १९५८ | माचीवरला बुधा | गो.नी. दांडेकर |
| १९५८ | पूर्णामायची लेकरं | गो.नी. दांडेकर |
| १९५९ | फकिरा | अण्णाभाऊ साठे |
| १९५९ | वैजयंता | अण्णाभाऊ साठे |
| १९५९ | बारी | रणजित देसाई |
| १९५९ | ययाती | वि.स. खांडेकर |
| १९६० | धग | उद्धव शेळके |
| १९६० | माझा गांव | रणजित देसाई |
| १९६० | आकाशाची फुले | ग.दि. माडगुळकर |
| १९६० | अन्नपूर्णा | चंद्रकांत काकोडकर |
| १९६० | ठिणगी | ग.ल. ठोकळ |
| १९६० | पूर्णपुरुष | गिरिजा कीर |
| १९६० | महादेवता | सुमती क्षेत्रमाडे |

## ३.१.२७ संदर्भ


१) कुलकर्णी, वा.ल., 'साहित्य : शोध आणि बोध', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी १९९५.

२) देशपांडे, कुसुमावती, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', मुंबई, मराठी साहित्य संघ, आवृत्ती दुसरी १९७५.


## ३.१.२८ पूरक वाचन


१) ठाकूर, रवींद्र, 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि. पुणे

२) देशपांडे, कुसुमावती, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक,' मुंबई, मराठी साहित्य संघ.

३) कुरुंदकर, नरहर, 'धार आणि काठ,' देशमुख आणि कंपनी, पुणे.

४) बांदिवडेकर, चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

५) कुलकर्णी, श्री. मा. 'कादंबरी समीक्षा', उन्मेष प्रकाशन, नागपूर.

६) बांदिवडेकर, चंद्रकांत, 'मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

७) हस्तक, उषा, 'कादंबरी आणि मराठी कादंबरी', साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद.


munotes.in

## ३.१.२९ नमुना प्रश्न

१) श्री. व्यं. केतकर यांच्या कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करा.

२) १९२० नंतरच्या स्त्रीलिखित कादंबरीची वैशिष्ट विशद करा.

३) फडके-खांडेकर यांच्या कादंबरीचे स्वरुप स्पष्ट करा.

४) १९२० नंतरच्या कालखंडातील रंजनवादी कादंबरीचा आढावा घ्या.

५) १९२० नंतरच्या कादंबरीतील समाज जाणिवा विशद करा.

❖❖❖❖

munotes.in

# घटक-४

## चरित्र-आत्मचरित्र (१८७४ - १९६०)

**घटक रचना :**

४.१ उद्दिष्टे
४.२ प्रास्ताविक
४.३ विषय विवचेन
४.३.१ चरित्र या वाङ्मय प्रकाराचा परिचय
४.३.२ चरित्र वाङ्मय प्रकाराचे स्वरूप व त्याचे विशेष
४.३.३ महत्त्वाचे चरित्रकार आणि त्यांचे चरित्र लेखन
४.३.४ आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचा परिचय
४.३.५ आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप - वैशिष्ट्ये
४.३.६ आत्मचरित्र लेखकांची मराठीतील परंपरा
४.४ समारोप
४.५ पूरक अध्ययन
४.६ नमुना प्रश्न

### ४.१ उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला -

- चरित्र - आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारांचा परिचय करुन घेता येईल.
- चरित्र लेखनाचे तंत्र व या लेखन प्रकाराचे स्वरूप समजावून घेता येईल.
- आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप समजावून घेता येईल.
- १८७४ ते १९६० या काळात लिहिल्या गेलेल्या चरित्र वाङ्मयाचा अभ्यास करता येतील
- १८७४ ते १९६० या काळात मराठीत लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्र वाङ्मयाचा अभ्यास करता येतील.
- चरित्र - आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारांतून घडणारे जीवनदर्शन व अनुभवविश्वाचे वेगळेपण जाणून घेता येईल.
- चरित्र-आत्मचरित्र वाङ्मय प्रकारांचे स्वरूप - विशेष सांगून त्यांची मराठी साहित्यातील परंपरा सांगता येईल.

## ४.२ प्रास्ताविक

कोणत्याही साहित्यकृतीचा सौंदर्यात्मक, कलात्मक शोध घेताना ज्या साहित्य प्रकारात तिची रचना, मांडणी झाली आहे, त्या साहित्य प्रकाराची काही तात्त्विक ओळख, परिचय करुन घेणे अभ्यासाच्या, वाङ्मयीन आकलनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. साहित्यकृतीचा अनुभव, तिचा आस्वाद, समीक्षा वा मूल्यमापन करताना निश्चित काही तत्त्वे लक्षात घ्यावी लागतात. चरित्र-आत्मचरित्र या साहित्य प्रकाराचा परिचय करुन घेताना या साहित्य प्रकाराची संकल्पना, त्याचे स्वरूप, मूलभूत घटक, त्याचे प्रकार-उपप्रकार व त्याची गुण वैशिष्ट्ये याविषयीची चर्चा अपेक्षित आहे. शिवाय या दोन्ही साहित्य प्रकारात झालेली साहित्य निर्मिती, त्याची परंपरा विचारात घेणे महत्त्वाचे ठरेल. त्याचबरोबर अन्य साहित्य प्रकारापेक्षा चरित्र-आत्मचरित्राचे असलेले वेगळेपण लक्षात घेणे गरजेचे ठरते. अभ्यासाच्या या भागात वरील मुद्यांची चर्चा व विवेचन केले आहे.

विषयाची मांडणी करताना पुढील काही मुद्दे विचारात घेणे महत्त्वाचे ठरेल.

**साहित्यप्रकार ही संकल्पना :**

साहित्यप्रकार म्हणजे साहित्याचे वर्गीकरण होय. या वर्गीकरणासाठीची काही निश्चित तत्त्वे असावी लागतात. कलेनुसार ही तत्त्वे भिन्न-भिन्न स्वरूपाची असून काळानुसार ती बदलत असतात. उदा. चित्रकला, नृत्य, संगीत, वास्तुकला. या प्रत्येक कलेच्या तात्त्विक विचारातून त्यांचे विविध प्रकारात वर्गीकरण केले गेले आहे. साहित्यकलेचा विचार केला तर प्राचीन काळापासून आजतागायत त्या-त्या कालखंडात साहित्यप्रकाराबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. मुळात साहित्याचे प्रकार मानावेत की मानू नयेत इथपासून तर कोणते मुख्य आणि कोणते उपप्रकार मानावेत ? याबाबत मतभेद आढळून येतात.

मराठी साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक, ललितगद्य, चरित्र-आत्मचरित्र, विनोद, व्यक्तीचित्र, प्रवासवर्णन असे ललित साहित्याचे प्रकार-उपप्रकार रूढ आहेत. प्रा. गो. मा. पवार यांच्या मते, साहित्यप्रकार ही संकल्पना स्थिर नव्हे. काळाप्रमाणे, गरजेप्रमाणे, अभिरुचीप्रमाणे ती बदलत आलेली आहे. एकेक साहित्यप्रकार घेतला तरी त्या संकल्पनेच्या आशय-मांडणीतही काळानुसार बदल होत गलेला दिसतो.

## ४.३ विषय विवेचन

### ४.३.१ 'चरित्र' या वाङ्मय प्रकाराचा परिचय

चरित्र म्हणजे एका माणसाच्या जीवनाचा किंवा जीवनखंडाचा 'वृत्तांत' सांगणारी एक सर्जनशील कलाकृती असते. अर्थात हा वृत्तांत असल्यामुळे जे घडले, जे सत्य आहे आणि जे प्रत्यक्ष वास्तव आहे, त्यापासून चरित्रकार मुळीच दूर जाऊ शकत नाही. चरित्र लेखनात निखळ असे सत्य आले पाहिजे. त्यात थोडीसुद्धा कल्पकता घुसता कामा नये. चरित्र हा एक व्यक्तीच्या जीवनाचा वृतांत असतो. तशीच ती एक सर्जनशील कलाकृतीही असते. या वाङ्मयीन कलाकृतीला वृत्तांताचे नाते असल्याने त्यामध्ये केवळ कृत्रिमता आणून चालत नाही तर त्यात अधिकाधिक जिवंतपणा, भावभावनांचा आविष्कार, व्यक्तित्व कसे विकसित होत गेले

munotes.in

त्याबद्दलची मांडणी आणि आस्वाद असा अनुभव चरित्रकाराकडून मांडला गेला पाहिजे. म्हणजे ते चरित्र रसिकप्रिय व वाचनीय ठरेल.

कोणतेही चरित्र तीन अंगांनी बनते. व्यक्तित्व, जीवनक्रम आणि परिस्थिती. ज्या व्यक्तीचे चरित्र रेखाटायचे आहे तिथे व्यक्तित्व कालानुक्रमे बदलत गेलेले असते. ते बहुदा स्थिर असत नाही. काळ जसा बदलत जातो त्याप्रमाणे त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात झालेले बदल, विकास व परिवर्तन याच्या नोंदीसुद्धा चरित्रकार घेत असतो. शिवाय जीवनक्रमाच्या सर्व महत्त्वाच्या नोंदी कलात्मक स्वरुपाने घेत परिस्थितीनुरुप त्या व्यक्तीचे आयुष्य कसे घडत गेले, या सगळ्यांच्या नोंदी चरित्रकार चरित्रातून करीत असतो. चरित्र लेखनात सुरुवातीला चरित्र नायकाची निवड होते. ज्याच्या जीवनाबद्दल विस्ताराने लिहायचे आहे, त्याचे जीवन त्याबद्दलची माहिती, घटना-घडामोडी, प्रसंग त्या व्यक्तीचे कार्य, परिस्थिती, योगदान या सर्वांचा अभ्यास व त्यातील बारकावे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. त्यातील सत्यता पडताळून त्या घटना घडामोडींच्या नोंदी चरित्रात घेता येतात.

**चरित्र आणि आत्मचरित्र साम्य-भेद :**

चरित्र आणि आत्मचरित्र यांच्यातील साम्य-भेद लक्षात घेताना सर्वात महत्त्वाचा मुद्दा लक्षात येतो तो हा की, चरित्र आणि आत्मचरित्र यांच्यात एका माणसाचे जीवन किंवा जीवनखंड घेऊन त्याचा वृत्तांत सांगणे हे महत्त्वाचे कार्य दोन्ही ठिकाणी घडत असते. वाचकाच्या मनात त्याबद्दल जिव्हाळा व कुतूहल निर्माण होत असते. जीवनानुभव चरित्र आणि आत्मचरित्र दोन्हीतही व्यक्त होत असतो. तरीही चरित्रलेखनात लेखक दुसऱ्याचा वृत्तांत सांगत असतो तर आत्मचरित्र लेखनात स्वतःचा वृत्तांत, स्वतःच्या आठवणी आणि आलेले अनुभव, घडून गेलेल्या घटना याबद्दलचे निरीक्षण यावर भर देत असतो.

असे असले तरी चरित्रात लेखक दुसऱ्याचा वृत्तांत सांगतो आणि आत्मचरित्रात तू स्वतःचा वृत्तांत सांगतो या दोन्हीतही मूलभूत स्वरूपाचा भेद आहे असे स्पष्टपणे म्हणता येईल. आपणास किंवा आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तीबद्दल तिच्या आजपर्यंतच्या वाटचालीबद्दल तिच्या कार्यकर्तृत्वाबद्दल कलात्मक स्वरूपात प्रेरणादायी अशी मांडणी चरित्रलेखनातून होत असते. चरित्रात मुख्य आधार साधनसामग्रीचा असतो आणि आत्मचरित्रात मुख्य आधार आठवणींचा असतो. यावरुन चरित्र आणि आत्मचरित्र ही एका व्यापक वर्गात साहित्य प्रकारात समाविष्ट होत असली तरी ही दोन्ही एक नव्हे त्यांच्यात जसे साम्य आहे तसा भेदही आहे.

**४.३.२ चरित्र वाङ्मय प्रकाराचे स्वरूप व त्याचे विशेष :**

चरित्र म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनाचा सर्वसाधारणपणे ढोबळ असा इतिहास असतो. घडून गेलेल्या घटना, घेतलेले अनुभव, केलेले कार्य-कर्तृत्व याचा एक कलात्मक आविष्कार चरित्रातून व्यक्त होतो. त्यामुळे चरित्रनायकाच्या जीवनातील विविध घटना, प्रसंग, घडोमोडी त्याच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कशा पोषक ठरत गेल्या, किंबहुना त्याने केलेला जीवनसंघर्ष, केलेले अलौकिक असे कार्य या सर्व दृष्टीने चरित्र नायकाच्या आयुष्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न चरित्र लेखनातून होतो. चरित्र हे जिवंत व्यक्तीचे असल्यामुळे त्याचा आधी, अंत व मध्य यानुसार त्याची रचना होत असते. विविध संदर्भ त्यात येत असतात.

आपणास प्रिय किंवा आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तीबद्दल तिच्या जीवनकार्याबद्दल आठवणींच्या रूपाने तिच्या व्यक्तिमत्त्वाला साकार करणे ही प्रेरणा चरित्र लेखनामागे दिसते. त्यामुळे आपल्याकडील जुने पोवाडे, वीर पुरुषांच्या पराक्रमाप्रमाणे समाजात वंदनीय म्हणून पावलेल्या, विशेष कार्य करुन गेलेल्या व्यक्तींची चरित्रेही जुन्या काळात लिहिली गेली. मध्ययुगीन मराठी परंपरेत संत चरित्रातून त्या-त्या संतांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेतला गेला. महानुभाव संप्रदायातील 'लीळाचरित्र', वारकरी संप्रदायातील नामदेवांचे अभंग, तुकारामांचे आत्मनिवेदनपर अभंग यांचा उल्लेख करता येतो. मराठीतील चरित्र लेखनाची परंपरा बाराव्या तेराव्या शतकापासून सांगता येते. महानुभाव संप्रदायातील 'लीळाचरित्र' हा मराठीतील आद्य चरित्रग्रंथ म्हणून ओळखला जातो. महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या लीळा म्हणजे आठवणी त्यांच्या अनेक शिष्यांनी चरित्ररूपाने एकत्रित केल्या. लीळा चरित्राची विभागणी एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा तीन विभागात असून यातून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक जीवन व्यवस्थेची माहिती अभ्यासता येते. प्राचीन काळात लिहिली गेलेली ही गद्य व पद्य चरित्रे माहितीपूर्ण असून ती वाचकांना उपयुक्त माहिती देणारी व प्रेरणा देणारी ठरली.

### ४.३.३ महत्त्वाचे चरित्रकार आणि त्यांचे चरित्र लेखन :

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई संपल्यानंतर इंग्रजी राजवट सुरू झाली. इंग्रजी शिक्षणाचा आरंभ झाला. इंग्रजी भाषेतील विविध ग्रंथाचा परिचय होऊन त्यातून इंग्रजी शिक्षण घेतलेली नवी पिढी इंग्रजीतील कथा, कादंबरी, नाटक, निबंध वाङ्मय याच्याशी परिचित होत गेली. हळूहळू इंग्रजी ग्रंथांचे मराठीत भाषांतर करण्यास सुरुवात झाली. याच काळात इंग्रजी पुस्तकाप्रमाणे इंग्रजी भाषेतील चरित्र-आत्मचरित्र नवशिक्षितांच्या वाचनात आली. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी इ.स. १८५२ मध्ये 'सॉक्रेटीसचे चरित्र' इंग्रजीतून मराठीत भाषांतरित केले. त्यापूर्वी महादेव शास्त्री कोल्हटकर यांनी १८४९ मध्ये 'कोलंबसचा वृत्तांत' मराठीत भाषांतर करून प्रसिद्ध केला होता. एका अर्थाने इंग्रजी साहित्याशी व भाषेशी परिचय झाल्याने इंग्रजीतील अनेक ग्रंथांची मराठीत चरित्र-आत्मचरित्रे भाषांतरित होऊ लागली.

पुढील काळात १८६०-७० च्या सुमारास कथा, कादंबरी, नाटक हे वाङ्मय प्रकार स्वतंत्रपणे हाताळणाऱ्या मराठी ग्रंथ लेखकांनी चरित्र वाङ्मयाच्या क्षेत्रातह स्वतंत्र लेखनाला सुरुवात केली. म. वि. चौबळ यांनी १८७१ साली 'रामदास', १९७२ साली 'एकनाथ' व १८७७ साली 'तुकाराम' अशी तीन महाराष्ट्रीयन संतांची चरित्रे प्रसिद्ध केली. १८७३ साली रा. पां. आजरेकर यांनी विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे चरित्र लिहिले. त्यातूनच स्वतंत्रपणे चरित्र लिहिण्याची ही परंपरा हळूहळू सुरू झालेली दिसते. अर्थातच स्वतंत्र चरित्र लेखनाबरोबर भाषांतरित चरित्र ग्रंथांची निर्मिती या काळात मोठ्या प्रमाणात होत होतीच. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या लेखणीतून इ.स. १८७४ पासून 'निबंधमाले'च्या माध्यमातून जी साहित्यविषयक कामगिरी होऊ लागली त्याने मराठी भाषा व साहित्य क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केलेली दिसते. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे मुख्यतः निबंधकार व टीकाकार म्हणून प्रसिद्ध असले तरी ज्याला चरित्र म्हणता येईल असा 'डॉ. जॉन्सन' यांच्यावरील प्रदीर्घ निबंध त्याकाळी विशेष महत्त्वाचा ठरला. त्यानंतर चिपळूणकरांचे सहकारी शंकर तुकाराम शाळिग्राम यांनी 'सेनापती बापू गोखले' यांचे चरित्र १८७७ साली लिहिले. या ग्रंथाबरोबर ना. वि. बापट यांनी थोरले बाजीराव साहेब यांचे चरित्र (१८७९), भि.धो. निरगुडकर यांनी 'परशुरामभाऊ पटवर्धन' यांचे चरित्र असे चरित्र ग्रंथ प्रसिद्ध झाले.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय सुधारणांच्या दृष्टीने जे अनेक महत्त्वपूर्ण बदल घडले त्याचा प्रभाव आणि परिणाम साहित्यनिर्मिती व चरित्र लेखनावरही झालेला दिसतो. १८५७ च्या उठावानंतर सामाजिक सुधारणांचा, चळवळींचा नव्याने उदय होणे, आपली भाषा, संस्कृती, धर्म, इतिहास याविषयी जनजागृती व नवी प्रेरणा निर्माण होणे या घटना चरित्र लेखनासाठी महत्त्वाच्या ठरल्या. स्वदेशाभिमानातून राजारामशास्त्री भागवत यांनी शिवछत्रपती (१८९९), संभाजी (१८९२) आणि राजाराम (१८९२) अशी मराठा छत्रपतींची चरित्रे लिहून प्रसिद्ध केली. इतिहासाचे अभ्यासक वासुदेवशास्त्री खरे यांचे नाना फडणीस यांचे चरित्र (१९८२) विशेष गाजले. १८९४ मध्ये हे द.ब. पारसनीस यांनी 'झाशीची राणी लक्ष्मी साहेब यांचे चरित्र' लिहून प्रसिद्ध केले. स्वदेशीय इतिहास प्रेमाने प्रेरित होऊन इतिहासातील प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे या काळात लिहिली गेली. त्यात प्रामुख्याने रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांनी लिहिलेल्या लहान-मोठ्या चरित्रात शूर लक्ष्मीबाई (१८९२), जवानमर्द मराठा जनकोजी शिंदे (१८९२), अहिल्याबाई होळकर (१८९५) ही चरित्रे विशेष लोकप्रिय ठरली. इतिहास विषयक सत्यकथांबरोबरच चरित्र विषयाचा गौरव करणे हा उद्देश या चरित्र लेखनामागे दिसला.

एकोणिसाव्या शतकाचा अखेरचा कालखंड महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक जनजागृतीचा व परिवर्तनाचा कालखंड होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी सुरु केलेला सामाजिक सुधारणांचा प्रयत्न पुढे लोकमान्य टिळक, गो. ग. आगरकर यांनी चालू ठेवला. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेबरोबरच भारतीयांच्या मनात नव्या आकांक्षा अधिक उंचावत गेल्या. महाराष्ट्रात जणू नवे युग अवतरले होते. याच काळात लोकमान्य टिळक यांचे कार्य भरात असताना त्यांची लहान-मोठी चरित्रे प्रसिद्ध झाली. बाळशास्त्री जांभेकर, विजय कीर्तने, वामन शिवराम आपटे यांसारख्या लेखकांनी लेख प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे या काळात लिहिली होती. शिवाय राजकीय जागृतीचा परिणाम म्हणून देशभक्तांची चरित्रही लिहिली जाऊ लागली. पुढे २० व्या शतकाच्या सुरुवातीस ज्या राजकीय घटना घडामोडी घडत होत्या त्याचा परिणाम सामाजिक, राजकीय बदलामध्ये दिसत होता. त्यातूनच थोर देशभक्तांची चरित्रे लिहिण्यास अधिक प्रेरणा मिळाली. वा.दा. मुंडले यांनी 'काव्हूर उर्फ इटलीचा रामदास' (१९१६), नेपोलियन बोनापार्ट (१९१६) व 'प्रिन्स बिस्मार्क' (१९१७) अशी तीन युरोपियन नेत्यांची चरित्रे लिहिली. या सर्वच चरित्र लेखनातून पाश्चात्त्य देशभक्तांनी राष्ट्र उद्धारासाठी केलेल्या प्रयत्नांचा आदर्श तरुण पिढीसमोर ठेवणे हाच उद्देश असलेला दिसतो.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेबद्दल अभिमान जागृत होऊन लेखनाला एक चांगलीच प्रेरणा मिळाली. त्यातून प्राचीन कवींची चरित्रे लिहिण्याची प्रेरणा घेऊन ल.रा. पांगारकर यांनी 'मोरोपंत : चरित्र आणि काव्य विवेचन' (१९०८), 'एकनाथ चरित्र' (१९१०) 'ज्ञानेश्वर चरित्र' (१९१२), 'तुकाराम चरित्र' (१९२०) असे चरित्र ग्रंथ लिहिले. याशिवाय पुढील काळात 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' या विस्तृत ग्रंथांचे तीन भागही प्रसिद्ध केले. संत साहित्याचा त्यांनी केलेला अभ्यास आणि संतांच्या चरित्राचा घेतलेला विस्ताराने मागोवा हा त्यांच्या लेखन शैलीचा, अभ्यासाचा महत्त्वाचा आविष्कार ठरतो. त्यांच्याबरोबरच ज.र. आजगावकर यांनासुद्धा संतचरित्रकार म्हणून नाव मिळविले. 'संतश्रेष्ठ तुकाराम' हा त्यांचा स्वतंत्र चरित्रग्रंथ १९३५ झाली प्रसिद्ध झाला. पुढील काळात शं.वा. दांडेकर, भा.वा. भट, न.र. फाटक इत्यादी लेखकांनी संतचरित्रे लिहिलेली दिसतात.

लोकमान्य टिळकांच्या हयातीत त्यांची काही चरित्रे प्रसिद्ध झाली. त्याचबरोबर त्यांच्या मृत्यूनंतरही काही लेखकांनी त्यांच्या चरित्र व कार्यासंबंधीचे ग्रंथ लिहिलेले आहे. या ग्रंथातला महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे न.चि. केळकर यांनी लिहिलेले 'टिळक चरित्र' होय. या चरित्राचा पहिला भाग १९२३ मध्ये व पुढील दोन भाग १९२८ मध्ये प्रसिद्ध झाले. याच काळात प्रसिद्ध झालेला दुसरा महत्त्वाचा चरित्रग्रंथ म्हणजे न.र. फाटक यांचा 'न्यायमूर्ती रानडे यांचे चरित्र' (१९२४) हा होय. न्या. रानडे यांच्या या व्यक्तीजीवनाचा व तत्कालीन समाजस्थितीचा सूक्ष्म अभ्यास करुन परिश्रमपूर्वक लिहिलेले असे हे सर्वोत्कृष्ट चरित्र आहे असे मानले जाते. १९३६ मध्ये दा. ना. आपटे यांनी 'बडोद्याचे सयाजीराव महाराज' यांचे विस्तृत चरित्र प्रसिद्ध केले. १९५० साली ग.गं. जांभेकर यांनी 'बाळशास्त्री जांभेकर-जीवनवृत्तांत व लेखसंग्रह' हा ग्रंथ तीन खंडात प्रसिद्ध केला. १९४७ साली शि.ल. करंदीकर यांनी 'सावरकर चरित्र' लिहिले.

प्राचीन संत कवींच्या चरित्राप्रमाणेच अर्वाचीन काळातील ग्रंथकारांची चरित्रेही प्रसिद्ध झालेली आहेत. अशा चरित्रांमधून त्यांच्या व्यक्तीचित्रणाबरोबरच यांच्या वाङ्मयीन कार्यकर्तृत्वाचाही आढावा घेतलेला दिसतो. ज्यामध्ये 'राम गणेश गडकरी यांचे चरित्र' (१९५९), 'ना.सी. फडके : व्यक्ती आणि वाङ्मय' या चरित्र ग्रंथातून त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला गेला. १९२० ते १९६० या कालखंडात स्त्री चरित्रकारांकडून फार संख्येने चरित्रलेखन झालेले दिसत नाही. १९३१ मध्ये वेणूबाई पानसे यांनी 'हरिभाऊ आपटे' यांचे चरित्र लिहिले. दुर्गाबाई जोशी यांनी 'वीर वामनराव जोशी' यांचे चरित्र १९४० मध्ये लिहिले. काशीबाई कानिटकर यांनी आनंदीबाई जोशी यांचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले आहे. एकूणच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची चरित्रे १८७४ ते १९६० या काळात प्रसिद्ध झालेली आहेत. काळाबरोबर बदललेली राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती, घडत गेलेले बदल व त्यानुसार त्या-त्या कालखंडात उल्लेखनीय असे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व उल्लेखनीय कार्य केलेल्या महनीय व्यक्तींबद्दल, त्यांच्या जीवन कार्याबद्दलचा विस्ताराने आढावा चरित्र लेखनातून लेखकांनी घेतलेला दिसतो.

munotes.in

### ४.३.४ आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचा परिचय :

नाटक, कविता, कादंबरी, ललितगद्य या साहित्यप्रकारांबरोबरच चरित्र या साहित्यप्रकाराचा काहीसा परिचय आपल्याला झालेला आहे. आता 'आत्मचरित्र' या साहित्यप्रकाराचा परिचय करून घेताना या साहित्यप्रकाराची संकल्पना, त्याचे काही मूलभूत घटक, त्याची वैशिष्ट्ये व त्याचा इतिहास याविषयीची चर्चा अपेक्षित आहे. अर्थातच या साहित्यप्रकाराची ओळख करुन घेतानाच आत्मचरित्र लेखकांची मराठीतील परंपरा आपण विचारात घेणार आहेत. त्या दृष्टीने विद्यार्थांना या साहित्यप्रकारची तोंड ओळख करून देणे, त्याच्या स्वरूप-विशेषांची चर्चा करणे महत्त्वाचे ठरेल.

प्रस्तुत विषयाची मांडणी करताना पुढील काही मुद्दे विचारात घेतले आहेत.

१) आत्मचरित्र : एक गद्यात्मक साहित्यप्रकार.
२) आत्मचरित्र : या संज्ञेचा / संकल्पनेचा अर्थ.
३) आत्मचरित्र या साहित्यप्रकाराचे स्वरूप.
४) आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणा.
५) आत्मचरित्राचे घटक - विषय.

### १) आत्मचरित्र : एक गद्यात्मक साहित्यप्रकार :

साहित्यप्रकार म्हणजे साहित्याचे वर्गीकरण होय. कथा, कविता, कादंबरी, नाटक, ललितगद्य, चरित्र-आत्मचरित्र, विनोद असे ललित साहित्याचे प्रकार-उपप्रकार रूढ आहेत.

प्रा. गो. मा. पवार यांच्या मते, साहित्यप्रकार ही संकल्पना स्थिर नव्हे. काळाप्रमाणे, गरजेप्रमाणे, अभिरुची प्रमाणे ती बदलत आलेली आहे. एकेक साहित्यप्रकार घेतला तरी त्या संकल्पनेच्या आशय-मांडणीत बदल होत गेलेला दिसतो. आत्मचरित्र हा एक स्वतंत्र साहित्यप्रकार मानावा की मानू नये याबाबत अभ्यासकांमध्ये मात्र मतभेद आहेत. कथा, कविता, कादंबरी,नाटक यांच्यासारखाच हा साहित्यप्रकार आहे का? त्याचे म्हणून वेगळेपण कोणते? त्याची स्वरूप-वैशिष्ट्ये काय आहेत? यासारखे प्रश्न उपस्थित होतात. याबाबत भूमिका मांडताना उषा हस्तक म्हणतात, आत्मकथन-आत्मचरित्र हा साहित्यप्रकार मानण्याकडे काही अभ्यासकांचा कल आहे तर काहींच्या मते, आशय, रचना, मांडणी व भाषाशैली यादृष्टीने या साहित्यप्रकाराचे कोणतेही निश्चित संकेत निर्माण न झाल्यामुळे त्याला साहित्यप्रकाराचे स्वरूप प्राप्त झालेले नाही. शिवाय सर्जनशील लेखनामागे जशा वाङ्मयीन प्रेरणा-जाणिवा असतात तशा आत्मचरित्रपर लेखनातून त्या जाणवत नाहीत.

डॉ. आनंद यादव आपल्या 'आत्मचरित्र मीमांसा' या ग्रंथात म्हणतात, आत्मचरित्र हा साहित्यप्रकार आपण मानला तरी ललित साहित्याचे स्वरूप जसे कल्पित वास्तव या प्रकाराचे असते तसे आत्मचरित्र-आत्मकथनाचे स्वरूप नसून ते प्रत्यक्षातील वास्तव या स्वरूपाचे असते. शिवाय वाङ्मयीन कलात्मक भाषाशैली आत्मचरित्रपर लेखनात अपेक्षित नसते. म्हणून हा साहित्यप्रकार वास्तववादी ठरतो. बऱ्याचदा तो ललित गद्याचा एक उपप्रकार मानला जातो.

### २) आत्मचरित्र : या संज्ञेचा / संकल्पनेचा अर्थ :

आत्मचरित्रपर लेखन अनेक नावांनी आपल्यासमोर येते. 'आत्मचरित्र', 'आत्मकथन', 'आत्मकथा', 'आत्मनिवेदन', 'स्वकथन' अशा संज्ञा त्यासाठी वापरल्या जातात. भारतीय प्राचीन किंवा मध्ययुगात 'आत्मचरित्र' ही वाङ्मयीन संकल्पना भारतीय साहित्यात नव्हती. 'चरित्र' किंवा 'चरित' ही संकल्पना मात्र रूढ असलेली दिसते. पुढे १९ व्या शतकाच्या मध्यापासून मराठीत या वाङ्मयप्रकारात लेखन होऊ लागले. इंग्रजीत 'ऑटोबायोग्राफी' हा शब्द त्यासाठी रूढ आहे. त्याचा अर्थही 'स्वतःच स्वतःच्या जीवनाचा काढलेला आलेख' असाच होतो. त्यालाच मराठीत आत्मचरित्र हा शब्दप्रयोग रूढ झाला आहे. 'आत्मचरित्र', 'आत्मकथन', 'आत्मकथा' या एकाच प्रकारच्या संज्ञा वाटत असल्या तरी त्यात अर्थपूर्ण अशा भिन्न छटा आहेत. त्यामुळे आत्मचरित्रपर लेखनाचे जे अनेक प्रकार संभवतात ते एकमेकास पूरक असले तरी ते एकमेकांचे पर्याय ठरु शकत नाहीत.

यासंदर्भात असेही म्हटले जाते की, आत्मचरित्र हे सर्वसाधारणपणे उतार वयात लिहिले जाते. मात्र आत्मकथन लिहिण्याचे वय निश्चित करता येत नाही. ते लेखकसापेक्ष असते. म्हणजे त्याचा निर्णय घेण्याचे स्वतंत्र लेखकाला असते. दलित साहित्य प्रवासात विपुल आत्मकथने लिहिली गेली. त्यातून मराठीत 'आत्मकथन' ही संज्ञा रूढ झाली आहे. एरवी आत्मचरित्र हीच संज्ञा वापरात होती. 'आत्मकथा', 'आत्मनिवेदन', 'आत्मस्मृती' इ. संज्ञा आत्मकथन या संज्ञेला पर्याय म्हणून वापरल्या जातात. 'आत्मशोध' ही संज्ञाही या प्रकारच्या लेखनासाठी

वापरली जाते. त्याचा अर्थ 'स्वतःचा शोध', 'स्व'चा शोध असा घेतला जातो. ज्यात 'मी' बरोबरच कुटुंब, समाज, संस्कृती, जीवनमूल्ये यांचाही संदर्भ येतो.

डॉ. सदा कऱ्हाडे यांनी 'आत्मकथा' ही संज्ञा वापरली असून ती आत्मचरित्र या संज्ञेचीच पर्यायी संज्ञा असल्याचे म्हटले आहे. अशोक पाटील यांनी मात्र 'स्वकथन' हा काहीसा वेगळा शब्दप्रयोग त्यासाठी वापरला आहे. डॉ. यशवंत मनोहर यांनी 'स्वकथन' संज्ञेचा पुरस्कार करताना दलित आत्मकथनांचा संदर्भ दिला आहे. अभ्यासकांमध्ये या संज्ञेबाबत वरीलप्रमाणे मतभेद असले तरी 'आत्मकथन' ही संज्ञा आज सर्वमान्य झालेली दिसते. डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. चंद्रकुमार नलगे या अभ्यासकांनीही हीच संज्ञा मान्य केली आहे. म्हणूनच ती उचित, आशयपूर्ण व अर्थवाही वाटते.

एकूणच आत्मपर लेखनासाठी अशा विविध संज्ञा विचारात घेताना त्यातील सूक्ष्म भेदही लक्षात घ्यायला हवेत. वेगवेगळ्या संज्ञा या लेखनप्रकारासाठी वापरल्या जात असल्या तरी त्या सर्वांचा मूलाधार 'मी' हाच असतो. हे मात्र निश्चित. या साहित्यप्रकारची तात्त्विक चर्चा करताना त्यातील लालित्य, कल्पकता, लेखनामागील भूमिका, वास्तवता, सर्जनशीलता या आधारे त्याचा विचार होणे अपेक्षित आहे, असे वाटते.

**३) आत्मचरित्र या साहित्यप्रकाराचे स्वरूप :**

मराठी साहित्यात आत्मचरित्र, आत्मकथन या साहित्यप्रकाराचे स्वतंत्र स्थान आहे. त्याला प्रदीर्घ अशी परंपराही आहे. शिवाय या साहित्यप्रकाराकडे वाचकांचा कल अधिक झुकू लागलेला आहे. आत्मकथनांचे वाचन करणारा वाचकवर्ग वाढतो आहे. त्याचे कारण समाजातील सामान्य व्यक्तींपासून ते असामान्य कार्यकर्तृत्व करणाऱ्या व्यक्तींच्या लेखन कृतीतून मानवी मनाची व मानवी जीवनाची जी अनेकरंगी रुपे व्यक्त होतात. ती वाचकांना प्रेरणादायी व महत्त्वाची वाटतात. ज्यातून वाचनाचा अलौकिक आनंद तर मिळतोच पण त्याचबरोबर प्रोत्साहन मिळते, बोध घडतो. खऱ्या अर्थाने 'विचारविवेक' जागृत होण्यास मदतही होते. त्यामुळेच आत्मकथनपर ग्रंथांची मराठी साहित्यात सातत्याने भर पडते आहे.

डॉ. आनंद यादव 'आत्मचरित्र' या साहित्यप्रकारचे स्वरूप स्पष्ट करताना असे म्हणतात -

मी माणूस या नात्याने माझ्या जीवनात जी काही आजवर वाटचाल केली त्या वाटचालीतील माझी स्थितीगती म्हणजे सुख-दुःख, आशा-आकांक्षा, विकास-विस्तार, भाव-सत्ये, कृती-कर्मे, यशापयश, धडपड, यांचा 'मी' ला केंद्रस्थानी धरुन काढलेला आलेख म्हणजे आत्मचरित्र, आत्मकथन असते.

मराठी आत्मचरित्रपर लेखन करणाऱ्या व्यक्तींमध्ये राजकीय क्षेत्रातील व्यक्ती, समाजसेवक, डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, वकील, न्यायाधीश, पोलिस अधिकारी, उद्योजक, खेळाडू, पत्रकार, नाट्य व सिनेकलावंत, लेखक, वैज्ञानिक अशा भिन्न-भिन्न क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश होतो. 'आत्मकथन लिहिणारी व्यक्ती सर्वसाधारणपणे आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व त्या अनुरोधाने आपल्या व्यक्तिमत्वाचे लेखनरुपाने दर्शन घडविते' असे विवेचन प्रा. रा.ग. जाधव यांनी मराठी विश्वकोशात (खंड-२) केले आहे.

या साहित्यप्रकाराचे स्वरूप लक्षात घेताना असे लक्षात येते की, आत्मचरित्राचे केंद्र लेखक स्वतःच असतो. त्या व्यक्तीचे जीवनदर्शन तर त्यातून घडतेच पण त्याचवेळी त्या काळातील मानवी मनाचा इतिहास समजून घेण्याच्या दृष्टीने ते आत्मकथन उपयुक्त ठरते. आत्मकथनातून त्या समाजस्थितीत व्यक्तींच्या वाट्याला आलेले समाजजीवन, त्यातील ताणतणाव, संघर्ष याचे आविष्करण त्यातून घडत असते. 'विशिष्ट व्यक्तीची ती जीवनकथा असली तरी सर्व बाजूंनी शोषण झालेल्या समाजाचे चित्रही त्यातून व्यक्त होत असते' हे डॉ. भालचंद्र फडके यांचे मत महत्त्वाचे ठरते.

**४) आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणा :**

आत्मचरित्र का लिहिले जाते? त्यामागील प्रेरणा कोणत्या? याबाबत विचार करता आत्मचरित्र हे साधेसुधे निर्मळ आत्मनिवेदन असते, असे म्हणता येईल. लेखकाला आपल्या जीवनाची कहाणी, आपले अनुभव, आपली सुख-दुःखे, आपले यशापयश सांगायचे असते.

मालतीबाई बेडेकर यांच्या मते, "आत्मचरित्रे तेव्हांच लिहिली जातात, जेव्हा लेखक-लेखिकेला आपल्या आयुष्यात काहीतरी सांगण्यासारखे आहे असे वाटते. कधी स्वतःच्या कर्तबगारीचा अभिमान असतो तर कधी स्वतःच्या दुःखाची, संघर्षाची, अन्यायाची तीव्र जाणीव झालेली असते."

आत्मकथन-आत्मचरित्र लेखनामागील प्रमुख प्रेरणा ही आत्मशोधाची असते. हा शोध कधी पुरेशा प्रामाणिकपणे, मनःपूर्वकतेने घेतला जातो तर कधी आयुष्यातील संस्मरणीय घटनांच्या निवेदनावरच अधिक भर दिला जातो. आत्मपरीक्षण, वर्तनामागील कारणमीमांसा, त्यांचे विश्लेषण, आत्मसमर्थन या प्रेरणाही अशा लेखनामागे असतात. आपल्या जीवनाचा आदर्श समाजासमोर ठेवून तरुण पिढीकडून, वाचकांकडून, समाजाकडून त्याचे अनुकरण व्हावे ही प्रेरणाही त्यामागे असते. शिवाय वाचकांना त्यातून प्रोत्साहन मिळावे. अशी अपेक्षाही ध्वनित होते. आत्मकथने इतर कोणत्याही प्रेरणेने लिहिली जात असली तरी त्या-त्या काळातील मानवी समाजाचा इतिहास समजून घेण्याच्या दृष्टीने कच्ची सामग्री म्हणून ती महत्त्वाची ठरतात, असे म्हणता येईल.

विशेषतः आपल्या जीवनाचे महत्त्वाचे सूत्र विशद करणे ही प्रेरणा येथे अधिक महत्त्वाची ठरते. 'आत्मप्रेम' ही माणसाच्या जीवनाची मूलभूत प्रेरणा बऱ्याच आत्मकथनांमध्ये प्रभावी ठरलेली आहे.

**५) आत्मचरित्राचे घटक - विषय :**

आत्मचरित्राच्या विषयाचे मूळ स्वरूप हे आत्मशोध घेणे, तो कलात्मक पद्धतीने विशद करणे हे असते. 'मी'चे मानवी जीवन अचूकपणे सांगणे, जीवनाचे स्व-स्वरूप शोधणे हा आत्मकथनाचा विषय असतो. त्यासंदर्भात काही घटक सांगता येतील.

**आत्मचरित्राचे घटक :**

१) 'मी' / 'स्व' चे सत्यकथन

२) वास्तवता

३) सभोवतालची माणसे (व्यक्तीदर्शन)

४) घटना - घडामोडींचे प्रसंगचित्रण

५) संवाद व भाषाशैली

६) वातावरण निर्मिती

कोणत्याही आत्मचरित्रपर लेखनाचा अविभाज्य घटक म्हणजे त्या अनुभवांचे निवेदन करणारा 'मी' हा असतो. आत्मकथन हे 'मी' ने जीवनभर केलेल्या वाटचालीचे, जीवनप्रवासाचे सचित्र दर्शन असते. आपली झालेली जडणघडण, अनुभव, विचार, जाणिवा, मूल्य याबाबतचे यशापयश सत्यकथनातून लेखक सांगत असतो. त्यामुळे साहजिकच त्यात वास्तविकता येते. जे घडले ते जसेच्या तसे सांगण्याचा हेतू त्यामागे असतो.

स्वतःबरोबरच सभोतालची माणसे, समाज, निसर्ग यांचेही चित्रण आत्मकथनातून व्यक्त होत असते. आत्मदर्शना बरोबरच व्यक्तिदर्शन-समाजदर्शन घडवण्याचा प्रयत्न लेखकाकडून होतो. व्यक्तीचे निसर्ग व त्याच्याशी जे संबंध प्रस्थापित होतात, त्यालाही शब्दरूप देण्याचा प्रयत्न आत्मकथनातून होतो. जीवनाची ही वाटचाल, हा प्रवास केवळ एकट्याचा असत नाही. आयुष्याच्या विविध टप्प्यावर मागे वळून पाहताना जाणवलेल्या भावसत्याचा तो आलेख असतो. त्यामुळे त्यात स्वतःबरोबरच सभोवताली माणसे, लाभलेली परिस्थिती, जीवनातील चढउतार या बाबीही त्यात नकळत येतात. किंबहुना त्या यायलाच हव्यात, कारण ज्या काळात व्यक्तीच्या जीवनजाणिवा घडल्या त्या काळाचे संदर्भही वाचकांसमोर येणे गरजेचे असते.

आत्मचरित्रातील घटना-घडामोडीचे चित्रण हे त्याला जिवंतपणा प्राप्त करुन देत असते. स्वतःशी संवाद साधतानाच लेखक वाचकांशी नकळतपणे संवाद करत असतो. निवेदकाच्या भूमिकेतून हे सर्व कथन करतांना वाचकांना खिळवून ठेवण्याची क्षमता या लेखनात असते. म्हणूनच आत्मकथेने वाचकप्रिय ठरतात.

### ४.३.५ आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारी स्वरूप - वैशिष्ट्ये :

कविता, कथा, कादंबरी, नाटक या प्रत्येक साहित्यप्रकारचा तात्त्विक / सैद्धांतिक विचार करताना त्या-त्या साहित्यप्रकाराची म्हणून काही खास स्वरूप - वैशिष्ट्ये सांगितली जातात. त्या दृष्टीने आत्मचरित्र या साहित्यप्रकारची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१. 'स्व-रुपाची गद्यात्मक अभिव्यक्ती' हे आत्मचरित्र या साहित्यप्रकारचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये होय. त्याचे हे महत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षणच होय. असे म्हणता येईल.

२. आत्मचरित्रातून लेखक आपली जीवनकहाणी सांगत असल्याने त्यात विश्वासार्हता व जवळीक अधिक असते.

३. आत्मचरित्र लिहिणारा लेखक / लेखिका 'कालच्या' जीवनाबद्दल लिहीत असतो. तो गतकाळ त्याच्यासमोर असला तरी त्यात एक चैतन्य, एक आत्मशोध असल्याने तो वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.

४. व्यक्तिदर्शनाबरोबरच आत्मचरित्रातून व्यापक अशी कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यात्मकता त्यातून व्यक्त होते. चरित्रात्मक आपले जीवनानुभव कथन करीत असला तरी सामाजिक - सांस्कृतिक संदर्भाशिवाय ते व्यक्त होत नाहीत.

५. सत्यकथन व वास्तवता हे आत्मचरित्राचे महत्त्वाचे विशेष आहेत. जसे घडले तसे सांगण्याचा प्रयत्न व वस्तुस्थितीदर्शक भूमिका चरित्र लेखकाची असते.

६. इतर वाङ्मय प्रकारांसारखा कल्पनाविलास, सौंदयदर्शन या घटकांना त्यामुळे आपोआपच थोडे दूर ठेवले जाते.

७. 'अनुभव विश्वाचे प्रकटीकरण' आत्मचरित्र या साहित्यप्रकारात महत्त्वाचे मानले गेले असल्याने आपोआप इतर घटकांना फार महत्त्व न देता एक कलाकृती म्हणून तिला वाचकांकडून महत्त्व दिले जाते.

८. आपल्या जीवनविषयक अनुभवाचे व व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखक / लेखिकेने घडवलेले दर्शन म्हणजे त्याचे आत्मकथन असते.

९. आत्मचरित्रपर लेखनामागे आत्माविष्काराची प्रेरणा असल्याने आत्मजीवनाबद्दलची अर्थपूर्णता, स्वनुभावातील निवडीची दृष्टी, लेखनविषयक भान ही या लेखन प्रकाराची वैशिष्ट्ये ठरतात.

१०. आत्मचरित्राचे केंद्र लेखक स्वतःच असतो. तरीही स्वतःच्या जीवनाचे अलिप्तपणाने घडवलेले ते दर्शन असते. तसे ते असावे ही अपेक्षा असते. अशा लेखनात लेखक मानसशास्त्रीय दृष्ट्या स्व-पासून वेगळा होऊन घडलेल्या घटनाप्रसंगाकडे तटस्थपणे पाहू शकतो.

११. आत्मचरित्रपर लेखनाचे जे अनेक प्रकार संभवतात ते एकमेकांस पूरक असले तरी एकमेकांचे पर्यायी ठरू शकत नाहीत. त्यातील प्रत्येक लेखन प्रकार दुसऱ्यांपेक्षा वेगळा असल्याचे जाणवते.

१२. आत्मचरित्रपर लेखन करणारी व्यक्ती रूढ अर्थाने साहित्यिकच असते असे नाही. रंगभूमी, ललितकला, क्रीडा, विज्ञान, राजकारण, समाजसेवा या क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींनीही आत्मचरित्रपर लेखन केलेले आहे. विविध जाती-जमातींतीलच नव्हे तर विविध धार्मिक समाजगटांमधूनही आत्मचरित्रे - आत्मकथने लिहिली गेली आहेत. यातून विविध प्रादेशिक गट, त्यांच्या बोलीभाषा, विविध वयोगट व त्यांची बदलती जीवनदृष्टी यांचा समन्वय एकप्रकारे घडत गेला. विविध स्त्री-पुरुषांनीही या लेखनप्रकारातून आपल्या अनुभवाला शब्दरूप दिले आहे. काही आत्मकथनांच्या बाबतीत 'शब्दांकन' हा पर्यायही स्वीकारलेला आहे.

### ४.३.६ आत्मचरित्र लेखकांची मराठीतील परंपरा

आत्मचरित्र हा एका दृष्टीने सोपा व दुसऱ्या दृष्टीने अतिशय कठीण असा लेखन प्रकार आहे. आत्मचरित्राचा विषय स्वतः लेखकाचे जीवन असल्यामुळे त्या संबंधीची माहिती. संदर्भ, घटना-घडामोडी यांची नेमकी माहिती लेखकाशिवाय दुसऱ्या कोणालाही असत नाही. त्यामुळे आत्मचरित्र लेखनामध्ये एक प्रकारची वस्तुनिष्ठता येते. चिंतनशील दृष्टिकोनातून व अंतर्मुख भावनेने आपल्या पूर्वायुष्याकडे डोकावून पाहताना लेखक घडून गेलेल्या घटना-घडामोडी, प्रेरणादायी अनुभव, जीवनाची वाटचाल याबद्दल तटस्थ भूमिकेने आत्मचरित्र लेखनात स्वतःला

व्यक्त करीत असतो. स्वतःच्या जीवनानुभवाचे, व्यक्तिविकासाचे चित्रण करणे ही तशी पाहिली तर आव्हानात्मक आणि कठीण गोष्ट आहे. तटस्थ भूमिकेतून स्वतःकडे बघणे हे एवढे सोपे नसते. जे आत्मचरित्रातून लेखकाला साधायचे असते. म्हणूनच आत्मचरित्र लेखनामध्ये कठीणपणा असतो, असे म्हणता येईल.

आत्मचरित्रातून आपले अनुभव कथन करुन ठेवण्याची प्रथा व परंपरा मराठीमध्ये नवीन नाही. आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार प्रगत स्वरूपात इंग्रजी कालखंडात सुरू झाला असला तरी त्याच्याही आधी संत नामदेव, संत तुकाराम, बहिणाबाई यांनी प्रसंगपरत्वे आत्मपरलेखन केलेले आहेत. इतिहास काळातही अशा प्रकारचे आत्मवृत्तपर लेखन झालेले आपल्याला दिसते. ज्याला खऱ्या अर्थाने आत्मचरित्र म्हणता येईल असे पहिले लेखन आद्य मराठी व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांचे 'आत्मचरित्र' हा ग्रंथ केव्हा लिहिला गेला हे नक्की सांगता येत नाही. इ.स. १८६८ पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १८८२ पर्यंत या ग्रंथात दादोबा थोडी थोडी भर घालत गेले आहेत असे दिसते. १८८७ च्या सुमारास लिहिलेले 'अरुणोदय' हे बाबा पद्मनजी यांचे आत्मचरित्र वाचनीय आहे.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस न्या. रानडे यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनी सहजीवनातल्या आठवणी 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या नावाने १९१० साली ग्रंथरूपाने प्रसिद्ध केल्या. पुढे १९२७ मध्ये 'माझी जन्मठेप' हे वि.दा. सावरकर यांचे आत्मचरित्र, लक्ष्मीबाई टिळक यांनी लिहिलेली 'स्मृतिचित्रे' (१९३४), ल.रा. पांगारकर यांचे 'चरित्रचंद्र' (१९३८) आणि न.चि. केळकर यांचे 'गतगोष्टी' (१९३९) ही महत्त्वाची आत्मचरित्रे ठरतात.

पुढील काळात श्री. कृ. कोल्हटकर यांचे 'आत्मवृत्त' (१९३५) ना.सी. फडके यांचे 'माझ्या साहित्य सेवेतील काही स्मृती', य.गो. जोशी यांचे 'दुधाची घागर' (१९५५) अशी महत्त्वाची आत्मचरित्रे लिहिली गेली. श्री. म. माटे यांनी लिहिले 'चित्रपट : मी व मला दिसलेले जग' (१९५७) हे एक नमुनेदार आत्मचरित्र आहे. शिक्षण व समाजकार्यात श्री. म. माटे यांना आलेले बरे - वाईट अनुभव त्यांनी या ग्रंथात सांगितलेले आहेत. याचबरोबर कर्मवरी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'माझ्या आठवणी व अनुभव' या आत्मचरित्रात ग्रंथरूपाने प्रसिद्ध केल्या.

एकूणच आत्मचरित्र लेखनाची ही परंपरा मराठीत प्रदीर्घ स्वरूपात आपल्याला दिसते. मराठीत स्त्रियांनी लिहिलेली चरित्रे फार थोडीच आहेत परंतु आत्मचरित्र लिहिण्याची प्रवृत्ती मात्र स्त्रीलेखिकांमध्ये अलीकडे वाढीस लागलेली दिसते. अनेक स्त्रियांनी आपल्या आयुष्यातल्या आठवणींना आत्मचरित्राच्या रूपाने ऊजाळा दिलेला दिसतो. या सर्व आठवणी शब्दरुप करण्याचा प्रयत्न स्त्रीआत्मचरित्र लेखिकांनी केलेला आहे. एकूणच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्या पूर्व आयुष्यातल्या आठवणींना शब्द रूप देण्यासाठी हाताळलेला आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यात त्या-त्या टप्प्यांवर नावारूपाला आलेला दिसतो. आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार अधिकाधिक लोकप्रिय होत असल्याचे ते चिन्ह होते.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) चरित्र आणि आत्मचरित्रातील फरक स्पष्ट करा.

## ४.४ समारोप

थोडक्यात, चरित्र-आत्मचरित्र हे साहित्यप्रकार मराठी साहित्य परंपरेत वेगवेगळ्या कालखंडात अनेक अंगाने विकसित होत गेले. त्या-त्या टप्प्यांवर अनेक संदर्भात समकालीन परिस्थिती व साधनांच्या आधारे चरित्र-आत्मचरित्रकारांनी या साहित्यप्रकारात मोलाचे योगदान दिले. काळाबरोबर अनेक अंगांनी हे दोन्ही साहित्यप्रकार विकसित होत गेल. इतकी विविधता या साहित्यप्रकारात आहे. विपुल लेखन या दोन्ही साहित्यप्रकार झालेले आहे. अनेक अभ्यासकांनी तसा प्रयत्नही केलेला आहे. या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्यपूर्णता व त्याचे वेगळेपण शोधणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते.

## ४.५ पूरक अध्ययन / अधिक वाचनासाठी पुस्तके


१. भागवत, श्री. पु. (संपा.) : 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार' - मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८७.

२. गोखले, द.न. : 'चरित्र-चिंतन' - मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २०००.

३. प्रदक्षिणा : खंड पहिला - (अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा) - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९४१.

४. हस्तक, उषा, 'मराठीतील आत्मचरित्रपर लेखन' - स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, पहिली आवृत्ती, २००६.

५. डॉ. यादव, आनंद : 'आत्मचरित्रमीमांसा' - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पहिली आवृत्ती, १९९८.

६. डॉ. कुलकर्णी, व. दि. : 'मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक' - पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २००१.

७. डॉ. जाधव, मनोहर : 'दलित स्त्रियांची आत्मकथने : स्वरूप आणि चिकित्सा' - सुविधा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २००१.

८. 'मराठी विश्वकोश'- खंड - २, marathivishwakosh.maharashtra.gov.in - वेब आवृत्ती.


munotes.in

## ४.६ नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. चरित्र-आत्मचरित्र या साहित्यप्रकाराची स्वरूप - वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करा.

२. चरित्र - आत्मचरित्र या साहित्यप्रकारांची संकल्पना स्पष्ट करुन त्या मागील प्रेरणा थोडक्यात विशद करा.

३. गद्य साहित्याचा एका महत्त्वाचा उपप्रकार म्हणून चरित्र-आत्मचरित्र या साहित्यप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा.

४. आत्मचरित्र ही संज्ञा स्पष्ट करुन त्याबाबत असलेली विविध मतमतांतरे याबाबत थोडक्यात चर्चा करा.

५. आत्मचरित्र हा मराठीतील एक महत्त्वाचा गद्यात्मक साहित्यप्रकार आहे, या विधानाची चर्चा करा.

**ब) टिपा :**

१. चरित्र-आत्मचरित्र या संज्ञा / संकल्पनांचा अर्थ

२. आत्मचरित्र एक गद्यसाहित्य उपप्रकार

३. आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणा

४. मराठीतील सुरूवातीची चरित्रे

५. आत्मचरित्रातील 'मी' चे स्वकथन

❖❖❖❖

**एम.ए. भाग - १, सत्र - १**

**मराठी अभ्यासपत्रिका क्र. ३**

**मराठी वाङ्मयाचा इतिहास - १,**

**परीक्षा स्वरूप**

**अ) अंतर्गत चाचणी परीक्षा - ४० गुण**

**आ)सत्रांत परीक्षा - ६० गुण**

**नमुना प्रश्नपत्रिका** **(एकूण गुण : ६०)**

**सूचना :** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
३) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र. १ अ) १८७४ ते १९२० या काळातील मराठी निबंधाचे स्वरूप स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

आ) सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीतील मराठी निबंधाचा आढावा घ्या.

प्र. २ अ) रविकिरण मंडळातील कवी व त्यांच्या कवितेचे स्वरूप स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

आ) १८८५ ते १९२० या कालखंडातील कवी व कवितांचे स्वरूप, वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

प्र. ३ अ) श्री. व्यं. केतकर यांच्या कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

आ) फडके - खांडेकर यांच्या कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करा.

प्र. ४ अ) चरित्र-आत्मचरित्र या साहित्यप्रकाराचे स्वरूप व वैशिष्ट्ये सांगा. **(१५)**

**किंवा**

आ) आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणा स्पष्ट करून आत्मचरित्रातील 'मी' चे स्वकथन याचे स्पष्टीकरण द्या.

❖❖❖❖

munotes.in